# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १८/०९/२००३

आज दि. १८/०९/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०६ दि. १०/०९/२००३ रोजीच्या विषय पत्रिकेवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती |
| ३) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ४) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ५) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ७) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ८) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| ९) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १०) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १२) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १३) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १४) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १५) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १६) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १७) | श्रीम. गोहिल शानू | सदस्या |
| १८) | श्री. मदन उदितनारायण सिंग | सदस्य |
| १९) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २०) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २१) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २२) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २३) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २४) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २५) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २६) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २७) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २८) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| २९) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | सदस्य |
| ३०) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३१) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे<br>उर्फ<br>शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३२) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३३) | श्री. आत्माराम बाळाराम गावंड | सदस्य |
| ३४) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३५) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३७) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३८) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ३९) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४०) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४१) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४२) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४३) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४४) | श्री. मेंडोसा स्टीवन जॉन | सदस्य |
| ४५) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४६) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ४७) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४८) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ४९) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ५०) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५१) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ५२) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५३) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५४) | श्री. मॉरस जोजेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ५५) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ५६) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ५७) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५८) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६०) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६१) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६२) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |
| ६३) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६४) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६५) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६६) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ६७) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६८) | श्रीम. रक्षा एस. शाह | सदस्या |
| ६९) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ७०) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७१) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. परेरा टेरी पॉल | नामनिर्देशित सदस्य |

## <u>अनुपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| २) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | गटनेता |
| ३) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |

## रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद मुझफ्फर हुसेन | उपमहापौर |
| २) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्ष नेता |
| ३) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ५) | श्री. घोन्सालविस जोजफ जॉन | सदस्य |

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त, विरोधी पक्षनेते व उपायुक्त तसेच उपस्थित सदस्य व मनपा अधिकारी, पत्रकार बंधु आपल्या सर्वांचे स्वागत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर पदास मला दि. २८/०८/२००३ रोजी एक वर्ष पुर्ण झाले. या एक वर्षात आपण सर्वांनी मला जे सहकार्य व मानसन्मान दिला त्या बद्दल मी आपली आभारी आहे. या एका वर्षात जी जनहिताची कामे करता आली. तरी यापुढेही जनहिताच्या कामासाठी व शहराच्या सर्वांगीण विकासाकरिता आपण मला असेच सहकार्य कराल अशी अपेक्षा करते.

गेले काही दिवस मी आजारी असताना आपण सर्वांनी माझे आरोग्य चांगले राहणे कामी ज्या सदीच्छा दिल्या त्याबद्दल मी आपली आभारी आहे. मागील पंधरवड्यात गणेशोत्सव मोठ्या आनंदात व शांतते पार पडला. तसेच श्रीगणरायाचे विसर्जनकरिता प्रशासनाने चोख व्यवस्था केली होती तसेच पोलिसांनीही शहरात कायदा व सुव्यवस्था चांगल्याप्रकारे राखलेली आहे. तसेच सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी देखील विशेष मेहनत घेऊन प्रशासनाला सहकार्य केल्याबद्दल सर्वांच्या वतीने मी धन्यवाद देते.

पुढील आठवड्यात होणाऱ्या नवरात्र उत्सवाकरिता आपणांस व सर्व शहरवासियांना हार्दिक शुभेच्छा. मा. प्र. सचिवांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

**प्र.सचिव :-**

आजच्या सभेपुढे आलेले रजेचे अर्ज वाचुन दाखवित आहे. सन्मा. सदस्य श्री. जोजफ जॉन घोन्सालविस, श्री. अशोक बळवंत पाटील, श्री. मुझफ्फर हुसेन, श्रीम. हेलन जोर्जी गोविंद, श्री. परशुराम दामोदर पाटील या सदस्याचे रजेचे अर्ज आलेले आहेत.

**धुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त सो।, उपस्थित सगळे नगरसेवक बंधु भगिनींनो आज आपल्या येथे महापालिकेची सभा होत आहे आणि वर्षभर एक वर्षे महापौर या नात्याने मा. मायरा मॅडम यांनी तसेच सर्व उपस्थित नगरसेवक एक वर्षभर जे मा. महापौरांनी चांगले काम केले आणि सर्व सन्मा. नगरसेवकांनी त्यांना साथ दिली त्याबद्दल मा. महापौरांचे आणि सर्व नगरसेवकांचें मी अभिनंदन करत आहे आणि तसा मी ठराव मांडत आहे.

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रथम मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्या कारकिर्दीस एक वर्ष होत आहे. मा. महापौर व मा. उपमहापौर यांनी एक वर्षभर चांगले काम केले आहे आणि सर्व सन्मा. नगरसेवकांनी त्यांना साथ दिली त्याबद्दल मा. महापौर आणि सर्व सन्मा. नगरसेवकांची ही सर्व साधारण सभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. नगरसेवक डॉ. रमेश जैन यांनी आपल्याला माहीत आहे की आपल्या देशामध्ये एकंदर चाललेल्या अतिरेक्यांचा घातपात व देशामध्ये जातीय तणाव निर्माण करण्याचे कारस्थान अशा वेळी भाईंदरच्या रस्त्याचे नामकरणाचे काम सुरु झाले. त्याबद्दल धन्यवाद सुध्दा आम्ही दिलेले आहेत. पण एका रस्त्याचे नाव ग्रामपंचायत काळापासून असलेल्या नावात बदल करून त्या ठिकाणी अन्य नाव देण्यांत आले. त्याबाबतीत मा. आयुक्त साहेब आपली भेट घेतल्यानंतर आपण ही कार्यवाही नियमाप्रमाणे केलेली आहे. असे आम्हाला सांगितले पण जनभावना समजुन या ठरावामध्ये फेरफार करावा आणि ग्रामपंचायत काळापासून जे नाव ह्या जैन मंदिराचे नाव आहे ते पुन्हा स्थापित करावे. अशी मागणी आम्ही भारतीय जनता पक्ष, अन्य जैन समाजाचे नागरिक आपल्याला भेटून सांगितले होते. त्याला आपण कबुली दिली. आपण उपायुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेब यांच्याशी फोनवर विचारून त्या रस्त्याचे जैन मंदिर मार्ग असे नाव होते का? यापुर्वी हा जैन मंदिर मार्ग नावाचे बोर्ड काढण्यात आला का? असा प्रश्न विचारला असतांना उपायुक्तांनी सर्व बाबतची जाणीव दिली आपण दोन दिवसात कारवाई करु असे स्पष्ट सांगितले त्याच्यानंतर आपण नांव बदली केले नाही तरी आम्ही पुन्हा आपल्याला भेटलो. आपण आम्हाला सांगितले की हे कायद्याने आम्हाला करता येत नाही मा. महासभेत प्रस्ताव आणावा त्यानंतर विचार केला जाईल. मा. महासभेसाठी प्रस्ताव आम्ही दि. ०४/०८/२००३ ला दिला. तरी महासभेत प्रस्ताव का आणला गेला नाही. याबाबत आम्हाला या सभागृहात खुलासा पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेपुढे एखादा प्रस्ताव आणणे ही मा. महापौरांच्या अखत्यारितील गोष्ट आहे. तुम्ही आम्हाला जे पत्र दिलेले आहे ते आम्ही मा. महापौरांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण साहेब तुम्ही त्या दिवशी स्वतः आम्हाला म्हणाले की आपण हा प्रस्ताव द्या. मी मा. महासभेपुढे आणतो आहे आज जर आपण हे सांगत असाल की मा. महापौरांनी सांगावे की असे काही विषय तुमच्या अखत्यारीत येतात किंवा नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौरांनी सांगावे असे मी बोललेलो नाही. मा. महापौरांच्या अखत्यारितील तो विषय आहे. मा. महापौरांनी तो विषय सभागृहापुढे ठेवायचा किंवा नाही त्याना जर आवश्यकता वाटली तर मा. महापौर तो विषय ठेवतील आणि त्यांना जर नाही वाटले तर नाही ठेवणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जनभावना समजून आपण त्या पद्धतीने मा. आयुक्त म्हणून मा. महापौरांनी सांगितले पाहिजे हा ज्वलंत विषय आहे. ह्या भाईंदरमध्ये पुन्हा कुठलाही धार्मिक तणाव निर्माण होऊ नये म्हणून आपण दिलेला शब्द मी पाळला. आपण सांगितले की मा. महासभा निर्णय जो निर्णय घेईल तो तुम्ही मान्य करा. आमच्याकडे काही पुरावे आहेत तसेच ग्रामपंचायत काळापासूनचे पुरावे आहेत. त्या रस्त्याचे नाव जैन मंदिर मार्ग होते. आजही आमच्याकडे पुरावे आहेत. असे पुरावे मा.महासभेमध्ये आणल्यानंतर प्रस्तावाला पुढे चालना मिळणार आहे म्हणून मा. महापौर मॅडम आपणाला विनंती आहे की हा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे का? मा. महापौर मॅडम आम्ही हा प्रस्ताव मा. आयुक्त आणि सचिवातर्फे पाठविलेला आहे. तरी हा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे का? जर आला असेल तर तो मा. महासभेपुढे येणार किंवा नाही. याची कृपया आम्हांला माहिति द्यावी अशी विनंती आहे.

**कैलासबेन जानी :-**

जैन मंदिर मार्ग क्रॉस रोड तरी हा क्रॉस रोड कुठे आला. जैन मंदिर क्रॉस रोड त्याच्यामध्ये लिहिलेले आहे उल्लेख केलेला आहे. कॉपी आमच्याकडे आहे तरी जैन मंदिर क्रॉस रोड कुठे आहे. बाप नसेल तर बेटा कुठून आला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ह्या शहरामध्ये कधी धार्मिक भावना भडकवून दंगली झालेल्या नाही आहेत आणि जर प्रशासनाचा हाच उद्देश असेल. आमचा स्पष्ट आरोप आहे. प्रशासनाचा यांच्यामध्ये हाच उद्देश असेल.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला बोलण्यास परवानगी द्या. मा. आयुक्त साहेब मागे आपण सर्व गटनेत्यांची मिटींग बोलाविली होती. सगळया पक्षाचे गटनेते होते आणि ती आपण चर्चापण केलेली होती सविस्तर चर्चा केलेली होती आणि त्या चर्चेअंती निर्णय दिला होता की सर्व गटनेत्याऐवजी जी

आपली मिटींग झालेली होती आणि तरी आपण म्हणाले होते हा ठराव पास केलेला आहे. तो बरोबर आहे आणि आपण म्हणाले होते की असे जर पुरावे असतील तर ते आम्हाला दाखवा आणि त्या हिशोबाने आपण निर्णय घेऊ. आणि जर त्याच्याकडे पुरावे असतील तर ते तुमच्याकडे दाखवतील आणि त्याप्रमाणे आपण निर्णय घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृह नेते साहेब स्वतः मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की हा ठराव झालेला आहे. ठरावाचे पुनरुपांतर करावयाचे असेल तर मा. महासभेत प्रस्ताव आणावा लागेल म्हणून पुरावे कुठे दाखवायची गरज नाही आहे. मा. महासभेत प्रस्ताव आणा आम्ही पुरावे देतो.

**मा. आयुक्त :-**

ज्यावेळी जैन मंदिर मार्ग की जेठालाल संघवी मार्ग हा विषय घेऊन जेव्हा आपण माझ्याकडे आलात. त्यावेळी त्याची पार्श्वभुमी मला माहिती नव्हती. आपण मला असे इम्प्रेशन करून दिले की त्या रस्त्याचे नाव जैन मंदिर असताना ठेकेदाराने जेठालाल संघवी मार्ग असे रंगविलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इम्प्रेशन शब्द मागे घ्या.

**मा. आयुक्त :-**

एक मिनिट आपण बोललात आता मला बोलू द्या. माझे कदाचित तसे इम्प्रेशन झाले असेल आपण नसेल करून दिले. माझेच झाले असेल. त्यावेळेला मला असे वाटले की कदाचित कॉन्ट्रक्टरने रंगविताना चुक केली असावी म्हणून श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांना फोन केला आणि विचारले की दिलेल्या लिस्टप्रमाणेच कॉन्ट्रक्टर काम करतो आहे की स्वतःचे आणखी काही ॲडिशनल करतो आहे हे आपण तपासा. त्यावेळी श्री. नाईक साहेबांनी सांगितले की ठीक आहे साहेब माझ्याक्डे पाठवून द्या. चुक झाली असेल तर त्याच्यामध्ये मी दुरूस्ती करतो ही त्याची पार्श्वभूमी होती. त्यानंतर ज्यावेळेला हा विषय आपण माझ्याकडे उपस्थित केला आणि माझ्या लक्षात आले की, ही काही ठेकेदाराची चुक नाही आणि हा ठरावच तत्कालिन नगरपालिकेने केलेला आहे. तेव्हा हा विषय चिघळू नये म्हणून माझ्या लेवलला मा. महापौरांची तब्येत बरी नव्हती त्यामुळे गटनेत्यांची मिटींग बोलाविली होती. सन्मा. सदस्य श्री. रोहीदास साहेबसुद्धा ह्या मिटींगला हजर होते आणि सर्व गटनेते होते. तरी त्याच्यामध्ये हा विषय आम्ही चर्चेला घेतला कि जेठालाल संघवी मार्ग ठेवायचे की, जैन मंदिर मार्ग ठेवायचे आणि मग त्यानुसार पुढच्या कार्यवाही काय करायच्या. सुदैवाने तत्कालिन आपले नगराध्यक्ष आणि सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब सुद्धा योगायोगाने माझ्याकडे आले होते तरी मी त्यांना त्यावेळी विनंती केली की हा निर्णय त्या काळामध्ये घेतलेला आहे. तेव्हा आपल्याला याची पार्श्वभूमी चांगली माहिती आहे. तरी आपण या सभेला यावे आणि त्यांनी आमची विनंती मान्य केली तेव्हा त्या सभेला ते स्वतः आले. त्यांनी जो सगळा इतिहास सांगितला की हा निर्णय कशा पध्दतीने घेतला व त्या काळामध्ये कुठल्या पध्दतीने फॉर्मेलिटीज झाल्या आणि मा. महासभेमध्ये कशा पध्दतीने संमती घेण्यात आली ते सर्व राजकीय पक्षाचे एकमत या ठरावाच्या संदर्भामध्ये त्यावेळेला झालेले होते बरीचशी आपल्यापैकी मंडळी त्यावेळी नगरसेवकसुध्दा असतील मला एक्झॅक्टली माहीत नाही की त्यावेळी कोण कोण होते. परंतु हे सगळे झाल्यानंतर हे जेठालाल संघवी नाव त्या रस्त्याला द्यायचे असा निर्णय झाला. आणि हा निर्णय झाला. तर हा निर्णय बदलायचा किंवा काय करायचे तर त्या विषयावरती गटनेत्याच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन असे ठरले की जो निर्णय झालेला आहे तो तर सध्या अस्तित्वात आहे तो निर्णय आपण बदलू शकत नाही त्यावेळी अशीही चर्चा झाली होती की यांच्याअगोदर काही ग्रामपंचायतीने निर्णय घेतला होता. जो निर्णय बदलला गेला. परंतू मुळातच सन्मा. सदस्य श्री प्रफुल्ल पाटील साहेबांनी डिटेलमध्ये जाऊन चौकशी केलेली होती की ग्रामपंचायत काळामध्ये अशाप्रकारचा निर्णय झालेला नव्हता. हे देखील त्यावेळेला निर्दशनाला आले होते तरी देखील आपण दोन दिवस या बाबतीत तपासणी करु असे ठरलेले होते परंतू आज अखेर आम्हाला कुठलेही कागदपत्र मिळालेले नाही कि त्या रस्त्याला जैन मंदिर मार्ग आहे असे नांव दिले आहे एक प्रथा म्हणून काही नावे प्रचलित असतात आणि त्यानुसार बोर्ड रंगविण्याची पध्दत असते जसे आपल्याला सांगण्यात आले की काशिमिरा रोड असे आपण म्हणतो परंतू लोकांना जर म्हटले की डॉ. हेडगेवार मार्ग कोणता तर बऱ्याच लोकांना सांगता येणार नाही काशिमिरा रोड म्हटले की पटकन सांगता येते. परंतु ऑफीशीयल नाव जे आहे डॉ हेडगेवार रोड आहे तर असाच प्रकार ह्या जैन मंदिर रस्त्याच्या बाबतीत झालेले आहे त्याचे नाव जेठालाल संघवी रोड असेच दिलेल्या निर्णयाप्रमाणे होते. परंतु प्रचलित बोलण्याची जी पध्दत असते त्याच्यामध्ये काही लोकांनी पोस्टल ॲड्रेस म्हणून दुकानावरती जैन मंदिर मार्ग म्हणून जे आपण पुरावे दिले परंतु तशाप्रकारे एक परंपरा प्रचलित म्हणून तसे करायला गेलो तर तसे अनेक नावे आपल्याला बदलायला लागतील आणि ते चुकीचे होईल

म्हणून जो निर्णय तत्कालीन प्रशासनाने घेतलेला होता तो निर्णय जो पर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत त्याच्यात कुठलाही बदल करायचा नाही असे मी त्यावेळेला सांगितले आणि मला वाटते सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील साहेब यांच्या ह्या विषयाबाबत त्यांच्या भावना तीव्र होत्या परंतु आम्ही त्यांना ज्यावेळी ही वस्तूस्थिती सांगितली त्यावेळी ते ही थोडेसे कनवेंन्स झाले असे मला वाटत होते त्यानंतर मग तुमचे चार दिवसानंतर पुन्हा पत्र आहे की आम्ही आंदोलन करू वगैरे तर हा दरम्यानच्या काळामध्ये तुम्ही मला एक पत्र दिले आणि महासभेत हा विषय घ्यावा अशी विनंती केली. मा. महापौरांच्या अखत्यारीत हा विषय असल्यामुळे मी मा. महापौराकडे हा विषय फॉरवर्ड केला परंतु दरम्यानच्या काळामध्ये त्यांची तब्येत ठिक नसल्यामुळे त्यांना कदाचित त्यांच्या पुढे तो विषय आलेला नव्हता. परंतु चर्चा करून तो विषय मा. महासभेत घ्यायचा असे मला पी. ए. म्हणाले होते. परंतू कदाचित त्यांच्या त्या तब्येतीमुळे ते शक्य झालेले नसावे. तरी त्याचा खुलासा शक्यतो मॅडम स्वतः करतील पण मला तो विषय फेवरेबल रिकमेन्ड करून मा. महासभेपुढे पाठवायची कुठल्याही प्रकारची आवश्यकता वाटली नाही. तसे करणे माझ्या प्रशासनाचे प्रमुख म्हणून काम नाही कारण मुळातच कुठल्या रस्त्याला कुठले नाव द्यावे हा प्रशासनाच्या अखत्यारीतला विषय नाही. हा लोक प्रतिनिधी आणि आपण सर्वानी ठरवायचे. तर याबाबत अशी पार्श्वभूमी आहे तेव्हा कृपा करून आपण मा. महापौर मॅडम आपल्याला दोन मिनिटात सांगतील आणि त्यानंतर प्रश्नोतराच्या तासाला सुरूवात व्हावी अशी अपेक्षा आहे.

**रोहीदास शं. पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की मा. आयुक्त साहेबांनी जे निवेदन केले त्याला मी स्पष्ट आक्षेप घेत आहे. अशी नोंद व्हावी. आता हा विषय ज्यावेळी मा. आयुक्त साहेबांच्या कॅबिनमध्ये होता तोपर्यंत त्यांच्याशी संबंधित होता आणि त्यांनी जेव्हा सांगितले की गटनेत्यांची बैठक घेतली तो तेव्हा गटनेत्यांच्या बैटकीपर्यंत मर्यादित होता. आता हे सभागृह आहे आणि सभागृहामध्ये अनेक अधिकारी आणि पत्रकार किंवा बाहेर नागरिक उभे आहेत. मा. आयुक्तांनी अत्यंत जबाबदारीने निवेदन करण्याच्या ऐवजी जे हेतुपुरस्कर कलाटणी देऊन जे निवेदन केले त्याचा आक्षेप आणि मी उलगडा करतो आहे. या विषयाची पार्श्वभूमी अत्यंत पोटतिडकीने सौम्य भाषेमध्ये आम्ही मांडण्याचा प्रयत्न केला. वस्तुस्थिती ही आहे ते आम्ही पुन्हा पुन्हा सांगितले की तुम्ही दिलेल्या ऑडरनुसार ठेकेदाराने नांवे लिहायला सुरूवात केली. कदाचित तुमच्या किंवा ह्या सत्ताधारी पक्षाचा त्याच्यात दुष्ट हेतू नसेल. ह्या भाषेत आम्ही तुम्हाला निवेदन केले होते, आधीही केले होते. गटनेत्यांच्या बैठकीत सुद्धा केले होते. गटनेत्यांच्या बैठकीत करतेवेळी हे सर्व करतेवेळी ठेकेदाराला तुम्ही जी यादी दिलेली आहे तो नांव संघवी म्हणून लिहीत गेला नांव संघवी लिहिल्याबरोबर तिकडच्या लोकांच्या नागरिकांचे निवेदन तुमच्याकडे आहे. त्या प्रभागाचे नगरसेवक डॉ. रमेश जैन तुमच्याकडे आले आणि तुम्हाला सत्य परिस्थितीचे निवेदन सांगितले, अवलोकन करून दिले. सत्यपरिस्थिती काय होती ज्यावेळी हा ठराव झाला म्हणून तुम्ही म्हणता त्या ठरावाची सहा महिन्यानंतर जेव्हा अंमजबजावणी सुरू झाली. ठराव झाला ते कुणाला नक्की माहितच नव्हते. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनाही माहीत आहे ते त्या बैठकीमध्येही मी सांगितले होते पण एक होते की जेव्हा ठरावाची अंमलबजावणी सुरू झाली. त्यावेळी जनप्रक्षोप इतका झाला? तर त्याचे आयविटनेस तेव्हाचे अधिकारी आताचे उपायुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेब आहेत. मी तुम्हाला सांगितले की त्याची हजेरी घ्या त्यांची जबानी घ्या. असे न करता तुम्ही त्यांना विश्वासात घेऊन विचारा की सत्यस्थिती काय होती. आयविटनेस म्हणून आताचे उपायुक्त श्री. शिवमुर्ती नाईकजी आणि आताचे जे पी.एस.आय. आहेत निंबाळकर हे होते त्यांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न महणून ते नाव तसेच पेंडींग ठेवून तो विषय प्रलंबित ठेवला होता. तुम्ही तो ओपन असाही आम्ही दावा नाही केला पण ठेकेदारानें लिहीते वेळी ओपन केला हा विषय पेंडींग ठेवावा गटनेत्याच्या बैठकीमध्ये आणि असे जर असेल तर या सभागृहात मी पुन्हा सांगतो मा. आयुक्त साहेब तुम्ही असा कधीही प्रयत्न करु नका. मी तुम्हाला सांगून निघालो होतो की गटनेत्याच्या बैठकीमध्ये मेंजरटीवर जर असा निर्णय घेत असाल तर या सभागृहामध्ये सत्ताधारी पक्ष आम्हाला जे मान्य नसते तेच करीत असतो असे आमचे नेहमीचेच बोलणे आहे त्या निर्णयाचे काय आम्हाला नवीन नाही आहे तुम्ही अपेक्षित माणसे चार सांगितली त्या बैठकीमध्ये तुम्ही १३ टक्के केली माझ्यावतीने मी आणि सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील होते दोन लोकांनी बाजू मांडली.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौराच्या आदेशाने बोलू इच्छितो की सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी आता जे वक्तव्य मांडले की आम्ही जे मांडतो ते सत्ताधारी पक्षाला मान्य नसते हे चुकीचे वक्तव्य आहे तरी ते त्यांनी मागे घ्यावे.

**रोहिदास पटील :-**

जे काही मागे घ्यायचे ते आम्ही घेऊ मा. महापौर सांगतील तर परंतु आपण मध्ये बोलु नका. सगळ्यांना समजेल असे काही कुणाला डोक्याला ताप करून घेण्याची गरज नाही. शहरातील जी वस्तूस्थिती आहे ती समजली पाहिजे.

**याकुब कुरेशी :-**

प्रश्न तापाचा नाही. सत्ताधारी पक्ष जे करतो तेंव्हा बी.जे.पीचा विरोधच असतो मी आरोप करेन यापेक्षा.

**रोहिदास पाटील :-**

त्या बैठकीमध्ये मी स्पष्ट निवेदन केलेले होते किंवा मागणी केलेली होती की हा विषय वादाचा आहे. तरी संपूर्ण माहिती घ्या नंतरच त्याची अंमलबजावणी करा परंतू जसे बहूमताने होते त्याप्रमाणे तो तुम्हीच निर्णय काय घेतला आणि जो आम्हाला मान्य नाही आणि तो निर्णय बदलला नाही निर्णय घ्यायचा प्रश्नच नव्हता. नाव लिहून झालेले होते. आमचे म्हणणे होते की त्या नावावर व्हायटींग लावा. दुसरे नाव लिहा अगर नका लिहू  ही आमची मागणी होती. उगाच सभागृहामध्ये किंवा ऐकण्यामध्ये असे कन्फुजन व्हायला नको. मी गटनेत्याच्या मिटींगमध्ये श्री. रतन पाटील आणि रोहिदास पाटील यांनी मान्य केलेले आहे.  त्याच्यात किती प्रक्षोप भावना आहेत त्याची डेव्हलपमेंट म्हणून सांगतो की ज्यावेळी मोर्चा तेथील समाजाने नोटीस दिली त्यावेळी शहरामध्ये १४४ कलम लागला होता म्हणून पोलिसांनी एस.पी. आणि आपणही स्वतः की ह्या वेळी हा मोर्चा नसावा. त्यापेळी तो मोर्चा स्थगित आणि समाजाच्या वतीने सांगतो त्याचे कार्यक्रम लागतील तरी त्याला भारतीय जनता पार्टीचा संपूर्ण पाठींबा आहे.  परंतु निवेदन म्हाणून मी सांगतो की ह्या शहरामध्ये जे काही तुम्ही कराल ते अत्यंत जबाबदारीने करा. उगाच काहीतरी करून समाजामध्ये दुही माजवू नका याच्यामध्ये संघवी नावाबद्दल कोणीही विरोध करण्याचे कारण ही नाही आहे पण त्या रस्त्याचे प्रचलित असलेले नाव नगरसेवक श्री. मिलन पाटील यांचे तुम्ही बोर्ड बघा.  त्यांच्या बोर्डावर जैन मंदिर मार्ग असे लिहिलेले आहे.  तेथील सर्व दुकानावरचे तुम्ही बोर्ड बघा, त्या सगळ्यावर जैन मंदिर मार्ग असेच लिहिलेले आहे.  तुमच्य कॉन्फरन्समध्ये महापालिकेच्या कामकाजाच्या जे जे काही कागदपत्र आहेत ते जैन मंदिर मार्ग म्हणूनच नोंद आहे.  पण ते त्यावेळी करतेवेळी जो ठराव केलेला आहे त्याची अंमलबजावणी, त्याचा तुम्ही प्रयत्न केला? अंमलबजावणी करावयाच्या प्रयत्नानंतर झालेले डेव्हलपमेंट साहेब तुम्हांला दृष्टीआड करता येणार नाही. ही काय एका पक्षाची मागणी नव्हती ही समाजाची मागणी होती हे मी मिटींगमध्येही बोललो होतो. कुणीतरी सदस्य बोलले की भाजपाची मागणी आहे म्हणून मी त्या प्रकरणात नव्हतोच.  समाजाची मागणी होती.  समाजाचा प्रक्षोभ होता.  समाजाचा मोर्चा तीन चार हजाराचा होता.  मा. नाईक साहेबांनी निवेदन करावे, जे काय असेल ते समाज आता मागणी करीत आहे.  भारतीय जनता पार्टीने पाठींबा दिलेला आहे.  तुम्हांला जो काय निर्णय द्यायचा असेल किंवा शहराची शान राखायची आहे की, व्यक्तीमत्व वाढवायचे आहे तो तुम्ही निर्णय घ्यावा.

**रक्षा शाह :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते की, मॅडम मी एक सांगू इच्छिते की, पूर्ण महाराष्ट्रामध्ये आपल्या शहरात एक असे बावन जिनालय पूर्ण महाराष्ट्रामध्ये एकच देऊळ आहे.  आपण जैन मंदिर नांव लिहितांना तुम्हांला असे वाटते की, हे लिहायला नको आणि देवचंद जेठालाल संघवी हे प्रतिष्ठित व्यक्ती आहेत आणि त्यांचे नांव येऊ द्या.  परंतु बावन जिनालय हे महाराष्ट्रामध्ये एकमेव मंदिर आहे.  त्याचे नांव यावे असे तुम्हांला वाटत नाही का?  आणि तिकडे आमचा रोड आहे.  जैन मंदिर नांव होते त्यात तुम्ही चार पाच कितीतरी असे बोर्ड लावलेले आहेत.  आता लोकांना असे वाटते की, कोणी बँकमध्ये खाते उघडले किंवा कोणी ॲग्रीमेंट केले तर त्या सगळ्यामध्ये जैन मंदिर मार्ग असे आहे. कितीतरी लोकांना हा त्रास होणार आहे की, आमच्या ह्या गल्लीचे हे नांव आहे.  तुम्ही गल्लीगल्लीमध्ये किती बोर्ड लावणार आहात ते तरी आम्हांला कळू द्या.

**शशिकांत शहा :-**

मा. महापौर मॅडम की माध्यमसे मै बोलता हू।  इस तरह से लोगों की भावना को भडकाने का यह जो काम चल रहा है, हमारे सभी मंदिर पुरी बावन जिनालय कमिटी यही नामसे एकमतसे लेटर दिया हुआ है।  मिरा भाईंदर के जितने मंदिर है उस सभी मंदिरों का ठराव करके मिरा भाईंदर महानगरपालिकेमे भेजा हुआ है।  गुजरात समाचार मे भी जो कोई न्युज आया था इस बारे मे की, जैन समाजमे रोष है तो उन्होंने भी यह खुलासा दिया की, देवचंद जेठालाल मार्ग ही योग्य है।  और इन्होने जो काम किया था उसके लिए ही यह मार्ग है।  एक भी जैन भाई को विरोध नही है।  दिगंबर समाज, श्वेतांबर समाज, स्थानकवासी समाज, सभी समाज इसी नाम के उपर लेटर लिखा हुआ है।  आपको

फॅक्स किया हुआ है और हजारो जैनवासियों की भावना यहाँ पर दुखाने का काम बी.जे.पी. के सिवाय और कोई नही कर रहा है। ऐसा मेरा आक्षेप है और इसीके लिए मै आपको धन्यवाद देता हूं।

**रक्षा शाह :-**

हा बी.जे.पी.वर आरोप आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम आपण हा प्रस्ताव मा. महासभेत घेणार किंवा नाही याबाबत रुलिंग द्या. आम्ही मागणी केलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल, सदरचा प्रस्ताव मा. महासभेत घेणार कि नाही असे कसे आपण बोलतात. आपण जरा व्यवस्थित बोलावे. सगळ्यांना बोलता येते परंतु एक एका सदस्याने बोलावे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम की, अनुमतीसे बोलता हूँ की, हम नही चाहते की, इस हाऊस मे कोई जनभावना को भडकाये। भाईंदर वेस्ट मे मुझे भी पैतीस साल रहते हुए हो गये है। मोदी पटेल रोड आज तक महाराजा अग्रसेन मार्ग बदलने के बावजुद भी लोग मोदी पटेल रोड लिखते है। यह कहने को तो ठिक है की, अच्छे आदमी का नाम रखा गया। बावन जिनालय पुरे महाराष्ट्र मे एक है लेकीन उसका संस्थापक कौन था यह सब लोग जानते है। जेठालाल संघवी संस्थापक थे। किसी गलती के कारण हो गया होगा लेकिन ऐसे कितने रोड है, काशिमिरा रोड, आपने बताया सारे लोग काशिमिरा रोड के नाम कि पहचान है। अभी कुछ भी रोड हो गया बिल्कुल जैसे ओमप्रकाशजी जहाँ रहते है उस रोड को मोदी पटेल रोड का नाम लिया जाता है। मेरे बोलने का मतलब है की, हम सब लोग मिलजुलकर बैठकर अगर तय करे तो एक अच्छा होगा। लेकिन जनभावनाको भडकाना यह जैन समाज के लिए ठिक नही है।

**मा. महापौर :-**

याबाबत मी गटनेत्यांची एक मिटींग पुन्हा लावण्यांत येईल व त्याच्यात मी डिसीजन घेणार आणि मग ते महासभेत घ्यायचे किंवा नाही ते ठरवणार.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम आज जर अशा प्रकारचे ठराव नवीन नवीन यायला लागले नांव बदलण्यासाठी तर संपूर्ण शहरामध्ये आज जे बोर्ड लागलेले आहेत, तर प्रत्येक ठिकाणची अशी मागणी येईल. अशाच प्रकारचे नवघरला सुद्धा झालेले आहे. ज्या ठिकाणी आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये एकच गुरुद्वारा मंदिर आहे. नवघर रोडला तेथील लोक येथे मा. आयुक्त साहेबांना भेटायला आले होते तेव्हा त्यांनी तशी मागणी केली की, गुरुद्वारा हे मंदिर ह्या शहरामध्ये एकच आहे आणि ते नांव आमच्या येथे द्यावे त्या ठिकाणी वेगळे नांव आहे. मी तेथील लोकांना कल्पना दिली की, वरुन रेषेवरुन नांव आलेले आहे. याच्यात बदल होणे मुश्कील आहे आणि अशा पद्धतीने येथे जर बदली झाले तर इतर ठिकाणी सुद्धा मागणी येईल आणि मग त्या बाबतीत महानगरपालिकेला प्रॉब्लेम होईल तरी कृपया करुन असे निर्णय घेऊ नयेत जे निर्णय झालेले आहेत. ते योग्य आहेत आणि ते सर्व सभागृहाने मान्य करावेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचे हे प्रोसेडिंग आहे. आम्ही नांव बदली करायला सांगत नाही. जे नांव आहे ते नांव द्यायला सांगतो.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, येथे विषय आहेत ते न घेता विषयाचे विषयांतर चाललेले आहे. तरी माझी विनंती आहे, मा. महापौरांनी विषयपत्रिकेवरील विषयाप्रमाणे विषय घ्यावेत.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब या ठिकाणी जैन मंदिराच्या विषयावर जो मघापासून उहापोह चाललेला आहे त्या संदर्भात मी सन्मा. भाजपाचे सदस्य आणि आमचे सहकारी श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी हा विषय सभागृहात आला त्यावेळी आपण ह्या सभागृहाचे सन्मा. सदस्य होते आणि तेव्हा खरे म्हणजे ह्याबाबत चर्चा करायला पाहिजे होती आणि दुसरी गोष्ट म्हणजेच संपूर्ण जैन समाज फक्त भाजपाचा नाही आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्याकडे पुरावे आहेत.

**आसिफ शेख :-**

ओमप्रकाशजी जे वक्तव्य करतात त्या प्रकारची आमची भावना नाही आहे. आम्ही तर सगळ्यांना हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख या सर्वांनाच घेऊन चाललो. हयात लेके चलो, कायनात लेके चलो, चलो तो सारे जमानेको साथ लेके चलो या पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आहे. आपण त्या पक्षाचे लेबल काढा.

**(सभागृहात गोंधळ)**

आत्ताच सन्मा. महापौरांनी सांगितलेले आहे की, सर्व गटनेत्यांना बोलावून त्यांची मिटींग घेऊ आणि मग निर्णय घेऊ. जैन समाजाबाबत आपला जेवढा आदर आहे त्यापेक्षा शंभर पटीने आदर आमचा आहे. कारण आम्ही प्रत्येक वेळी सर्वांना बरोबर घेऊन चालतो. मागच्या तत्कालीन नगरपरिषदेच्या काळात महापालिका सदस्य आणि तत्कालीन नगराध्यक्ष श्री. प्रफुल्लजी पाटील यांच्या कारकिर्दीत तो विषय आलेला होता. मा. आयुक्त साहेबांनी या ठिकाणी संपूर्ण खुला केला. त्यांनी संपूर्ण तपासणी केली आणि त्यानंतर ते प्रस्ताव मी त्यांना धन्यवाद देतो. बरेचसे प्रस्ताव त्या ठिकाणी ह्या शहरासाठी चांगले निर्णय घेतलेले आहेत. आम्ही समर्थन करतो.

**कैलासबेन जानी :-**

आता धन्यवाद देतात पण जेव्हा खुर्चीवर बसले होते तेव्हा दिले होते का धन्यवाद प्रफुल्ल पाटील यांना.

**आसिफ शेख :-**

याचा फक्त समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा व विषयाचे विषयांतर करायचे चालू आहे. कहीपे निगाहे कहीपे निशाना, जिने दो जालिम बना दे दिवाना या पद्धतीचे आहे. मा. महापौर साहेब आपण रुलिंग दिलेले आहे आणि आपण जैन समाजाच्या भावनांचा आदर केलेला आहे. मी या ठिकाणी मा. महापौरांना धन्यवाद देतो. याबाबत मा. महापौर साहेब आपण निश्चितपणे एक गटनेत्यांची मिटींग बोलवा आणि अथोचित तो निर्णय घ्याल अशी मी अशा करतो. धन्यवाद.

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, सन्मा. नगरसेवक श्री. आसिफ शेख हे शिकलेले आहेत, कवी आहेत, ते उर्दू बोलतात त्यामुळे काहींना समजते आणि काहींना समजत नाही. तरी त्यांच्या वक्तव्याचा खुलासा करतो आहे. ते तितके चलाख आहेत, पटाईत आहेत त्यावेळी त्यांचे नगराध्यक्षांबरोबर पटत नव्हते. तरी हे सभागृह आहे या सभागृहात विसरता येत नाही.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, हे म्हणतात की आमचे पटत नाही. परंतु आमचे सगळ्यांशी पटते. आमच्याकडून पहिल्यापासून जात-पात, धर्म सर्व समान आहे. महाराष्ट्र टाईम्स या दैनिकात बातमी आली की, ओमप्रकाश गाडोदियांनी बातमी दिली की, श्री. रोहिदास पाटीलने हमारे घर मे झगडा लगा दिया, हे तर अधिकृत.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह जो नही पटता नाही इसीलिए रोहिदासजी सपोर्ट नही करते। श्री. ओमप्रकाश अग्रवालजीको अकेले को ही बोलने देते।

**कैलासबेन जानी :-**

सपोर्ट करते है की, नही करते है यह बात अलग है।

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौर मॅडम मी अगोदरच सांगितले, जैन मंदिर मार्ग असे पेपरचे स्टेटमेंट आहे.

**कैलासबेन जानी :-**

सपोर्ट करते है की नही करते है यह हमारा आपस का मामला है। आपको क्या जरुरत है बोलने की।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम महेंद्रसिंग चौहाण को झुठ बोलने की आदत ही है। इसने स्टेटमेंट दिया है पेपरमे।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

भुदेकाजी यह पेपर कहाँ से ले आये हो, यह कौनसा राष्ट्रीय पेपर है। भुदेकाजी का एक ही काम है महेंद्रजीका नाम ढुंढने का।

**शिवप्रकाश भुदेका :-**

चौहाण साहब को झुठ बोलनेका आदत है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

शिवप्रकाश भुदेका इस हाऊस मे एक अकेले सच्चे बोलनेवाले आदमी है।

**(सभागृहात गोंधळ)**

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम सभागृहामध्ये नामकरणाची जी चर्चा चाललेली आहे, माझ्या गेल्या हाऊसमध्ये मी सभागृहामध्ये नगरसेवक होतो त्यावेळेला जवळ जवळ १५८ नावांची लिस्ट तयार झालेली होती. १२८ X २ अशा जवळ जवळ ज्या काही ३०० ते ३२५ पाट्या निघतील, एका पाटीला महानगरपालिकेला १६०० रुपये इतका खर्च येतो. ही जी रक्कम आहे ही रक्कम कुठल्या इंजिनियरने मंजुर केली? त्याच्यात माल किती आहे? त्याची प्रॉडक्शन अमाऊंट किती आहे हे काय आम्हा लोकांना कळते लगेच १६०० रुपयांमध्ये काय काय येते एवढी महागडी पाटी आणि जी पाटी आपल्या महानगरपालिकेनी डिझाईन केली. जे प्रशस्त डिझाईन त्या लायकीचा तो रोडही हवा असतो. त्याची लांबी रुंदी प्रशस्तीकरण जे असेल रस्त्याचे त्यानुसार ती पाटी लागली पाहिजे. जवळजवळ आपल्या शहराला ३०० ते ३२५ पाट्यांची रिक्वायरमेंट असतांना प्रत्यक्ष गरज माझ्या माहितीनुसार जवळ जवळ २०० ते २२५ पाट्या ह्या जास्त बनवण्यांत आलेल्या आहेत आणि त्या ज्या बसविण्याची पद्धत आहे, आता जी चर्चा झाली ती केवळ एका रस्त्याची झाली. परंतु या शहरामध्ये अनेक मान्यवर ज्यांची ऐतिकाहासिक अशी काही पुरुषांची नांवे आहेत त्यांनी कतृत्त्व गाजविले त्या नावामध्ये एक निराळाच भारदस्तपणा आहे आणि त्या नावामध्ये एक इतिहास आहे. अशा लोकांची नावे असलेल्या पाट्या कशा स्वरुपात लावलेल्या आहेत याचे जरा भान ठेवलेले आहे का? प्रत्येक कोपऱ्यावरती ज्या अनेक पाट्या अशा लावलेल्या आहेत की, ते नामकरण झाले असे दिसतच नाही.

दुसरी गोष्ट अशी की, याची तक्रार अगोदर मी केलेल्या आहेत. आपल्याकडे सिटी इंजिनियर आहेत. ज्युनियर इंजिनियर आहेत. फौजफाटा भरपूर आहे. परंतु अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांनी जाऊन पहाणी सुद्धा केलेली नाही. माझ्या वार्डातील तीन पाट्या ह्या तुटलेल्या आहेत. जाण्या येणाऱ्या ट्रकमुळे जे अडथळे आहेत, वाहतुकीला अडथळे आहेत अशा ठिकाणी ह्या पाट्या लावलेल्या आहेत. तीन तीन फुटाच्या रुंद गल्ल्यांना सुद्धा अशा मोठ्या पाट्या लावलेल्या आहेत. माझा याबाबतीत कुठलाही विरोध नाही. छोटी गल्ली असेल, तीनशे, चारशे, पाचशे रुपयांची बी.एम.सी. टाईपचे बोर्ड जसे मी पुर्वी लावलेले होते. माझ्या वार्डात नामकरण ऑलरेडी मी करुन टाकले. हा वाद राहिलेला नाही. आमच्या स्वतःच्या खर्चाने आम्ही पाट्या बनविल्या आणि लावून टाकल्या. तशा स्वरुपाच्या छोट्या पाट्या महानगरपालिकेने का मागविल्या नाहीत. आज शहरामध्ये प्रमाणापेक्षा जास्त बोर्ड लावले गेलेले आहेत. ते बोर्ड कोऱ्या स्वरुपात आहेत. मा. आयुक्त साहेबांना भेटलो तर त्यांनी एक चांगले टिपिकल उत्तर दिले की, आमच्या टेंडरमध्ये आहे तेवढ्यापेक्षा जास्त असेल तर त्याचे पैसे देणार नाही. उत्तर ऐकायला चांगले वाटले. परंतु व्यवहारात उत्तर ते बरोबर नाही आहे. कारण एखाद्या गल्लीला नामकरण झाले किंवा नाही झाले. तसेच बोर्ड लागला नाही आणि नांव दिले नाही तर एका नव्या वादाला सुरुवात होते. कोण तो सोम्या गोम्या उठून कुठलेही नांव लावतो. ठरावात ते नांव नाही आहे. त्याच्यापेक्षा जास्त बोर्ड लागलेली आहेत तर उद्या कुठेतरी कुठलेतरी नांव लागेल ते नांव ठरावामध्ये नसणार आहे आणि त्याच्यातले ते होणारे वाद आणि जे आमचे सहकारी मित्र त्यांना दर वेळेला टेन्शन असते आणि शहरामध्ये वातावरण चिघळेल. तसे जर एखादे काही झाले तर त्याला जबाबदार कोण आहे. कारण जे ठरावामध्ये नांव नाही आहे तेवढ्या पाट्या त्याच्यापेक्षा जास्त पाट्या नगरपालिकेने बनविल्या कशा काय? त्या ठेकेदाराने कशा काय बनविल्या? बनविल्या ते ठिक आहे परंतु तो उठसुठ सगळीकडे लावत सुटलाय. कुणाचाही कंट्रोल नाही. माझे प्रशासनाला असे एक निवेदन आहे की, हा विषय तेवढा लाईटली घेऊ नका. या शहरामध्ये तसे बघायला गेले तर शहर शांत सुद्धा आहे. परंतु बऱ्याच प्रकरणांमध्ये शहर कसे होते हे उग्र स्वरुप बघितले आहे. सगळ्यांनी माझी तशी इच्छा नाही आहे. परंतु एक ॲडव्हान्समध्ये सदस्य या नात्याने मी आपल्याला एक निवेदन करु इच्छितो. मा. महापौर मॅडम आपल्याला सुद्धा मला एक सांगायचे आहे की, या शहरामध्ये काय चाललेले आहे जो उठेल तो माझ्या इकडे तीन फुटाच्या रोडला ती मोठी पाटी लावलेली आहे. म्हणजेच एकेका वस्तीत सहा-सहा, सात-सात पाट्या लागलेल्या आहेत. त्या कोऱ्या आहेत. त्याचे नामकरण कोणी करायचे. कुठले नांव ठेवले आहे ते काहीच कळायला मार्ग नाही. प्रभाग निहाय तीन-तीन नगरसेवक आहेत. एकेका वार्डमध्ये तीन नगरसेवक आहेत म्हणजेच तीन मते तयार होतात. प्रत्येक नगरसेवकांचे एक मत असते की, माझे हे नांव तिथे लागले पाहिजे. तर तिथे तीन मते तयार होणार आहेत. नगरसेवकांची

तसेच मंडळे वगैरे जे असतात तो भाग निराळा आहे. परंतु हेच करत असतांना काही मोठ्या मोठ्या रोडला सुद्धा नामकरणाच्या पाट्या लागलेल्या नाहीत हे लक्षात ठेवा साहेब आणि जे १५८ नावांची लिस्ट आहे लोकांनी नवीन जर आपल्याला प्रस्ताव दिले तर ते तुम्ही ॲड करा ठरावामध्ये. नवीन प्रस्ताव घ्या शहरामध्ये. जेणेकरुन वाद नको. रस्ते हे वाढत जाणार आहेत. त्या गल्ल्या आपल्या कुठल्या तरी अधिकाऱ्यांना कुठले रोड बाकी आहेत ते तुम्ही ठरवून द्या आणि एकदाचे काय ते फायनल करुन घ्या. जेणेकरुन नगरपालिकेचे आता जे १६०० रुपये प्रत्येक पाटी खर्च वाढणार आहे. तरी त्याचा काय तो सोक्षमोक्ष लावून रुलिंग द्या आम्हांला की, तुमच्या टेंडरच्या व्यतिरिक्त ज्या पाट्या लागलेल्या आहेत त्याला आदेश कुणाचा? कॉन्टेटी ऑफ प्लेट किती आहेत आणि ते कोणी आदेश दिले अशा पद्धतीचे बोर्ड लावायचे आणि जे आता शहरामध्ये लागत आहेत ते प्लॅनिंग कोणाचे आहे याचे जरा आम्हांला आपण रुलिंग द्यावे ही विनंती.

**प्रभात पाटील :-**

मा. आयुक्त साहेब माझा वेगळा विषय आहे या नामकरणाबाबत. नामकरण कुठे करायचे नाही आहे. परंतु नवीन आपण ह्या शहराच्या विकासाकरिता नामकरणाचा विषय घेतलेला आहे. परंतु बऱ्याच ठिकाणी महानगरपालिका फॉम होऊनही आणि तुमच्या महापौर पदाला एक वर्ष झाले. असे असतांना शहरातल्या बऱ्याच शाळा, बरेचसे विभागीय कार्यालय आणि इतर सार्वजनिक ठिकाणी मिरा भाईंदर नगरपालिका म्हणूनच अजून असे बरेचसे बोर्ड आहेत. बरीचशी अशी अजून जाणीव करुन देते आहे की, हे शहर अजूनही नगरपालिका अस्तित्वात आहे. तरी ते बोर्ड बदलायचे जरा बघावे तिथे महानगरपालिका म्हणून बोर्ड लावले पाहिजेत.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, मा. महापौरांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, आपण हे जे नामकरण करतो तर ते कशाकरिता करतो. ज्या गावाच्या विकासाकरिता पुर्वी ग्रामपंचायतीच्या वेळेला ज्या लोकांनी भोग दिलेले आहेत. या गावातून स्वातंत्र्य सैनिक या देशाकरिता बलिदान झालेले आहेत किंवा जेल भोगलेले आहेत अशा लोकांची नांवे आपल्या या गावांत विकासाकरिता त्यांचे नांव आठवणीत रहावे म्हणून त्यासाठी आपण ह्या फलकावर त्या लोकांच्या नांवाची पहिल्यांदा सुचना करुन आणि त्या लोकांची नांवे लावायची अशी माझी विनंती आहे. त्याप्रमाणे चंदुलाल शेठ हे चंदुलाल शहा जे आहेत यांनी गावासाठी खुप काही केलेले आहे. परंतु अशा लोकांची नांवे मात्र कुठे फलकावर दिलेले नाही. वाटेल त्या गल्ली बोळांना वाटेल त्या लोकांची नांवे देतात. आपणांस विनंती आहे की, या शहराकरिता ज्या लोंकांनी भोग दिलेले आहेत, आपले तन-मन-धन खर्च करुन ह्या लोकांनी जे भोग दिलेले आहेत अशा लोकांचा प्रथम विचार मा. महापौरांनी आणि मा. आयुक्तांनी विचार करावा आणि अशा लोकांची नांवे टाकावीत की, ज्यावेळेला ज्या सरपंचांनी आता जसे चंदुलाल शेठ आहेत, पंकज शेठ आहेत अशा लोकांनी गावाकरिता भोग दिलेले आहेत तरी माझी नम्र विनंती आहे की, कुठेतरी ह्या दोन तीन माणसांची नांवे आणि स्वातंत्र्य सैनिकांची नांवे इस्टमध्ये सुद्धा तशीच गेलेली आहेत. तरी त्यांची नांवे द्यावीत ही नम्र विनंती करतो.

**रक्षा शाह :-**

मा. महापौरांच्या आदेशाने पाच मिनिटे बोलू इच्छिते. मला फक्त एवढेच सांगायचे आहे की, तुम्ही जेव्हा गटनेत्यांची मिटींग घेणार त्यावेळेला मला एक ठराव मांडायचा आहे की, तुम्ही तो ठराव आणा की, जे प्रतिष्ठीत व्यक्तींचे नांव तुम्ही आणणार आहात ठरावामध्ये ऐतिहासिक लोकांची नांवे तुम्ही देणार तिकडे नगरपालिका आपली बोर्ड लावणार आणि कामे करतात ही वेगळी गोष्ट आहे. परंतु जिकडे प्रतिष्ठीत व्यक्ती एक वडीलांचे नांव म्हणून तिकडे टाकावे असे तुम्हांला वाटत असेल तर ते पण कायदा करायला पाहिजे की, त्या रोडचे जे काही नुतनीकरण येईल तेही भोगायला लागेल असा तुम्ही ठराव मांडा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम मी केव्हापासून हात वर करीत आहे. मॅडम आपल्याकडे जो काही विषय नव्हता त्याच्यावर आपण एक तास घालविला ते ठिक आहे. तशी त्याची काही कळकळीची विनंती असेल. पण जे ठराव आपली नगरपालिका असतांना झालेले आहेत. कुठलाही ठराव मी इतर कुठल्याही ठरावाबाबत बोलत नाही आणि हे करावे ते करावे हे सुद्धा बोलत नाही. पण जो एकदा ठराव झालेला आहे त्या ठरावावर तो फेटाळून परत ठराव करावा असे काही कायद्यात आहे का? ते पहिल्यांदा आपण बघून घ्यावे. कारण असे पत्र आमचे सुद्धा आहेत आपल्याकडे. कारण मी ज्या रोडवर आहेत श्री. चव्हाण साहेबांनी बोलले की, ग्रामपंचायत काळापासून मोदी पटेल रोड असे बोलतात तरी त्यांना सुद्धा तोच प्रॉब्लेम आहे आणि पब्लिकसुद्धा आमच्याकडे तक्रार करतात की, आमच्या

एफ.डी.मध्ये, बँकमध्ये आणि आमच्या त्या पत्रव्यवहारामध्ये मोदी पटेल रोड आहे. तसेच आपल्या पाणी विभागामध्ये, आरोग्य विभागामध्ये सुद्धा मोदी पटेल रोड आहे असे नमुद केलेले आहे आणि आता अचानक नांव बदलले तर लोकांनी सुद्धा तक्रार केलेली आहे. परंतु कुठलाही ठराव झाला तर त्यानंतर तो फेरबदल करुन ठराव करण्याचा आपल्याला अधिकार आहे का? त्याचा विचार करुनच हा प्रस्ताव आपण मा. महासभेपुढे आणावा. नाहीतर अशाप्रकारे दोन तास आपला वेळ फुकट जाईल.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम मी एक आपल्या कामकाजास सुरुवात करण्यापुर्वी स्वागताचा एक ठराव मी या ठिकाणी मांडतो. आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये ३० ऑगस्ट ते ९ सप्टेंबर पर्यंत अकरा दिवसाचे गणपती अतिशय चांगल्या प्रकारे गणोशोत्सव झाला. कुठल्याही प्रकारचा जातीय दंगा झाला नाही आणि ९ सप्टेंबर रोजी फार फार मोठे म्हणजेच १८ फुटाचे किंवा १६ फुटाचे गणपती विसर्जनासाठी आले होते. सार्वजनिक गणपती हे ९ तारखेला अतिशय उत्साहाने त्यांचे विसर्जन झाले. त्यापुर्वी आपल्या मेहनतीने, मा. मापौरांच्या मेहनतीने, मा. आयुक्त साहेबांच्या मेहनतीने तसेच सर्व अधिकाऱ्यांच्या मेहनतीचे अतिशय चांगली उत्कृष्ट अशी चौपाटी भाईंदर पुर्वेला बनली आणि कसलाही अडथळा न येता त्या ठिकाणी अधिकारी आणि मा. महापौर मॅडम आणि सर्व सभासदांचे या ठिकाणी स्वागत करतो. परंतु त्या ठिकाणी हमेशा संभाषण होत होते की, त्या ठिकाणी भारतीय जनता पार्टीने चौपाटीसाठी मेहनत घेतली व ती चौपाटी बनविण्यांत आली. एखाद्या व्यक्तिचे नांव घेत होते. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील या ठिकाणी त्यांचेदेखील श्री. रोहिदास पाटील यांचे नांव वारंवार घेतले जात होते. त्या ठिकाणी बसलेल्या सदस्यांचे ते कर्तव्य होते आणि त्यांचेच नांव त्या ठिकाणी घेतले जात होते. महापालिकेने ती चौपाटी बनविलेली आहे. ही चौपाटी श्री. रोहिदास पाटील यांच्या भारतीय जनता पार्टीने बनविलेली आहे हे चुकीचे वक्तव्य त्या ठिकाणी होत होते. जातीय तणाव निर्माण कसा होते हे भाजपाकडून शिकावे. प्रेसनोट काढली गेली की, दिनेश नलावडे आणि त्यांच्या समर्थकांनी त्या ठिकाणी दगडफेक केली. पेपरमध्ये सुद्धा बातमी आली की, कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी चौपाटीला विरोध केला. दिनेश नलावडे आणि सदस्या शानु गोहिल यांनी त्या ठिकाणी रस्ता अडविण्याचे काम केले. असे कोणतेही काम केलेले नाही. आमचे युतीचे सरकार असतांना आम्ही कसा विरोध करणार. आम्ही सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांचा आदर करतो आणि ते आमची प्रेसनोट काढतात.

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये ३० ऑगस्ट ते ९ सप्टेंबर पर्यंत अकरा दिवसाचा गणेशोत्सव अतिशय चांगल्या पद्धतीने पार पडला. या कालावधीमध्ये कुठल्याही प्रकारचा जातीय दंगा झाला नाही. ९ सप्टेंबर रोजी फार मोठे मोठे म्हणजेच १८ फुटाचे किंवा १६ फुटाच्या गणपतींचे विसर्जन अतिशय उत्साहाने झाले. त्यापुर्वी मा. महापौरांच्या प्रयत्नाने व सर्व पक्षांच्या नगरसेवकांच्या सहकार्याने आणि मा. आयुक्त साहेबांच्या मेहनतीने तसेच सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या मेहनतीने अतिशय चांगली उत्कृष्ठ अशी चौपाटी भाईंदर पुर्वेला बनवली आहे. तरी या ठिकाणी सर्वांचे ही सर्वसाधारण सभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन पाटील :-**

या सभागृहामध्ये जे अधिकारी लोक आलेले आहेत त्यांची आम्हांला ओळख करुन द्यावी आणि पुढील विषय चालू करावेत अशी नम्र विनंती आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम मा. आयुक्त साहेब, उपस्थित सर्व अधिकारी आणि सभागृहातील सन्मा. सदस्य, आजच्या सभेपुढे नसलेल्या विषयावरती आपण जवळ जवळ एक तास चर्चेमध्ये घालवलेला आहे. खरं म्हणजे या विषयावरती दुर्दैवाने म्हणा किंवा सुदैवाने म्हणा ज्या दिवशी आयुक्त साहेबांनी सभा बोलावली होती तेव्हा मी त्यांना भेटावयास आलो होतो. त्यांनी मला सभेला निमंत्रित केल्यानंतर जवळ जवळ १ तास १५ मिनिटे मी त्यांना ह्या विषयाचे संपूर्ण कायदेशिररित्या कशा पद्धतीने केला आहे. तत्कालीन नगराध्यक्ष गिल्बर्टजी मेंन्डोन्सा यांच्या कालावधीत सुरु झालेला हा उपक्रम माझ्या

कालावधीमध्ये संपला आणि माझ्या कालावधीनंतर महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर हे सगळे घडलेले आहे. ते पुढच्य काळामध्ये घडलेले आहे. त्यामुळे या संदर्भात मा. आयुक्तांना मी सर्व कायदेशीर ज्या प्रक्रिया झालेल्या आहेत त्याला संपूर्ण नियम बायलॉजचे नियम सांगून ही कारवाई केलेली असल्यामुळे आपण ह्याचा पुढे अवलंब करावा असे सगळे ठरल्यानंतर हा विषय महासभेपुढे आणण्यासाठी काही सदस्यांनी येथे मागणी केलेली आहे. अर्थात, हा विषय सभेपुढे येण्या अगोदरच जवळ जवळ एक-सव्वा तास चर्चा झालेली आहे. याच्यामुळे विषय सभेपुढे आल्यानंतर मला वाटते कदाचित चर्चाच होणार नाही. त्यामुळे असे वाटत नाही की, ह्या विषयावर या सभागृहामध्ये आताच्या प्रसंगी काही बोलणे मला उचित वाटणार नाही. कारण हे सभागृहाच्या विषयाला धरुन असल्यामुळी ही चर्चासुद्धा आपण या सभागृहाच्या चर्चेतून काढावी की, नाही याबाबत आपण निर्णय घ्या आणि आपल्याला जर योग्य वाटलं, कारण शेवटी ते महापौरांचे अधिकार आहेत. जर एखाद्या विषयाशी त्यांच्या मनात जर इतरांच्या भावना वाईट होत असतील, असे वाटत असेल तर तो विषय आणू शकतात. जेव्हा तो विषय येईल, कारण मी जे काही काम केलेले आहे नगराध्यक्ष म्हणून ते मला पूर्णपणे समर्थ आहे की, मी प्रत्येक गोष्ट कायद्याची तरतुद पाहून सर्व त्यावेळी हयात असलेल्या आणि हयात नसलेल्या या शहरासाठी ज्यांनी फार काही आपले बलिदान दिलेले आहे त्यांनी श्रम केलेले आहेत विकासासाठी अशा सर्वांचे राष्ट्रीय महापुरुषापासून ते स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या सर्वांची नांवे समाविष्ट केली जातील आणि ह्या सभागृहानेच नगरपालिकेच्या हयातीमध्ये त्याला बिनविरोध मंजुरी दिली होती. त्यामुळे यापुढे या विषयावरती जर मागच्या ग्रामपंचायतीच्या काळात काय झाले असेल आणि ते काही रेकॉर्ड असेल तर कृपया सन्मा. महापौरांनीच ते पहावे अन्यथा हा विषय आणण्याचे अधिकार आपले आहेत. म्हणून तुर्त या विषयावरती पुढे चर्चा थांबवावी अशी मी विनंती करतो आणि सभेचे कामकाज चालू करावे.

**मा. महापौर :-**

प्रभारी सचिवांनी प्रश्नोत्तराच्या तासास सुरुवात करावी.

**प्र. सचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला आता सुरुवात होत आहे. बारा वाजून वीस मिनिटे झालेली असून अर्ध्या तासाची वेळ देण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझा पहिला प्रश्न म्हणजेच महापालिका परिसरामध्ये १/१/९५ पुर्वीच्या गलिच्छ वस्त्या व झोपडपट्टी यांना फोटोपास देण्याचे आहे. तर त्याच्यामध्ये जे उत्तर आलेले आहे फोटोपास देण्याचे काम सुरु आहे. याच्यामध्ये शासनातर्फे आजच्या तारखेला मला हे पत्र १८/९/२००३ला दिले आहे. मा. महापौर मॅडम ही जी कारवाई चाललेली आहे जे उत्तर देण्याची पद्धत आहे. याच्यामध्ये कुठेतरी एका निष्क्रीयता किंवा चुकीच्या पद्धतीने एखाद्या सदस्यांला किंवा सभागृहाला माहिति पुरविणे हा प्रकार परत परत होत आहे. बघा, आपला एक स्तुत्य कार्यक्रम सुरु केला आपण. त्यानंतर आपली तब्येत बिघडली. त्यामुळे आपण आमच्या विभागामध्ये येऊ शकला नाहीत. या शहरातील मा. महापौरांनी आतापर्यंत दिलेले फोटोपास कुठल्या वस्तीत दिले आणि कुठे कुठे कार्यक्रम झाला आणि त्यांनतर तो का स्थगित करण्यांत आला आणि तो पुढे कधी चालू होणार आहे याचे कुठेही विश्लेषण पहिल्या पॅरेग्राफमध्ये नाही. हा आम्ही तुमच्या व्यक्तीगतरित्या झालेला अपमान समजतो. कारण आपल्या हाताने फोटोपासचे वितरण झाले होते हे सत्य आहे. आम्हांला पत्र आले होते. त्यानुसार कार्यक्रम सुरु झाला. ह्याची १८/९/२००३ पर्यंत आम्हाला अजूनपर्यंत ही माहिती प्रशासनातर्फे देण्यांत आलेली नाही. स्पेसिफिक फोटोपासचा विषय आहे म्हणून मी बोलत आहे. कारण आपल्याकडून निरनिराळ्या वॉर्डमध्ये वाटप झालेले आहे. तुमची नंतर आमच्याकडे टर्म होती. त्यानंतर तब्येत बिघडली म्हणून तो कार्यक्रम स्थगित केल्याचे पत्र माझ्याकडे आलेले आहे. एक, फोटोपास वाटपासंदर्भमध्ये मी माझ्या प्रभागाचे बोलत आहे की, प्रश्न आम्ही मांडतो प्रशासनाकडे ते काम लवकरात लवकर होईल अशी आमची आशा असते. कारण ज्या मतदारांनी आम्हांला निवडून दिलेले आहे त्यांचा आमच्यावर अधिकार असतो. ते दरवेळेला विचारतात की, साहेब आमचे हे काम का नाही झाले? शहरामध्ये मागच्या ऑगस्टला शिवमुर्ती नाईक साहेबांनी काही फोटोपास वाटले. त्याच्यानंतर काही त्रुटी राहिल्या. परत स्थगित करण्यांत आले. तो एक इन्सिडन्स झाला. त्यानंतर लोकांना असे वाटले की, फोटोपास आपल्याला मिळतील. त्यानंतर आम्ही लोकांना समजावले की, त्यात थोडा बदल करायचा आहे. शासनातर्फे जे आघाडी सरकार आता आहे त्यामध्ये सर्व पक्ष सामील आहेत. डावे पक्ष, कॉंग्रेस, राष्ट्रवादी वगैरे ह्या सगळ्यांनी त्यातील रेट्स कमी केले. त्यातील मोठी अमाऊन्ट होती त्याच्यामध्ये सुधार करुन ती कमी करण्यांत आली. एवढा मोठा फरक हा सर्वसामान्य गरिब जे झोपडपट्टीत राहतात त्यांच्या फायद्याचा होता. हा निर्णय आम्ही लोकांपर्यंत कळविला. त्याच्यानंतर लोकांना थोडे समाधान झाले आणि ही

फोटोपास वितरणाची जी योजना आहे ती नगरपालिकेकडून का स्थगित केली. त्याचे विश्लेषण आमच्या परीने आम्ही राजकारणात केले. परंतु, परत आपल्याकडून वितरण सुरु झाले. त्यानंतर लोकांमध्ये परत आशंका सुरु झाली की नाही परत काम सुरु झाले आहे. पण पद्धतशीरपणे आमच्या प्रभागामध्ये मिलन म्हात्रेंनी फोटोपास थांबविलेले आहेत. असा प्रकार राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी पोस्टर लावून केलेला आहे. माझ्या वॉर्डमध्ये आजही पोस्टर लागलेले आहेत. आपण त्या पक्षाचे असाल. माझे कुठे प्रशासनाला पत्र आहे का? फोटोपास देऊ नका म्हणून? नाही. उलटे प्रश्न आणि पत्रव्यवहार हे आम्ही वारंवार करीत आहोत. पण असा समज पसरवला गेला. आम्ही पण राजकारण करतो. तुमचे पत्र वॉर्डमध्ये वाटले की, तुमची तब्येत खराब आहे म्हणून हा कार्यक्रम स्थगित केलेला आहे. प्रशासनाचे पत्र आम्हांला वाटायला लागले. आपल्या ज्या काही चुका होतात अनावधानाने म्हणा असे अचानक काही प्रसंग घडतात. उदाहरणार्थ, माझी तब्येत देखील कधी बिघडेल त्याची गॅरंन्टी नाही. तर असे काही कार्यक्रम स्थगित केले जातात. त्यातील बरोबर राजकारण्यांनी वापर केला जातो आणि असे एखाद्याला बदनाम करण्याचे काम प्रशासन जे आता डिले चालले आहे. आपण चांगले असाल तर आपण तिकडे आता कार्यक्रमाची आपल्या हाताने सुरुवात करावी. तो सर्वस्वी आपला अधिकार आहे. माझ्या वॉर्डमध्ये तुम्ही उद्यापासून सुरु करा. आमची कसलीही ना नाही. तुम्ही फक्त उद्घाटन करा. दोन मिनिटे बसा. आपली तब्येत चांगली नसेल तर आपण तो कार्यक्रम सुरु करुन निघून जाऊ शकता. पण लोकांचे बोल आम्हांला खावे लागतात. लोकांना असे वाटते की, आम्ही प्रयत्नशिल नाही. आमच्याकडून काहीतरी दिरंगाई होते. आता जे सर्वे झाले त्यामध्ये प्रशासनाला आम्ही मदत केली. जी ०१/०१/९५ अगोदर खरे लोक तिथे होते. ज्यांचे पुरावे होते अशांचा सर्वे करुन फोटोपासचे काम लवकरात लवकर महापालिकेतर्फे कसे होईल याचे प्रयत्न आम्ही केलेले आहेत आणि त्यानंतर जी लोकल स्तरावर किंवा स्थानिक स्तरावरील जी घाणेरडी राजकारणे आहेत त्यांचे प्रकार आता सुरु झालेले आहे. याकरिता लवकरात लवकर त्या ठिकाणी अजूनही माझा निराळा आक्षेप आहे. साहेब, जरा आपण चेक करावे. एखादी वस्तु घडून गेल्यानंतर, एखादे डॉक्युमेंट तयार झाल्यानंतर त्याच्यामध्ये डिस्टर्ब करणे फार कठीण असते. त्याचे जरा पुरावे आपण चेक करावे. मी स्पष्ट आपल्याला सुचना देऊ इच्छितो आपण जरा त्याच्यावर एक नजर मारा. कारण त्या विभागातर्फे जे केले जाते एक छोटसं उदाहरण देतो. याच्या अगोदर बी.पी.एल.चा सर्वे झाला. त्यातसुद्धा असे झालेले आहे. ओरिजनल बी.पी.एल.वाले तुमच्या रेकॉर्डवर आलेलेच नाही. भलतेसलतेच कोणतरी आले आणि ती स्कीम आपण जास्तीत जास्त चांगल्या रितीने न राबवल्यामुळे लोकांपर्यंत आपण ती स्कीम पोहोचवू शकलो नाही आणि त्याचा लाभ खरोखर जे बी.पी.एल.वाले आहेत, आर्थिक मागासवर्गीय लोकांना या योजनेचा लाभ अजूनपर्यंत घेता आलेला नाही. त्याकरिता माझी आपल्याला अशी नम्र विनंती आहे की, फोटोपासच्या कामावर लक्ष ठेवावे. मी आपल्याला नंतर पत्र देईल काय पुरावे आहेत की नाहीत ते? माझ्या सहीनिशी देईन. पण आमचा नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कुठलाही आकस नाही, आरोप जरुर आहे. ज्यांनी कोणी चुक केली असेल त्यांनी सुधरविण्याचा प्रयत्न करा. त्याचे दोन फायदे होतात. एक म्हणजे, व्यवस्थित चांगले डॉक्युमेन्टस् तयार होते आणि दुसरे जो लाभार्थी आहे त्याला चांगले सत्य व्यवस्थित देऊ शकता. हे पूर्णपणे पाहून मी जे बोललो त्यावर मला रुलिंग द्यावे. नंतर दुसऱ्या सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. कारण मागचे एक रुलिंग बाकी राहिलेले आहे. मघाशी जे रु. १६००/- च्या प्लेटचे मी बोललो ह्यावर रुलिंग काहीच आलेले नाही. हा नगरपालिकेचा आर्थिक प्रश्न आहे. २०० ते २५० प्लेट गुणिले १६०० हा हिशोब लावा. एवढी रक्कम आपण कुठे देणार आहात. त्याचे आपल्याकडून अजून रुलिंग आलेले नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

म्हात्रे साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केलेला होता. नामकरणाच्या ज्या पाट्या आहेत त्या जास्तीच्या लागल्या आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावरती त्याही वेळेला मी त्यांना सांगितले होते की, जर असे नक्की झाले असेल, आवश्यकता पी.डब्ल्यू.डी. ने तपासली आणि तेवढी मंजुरी आपण दिलेली आहे. त्याही वेळेला मी सांगितले होते की, ठेकेदाराकडून जास्तीचे लागले असतील तर त्याचे पेमेन्ट आमच्याकडून केले जाणार नाही. ठेकेदार विनाकारण लावणार नाही. त्याची आवश्यकता तपासतांना जर काही चुका झाल्या असतील तर त्याबाबतीत आम्ही आणखी तपासून घेऊ. रस्त्याला एकच प्लेट असायला पाहिजे असे नाही. तिकडच्या बाजुला एक असते, इकडच्या बाजूला असते. मध्ये चौकामध्ये आणखी एखादा रस्ता मिळत असेल तर त्या चौकाची प्लेट असते. अशा त्याच्यामध्ये काही बाबी आहेत. त्यामुळे कदाचित प्लेटची संख्या वाढल्यासारखे प्रथम दर्शनी आपणाला दिसून येते. परंतु नक्की तशी आवश्यकता होती का? हे पुन्हा आपण म्हणत असाल तर आम्ही व्हेरिफाय करुन घेऊ

आणि जास्तीत जास्त प्लेटस् लागल्या असतील तर त्याचे पेमेन्ट हे अर्थातच आम्ही करणार नाही. दुसरा जो विषय होता हा ओळखपत्राच्या वाटपाचा.

**मिलन म्हात्रे :-**

त्या प्लेट आपण काढणार का? कारण त्याच्यामध्ये वाद उत्पन्न होतात. मी मुद्दा असा उपस्थित केला की, जिकडे रस्त्याचे नामकरणच झालेले नाही. ठरावाची नांवेच नाहीत तिथे प्लेट लागलेल्या आहेत. माझ्या वॉर्डमध्ये पण आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

माझ्या माहितीप्रमाणे असे झालेले नसावे. काढलेल्या आहेत आणि नसतील काढल्या तर त्याही काढू. ठरावामध्ये जी नांवे आहेत ती नांवे कॉन्ट्रॅक्टरकडे दिलेली आहेत आणि त्या नावाप्रमाणेच तो प्लेटस रंगविण्याचे काम करतो आहे. परंतु आपण म्हणता त्या पद्धतीने जर झाले असेल तर ते आपण काढून टाकू.

**मिलन म्हात्रे :-**

आणि जी चुकीची लागली गेलेली आहे. आतापर्यंत तीन प्लेटस् माझ्या वॉर्डमध्ये पडलेल्या आहेत. त्यांना मी कशा प्लेटस् लावायच्या ती साईड दाखविली आहे. त्या अजून निघालेल्या नाहीत आणि बाकीच्या पडणार पण आहेत.

**मा. आयुक्त सो. :-**

प्रशासनाची ओळखपत्र वाटपाच्या बाबतीत तयारी पुर्ण झालेली आहे. त्याच्यामध्ये आपण म्हणता आपल्याकडे काही पुरावे आहेत. काही लोकांपर्यंत प्रशासन पोहोचले नाही असे आपले म्हणणे आहे. आपल्या प्रभागामध्ये जास्तीत जास्त झोपडपट्टी आहे. कायद्याने ज्यांना ओळखपत्र द्यायला पाहिजे अशा व्यक्तींना ओळखपत्र मिळाले नसेल तर आपण वेळीच जर ते सुचविले तर नक्की त्याच्यावर कार्यवाही करता येईल आणि जर चुकीच्या माणसाला दिले गेले आहे किंवा तसा आमचा काही प्रस्ताव आहे असे माहिती असेल किंवा कोणी चुकीची कागदपत्रे देऊन त्याच्या आधारावर ओळखपत्र मिळविलेले असेल किंवा मिळविणार आहे असे जर आपल्याला माहिती असेल तर आपण कृपा करुन स्पष्टपणे त्याबद्दल बोललात तर बरे होईल. म्हणजे घटना घडण्याच्या अगोदर आम्हांला त्याच्याबद्दल खबरदारी घेता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, तिकडचे सर्वे झालेले आहेत.

**मा. आयुक्त सो :-**

सर्वे झालेले आहेत. त्याचे लाभार्थी फिक्स आहेत. आकडेवारी आमच्याकडे आहे आणि त्यानुसारच आम्ही ओळखपत्र तयार केलेली आहेत आणि त्या वाटपाचा कार्यक्रम होता. त्याच्यामध्ये थोडासा अडथळा आला होता. आमच्याकडून तयारी झालेली आहे. ८-१५ दिवसामध्ये मॅडम त्याबद्दल बोलतील. पूर्ण वाटप करण्याची आमची तयारी आहे. त्यात कुठल्याही प्रकारची अडचण नाही. परंतु, अपात्र व्यक्तीला ते दिले जात असेल असे जर आपल्याला वाटत असेल तर आपण आम्हांला ते जरुर निदर्शनास आणावे.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने मी बोलत आहे. मागच्या सभेमध्ये मी ज्या फोटोपासबद्दल बोललो होता. त्यावेळी मला वाटतं मी जे बोललो ते आग्रहाने बोललो होतो. पण नाईक साहेबांना वेगळं वाटले की, आपण नाराजीने बोलतो. पण तो फोटोपासचा कार्यक्रम उशिरा केल्यामुळे आज परिणाम काय झाला. माझ्या प्रभागातील ज्या झोपड्या तोडल्या त्या तोडल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या आयुक्तांकडे आदेश दिला की, १२८ झोपड्या ह्या १९९५ पुर्वीच्या आहेत. त्यांचे पुर्नवसन करा. आयुक्त साहेबांनी परत जिल्हाधिकाऱ्यांना लिहिले, कुठे पुर्नवसन करायचे हा पत्रव्यवहार चालू असतेवेळी त्यांना ते फोटोपास असावे असा प्रशासकिय कामाकाजामध्ये विषय आला. आपण फोटोपास दिलेच नाही. त्यामुळे ते पोहोचले नाहीत. त्यामुळे ते देऊ शकले नाहीत. मी तुम्हांला धन्यवाद देतो की, माझ्या प्रभागातील कार्यक्रम तुम्ही टाळता का? माहिती नाही. परवाच्या दिवशी तुमची गणवेश वाटपाची यादी आली. त्यात आमची शाळा नव्हती. पण मला पत्र मिळाले की, तुम्ही तो वाटून टाका. काल ३००-४०० लोकांच्या उपस्थितीमध्ये मुलांना कपडे मिळाले. वेळेत मिळाले. लोक आपल्याला धन्यवाद देतात. पण ते काम लेट केले. त्यात तुमचा काही दोष नसतो. कदाचित प्रशासकिय कामकाजामध्ये होते. तब्येत बरी नव्हती. याच्याशी सगळ्यांच्या सद्‌भावना तुमच्या पाठीमागे आहेत. पण काम लेट झाल्यामुळे निष्कारण दुसऱ्या लोकांना तिष्ठत राहावे लागते किंवा त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. आज बंदरवाडीच्या १२८ झोपडीधारकांचा प्रश्न रेगाळत पडलेला आहे. या सभागृहामध्ये जयंत

पाटलांनीही प्रश्न उपस्थित केला होता की, त्या प्रभागातील झोपड्या माझ्या प्रभागात आल्या आहे. माझा त्याला विरोध आहे. त्यांची भावना इथपर्यंत मीही त्यांच्याशी बोललो होतो. झोपड्यांचे ह्या प्रभागातून निघून त्या प्रभागात पूर्नवसन करा असा कोणाचा काही कटाक्ष नाही. कोणाचा काही हेतू नाही. पण ती लोक १९८३ पासून राहात होती. १९८५ पासून राहात होती. मुले झाली, मुले शिकली, लग्न झाले, त्यांना मुले झाली आणि एकाएकी त्या झोपड्या तोडल्याबरोबर ते १२८ लोक आज सैरावैरा धावत आहेत. कुठेही त्यांना जागा देत नाही. या सभागृहाचे मी लक्ष वेधून पुन्हा महापौरांना मी विनंती करतो, आयुक्त साहेबांना विनंती करतो आहे की, जी दलित समाजाची लोक आहेत आणि त्यांचे पुर्नवसन होणे अत्यंत गरजेचे आहे. सरकारचे धोरण आहे की, १९९५ पुर्वीच्या ज्या झोपड्या आहेत त्यांचे पुर्नवसन सन्मानाने व्हायला पाहिजे, निटनेटके व्हायला पाहिजे. पण आज या मुलांना, बायकांना मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो, ज्या ठिकाणी ते रहात होते ते आयुक्त साहेबांना विनंती करीत होते, मी ही एकदा फोन केला होता की, पाऊस आहे. तर कुठेच जागा नाही. मग कुठेतरी त्यांना थांबवा आणि त्यांना नक्की सांगा की आपण कायम करीत नाही. पण महापालिकेच्या वतीने त्यांच्या घराजवळच ती कोंबडीची आतडी आणि मासे, कुजलेले मासे टाकून असे या महापालिकेत साडेसात लाख लोक जी राहतात ती महापौर म्हणून आपल्याकडे सन्मानाने बघतात आणि मघाशी जो ठराव झाला. माझी बोलण्याची इच्छा होती. पण दुसरा विषय आला. तर तो खराखुरा अभिनंदनाचा ठराव असेल. पात्र असतील त्यांना अभिनंदन करायला काही हरकत नव्हती. ज्याच्याविषयी ज्या ज्या ठिकाणी तुम्ही चांगले काम कराल त्या ठिकाणी आमची भारतीय जनता पार्टी ही तुमचा सन्मानच करील. अभिनंदन करील. पण ज्या ठिकाणी कुठे त्रुटी असतील ते सागायलाही एक मिनिटही आम्ही मागे रहाणार नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. आयुक्त साहेबांनी शासनाची बाजू मांडलेली आहे. मघाशीच मी सांगितले की, थोडे कामकाजाच्या प्रथेमध्ये आपण सुधार केला पाहिजे. तरी आता सर्व सदस्यांना वर्षे होत आलेले आहे. मला ह्याच्यावरती शासनाची बाजू मा. आयुक्तांकडून क्लिअर झाली. मा. महापौरांकडून रुलिंग हवे आहे.

**अनंत पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, आता जे काही फोटोपास संदर्भामध्ये ठरलेले आहे मधल्या काळामध्येच काही पोर्ट ट्रस्ट जे काही सेंट्रल गर्व्हनमेंटच्या ज्या काही झोपडपट्या वाढलेल्या आहेत तर त्यांना सर्वांना सरसकट फोटोपास देणार आहात का? याचाही खुलासा होणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

बंदरवाडी प्रभाग क्र. ६ मधील झोपडपट्ट्या तोडल्या त्या जागेशी आपला संबंध नव्हता. केंद्र सरकारच्या जागेवर त्या १२८ झोपड्या होत्या. त्या तोडल्यानंतर संपूर्ण ती वसाहत माझ्या प्रभागामध्ये बसायला गेली. मी त्यांना ठाम विरोध केला आपणही सहकार्य केले. आपल्या अतिक्रमण विभागाने त्या झोपड्या काढून टाकल्या आणि मागच्या सभेमध्ये मी विषय काढलेला होता की, ह्या ज्या झोपडपट्ट्या तोडलेल्या आहेत तर त्यांना आपण फोटोपास देतांना पत्ता तरी कुठला टाकणार. मुळात त्या झोपड्या नाहीत. इकडे तिकडे विखुरलेले आहेत आणि त्या वेळेला आपण सांगितले त्यांच्या जागेचा संबंध त्या केंद्रशासनाच्या जागेवर असल्यामुळे आपला काही संबंध नाही. त्यांना फोटोपास आपल्याला देता येणार नाहीत. त्यामुळे आता जे सन्मा. नगरसेवक रोहिदास पाटील यांनी सांगितले त्यांच्या फोटोपासविषयी तर त्या संबंधी आपल्याला निर्णय घेणे गरजेचे आहे की आपण त्यावेळी आम्हांला सांगितले की, फोटोपास देता येणार नाहीत. दुसरा प्रश्न असा आहे की, फोटोपासचा कार्यक्रम माझ्या प्रभागामध्ये दोन वेळा लावला गेला. एकदा महापौर मॅडमची तब्येत बरोबर नव्हती आणि आजच्या तारखेला आपण लावलेले आहे. म्हणजे आपले जे कर्मचारी आपले हे जे कार्यक्रम लावतात ते किती चुकीचे कार्यक्रम लावतात ते बघा. सोळा तारखेपासून वीस तारखेपर्यंत कधीही आपली सभा लागू शकते. अठरा तारखेपासून वीस तारखेपर्यंत लागणारच आणि ह्या वेळेमध्ये सकाळी ११.०० वाजता आजच्या दिवशी हा फोटोपासचा कार्यक्रम आपण लावलेला होता. तर अशा तऱ्हेची चुक पुन्हा होता कामा नये, एवढी जरा दक्षता घ्या.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम मी समजू इच्छितो, पण मला जेवढे माहिती आहे तेवढे केंद्रशासनाच्या जागेवर असेल तर फोटोपास द्यायचा नाही असे नाही. त्याचा एक मुद्दा आहे की, त्या झोपड्या तुटल्या म्हणून

तुम्ही या सभागृहाच्या निदर्शनास आणले की, आपण फोटोपास द्यायला लेट केला म्हणून तो विषय आता आलेला आहे. पण केंद्र शासनाच्या जागेवर फोटोपास देऊ नये असा नियम नाही.

**मा. उपआयुक्त सो. (शिवमुर्ती नाईक) :-**

मा. महापौर मॅडम मागच्या वेळेला सलग झोपडपट्टी एकूण किती आहेत आणि त्या झोपडपट्टीवाईज तारखा दिलेल्या होत्या. प्रत्येक तारखेला कोणकोणत्या तारखेला किती वाजता आपण फोटोपासचा कार्यक्रम करणार आहेत याचे सर्वांना कळविले होते. मात्र अचानक मा. महापौरांची तब्येत बिघडल्यामुळे तो प्रोग्राम ज्या दिवशी होता त्या दिवशी मान्यवर त्या विभागाचे सभासदांना घेऊन एकूण ५१३ फोटोपास वाटण्यांत आले. साईबाबा नगर भाईंदर, हनुमान नगर, कोठार झोपडपट्टी, भाटेबंदर उत्तन, लालबहादुर शास्त्री नगर, धारावी या विभागामध्ये ५१३ फोटोपास वाटण्यांत आले. नंतर मा. महापौर मॅडमशी चर्चा केली. चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितले की, तब्येत बरी झाल्यानंतर आपण परत अशाच पद्धतीने तारखा घेऊन आणि प्रत्येक दिवशी एकेक झोपडपट्टी घेऊन आपण वाटप करु असे सांगितले. मात्र दहा पंधरा दिवसांत त्यांची तब्येत बरी न झाल्यामुळे त्या तारखा पुढे ढकलण्यांत आल्या. यामध्ये महापालिकेचे झोपडपट्टीबाबतचे फोटोपास सहा महिन्यापुर्वीच तयार होते आणि त्यामध्ये शासनाचे रक्कमेबाबत जो वाद उपस्थित होता काही पक्षांमध्ये आणि काही राजकीय याच्यामध्ये मागच्या जी.आर.प्रमाणे निवासीला नऊ हजार रुपये, संयुक्त निवासी आणि कमर्शियल याला अठ्ठाविस हजार रुपये आणि दुकानाला चाळीस हजार रुपये अशा तऱ्हेने फी भरणे झोपडपट्टीच्या लोकांना शक्य नाही म्हणून एक मिटींग झाली आणि मिटींगमध्ये एक नवीन जी.आर. निघाला आणि त्याप्रमाणे निवासी झोपडपट्टीला तीनशे पंचवीस रुपये संयुक्ताला दहा हजार दोनशे रुपये आणि दुकानाला पंधरा हजार दोनशे रुपये हे रिवाईज दर आल्यानंतर जी जी लोक भरतील त्या त्या लोकांना झोपडपट्टीमध्ये जाऊन फोटोपास देण्याचा कार्यक्रम आपण करावयाचा होता. परंतु काही लोक ही रक्कम वेळेवर न भरल्यामुळे तसेच ज्यांनी भरलेले आहेत त्यांना दिलेले आहेत आणि ज्यांनी भरलेले नाहीत त्यांना ते दिलेले नाहीत आणि झोपडपट्टीमध्ये फोटोपास वाटण्यापुर्वी संबंधित कर्मचारी आठ दिवस अगोदर तुमच्याकडे फोटोपास देण्यासाठी आम्ही येणार आहोत ही रक्कम तयार ठेवा अशी पुर्वसुचना देऊनच झोपडपट्टीचा फोटोपास देण्याचा कार्यक्रम आम्ही लावू आणि महापौरांच्या सवडीने तारखा घेऊन त्या त्या पद्धतीने फोटोपास वाटण्याचा कार्यक्रम आखून सर्वच मान्यवर सभासदांना कळविण्यांत येईल. फोटोपास संबंधित जे केंद्रशासनाच्या जागेत आहेत आणि केंद्रशासनाने स्वतःच्या जागेतील झोपडपट्ट्या काढून टाकली ते फोटोपास जरी आपण दिले असते तरी केंद्रशासनाच्या जागेत असल्यामुळे त्यांचे पुर्नवसन करण्याची जबाबदारी केंद्रशासनाची आहे. मागे रेल्वे हद्दीमधील झोपडपट्टी विभागातील ज्या झोपड्या काढल्या त्या रेल्वेनेच पुर्नवसन करायचे असा निर्णय त्या वेळेला घेण्यांत आला होता. आतासुद्धा जर १/१/९५ पुर्वीच्या ज्या झोपडपट्ट्या असतील त्यांच्यासाठी आपण जरी फोटोपास दिला तरी पुर्नवसन करण्याची जबाबदारी मात्र केंद्रशासनाचीच असेल. कारण त्या झोपड्या केंद्रशासनाच्या जागेवर वसलेल्या होत्या. त्यामुळे केंद्रशासनाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करणे संयुक्तिक ठरेल.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम यांच्या परवानगीने मी येथे बोलत आहे. नाईक साहेबांना झोपडपट्टीबाबत आस्था आहे. कामाचा अनुभव देखील आहे. आपण आता जे निवेदन केले ते संपूर्ण चुकीचे निवेदन केले आहे हे माझे दुर्दैव आहे.

**मा. उपआयुक्त सो. (शिवमुर्ती नाईक) :-**

चुकीचे निवेदन नाही आहे. कायदेशीर केलेले आहे आणि सौजन्याने म्हटले तर बसून ठरविता येईल. याचा अर्थ भावना आणि कायदा यामध्ये फरक आहे. सौजन्याने म्हणजे काही गटनेते आणि आयुक्त साहेब आणि जे सर्व मिळून चर्चा करुन सामुहिक निर्णय घेतला तर आपण केव्हाही मार्ग काढू शकतो. कायदा आणि भावना यामध्ये फरक आहे. कायदेशीर प्रश्न विचारला तर होऊ शकणार नाही. पण भावनावश होऊन जर आपण चर्चा करुन मार्ग काढू या म्हटलं तर मार्गही निघू शकेल. याचा अर्थ माझ्या झोपडपट्टीविषयी भावना वाईट आहेत असे समजणे गैरसमज आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्या १२८ एकदम दलित झोपडपट्टीच्या सगळ्या आबालवृद्ध, छोट्या-मोठ्यांच्या वतीने मी विनंती करतो. आपल्याला ईश्वर शक्ती देवो आणि त्यांचे पुर्नवसन होवो. पण आपण जो आता मुद्दा मांडला की, ते रेल्वेच्या जागेत होते, केंद्राच्या जागेत होते आणि केंद्राने पुर्नवसन करावे. अधिकाऱ्याने नाही, केंद्रानेही नाही, मी तुम्हांला खात्रीने सांगतो की, त्याचे पुर्नवसन महाराष्ट्र शासनानेच करावयाचे आहे आणि आपल्याला त्यामध्ये यश मिळेल. तुम्हांलादेखील मी विनंती करित आहे, तुमच्या सहकार्याशिवाय मिळणार नाही पण त्याच्या पलिकडील जे आहे की, आपण सांगितले की, आपण संगनमताने करुया.

त्याच्यातच मी ईश्वराला प्रार्थना करतो आहे, त्यामध्ये यश मिळू द्या. लवकरात लवकर त्यांचे सेटलमेंन्ट करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम माझी आपल्याला एक सुचना आहे की, कोणत्याही झोपडपट्टीचे पुर्नवसन हे महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन व पुर्नविकास अधिनियम १९७१ च्या तरतुदी नियम क्रमांक ४ अन्वयेच करण्यात यावे. या कायद्याच्या तरतुदी व्यतिरिक्त आपण कारवाई केल्यास ती बेकायदेशीर ठरेल अशी मी सुचना मांडत आहे.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भात थोडासा आणखी खुलासा करण्यासाठी मी येथे उभा आहे. सन्मा. सदस्य रोहिदासजी पाटील यांनी या रेल्वेच्या हद्दीमध्ये ज्या झोपड्या तोडल्या गेल्या त्यांचे पुर्नवसन करावे अशी एक आग्रहाची मागणी केली होती. परंतु एक तर आता नाईक साहेबांनी जो या ठिकाणी खुलासा केला की, केंद्र शासनाच्या जागेमध्ये ती झोपडपट्टी होती आणि त्यामुळे जर पुर्नवसन करावयाचे असेल तर ते त्यांनी करावे हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा असा की, आपल्या महापालिकेकडे कुठलीही अशी जागा आज उपलब्ध नाही की, ज्यांच्यामध्ये आपण सहानुभूतीचे धोरण स्विकारुन त्यांना त्यांचे पुर्नवसन करु शकू. तिसरा मुद्दा असा होता की, आपण स्वतः जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊन आग्रह धरला की, ह्यांचे पुर्नवसन करावे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी एक संदिग्ध स्वरुपाचे पत्र आपल्याकडे पाठवून दिले आणि त्याच्यामध्ये ह्यांचे पुर्नवसन करायला आमची हरकत नाही अशा प्रकारचे दोन ओळीचे उत्तर त्यांनी दिले. परंतु अशा प्रकारचे जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र म्हणजे आपण जसं काय त्यांच्या नो ऑब्जेक्शनची वाट पहात होतो आणि ते आपल्याला मिळाले अशा स्वरुपात साधारण ते होते. तर तशा पत्राची आवश्यकता मला नव्हती म्हणून मी स्वतः जिल्हाधिकाऱ्यांना फोन लावला आणि त्यांना मी विनंती केली की, जर आपल्याला पुर्नवसन करायचेच असेल तर स्पेसिफीक आम्हाला सर्व्हे नंबर द्या, क्षेत्र द्या आणि ते विनामुल्य आमच्याकडे हस्तांतरित करा. जर एवढे आपण करत असाल तर आपल्याला खरोखरच पुर्नवसनामध्ये स्वारस्य आहे असे आम्ही समजू. आपल्यालाही मी असे सांगितले की, जर आपल्याला खरंच आग्रह धरायचा असेल की, हे कायदेशिर व्हावे असे जर आपल्याला वाटत असेल तर आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे तसा आग्रह धरा की, आम्हांला स्पेसिफीक ॲलॉटमेंन्ट करुन द्या आणि तर आपल्याला त्याच्यावर पुढच्या गोष्टी ज्या सिव्हीक ॲमॅनिटिज आहेत त्याची थोडीशी जबाबदारी घेता येईल आणि त्यांचे पुर्नवसन करता येईल. मानवतेची भावना सगळ्यांमध्ये आहे. आपल्या सभागृहात उपस्थित असणारे नसणारे, सदस्य नसणारे परंतु ते करीत असतांना कायद्याचा जो अडसर आहे, आता सॉल्ट कमिशनरच्या जागेवरती असलेल्या झोपड्या काढल्या जातात. सॉल्ट कमिशनरचे अधिकारी येऊन राज्य पातळीवर माझ्याशी चर्चा करुन गेले की, झोपडपट्टया ज्या आमच्या जमिनीवर आहेत तर त्यांना तुम्ही फोटोपास देऊ नका आणि जर आम्ही त्यांचे पुर्नवसन केले नाही आणि त्यांना काढून टाकले तर आपण कृपा करुन आमच्यावर पुन्हा वेगळ्या प्रकारचे दडपण आणू नका. तुम्हांला जर ती जागा पाहिजे असेल या झोपडपट्टीवासियांना देण्यासाठी तर तुम्ही आमच्याकडे मागणी करा. आम्ही त्याचा मार्केट रेट ठरवू आणि मग तो मार्केट रेट जर महापालिका द्यायला तयार असेल तर आम्ही ती जागा झोपडपट्टीला देऊ. परंतु ते कुणालाही शक्य नाही. आपल्या आरक्षणातील ज्या जागा आहेत त्याच संपादन करायच्या म्हटले तर करोडो रुपये कमी पडणार आहेत. तेव्हा या सगळ्या गोष्टींचा आपल्याला यामध्ये विचार करावयाचा आहे आणि हे सगळे करुन जर जिल्हाधिकाऱ्यांच्या सहकार्याने या झोपडपट्टीचे पुर्नवसन होत असेल तर या उपस्थित सदस्यांपैकी कुणालाही त्याच्याबद्दल काय आक्षेप असण्याचे काही कारण नाही. सगळेजण तुमच्या भावनेशी सहमत आहेत.

(प्र. सचिवांनी प्रश्न क्र. २ चे वाचन केले)

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, आमच्या प्रभाग क्र. १० मध्ये फॉरेस्ट डिपार्टमेंन्टच्या जागेवर काही झोपड्या आहेत. जवळ जवळ १३० झोपड्या आहेत. या झोपडपट्टीवासियांना फोटोपास देण्यांत येणार आहेत. कारण तशी नोंद झालेली आहे. परंतु आता सध्या सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे की, ह्या झोपड्या ज्या हटविण्यांत येणार आहेत. सात महिन्याचा कालावधी दिलेला आहे. तर त्या झोपडपट्टीवासियांचे आपल्या पालिकेमार्फत आपण काही पुर्नवसन करणार आहात का? किंवा त्यांना काही जागा उपलब्ध करुन दिली जाईल का?

**मा. आयुक्त :-**

त्याचे उत्तर मी आत्ताच दिले की आपल्याकडे तशा प्रकारच्या जागा उपलब्ध नाहीत. त्यामुळे आपण करु शकणार नाही.

**केशव घरत :-**

पण जर त्यांना फोटोपास दिले.

**मा. आयुक्त :-**

फोटोपास दिलेले आहेत. पण त्या जागेवरुन राज्य सरकार त्यांना हटविणार नाही आणि त्यांना नागरी सुविधा पुरवेल याची ती एक गॅरन्टी आहे. याचा अर्थ त्यांना त्या जागेची मालकी प्राप्त झालेली आहे असे नाही. ज्या राज्यसरकारच्या जागेवर झोपड्या आहेत तेवढ्यापुरवती राज्य शासनाची जबाबदारी आहे. परंतु फॉरेस्ट हा एक केंद्रसरकारचा विभाग आहे, रेल्वे हा केंद्र सरकारचा विभाग आहे. सॉल्ट कमिशनर हे केंद्र सरकारचे आहे त्यांच्या जागेवर आपल्याला कुठल्याही प्रकारचा क्लेम सांगता येत नाही. जर घ्यायचा असेल तर त्याच्यासाठी आपल्याला मार्केट कॉस्ट दिली पाहिजे. फॉरेस्टच्या बाबतीत तर तेही शक्य नाही. कारण फॉरेस्ट झोपडपट्टीसाठी जागा देणार नाही. प्रकल्पासाठीच जागा देत असतांना फॉरेस्ट अनेक निकष लावतो आणि त्यामुळे महत्वाचे प्रकल्पदेखील आज पडून आहे. फॉरेस्टच्या बाबतीत तर ती शक्यता अजिबात नाही.

**केशव घरत :-**

साहेब पण जर त्यांनी त्यांच्यापुरती जागेची काही सुविधा केली तर त्यांचे पुर्नवसन होईल का?

**मा. आयुक्त :-**

कोण करणार ती सुविधा?

**केशव घरत :-**

सुविधा म्हणजे त्यांनी जर जागेचा काही बंदोबस्त केला.

**मा. आयुक्त :-**

कसा करणार ते?

**केशव घरत :-**

काहीतरी म्हणजे त्यांचे पैसे काहीतरी गोळा करुन काही निधी उभारतील ते.

**मा. आयुक्त :-**

आपण असा प्रस्ताव द्या. तो आमच्या नगरविकास विभागाला तपासायला सांगू आणि त्याप्रमाणे त्यांचा ले आऊट तयार करुन त्यांचे पुर्नवसन करता येईल. पण महापालिकेच्या वतीने ते काही होणार नाही. म्हणजे जे धोरण आहे ते स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३४ चे वाचन केले.)

**कैलासबेन जानी :-**

पान नं. ७६ सुकाळ तलावाबाबत मी एक लेटर दिलेले होते. ते ९७-९८च्या प्रोसिडींगची कॉपी मला मिळावी. आता दोन महिने झाले तरी माझ्या हातामध्ये कॉपी आलेली नाही. सुकाळ तलावाचा ३४ लाखाचा खर्च दाखविलेला आहे. त्याच्यापुर्वी किती खर्च केलेला आहे आणि ते माझ्या हिशोबाने नगरपरिषद असतांना पास झाले होते आणि ७८-७९ चे लेखी स्वरुपाने आपल्याकडे मागितले होते. तर अजूनपर्यंत मला कॉपी मिळालेली नाही. तर त्याची चौकशी करावी.

**आसिफ शेख :-**

पान क्र. ७६ शेवटचे २९ नंबर मनपा मुख्य कार्यालय मागील चर्चरोड डांबरीकरण करणे. मागच्या महासभेत पण सांगितले चुकून ते डांबरीकरण झालेले आहे. तिथे सिमेंट कॉंक्रीटीकरण असा शब्दप्रयोग पाहिजे होता. तर तो डांबरीकरणाऐवजी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने मी बोलत आहे. पान क्र. ३२ वृक्षप्राधिकरण समिती सदस्य म्हणून प्रत्येक पक्षाचे एक एक सदस्य म्हणून घ्यायचे होते. त्यामध्ये शिवसेनेचे सदस्यत्व घेतले नाही. वृक्षप्राधिकरण समितीमध्ये मी प्रियंका करंबेळे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठी आपल्याकडे सुचवित आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पान क्र. ८२ वर ते योग्य व्यक्तीची पुढील नियुक्ती होईपर्यंत असे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, पान क्र. ३२ वर नामनिर्देशित सदस्य म्हणून दोन नांवे आहेत. तरी तिसरे नांव हे श्री. उल्हास बाबूराव कुळकर्णी म्हणून घेण्यांत यावे.

**रतन पाटील :-**

पान क्र. ४९ रेल्वेखालून पादचारी तेथे भुयारी मार्ग असावा हा उल्लेख टाकावा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

पान क्र. ३२ पर वृक्षसंवर्धन कमिटीमे एक लेटर दिया है। राजकुमार व्यास के नाम का नामनिर्देशित। काफी पहले दिया हुआ लेटर है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम आता जे वृक्षप्राधिकरण समितीमध्ये स्विकृत नावाचा उल्लेख केलेला आहे. पत्राचा उल्लेख केलेला आहे. सचिव साहेबांनी खुलासा करावा. वृक्षप्राधिकरणमध्ये दोन नांवे स्विकृतमध्ये येतात. म्हणजे तुम्ही दोनपेक्षा अधिक जास्त घेणार आहात का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तीन आहेत. एक टाकण्याचे बाकी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नियमाप्रमाणे तुम्ही दोन सदस्य घेऊ शकता. तीन नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सचिव साहेब आपण पान वाईज का घेत नाही. प्रथा अशी बदलते का? एक-एक नंबर घ्या ना. काही फरक पडत नाही.

**मा. आयुक्त :-**

ठराव क्र. १२ वरच म्हटलेले आहे त्या नावाच्या वर वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १ पासून परत सुरु करा.

**मा. आयुक्त :-**

बारा अधिक तीन.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा कोलासो साहेब, आपण एका मिटींगला गैरहजर असतांना आपल्या नावाने ठराव पास झाला. त्याबद्दल आपल्या सह्या घेतल्या होत्या. जरा विस्तृत काम झाले तर काही वाईट आहे का? ही चुक सभागृहामध्ये झाली होती. ती ग्रॅमेटिकल नव्हती. एक तास आपण जास्त बसु. काय फरक पडतो?

**मा. आयुक्त :-**

आपण पाहिले असेल तर सुचवा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तसे नाही. पान नं. १ पासून १०-१५ पाने झाली असती.

**मा. आयुक्त :-**

बाकीचे सदस्य वाचून आले. त्याच्या काही सुचना नाही आहेत. आपल्या असतील तर सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

पण १, २ नंबर सर्व करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

आपल्या सुचना असतील तर आपण सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. कसे असते. मी उठून १०० नंबरवर गाष्टी करायची की, ९९ पानावर असे आहेत तर ते तसे नाही. रितसर करुन घ्या. ज्याला कोणाला असेल ते बोलतील. साहेब आपली जी प्रथा आहे तीच ठेवा. ह्यामुळे काय होते एकजण जर ओव्हरटेक केला. ८० पानावर बाकी राहते.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येकाला प्रोसिडींग अगोदरच दिलेले आहे. सर्वांनी ते वाचलेले आहे. कोणाच्या सुचना असतील तर ते वैयक्तिकरित्या सांगत आहेत आणि आपण त्या दुरुस्त करतो. आपल्या काही सुचना असतील तर आपण सांगा. म्हणजे सभागृहाचा वेळ वाया जाणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

एवढेच आहे. आपली जी एक नंबरपासून प्रथा आहे त्याचे तुम्ही वाचन करा.

**मा. आयुक्त :-**

त्याचे कारण नसतांना रिपिटेशन होत आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने मी येथे बोलत आहे. आपण आता वृक्षप्राधिकरण समितीच्या संदर्भात जे बोलले की, बारा सदस्य आणि परत तीन सदस्य. तर बारा सदस्य पूर्ण झालेले आहेत.

यामध्ये कुठले सदस्यत्व कमी करुन शिवसेनेचे सदस्यत्व घेणार आहात. वृक्षप्राधिकरण समिती पान नं. ३२ ऑलरेडी बारा सदस्य झालेले आहेत.

**मिलन पाटील :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, वृक्षप्राधिकरणाची जी समिती आहे त्यामध्ये जी नामनिर्देशित लोक आहेत. त्यामध्ये लायन्स क्लबसारखे जे लोक आहेत त्यांनी हजारो झाडे लावलेली आहेत. झाडांची ज्यांना आवड आहे अशाच लोकांनी नांवे घ्यावी. तर आर्ची डिसुझाचे नांव मी सुचित करतो की, आर्ची डिसुझा हे एक सामाजिक कार्यकर्ते आहेत आणि त्यांनी चांगले कार्य केलेले आहे. तर त्या वृक्षप्राधिकरणामध्ये त्यांचे नांव घ्यावे.

**हॅरल बोर्जीस :-**

ते संचालक मंडळावर निवडून आलेले आहेत. त्यांना ऑलरेडी बरेच काम आहे.

**मा. उपआयुक्त साो. (शिवमुर्ती नाईक) :-**

मा. महापौर मॅडम हा फक्त प्रोसिडींग वाचून कायम करण्याचा विषय आहे. फक्त प्रोसिडींगमध्ये जे आहे ते बरोबर लिहिलेले आहे का नाही एवढेच बघायचे आहे. दुरुस्ती सुचवायची नाही.

**रतन पाटील :-**

जिथे नांव नाही तिथे दुरुस्ती सुचवायची आहे ना?

**मा. उपआयुक्त साो. (शिवमुर्ती नाईक) :-**

नॉमिनेशन सभासदांची पण नांवे सांगायची नाही. फक्त प्रोसिडींग लिहिलेले बरोबर आहे कि नाही ते बघावे.

**मिलन म्हात्रे :-**

एक सीट कमी आहे. ब्लँक आहे. बारा प्लस तीन पंधरा होतात. पण एक त्याच्यामध्ये कमी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्यावेळी ही समिती गठित करायची होती. त्यावेळी शिवसेनेचा एक सदस्य होता. त्याचे नांव काढले.

**शुभांगी नाईक :-**

यामध्ये शिवसेनेचा सदस्य दिलेलाच नाही. शिवसेनेचा सदस्य पण पाहिजे ना.

**मा. उपआयुक्त साो. (शिवमुर्ती नाईक) :-**

मी गटनेत्यांना चार वेळा सांगितले होते. लवकर नाव द्या. लिहायचे राहिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाईक साहेब यामध्ये एक नांव कमी आहे. मग चौदा सदस्यांची आपण कमिटी बनविणार आहात का? खाली एक नांव कमी आहे.

**शुभांगी नाईक :-**

मग एक नांव टाका ना. आमच्या शिवसेनेचे सदस्य आहे त्यामध्ये.

**मिलन म्हात्रे :-**

पण तुमच्या म्हणण्यानुसार त्यामध्ये नांव येणार नाही. चौदा सदस्यांचीच कमिटी बनेल. जे आर्ची डिसुझाचे नांव आहे ते आपण टाकायचे नाही. चौदा सदस्यांची कमिटी बनवणार का? हो किंवा नाही.

**मा. उपआयुक्त साो. (शिवमुर्ती नाईक) :-**

वृक्ष कमिटी ठरवेल कुणाला जागा घ्यायची ते.

**हॅरल बोर्जीस :-**

महापौर महोदया मा. सुरेखा पाटील यांना शिवसेनेच्या माजी नगरसेविका होत्या. त्यांना कॉप्शन म्हणून त्यांना सुचविलेले आहे.

**रतन पाटील :-**

एक सदस्यांचे नांव टाईप करुन घ्या. हे नांव टाकणार म्हणून.

**शुभांगी नाईक :-**

शिवसेनेच्या एका सदस्याचे नांव घेण्यांत यावे.

**मा. आयुक्त :-**

या वृक्षप्राधिकरण समितीमध्ये त्याची स्थापना झालेली आहे आणि त्याच्यामध्ये १२ सदस्य आणि ३ नामनिर्देशित सदस्य अशी याची रचना होती. आपण सर्व संमतीने ही नांवे याला अंतिम स्वरुप

द्यायचे होते आणि जी जी नांवे आपल्याकडून आलेली आहेत त्या नावाचा या ठिकाणी प्रोसिडींगमध्येही समावेश केलेला आहे. खरे म्हणजे ती जी नामनिर्देशित व्यक्तीची नांवे असायला पाहिजेत या व्यक्ती त्या क्षेत्रातील तज्ञ असाव्यात अशा प्रकारची एक कायद्याची अपेक्षा आहे की, जे या सभागृहामध्ये निवडून येऊ शकत नाहीत किंवा ज्यांना राजकारणामध्ये स्वारस्य नाही परंतु पर्यावरण राखण्याच्या दृष्टीने त्यांना काही आवड आहे. वृक्ष लागवडीमध्ये पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने काही लोकांनी प्रयत्न केलेले असतील आणि त्यांना जर आपण ह्या समितीवर घेतले तर त्यांच्या ज्ञानाचा उपयोग आपल्याला होऊ शकेल यासाठी खरे म्हणजे या तीन नामनिर्देशित व्यक्तीची नांवे आपल्याला सर्व संमतीने फायनल करायची होती. या सभागृहातील जे सन्मा. सदस्य आहेत ते सदस्य असतील आणि ह्या ज्या तीन व्यक्ती आहेत त्या मात्र त्या क्षेत्रातील एक्सपर्ट असाव्यात अशा प्रकारची अपेक्षा आहे. तर माझी आपल्याला विनंती राहील की, कुठल्याही सन्मा. सदस्याचे नांव सुचविण्यापेक्षा या क्षेत्रातील एखादी तज्ञ व्यक्ती असेल तर त्यांचे नांव यासाठी सुचवावे. म्हणजे त्यांच्या ज्ञानाचा आपल्याला व वृक्ष प्राधिकरणाला फायदा होईल. पण हा विषय जो आहे तो आजच्या महासभेत चर्चेचा विषय नाही. ज्या काही आपल्याला सुचना करावयाच्या असतील त्या आपण कराव्यात आणि मग सर्व संमतीने यामध्ये निवड करता येणे शक्य आहे.

**रोहिदास पाटील :-**

या प्रोसिडींगलाच आपण मंजुरी देतो. याच्यामध्ये कागदात ज्या त्रुटी राहिलेली आहे ती वरचे वाचले तर सभागृहाचे सन्मा. नेते ध्रुवकिशोरजी पाटील त्यांचे स्टेटमेन्ट त्यांनी वाटणी केलेली आहे. वाटणीच्या हक्काचेच ते मागतात.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी पक्षनिहाय सदस्य संख्या सांगितलेली आहे. त्याचा उल्लेख यात नाही. स्वतःच्या पक्षाचे बरोबर घेतले आहे.

**शुभांगी नाईक :-**

आमचा एकही सदस्य दिलेला नाही. बाकीच्या सगळ्या पक्षाचे दिलेले आहेत. शिवसेनेचा एक द्या ना. आम्ही मागणी करतो शिवसेनेचा द्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, राष्ट्रवादी आणि काँग्रेसची वाटणी बरोबर झालेली आहे.

**मिलन पाटील :-**

सुरेखा हेमंत पाटील ही भारतीय जनता पार्टीची आहे ना. मग एक कमी करुन त्यांचे नांव टाकून द्या. तुमचे चार सदस्य झालेले आहेत. तर सुरेखा हेमंत पाटीलचे नांव कमी करुन शिवसेनेला देऊन टाका. युती आहे तुमची.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हो महाराष्ट्रामध्ये आमची युती आहे.

**शुभांगी नाईक :-**

बीजेपीचे दोन आणि शिवसेनेचा एक असे दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

वरच्या लिस्टमध्ये पदसिद्ध सदस्य असेल तो सदस्य होऊ शकतो. हे डेफिनेशन तुम्ही मागच्या वेळेला दिले. सभागृह नेत्यांनी त्यामध्ये भाषण केलेले आहे. त्यामध्ये सर्व पक्षांना प्राधान्य दिले जाईल आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये ही कमिटी तयार केली जाईल असे सांगितले आहे. साहेब वरती उल्लेख आहे. याच्यामध्ये नांव आले पाहिजे.

**शुभांगी नाईक :-**

साहेब, शिवसेनेचा एक आणि बी.जे.पी.चे दोन असे दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

अपेक्षा सांगितल्या कायद्याच्या परंतु असे असू शकते.

**मिलन म्हात्रे :-**

ती स्विकृत आहे. पदसिद्ध सदस्यांच्या बोला तुम्ही ताकाला जाऊन भांडे लपवता का? वरच्या लिस्टमध्ये सर्व पक्षांना प्राधान्य देण्याचे आपण कमिटमेन्ट केलेले आहे. त्याच्यामध्ये शिवसेनेवर अन्याय झालेला आहे असे मला वाटते. त्या सदस्यांच्या नावाचा तिथे उल्लेख करा आणि मग या प्रोसिडींगला मान्यता द्या.

**आसिफ पटेल :-**

महापौरांच्या परवानगीने मी बोलतो. ही जी नांवे दिलेली आहेत समिती जी बनविलेली आहे. त्यामध्ये तज्ञ आहेत का? मला तर वाटते एकही तज्ञाचे ह्यामध्ये नांव नाही. तुम्ही आता म्हणालात तज्ञाचे नांव घ्यायचे तर ते कुठे आहे. ह्या वृक्षारोपण प्राधिकरणाची नांवे दिलेली आहेत त्यामध्ये एकही माहितीगार नाही की, वृक्षारोपणाची ज्याला माहिती आहे. तर असे लोक तुम्ही घेतलेले आहेत का? एकही नांव नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेबांना पण माहिती नाही काय?

**आसिफ पटेल :-**

स्टॅन्डींग कमिटीने सुचविलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या वॉर्डमध्ये आम्ही भरपूर वृक्षारोपण केलेले आहे. महानगरपालिकेच्या सर्व ठिकाणी वृक्षारोपण करुन घेतलेले आहे. आपले शब्द मागे घ्या, या लिस्टमध्ये जे सदस्य आहेत त्यांनी आमच्या विभागातील वृक्षारोपण चांगल्या पद्धतीने केलेले आहे. आयुक्तांना पण ज्ञान नाही असे होते. आपण काहीतरी कसे बोलता. माझे नांव दिले आहे.

**आसिफ पटेल :-**

ज्यांची नांवे दिलेली आहेत त्यांनी किती वृक्षारोपण केलेले आहे. त्यांना काही कल्पना आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

माझे नांव आहे.

**आसिफ पटेल :-**

विनाकारण टोल मारुन चालणार नाही. बाकीच्या लोकांची नांवे आहेत. मी प्रत्यक्ष त्यांच्या घरी गेलो. त्यांनी त्यांच्या घराजवळ देखील वृक्षारोपण केलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

एकही नांव बोलू नका. आम्ही भरपूर केलेले आहे. माझे त्यामध्ये नांव आहे आणि आयुक्तांचे देखील नांव आहे.

**आसिफ पटेल :-**

महिलाओने झाड कहा लगाया? सारी महिलाओं को लिया है इसमे। मा. महापौर मॅडम ज्याला वृक्षारोपणाची माहिती आहे त्यांना या कमिटीमध्ये घ्यायला पाहिजे ना. कधी घेऊ. आता घेऊ शकत नाही. मी सुचना करतो की, ज्यांना माहिती आहे त्यांची नांवे या तीन नावांमध्ये जोडा. एक नांव ह्यामध्ये बाकी आहे. मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये माहितीगार कोणीही नाही. मला असे वाटते की, मिलन म्हात्रे साहेबांनी एकही झाडे लावलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख यांचे म्हणणे आहे की, राष्ट्रवादीच्या माणसांनी एकही झाड लावलेले नाही.

**शुभांगी नाईक :-**

आमच्या पक्षाने वृक्षारोपण केले म्हणजे आमच्यापैकी एका सदस्याचे नांव आले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आता जे सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांनी जे वक्तव्य केले. मी मागच्या हाऊसला सदस्य होतो. कुठल्याही लिस्टवर काहीही बोलायचे ते बरे दिसत नाही. स्टँडिंगमध्ये हा विषय जरुर आला होता. पण त्याच्यामध्ये असा काही ठोस घेतले नाही की, आम्ही सर्व सदस्य आहोत. मी हा विषय महासभेपुढे आणला. शहरामध्ये काही वाद नको. सर्व सामोपचाराने व्हावे म्हणून सर्व पक्षातील किमान पक्षी एक एक माणूस त्यात घ्यावा. म्हणजे सगळ्यांना प्राधान्य दिले जाईल असे ठरले गेले. त्यानंतर ही लिस्ट बनवली आणि दुसरा आक्षेप जो सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांनी घेतला आहे. आपण जरा माझ्याबरोबर यावे. एक दिवस अपुरा पडेल. आपण जरा आमच्याप्रमाणे केबीनमधील राजकारण सोडून रस्त्यावर यावे. मग तुम्हांला आम्ही दाखवतो कुठे कुठे वृक्षारोपण केलेले आहे. भाईंदरमधील एकही पब्लिक प्लेस बाकी नाही जिथे मिलन म्हात्रेनी वृक्षारोपण केलेले नाही. आम्ही हजारोंनी नाही केले शेकडोंनी जरुर केलेले आहे. सगळ्यात पहिले आमच्या वॉर्डमध्ये केलेले आहे आणि त्यानंतर नगरपालिकेच्या सगळ्या पब्लिक प्लेसमध्ये केलेले आहे. याची जर आपल्याला चाड होती तर आपण स्वतः इंटरेस्ट घेऊन स्वतःचे नांव पुढे आणायला पाहिजे होते. ते आपण आणले

नाहीत. जो तुमचा काही गट असेल त्याचे नांव आणायला पाहिजे होते. ते आणलेले नाही आणि आपण हेही वक्तव्य केले की, त्याच्यामध्ये आयुक्त साहेबांचे नांव आहे. एकही नांव असे बोलून चालत नाही. आपल्याला माहिती नसेल तर आपण आमच्याबरोबर यावे. आम्ही आपल्याला दाखवतो कुठे कुठे वृक्षारोपण झालेले आहे.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम यांच्या परवानगीने मी बोलत आहे. सन्मा. मिलन म्हात्रे साहेब आपण जेव्हा स्टँडींगला होते तेव्हा आपण शिवसेनेच्या एका सदस्याचे नांव घ्यायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

मी तसे देऊ शकत नाही.

**आसिफ पटेल :-**

ते तुम्ही आता कसे मांडता. तुम्हांला ते सभागृहात मांडता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तो गटनेता घेणार. आम्ही देऊ शकत नाही.

**आसिफ पटेल :-**

तुम्ही का देऊ शकत नाही. तुम्ही स्टँडींगमध्ये आहात.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे आम्ही दिलेले आहे. दुसऱ्याच्या पक्षाचे आम्ही कसे घेणार. तुमच्या पक्षाचे तुम्ही घ्या ना. आमची युती नाही.

**शुभांगी नाईक :-**

आमची चुकी नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम या शहरामध्ये नव्याने जे झाडाचे टेंडर दिलेले आहे. अजून त्याची सुरुवात झालेली नाही. गेल्या दोन वर्षात वृक्षारोपण म्हणावे तसे झालेले नाही. स्टँडींगला माझा प्रस्ताव होता. जेव्हा बजेटमध्ये आम्ही बसलो सभापती साहेब आता येतील त्यांना विचारा की, नवीन सगळे नगरसेवक निवडून आलेले आहेत. किमान पक्षी प्रत्येक वॉर्डमध्ये पन्नास पिंजरे तरी द्या. म्हणजे निदान अडीच-तीन हजाराचे वृक्षारोपण होईल असा माझा प्रस्ताव आहे आणि त्यानुसार प्रत्येकाला पिंजरे मिळून वृक्षारोपण झालेले आहे. त्याकरिता मी महापालिकेचे आभार मानत आहे आणि यापुढे काम चांगले रहावे म्हणून ही कमिटी लवकरात लवकर गठीत करा. सगळ्यांना प्राधान्य द्या. ह्याच्यामध्ये काही वाद राहणार नाही.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगी मी येथे बोलत आहे. सन्मा. मिलन म्हात्रे माझ्या कंपाऊन्डला आले होते. मी कितीतरी झाडांचे तिथे वृक्षारोपण केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या खाजगी जागेत आम्हीदेखील झाडे लावलेली आहेत.

**आसिफ शेख :-**

तुम्ही ज्यांची नांवे सुचवली आहेत त्यांनी झाडे लावली नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही सुचवलेली नाहीत. मी फक्त माझे नांव सुचविले आहे.

**आसिफ पटेल :-**

कोणालाही वृक्षारोपणामध्ये इंटरेस्ट नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**आसिफ पटेल :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी आपणसुद्धा बाहेरुन माझ्या इकडून जात असाल. आपण बघितले असतील मी किती झाडे लावली ती. तसेच आपणसुद्धा आपल्या कॉलेजच्या आवारात झाडे लावलेली आहेत. परंतु जी काही नांवे दिलेली आहेत त्यांना यात इंटरेस्ट आहे का? आणि इतर जे सदस्य आहेत त्यांना यात इंटरेस्ट आहे का? त्यांची जी नांवे दिलेली आहेत ती लोक वृक्षारोपण व्यवस्थित करतील का? ज्यांना वृक्षारोपण करण्याचा इंटरेस्ट आहे त्यांची नांवे यामध्ये आली पाहिजेत.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने मी बोलत आहे. आर्ची डिसुझा यांनी लायन्स क्लबमधून झाडे लावलेली आहेत. त्यांना झाडाबद्दल प्रेम आहे म्हणून ते झाडप्रेमी माणूस आहेत.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने मी बोलते. ज्यावेळी वृक्षारोपण या ठिकाणी महापालिकेच्या वतीने केले जाते. त्यावेळी आमचे सगळे सदस्य उपस्थित असताना आमच्या सदस्यांचे नांव नाही. एवढीच आमची एक विनंती आहे आणि या ठिकाणी दिलेले आहे. दोन बी.जे.पी. आणि एक शिवसेना. आमचा एक शिवसेनेचा सदस्य या ठिकाणी आला पाहिजे, एवढीच आमची विनंती आहे.

**आसिफ पटेल :-**

त्यांनी नांव द्यायला हवे होते.

**शुभांगी नाईक :-**

तसे आम्हांला कळविले नव्हते.

**मिलन पाटील :-**

या सभागृहात सर्वात जास्त झाडे मी लावली आहेत. आठ ते साडे आठ-नऊ हजार झाडे लावलेली आहे माझ्या तीन वाड्या आहेत आणि मी रत्नागिरी व बांध्यापासून ती झाडे आणलेली आहेत आणि हजारो रुपये खर्च करुन झाडे लावतो. परंतु मी असा कधी आग्रह केला नाही की, माझे नांव द्या.

**शुभांगी नाईक :-**

यामध्ये आमचासुद्धा सिंहाचा वाटा आहे. आम्हीपण आमच्या प्रभागामध्ये झाडे लावलेली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

ह्या सभागृहामध्ये कोणी किती झाडे लावली. ध्रुवकिशोरजी पाटील यांनी निवेदन केलेले आहे, त्यांच्या टिपणीमध्ये एक चुक राहून गेली आहे. ती दुरुस्त करण्याच्या दृष्टीने जसे सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांनी अत्यंत विचारपुर्वक निवेदन केलेले आहे. त्यांनी सांगितलेले आहे की, मी पुष्कळ झाडे लावलेली आहेत. त्यांनी सांगितले आहे की, राष्ट्रवादीच्या सदस्यांना झाडे लावण्याचा अनुभव नाही.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील चुकीचे बोलत आहेत. मला झाडे लावण्याचा जास्त अनुभव आहे.

**आसिफ पटेल :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी आपले शब्द मागे घ्यावेत. मी राष्ट्रवादीच्या लोकांवर आरोप करित नाही. तुम्ही शब्द मागे घ्या. मी राष्ट्रवादी पक्षाचे नांव घेतलेले नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम हा आपला इतिवृत्तांताचा विषय आहे आणि यामध्ये आपण वृक्षारोपणाचा विषयी एवढा गोंधळ घातलेला आहे. सन्मा. सदस्य आसिफ पटेल म्हणाले की, ह्यामध्ये जेवढी नांवे आलेली आहेत. त्यांना काही अनुभव आहे का? त्याच्या विषयी मी सहमत आहे. त्यामध्ये सर्वजण आले. तरीसुद्धा सांगतो की, आता सन्मा. सदस्य मिलन पाटील म्हणतात की, मी तीन वाड्यांमध्ये झाडे लावलेली आहेत. परंतु त्यांना झाडांविषयी माहिती आहे का?

**मिलन पाटील :-**

या सभागृहामध्ये चर्चा करु नका. जशी कव्वालीची मैफिल चालते तसे तुम्ही माझ्याबरोबर एकटे बसा आणि झाडांची माहिती मी तुम्हांला विचारतो आणि तुम्ही मला उत्तर द्या. या सभागृहाचा वेळ वाया घेऊ नका. प्रत्यक्ष मी तुमच्या ऑफीसला येतो किंवा तुम्ही माझ्या ऑफीसला या. मग पाहू या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मग त्या समितीमध्ये यांना एकट्यांना ठेवावे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदसय श्री. आसिफ पटेल साहेबांनी जे वक्तव्य केले. ते चुकीचे आहे कारण येथे बारा सदस्य दिलेले आहेत आणि त्यांनी त्याच्यामध्ये जो उल्लेख केला की, यांना वृक्षारोपणाबद्दल माहिती आहे किंवा नाही. तरी प्रत्येकाला माहित आहे किंवा नाही हे काही आम्ही आसिफ पटेल यांना सांगायचे का, आम्हाला माहित आहे म्हणून.

**आसिफ पटेल :-**

असे काही म्हटलेले नाही. परंतु सर्व याबाबत इंटरेस्टेट आहेत का? आणि सर्वांना माहित नाही असे म्हटलेले नाही.

**सुरेखा गायकवाड :-**

तुमच्या माहितीसाठी सांगते की, मिरा रोडमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम हा सर्वात जास्त सुरेखा गायकवाड यांनी राबविला आहे.

**गीता जैन :-**

आपने ऐसा आक्षेप क्यों लगाया की, महिला इस बात में इंटरेस्टेड नही है।

**सुरेखा गायकवाड :-**

सन्मा. सदस्य श्री. आसिफ पटेल साहेब तुम्ही जे वक्तव्य केलेले आहे ते चुकीचे आहे आणि गटनेत्यांनी ज्यांना इंटरेस्ट आहे त्यांना विचारुनच ती नांवे घेतलेली आहेत आणि नंतरच दिलेली आहेत.

**आसिफ पटेल :-**

ये जो तीन नाम डाले है वो तज्ञ के लिए रखे हुए है। ये जो दो नाम डाले उसमे तज्ञ है क्या? बताईये मुझे। इनको मालूमात है क्या? ये दो नाम की मै बात कर रहा हु। और मैने उपर जो नाम डाले है उसके सब लोग इंटरेस्टेड होंगे।

**गीता जैन :-**

इसका मतलब ये नही की आप महिलाओं के लिये बोले।

**आसिफ पटेल :-**

मै महिलाओं के लिए नही बोल रहा हुँ। बल्की सारे सदस्यो के लिए बोल रहा हुँ।

**तुळशीदास म्हात्रे :-**

या इतिवृत्तांताला मंजुरी द्या. एक शिवसेनेचा सदस्य घ्या. त्यामुळे काहीही फरक पडणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम वृक्षप्राधिकरण समितीवरुन बराच वादविवाद झाला. सगळ्यांनी आप आपली मते मांडली. परंतु हे वास्तव नाही. त्यामध्ये असे लिहिले आहे की, एन.सी.पी.चे चार सदस्य, काँग्रेसचे तीन सदस्य, बी.जे.पी.चे दोन सदस्य, शिवसेनेचा एक सदस्य याप्रमाणे सगळ्यांनी आपापले सदस्य नेमलेले आहेत. फक्त एकच चुकून नांव अनावधानाने संगिता म्हात्रे यांचे आलेले आहे. तरीसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आमचे नांव मागे घेतो आणि प्रियांका करंबळे यांचे नांव आम्ही सुचवितो.

**शशिकांत भोईर :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने मी येथे बोलत आहे. मला थोडे इतिवृत्तांताबाबत बोलावयाचे आहे. मॅडम ह्यामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. म्हणून तुम्हांला हा विषय मी सुचवत आहे. पान क्र. ४०, ४१ प्रकरण २२ ठराव क्र. १३, मुंबई नर्सिंग होम रजिस्टर ॲक्ट १९४९ नियम क्र. २/३ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका ही स्थानिक सेवा प्राधिकरण असल्याने उक्त अधिनियमाच्या नियम ५(२) अन्वये नोंदणी परवाना त्या त्या वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत नियम क्र. ७ नुसार नवीन / नुतनीकरण करावयाचे आहे. स्थानिक सेवा प्राधिकारणाने नियम ४(१) व ४(२) प्रमाणे सादर झालेल्या अर्जावर कारवाई करावयाची आहे. स्थानिक सेवा प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या नियम १७(१, २, ३ व ४) च्या तरतुदीस बांधील राहून फी आकारण्यात यावी अशी दुरुस्ती करावी. पान क्र. ५४ प्रकरण क्र. २५ ठराव क्र. १६ महसुल विभाग जिल्हाधिकारी कार्यालय या नोंदीऐवजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर योजनेवर ज्यांच्या जमीनी गेल्या आहेत त्या शेतकऱ्यांनी नामनिर्देशित केलेल्या नातेवाईकांना प्रशिक्षणासाठी पाठविलेले असून त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना या योजनेवर सेवेत रुजू करून घेण्यांत यावे. त्यांना प्रशिक्षण भत्ता देण्यांत यावा. तसेच क्र. १७ मध्ये नावांत एडवर्ड ॲन्थोनी फिलीप्स यांचे नावाऐवजी श्री. संदेश भालचंद्र पाटील यांचे नांव प्रत्यक्ष रेकॉर्डवर असल्याने तपासून समाविष्ट करावे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आणि मा. महापौर मॅडमना मी विनंती करतो की, वृक्षप्राधिकरण समितीवर सौ. प्रियंका प्रकाश करंबळे यांचे नांव आपण जाहिर केल्याबद्दल आपण तसे घोषित करावे.

**नरेंद्र मेहता :-**

पान नं. ७६ ठराव क्र. २२ धोकादायक इमारती पाडण्याबद्दल आपण २५ लाखाची मंजुरी दिलेली आहे. त्या संदर्भात मी सुचना मांडलेली होती. पान नं. ६४ वर हे एवढे लिहिले असले तरी एका धोकादायक इमारतींची आपण नोंद करुन घ्यावी. एकच लाईन आलेली आहे. मी त्या संदर्भात कमीत कमी सात ते आठ लाईन पर्यंत बोललो होतो की, धोकादायक इमारती पाडण्याबाबत आपण एक टेंडर काढू या. त्यांचा यामध्ये काही उल्लेख दिसत नाही आणि २५ लाख रुपयांची मंजुरी देण्यांत आलेली आहे. तर कृपया ते बदलून घ्यावे.

**प्रकरण क्र. ३४ :-**

दि. १९/०६/२००३, दि. १९/०७/२००३ व दि. १६/०८/२००३ रोजी मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २४ :-**

दि. १९/०६/२००३, दि. १९/०७/२००३ व दि. १६/०८/२००३ रोजी मा. महासभेचे इतिवृत्तांत मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह कायम करणेंत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३५ चे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम ज्या समितीबद्दल आपण दिलेले आहे ती महिला बालकल्याण समिती स्थापन करण्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे या सभागृहामध्ये जे सदस्य आहेत त्यापैकी २/३ सदस्य उपस्थित असतांना ही समिती स्थापन करणे असा माझ्या माहितीप्रमाणे नियम आहे. दुसरे म्हणजे नऊ सदस्यांची आपण नेमणुक करणार आहोत. एक तर सचिव साहेबांनी किमान आणि कमाल हा कुठे नियमामध्ये उल्लेख आहे का? आम्ही जर बालकल्याण समितीमध्ये महिलांना प्राधान्य द्यायचे असेल तर नऊच्या ठिकाणी अकरा का घेऊ नये, तेरा का घेऊ नये. एक तर कमाल किंवा किमान हा आकडा नियमामध्ये कुठे दिलेला आहे का? तिसरी गोष्ट म्हणजे त्यामध्ये एक वर्षाची मुदत आपण दिलेली आहे, असाही उल्लेख नियमामध्ये कुठेही नाही. एका वर्षाची मुदत असली पाहिजे. हे सभागृह ठरविणार आहे. आपण आज एक नवीन पद्धत काढलेली आहे. नवीन पद्धतीमध्ये ठराव दिलेला आहे. फक्त अनुमोदक व सुचक अशी नांवे टाकायची आहेत. असे सभागृहामध्ये कधीही आलेले नाही. सभेमध्ये चर्चा सविस्तर होऊन नंतर ज्या व्यक्तींची नांवे आली ती ठराव लिहून व्यवस्थित दिला जात आहे. ही पद्धत आज कशा तऱ्हेने तुम्ही टाकलेली आहे.

**प्र. सचिव :-**

हा ठराव आम्ही फक्त माहितीसाठी दिलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एकतर २/३ सभागृहामध्ये सदस्य आहेत का? दुसरे म्हणजे नऊ किंवा अधिक देऊ शकतो काय? नऊच कशाला? आज देशामध्ये महिलांना ३५ टक्के, ३८ टक्के आरक्षण देण्याचे काम सर्व सरकार करीत आहे. भाजपाने लोकसभेमध्येपण ठराव आणलेला आहे. आपल्या इथे ३३ टक्के महिला आहेत. नगरपालिकेच्या वेळी नऊ सदस्य होते. त्यावेळी ४५ सदस्य फक्त या सभागृहामध्ये होते. आज ७५ सदस्य आहेत. त्यामध्ये २६ ते ३० महिला आहेत. मग नऊ का? त्यामध्ये आकडा वाढू शकतो किंवा नाही? म्हणून ही जी आकडेवारी ठरावामध्ये दिलेली आहे ती दिली नाही पाहिजे आणि सभागृहाचा विषय सभागृहाने ठरविला पाहिजे होता. मुदतीच्या बाबतीमध्ये ह्या ठिकाणी सविस्तर लिहिलेले आहे की, मुदतीचा इथे कुठेही उल्लेख केलेला नाही. मुदत हा विषय समिती रचनेचा आहे. महापालिकेच्या कोणत्याही वेळी कोणताही विषय समिती विसर्जन करता येईल किंवा रचनेचा फेरफार करता येईल. या कायद्यामध्ये उल्लेख केलेला आहे.

**प्र. सचिव :-**

महापालिकेने ठराव करुन अन्यथा तरतुद केली नसेल तर असे अधिनियम कलम ७ अन्वये अधिन राहून महिला आणि बालकल्याण समितीत तिची रचना झाल्यापासून एक वर्ष मुदत कायम करण्याचे सभागृहाने ठरवावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही जे वाचता ते उपविधीत आहे का? उपविधी अजून मंजुर झालेली नाही. मग त्या उपविधी प्रमाणे काम करायचे आहे का? उपविधि मंजुर झालेला आहे का?

**प्र. सचिव :-**

सभागृहाने ठरवायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून तुम्हांला सांगतो, नऊ सदस्य देण्याचे काही कारण नव्हते. २/३ सभासद सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आता ही समिती नेमायची आहे. किमान व कमाल संख्या निश्चित करा. त्याची मुदत ठरवा. हे सभागृहाचे काम आहे. कारण महिलांना या बाबतीत माहिती नाही. ज्या नऊ किंवा

अकरा महिला त्यामध्ये इंन्टरेस्ट घेतात म्हणजे दोन महिलांना वगळण्यांत येत आहे. म्हणून या सभागृहामध्ये २/३ सदस्य उपस्थित आहेत का? हे पहिले नोंद करा. असतील तर पुढची कारवाई सुरु करा.

**रोहिदास पाटील :-**

यावर महापौर मॅडमना माझी एक विनंती आहे की, आता जेवणाची वेळ होत आहे आणि वृक्षप्राधिकरण समिती आपण ज्या पॅटर्नमध्ये केली. कदाचित राष्ट्रवादींना वाटेल की, आमच्यावर थोडासा अन्याय झालेला आहे. ती संख्या वाढू शकते. जसे राष्ट्रवादी ४, काँग्रेस आय ३, भाजपा २, शिवसेना १, जनता दल १, आघाडी १ असा पॅटर्न करुन घ्या. त्याचे एक वर्ष घ्या आणि वेळ वाढविण्याचे काही कारण नाही व संख्या जर नऊच्या ठिकाणी अकरा अधिक आयुक्त असे बारा करा. आपल्याला संख्या ठरवायची आहे. म्हणजे सगळ्या पक्षांना प्रतिनिधीत्व मिळाले. राष्ट्रवादीला काही कमी मिळाले असे वाटायला नको.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

संख्येनुसार आपण गेलो तर आमची संख्या जास्त होती. तुमच्यापेक्षा आमची संख्या डबल होते. सचिव साहेब, किती संख्या आहे ते सांगा.

**प्र. सचिव :-**

सभागृहाने ठरवावे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, मला वाटते या ठिकाणी महिला सदस्यांची आपल्याला नेमणुक करावयाची आहे. ती सभागृह ठरवेल असे आहे. तर मला वाटते प्रतिनिधीला ते योग्य राहील. तर नऊची संख्या बारा करायला काही हरकत नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने मी येथे बोलत आहे. ही महिलांची समिती स्थापन करायची आहे. तर त्याबद्दल महिलांना पण विचारा ना की, महिलांना काय बोलायचे आहे. ह्याच्यामध्ये पुरुष कशाला उभे राहतात. त्या तिकडचेच उभे राहतात. आमच्या येथून एकटेच सन्मा. सदस्य आसिफ शेखच उभे राहिले होते. तर फक्त महिलांना बोलू द्या. सर्व पक्षाच्या महिला उपस्थित आहेत आणि ठरवा नऊ पाहिजेत, बारा पाहिजेत की अकरा पाहिजेत त्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हंसनाळे यांनी जे सांगितले आहे तेच मी सांगत आहे की, महिला ंना विचारा की, नऊ सदस्य ठरविणारे तुम्ही कोण?

**ज्योत्स्ना हंसनाळे :-**

कृपया पक्षातील महिलांना बोलू द्या.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम या महानगरपालिकेच्या एक महिला महापौर आहेत आणि सध्या सभागृहाच्या भावना लक्षात घेता ही समिती गठीत करतांना त्यांचे अध्यक्षपद आपण घोषवून सर्व पक्षीय महिला सदस्यांना संबोधित करा व त्यांची एक मिटींग घ्या आणि ह्या समितीमध्ये जी चर्चा होईल त्या चर्चेमधून हवे असल्यास प्रत्येक गटनेत्याचा एक एक सदस्य घेतले तरी हरकत नाही. कारण या देशाचा इतिहास आहे की, या देशाच्या महिलांच्या विकासासाठी सर्वाधिक प्रयत्न पुरुषांनी केलेले आहेत आणि म्हणून या पक्षाच्या गटनेत्यांना देखील त्यांनी त्याच्यामध्ये घेतले तरी आमची काहीही हरकत नाही. परंतु सर्व पक्षीय जेवढे निवडून आलेले सदस्य आहेत. त्या सर्व सदस्यांची तुम्ही एक मिटींग घ्या. एक समिती नेमा किंवा त्यांना तुम्ही संघटीत करा आणि समिती गठित केली जावी अशी मी आपणांस शिफारस करते. मला असे वाटते सभागृह या गोष्टीशी सहमत असेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याला महिला बालकल्याण समिती गठीत करावयाची आहे. आज सभागृहामध्ये उपविधी मंजुर नसतांना ही समिती गठीत करण्याचा विषय आलेला आहे. याच्यामध्ये कुठल्या कायद्याचा आधार घ्यावा हा सभागृहापुढे प्रश्न नक्कीच आहे. तरीपण महिला समिती गठीत व्हावी याबद्दल महिलांपेक्षा पुरुषांना जास्त उत्सुकता आहे. म्हणून महिलांची लवकरात लवकर समिती गठीत व्हावी. यासाठी आपण कायद्याचा ३० उपकलम १ याचा आधार घेऊन या सभागृहाने कमीत कमी व जास्तीत जास्त संख्या ठरवावी. ३०(२) प्रमाणे जी सदस्य संख्या ठरेल, त्याच्यामध्ये कमीत कमी ७५ टक्के महिला असल्या पाहिजे. जर महिलांची संख्या ७५ टक्के पेक्षा जास्त असेल तर १०० टक्के महिला असल्या पाहिजेत. दुसरी गोष्ट म्हणजे सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी यांनी सांगितली ती चुकीची आहे. २/३

सदस्य उपस्थित असले पाहिजे. तसे नाही. या सभागृहामध्ये या समितीला काय काम करायचे आहे. या समितीचे कामकाज ठरवायला लागणार आहे. नुसती समिती गठीत करुन चालणार नाही. पहिले म्हणजे तिथे करण्यासाठी आपल्याकडे नियोजन नाही. उपविधी नाही. तरीदेखील आपण करतो आहे. ३०(१) खाली नियमाचा आधार घेऊन कारण आपल्याला सर्वसाधारण सभेला हे अधिकार आहेत. तर ३०(२) अन्वये २/३ लोक सभागृहात हजर असतांना त्यांनी त्यांच्या कामांची पद्धत, काय काम करायचे, कुठल्या प्रकारचे काम करायचे हे सभागृहाने ठरवायचे आहे. त्यावेळी २/३ सदस्य लागतात. दुसरी बाब अशी आहे की, या समितीमध्ये एक चेअरमन असणार आहे आणि दुसरा व्हाईस चेअरमन. त्याच्यानंतर या कमिटीला एक वर्षाचा कालावधी देण्यांत आलेला आहे. एक वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी त्यांच्या कर्तव्य, जबाबदाऱ्या जे ठरवील त्या वेळोवेळी सभागृहापुढे त्यांची प्रोसिडींग मंजुरीला येते आणि एक वर्षानंतर पुन्हा समिती गठित करावी लागणार आहे. ह्या कायद्यामध्ये मुळ कायद्यामध्ये केलेल्या गोष्टी अंतर्भूत असून त्यानुसार उपविधी जेव्हा मंजुर होतील तर उपविधी मंजुर झाल्यानंतर त्यानुसार पुढे कारवाई करावी. तुर्त एक वर्षासाठी आज सभागृहाने ही समिती नेमायला हरकत नाही. परंतु आपण समिती नेमत असतांना या समितीला कोणते अधिकार द्यावेत. त्या संदर्भामध्ये घोषवाऱ्यामध्ये आयुक्त साहेबांनी नियम क्र. ६० चा उल्लेख केलेला आहे. कृपया महिला सदस्यांना माझी विनंती आहे की, आपल्याला कुठले कुठले अधिकार पाहिजेत. तुमचे सौभाग्य आहे की, आपल्या महापौर मॅडमदेखील महिला आहेत. त्यामुळे तुम्हांला पहिले प्रेफरन्स मिळेल आणि त्या नक्कीच देतील. शी इज सो जनरस आणि म्हणून तुम्ही समजून घ्या की या साठमध्ये जेवढ्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्या या संपूर्ण नगरपालिकेच्या सर्व सदस्यांवर पुरुष आणि महिला त्यांना द्यायच्या आहेत. त्याच्यापैकी तुम्हांला कुठल्या हव्या आहेत. विशेषतः सचिव साहेब जे उपविधी तुमच्याकडे आहेत निश्चितपणे त्यांच्या कर्तव्य जबाबदाऱ्या ठरविलेल्या नाहीत. म्हणून आतापर्यंत जेवढ्या महिला समित्या स्थापन झाल्या त्या फक्त नावापुरती राहिल्या आणि मग त्यांची नेहमी तक्रार असते की, आम्हांला कोणीही काम देत नाही आणि काम नसेल तर फन्डस् देत नाहीत आणि फन्डस् मिळाले नाही म्हणून त्यांनी काय काम केले नाही. म्हणून त्यांच्यामध्ये एक नैराश्य येते. अनेक गोष्टी संस्कृतीशी किंवा महिला वर्ष साजरे करणे ह्या सगळ्या गोष्टीशी संबंधित आणखी कर्तव्ये व जबाबदाऱ्या कायद्याने निश्चित केलेल्या आहेत. त्या जर त्यांना दिल्या तर निश्चितपणे त्यांना तो फन्ड डायव्हर्ड करता येईल. अशी माझी सभागृहाला विनंती आहे म्हणून मा. महापौर मॅडमनी तो तसा निर्णय घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

याच्या अगोदर उपविधीचा प्रश्न आला की, उपविधी शासनाकडे पाठविली गेली आहे. ती उपविधी आपण स्विकारावी. का स्विकारु नये. आता ज्या दोन-तीन वक्त्यांच्या चर्चा झाल्या परंतु मागच्या वेळी सभागृहात ऑक्ट्रॉयचा विषय आला त्यावेळी या उपविधीचा विषय चर्चेला गेला. शासनाकडे आपण उपविधी पाठविला. त्या प्रोसेसमध्ये मंजुरी मिळेल. त्या प्रोससमध्ये आहेत आणि अशा स्वरुपात आपण उपविधीचा आधार घेऊ शकतो. असे मागच्या वेळेला सभागृहामध्ये रुलिंग झालेले आहे. त्यानुसार आपण तो ही विचार करावा. ह्या अगोदर सभागृहाचा एक सेम पॅटर्नला निर्णय झालेला आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम महिला बालकल्याण समितीसाठी पुरुष नगरसेवक एवढे आम्हांला सहकार्य करतात त्याबद्दल धन्यवाद. पण आता सन्मा. सदस्या प्रभात पाटील ताई यांनी आम्हांला जे सुचविले की, आपण पण एक महिला आहात आणि ह्या महिलांची कमिटी आपल्याला बनवायची आहे. तर सर्व पक्षीय महिलांची आपण एक बैठक घ्या. त्याच्यामध्ये गटनेत्यांना बोलवा आणि त्यानंतरच ते उपविधी आणि सर्व कार्यक्रम आपण त्याच्यामध्ये पारित करुन घेऊ आणि त्यानंतर हा विषय सभेपुढे आला तर बरे होईल.

**ज्योत्स्ना हंसनाळे :-**

मा. महापौर मॅडम मा. नगरसेविका प्रभात पाटील मॅडम आणि मा. नगरसेविका रिटा शाह यांनी जे निवेदन या ठिकाणी केलेले आहे तसेच आमचेही मत आहे. अशाप्रकारे बैठक किंवा चर्चा करुन आपण ती कमिटी स्थापन करावी.

**ज्युडी डिसोझा :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते जसे आपण वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये अकरा सदस्य घेतले. त्याचप्रमाणे महिला बालकल्याण मध्ये सुद्धा अकरा सदस्य व्हावे अशी माझी इच्छा आहे.

**मोहन पाटील :-**

आपण सभागृहामध्ये त्यांची संख्या फिक्स करावी.

**ज्युडी डिसोझा :-**

त्याची संख्या अशी असेल एन.सी.पी.चे ४, काँग्रेस २, बी.जे.पी. २, जनता दल १.

**मा. महापौर :-**

त्याची चर्चा आता नको आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम उपविधी मंजुर झालेला नाही. तरी ती उपविधीच्या आधाराने सभागृहामध्ये काम होते ही एक गंभीर बाब आहे. आज ह्या गोषवाऱ्यामध्ये २/३ संख्या मी बोललो त्याचा कालावधी त्याचे कार्य सर्व दिले ही चुकीची पद्धत आहे. माझे म्हणणे तेच होते की, हे कुठून आले.

**मा. आयुक्त :-**

२/३ ची आपली कल्पना काय आहे? उपस्थित सदस्यांच्या २/३ सदस्य. कोरम हा त्याचा बेस आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोरम झाला, मी मान्य केला. काम काय करायचे. अजून सभागृहाने ठरविले नाही आणि तुम्ही उपविधीप्रमाणे पाठवून दिलेले आहे आणि अजून आपला उपविधी आलेला नाही आणि उपविधीप्रमाणे तुम्ही काम करता.

**मा. आयुक्त :-**

उपविधीचे जे लिगल स्टेटस आहे. माझ्या माहितीप्रमाणे या महापालिकेमध्ये प्रशासकीय राजवट असतांना प्रभारी अधिकारी यांची नेमणूक केली गेलेली होती आणि प्रभारी अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या पावर्स वापरुन या महापालिकेला कुठल्या प्रकारचे रुल्स, रेग्युलेशन्स असावेत. कायद्याच्या दृष्टीने ज्या तरतुदी आहेत त्या आपल्या महापालिकेच्या बाबतीमध्ये थोड्या फार फेरफार करुन कशा ॲप्लीकेबल करता येतील. या संदर्भामध्ये सखोल अभ्यास करुन महासभेच्याच कॅपॅसिटीमध्ये हा ठराव शासनाला पाठविलेला आहे. आपल्या माहितीसाठी सांगतो की, आपल्या आजुबाजुच्या महानगरपालिका जुन्या आहेत. पण त्यांचेदेखील तीन-तीन, चार-चार, पाच-पाच वर्ष शासनाकडून उपविधी मंजुर करून आलेले नाहीत आणि या सभागृहाची त्याला संमती आहे. कारण हा महासभेचा ठराव आहे. त्यामुळे त्याच्या वैधतेबद्दल कमीत कमी ह्या महासभेमध्ये तरी प्रश्न उपस्थित होऊ नये अशी अपेक्षा आहे. कारण त्यांनी महासभेच्या कॅपॅसिटीमध्ये पाठवलेला तो ठराव आहे. शासनाने पाठवल्यानंतर महासभेने पाठवलेला ठराव म्हणून त्याला एक औपचारिक बाब म्हणून मान्यता द्याची आहे. याच्या पलीकडे त्याला काही महत्व आहे असे मला वाटत नाही. अशा प्रकारचे दुसऱ्या महापालिकेचे उपविधी मंजुर झालेले आहेत. त्यामुळे ठाणे महापालिकेच्या ऐवजी भाईंदर महापालिका एवढेच फक्त त्या ठिकाणी म्हणावयाचे असते. परंतु तिथे शासन दरबारी थोडासा उशीर लागतो आणि आपल्या माहितीसाठी सांगतो की, हा विषय फक्त महिला बालकल्याण समितीच्या कार्यपद्धती बद्दलचा नाही. आपण जे सभागृहाचे कामकाज आता चालवतो आहे आणि एक वर्ष चालवत आलेलो आहे हे त्याच उपविधीच्या आधारे चालवत आलेलो आहे. यावर कुणीही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे त्याच्या कायदेशीरपणाबद्दल फार काही फरक पडेल अशातील गोष्ट नाही. यावर अनौपचारिक चर्चा करुन आपल्याला सदस्य संख्या जर कमी जास्त करावयाची असेल तर ती आपण करु शकतो. हा एक मुद्दा आणि उपस्थित सदस्यांपैकी २/३ सदस्यांनी त्याला मत द्यायला पाहिजे. सर्व सदस्यांच्या नाही हा दुसरा मुद्दा. या विशेष समित्या ज्या आहेत त्या विशेष समित्या जर तातडीने नेमल्या तर या संदर्भातील जे कार्यक्रम आहेत ते कार्यक्रम आपल्याला ताबडतोब घेता येतील. जसे आजच्या सभेत आम्ही हा विषय ठेवला की, जी शाळेतील मुले आहेत त्यांना केंद्र सरकार शालेय पोषण आहार देत आहे. तर त्या बालकांना खरोखरच चांगल्या प्रतीचा आहार मिळतो का? हा एक मोठा शंकेचा प्रश्न आहे. आम्ही ते स्वतः तपासलेले आहे आणि आमचे समाधान झाले नव्हते. म्हणून ह्या ५० पैशाची आपल्याकडून आपण भरपाई करावी आणि चांगल्या प्रकारे खिचडी केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी. अशा प्रकारचा एक प्रस्ताव आम्ही मांडलेला आहे. कदाचित, महिला बालकल्याण समिती असती तर त्यांनी अधिक चांगल्या प्रकारे अभ्यास केला असता आणि चांगले उपाय ह्याच्यावर सुचविले असते. म्हणून आपल्याला विनंती आहे की, याच्या कायदेशीरपणा बद्दलचे जे प्रश्न आहेत ते फारसे उपस्थित करण्याची आवश्यकता नाही. गेले वर्षभर याच कायद्याच्या आधारावर या सभागृहाचे कामकाज चालविलेले आहे आणि मा. महापौर मॅडम यांनी या ठिकाणी मान्य केलेले आहे. सन्मा. सदस्या रिटा शाह यांची जी सुचना होती आणि त्याला अनुमोदन देखील दिले गेलेले आहे. तर ह्या चर्चेनंतर पुढे आपण सदस्य संख्या ठरविणार, त्याची मुदत ठरविणार, एक वर्षाच्या मुदतीचे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी सुचना केली ती खरे म्हणजे स्वागतार्ह आहे. याचे कारण म्हणजे सगळ्याच महिला सदस्यांना त्याच्यामध्ये कामकाज

करण्याची संधी मिळावी. जर तुम्ही दोन वर्ष, चार वर्ष त्याची मुदत ठरवली तर तेवढ्याच महिला फक्त तीन चार वर्ष काम करतील आणि बाकीच्या महिलांना ह्याच्यामध्ये कामकाज करण्यांस संधी मिळणार नाही. हा त्याच्या पाठीमागील हेतू आहे. याच्या बाबतीतील जी चर्चा आहे ती सविस्तर महापौर मॅडमच्या अध्यक्षतेखाली जी बैठक होईल त्यामध्ये हे निर्णय घेतले जातील आणि पुढच्या सभागृहामध्ये या बाबतीमध्ये विषय मांडला जाईल.

**प्रकरण क्र. ३५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समिती स्थापन करणे व सदरहू समितीस अधिकार प्रदान करणेबाबत.

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची नांवे देण्याबाबत मा. महापौरांना ही सर्वसाधारण सभा अधिकार देत असून समितीची नांवे गठीत करुन सदरची माहिती पुढील सर्वसाधारण सभेत ठेवण्यांत यावी.)

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३६ चे वाचन केले)

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम परिवहन सेवा समिती बनवणार आहेत की, आपण त्याचा फक्त अहवाल मागितला आहे आणि या अहवालामध्ये ते आपल्याला काय काय देणार आहेत? कारण ह्यामध्ये जो १० लाखाचा खर्च दिलेला आहे. त्या अंतर्गत ते आपल्याला काय काय देणार आहेत. तशी टिपणी आपण आम्हांला दिलेली नाही. सविस्तर टिपणी आम्हांला दिलेली नाही. तर मला असे वाटते की, आपण आम्हांला सविस्तर टिपणी द्यायला हवी होती. कारण आमचे ह्याच्यावर काहीच स्टडी नाही.

**मा. आयुक्त :-**

स्टडी करण्याची ही स्टेजच नाही. आपल्याला सर्वांनी ह्या सभागृहाने एक निर्णय घेतलेला आहे की, आपल्याला परिवहन समितीची स्थापना करावयाची आहे आणि या शहराला परिवहन व्यवस्था द्यायची आहे. त्यावेळी देखील मी आपल्याला सांगता होतो की, ही जी परिवहन सेवा सुरु करण्याची स्टेज नाही. परंतु सर्व जनप्रतिनिधींच्या आग्रहामुळे आपण हा निर्णय घेतलेला आहे. आता यामध्ये परिवहन सेवा सुरु करायची म्हणजे ताबडतोब उद्यापासून लगेच बस सर्व्हिस सुरु करायची. इतक्या सहजपणे घेण्यासारखा हा विषय नाही. केंद्र सरकारने सी.आय.आर.टी. नावाची जी संस्था जी ह्या विषयामध्ये तज्ञ संस्था जी आहे त्याचे पुण्याजवळ ऑफीस आहे. त्याला मार्गदर्शन करण्यासाठी ह्या संस्थेची स्थापना केलेली आहे. मग आशिया खंडातील सर्वात मोठी बेस्टसारखी परिवहन व्यवस्था जी आहे तीदेखील या सी.आय.आर.टी.चे मार्गदर्शन घेते. या सी.आय.आर.टी.चे तज्ञ या ठिकाणी येतील. सर्व रुटस्‌चा अभ्यास करतील. शहराच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करतील. येथील लोकसंख्या कशा प्रकारची आहे. रेल्वेला किती ट्रॅफिक जाते. किती ट्रॅफिक बेस्टच्या बसेसमध्ये जाते. या शहरातील नागरिक बेस्ट बसेसचा किती वापर करतात. बी.एम.सी.च्या सेवेचा वापर या शहरातील नागरिक किती करतात. एस.टी. महामंडळाची सेवा या शहरामध्ये उपलब्ध आहे. तिचा फायदा किती नागरिक घेतात आणि हे सर्व विचारात घेऊन आपल्याला ती सेवा तर बंद करायची नाही. परंतु हे सर्व गृहित धरुन आपण जर सेवा सुरु केली तर ती सेवा नक्की कशा स्वरुपाची असेल. ती फायद्यात राहिल की, तोटयात राहील. तीचे स्वरुप काय असावे. खाजगीकरण केले तर त्या खाजगीकरणाची प्रक्रिया कशी असेल. जर किलोमीटर बेसीसवर आपण भाडोत्री वाहने घेऊन आपण जर ही सेवा राबविली तर आपल्याला काय फायदा होईल की, तोटा होईल किंवा मग पुर्णतः खाजगीकरण केले तर त्याचे फायदे काय आहेत. ह्या सगळ्या गोष्टी आहेत. त्या आजच्या तारखेला आपल्या कुणालाच निश्चितपणाने सांगता येत नाही. यासाठी आपल्याला या तज्ञ संस्थेची गरज लागणार आहे. यांनी खरे म्हणजे १० लाख रुपयांपेक्षाही जास्त रक्कम आम्हांला सांगितली होती. मी स्वतः त्या ठिकाणी सी.आर.टी.चे डायरेक्टर आहेत त्यांना जाऊन भेटलो. त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि मग त्यांनी दोन लाख रुपये त्यामधून कमी करुन आठ लाख रुपये ठरविले. मात्र त्यांनी एक विनंती केली की, आमचा जो ग्रुप येईल त्या ग्रुपचा बंदोबस्त या ठिकाणी आपण महापालिकेतर्फे करावा. त्यांची निवासाची व्यवस्था असेल. त्यांच्या जेवणाखाण्याची या कालावधीतील व्यवस्था असेल. त्यासाठी आम्ही सभागृहाकडून दोन लाख रुपये जास्तीचे मागवून घेत आहोत. कदाचित दहा लाख रुपये खर्च येणार देखील नाही. त्याच्यापेक्षा कमी येईल. त्यांचे जे प्रत्यक्ष ध्येय आहे ते आठ लाख रुपयांचे आहे आणि

बाकीची व्यवस्था करण्यासाठी हे पैसे लागणार आहेत. याच्यामध्ये ते अहवाल आपल्याला पाच प्रतीत देणार आहेत. तो अहवाल सविस्तर असणार आहे आणि तो पुन्हा सभागृहापुढे डिटेल चर्चेसाठी सादर करण्यांत येणार आहे आणि मग आपले सभागृह जे निर्णय घेईल त्या निर्णयानुसार पुढील कारवाई करावी.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने मी येथे बोलत आहे. प्रकरण क्र. ३६ विषय, परिवहन सेवा अहवाल तयार करणेकरिता एजन्सी नेमणे. मा. आयुक्त यांनी प्रकरण क्र. ३६ खाली सदर सभागृहाच्या अवलोकनार्थ गोषवारा सादर केला आहे. त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २५ अन्वये परिवहन सेवा सुरु करण्याची तरतुद आहे. परंतु आजतागायत कार्यवाही करु शकत नाही. तसेच, परिशिष्ट २० खालील तरतुदीसुद्धा लागू होत नाही. सदर तरतुदी नियम ३४१ व ३४२ च्या अन्वये कारवाई होऊ शकत नाही. परिवहन सेवा केंद्र सरकारच्या सेंन्ट्रल इन्स्टिट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट पुणे या संस्थेच्या अहवाल व आर्थिक बाबी गोषवाऱ्यामध्ये आलेले नाही. तरी सदर अहवाल व कायदेशीर बाबींसह सभेपुढे आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम मै इसका समितीका अनुमोदन करते हुए अपने जो सदस्य है उनको सिर्फ एक बार बता देना चाहता हुं की आपकी महानगरपालिका चुने हुए एक बरस का पुरा काल हो गया। आपके यहा प्रोव्हिजन चार समितीयों का था। सबसे पहले वृक्ष संवर्धन समिती थी। प्रभाग समिती थी, परिवहन सेवा समिती है, महिला बालकल्याण है। जिस तरह से स्टँडिंग कमिटी यहा पे काम कर रही है। एक बरस उसका पुरा हो गया। मेरे कहने का तात्पर्य आपण समझीये, हम किसी भी प्रोव्हिजन मे, किसी ॲक्ट मे हम लोक सब सक्षम है। बोलने के लिये एक दुसरे मे जब तक जिम्मेदारी आप सबको नही मिलेगी, जब तक जिम्मेदारी आपकी नही बटेगी, तब तक आप शहर का बहुतसा विकास कही ना कही रोक देंगे। आपने देखा होगा की, एक वृक्ष संवर्धन समिती बनी उससे पहले प्रभाग समितीया कॅन्सल कर दी। न जाने कौनसा पिरिएड आयेगा तब जाके वो पिरिएड खत्म होगे। एक या दो साल मे प्रभाग समितीयाँ बनेगी। आक्षेप किसी पे नही। परीवहन सेवा इस शहर के लिए सभी पार्टीयों ने अपनी मॅनिफेस्टोमे परिवहन सेवा का पुरा पुरा ऐलान किया था। हम परिवहन सेवा आपको किसी ना किसी रुप मे देंगे। इस तरह से परिवहन सेवा का जो ठराव आज किया गया है, बाकी स्वागत योग्य है। उसका काम शुरु हो, मंजुरी करने का है। लेकिन मेरा तात्पर्य दुसरा है। महिला बालकल्याण का चित्र है। यहाँ के महिलाओं को सारे भारत वर्ष मे इस तरह महिलाओं को आगे बढाया जा रहा है। उनका समय क्यों कम किया जा रहा है। आज अगर आपकी महिला समिती सर्व संमतीसे बनी तो आपका पिरिएड आपके अध्यक्ष को एक उपाध्यक्ष को बाकी जो कार्यकारिणी के सदस्य जो भी आप तय करे, ग्यारह लोगोंको कम से कम एक साल की जिम्मेदारी तो मिलती है। इसी तरह से जो दुसरी समितीयाँ है के जितना आप डीले करेंगे उतना ही आपको कही ना कही आपको अधिकारोंसे वंचित रहना पडेगा। आपकी ये जो उपविधी पास हुई नही हुई। मैने कितने सालों से देखा है, उपविधी क्या होती है। उपविधी एक तरह से सेट इन ॲक्ट होता है। जो भी ॲज इट इज भिवंडी है, किसी भी महानगरपालिका मे ॲज इट इज आपको ॲडॉप्ट लेना पडता है। और वो कही से सॅन्क्शन होगा। थाना, भिवंडी, न्यु बॉम्बे वो ॲज इट इज सॅन्क्शन होके आयेगा। आपको ॲडॉप्ट कर लेना है। वो जो कोई खास फरक नही पडता है। मेरे बोलने का तात्पर्य ये है, जो आपकी मिटींग एक महिने मे होती है। आपका पिरिएड जो एक साल का निकल गया। आपने शहर का कितना काम कही ना कही रोक दिया। कही ना कही तो आपका विकास रुक गया। आप परिवहन सेवा को किसी भी रुप मे आज जो फन्डामेंन्टल रुप मे शुरुवात का काम है उसे शुरु होने दिजीए। आपको तीन महिने के अंदर चेअरमन बनेगा। एक छोटे से रुप मे आपका परिवहन सेवा शुरु हो जायेगी। इस्ट, वेस्ट और आपका जो २७-२८-३० किलोमीटर का एक एरिया है। आपको बोलने मे भी गर्व होगा की, हमारे भाईंदर मे परिवहन सेवा है। इसी तरह प्रभाग समिती मे नजर डाली। कृपया उसे कम करके, कम से कम प्रभाग समितीयों के चेअरमन बनके आप अपना अपना एरिया, अपना अपना प्रभाग सुधरेगा। ये मेरा आप सब लोगों से नम्र निवेदन है।

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम आता तो महेंद्रसिंग साहेबांनी जो विषय मांडला तो विषय अतिशय विचार करण्यासारखा आहे. चेना ते उत्तन, दहिसर चेक नाका, एस्सेल वर्ल्ड अशा फार मोठ्या विभागामध्ये आपण विभागले गेलेलो आहोत आणि चेना ते उत्तनपर्यंत जाताना लोकांना खुप त्रास होतो. प्रत्येकाला सर्वसामान्य लोकांवर रिक्षाचा खर्च परवडत नाही. अशी परिस्थिती या भाईंदर शहरामध्ये आहे आणि

आज जे प्रकरण ३६ आणलेले आहे, अतिशय चांगला विषय आहे आणि लवकरात लवकर परिवहन सेवा चालू करण्याच्या दृष्टीकोनातून आपण लक्ष द्यावे आणि या विभागात आणि या शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांचा प्रश्न लवकरात लवकर मिटेल अशी आपण लवकरात लवकर करावी.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, परिवहन चालू होने के लिये सभी पार्टीयोंने अपने मेनिफेस्टो मे लिखा था। लेकीन मेरे ख्याल से उसका टाईम अभी उचित नही है। हमारे यहॉ पे जो ७८ किलोमीटर रोड बन रहे है। गटर बने हुए नही है, गटर बन रहे है और उसमे बीच मे ऐसी बात भी आई थी। अभी भी वन वे या एक रस्ता मार्ग कही भी बराबर बना हुआ नही है। जब पहले बात आयी थी की, आर.टी.ओ.के साथ, पुलिस के साथ मिटींग लेनेवाले है। फिर उसका नक्की करेंगे। अभी तो वो भी नक्की नही हुआ। ऐसे परिवहन सेवा यहा पे एस.टी.की, बी.एस.टी.की चालू है। और अपना ओव्हर ब्रीज होने के बाद मे बी.एस.टी. की परिवहन सेवा चालू होगी। हमारे यहाँ का बजेट मे हेड रखा हुआ है। लेकिन हेड रखा हुआ है इसका मतलब ये नही है की, आप वो हेड को कैसा भी वापरना है और दस लाख रुपया खर्च करना है। हमारी महापालिका की आर्थिक स्थिती मजबूत नही है की, अभी उस परिवहन सेवा को चालू की जाए। इसिलिए मेरा यह प्रस्ताव है की, परिवहन सेवा कुछ दिनों के लिए स्थगित की जाय और उसका प्रस्ताव आगे लाया जाए।

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो. मिरा भाईंदर नगरपालिका स्थापन झाल्यानंतर महानगरपालिका स्थापना झाली होती. त्यावेळी सुद्धा सर्व नागरिकांची आणि जनप्रतिनिधींची अशी भावना होती की, आपल्या शहरामध्ये परिवहन सेवा सुरु व्हायला पाहिजे. शहर झपाट्याने वाढत आहे. सन्मा. सदस्यांनी वेळोवळी आपल्या सुचना या ठिकाणी मांडल्या आहेत. मी सुचनेपेक्षा एवढेच सांगेन की, या ठिकाणी जो विषय आणला आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत परिवहन सेवा सुरु करणेकामी अहवाल तयार करणेंकरिता एजन्सी नेमणे. आपण या ठिकाणी परिवहन सेवा सुरु करीत आहोत हा विषय नाही आहे. त्याची आता एजन्सी फिक्स करावयाची आहे आणि यासाठी आपल्या बजेटमध्ये आपण परिवहन सेवा समिती करिता ५० लाखाची तरतुद आपण केलेली आहे. जेव्हा एजन्सीचा अहवाल येईल त्या अहवालानंतर आपल्याला त्याच्यावर चर्चा केली पाहिजे. ही परिवहन सेवा सुरु करायला पाहिजे. करतेवेळी आपल्याला कोणत्या अडचणी आहेत. त्यावेळी असलेल्या अडचणी आपण अहवाल आल्यानंतर बघितल्या तर त्या येणाऱ्या अडचणींचा सुसंवाद साधुन नंतर आपण निर्णय घेऊ शकतो की, परिवहन सेवा समिती सुरु केली पाहिजे. परिवहन सेवा या शहरात दिली पाहिजे की, नाही. त्यावेळी आपण विचार करु शकतो. परंतु आज आपण जर त्या गोष्टीची मानसिकता जर घेतली नाही तर ती परिवहन सेवा सुरु होऊच शकत नाही. या शहरामध्ये आपण सांगितले की, रस्ते करतांना आपल्याला बजेटमध्ये तरतुद नसते किंवा एखादा रस्ता आपल्याला डेव्हलप करायचा आहे, आपले बजेट किती आहे? बजेटप्रमाणे करता येईल की, नाही? अशी मानसिकता जर आपण निर्माण करुन घेतली नाही तर त्या कामाला सुरुवातच होऊ शकत नाही. मी सन्मा. सदस्यांना या ठिकाणी विनंती करीत की, आपण या गोष्टीचा विचार केला पाहिजे की, या शहरामध्ये परिवहन सेवा सुरु असणे फार आवश्यक बाब आहे. परंतु जर अडचणी असतील तर त्या अडचणी जर आपण बिघतल्या तर परिवहन सेवा सुरु करावी किंवा करु नये हे आपण कधी फिक्स करु शकतो. ज्यावेळी आपल्याला तसा अहवाल येईल त्यावेळी. जसे मघाशी आपल्याला मा. आयुक्त साहेबांनी जी माहिती दिली की, सेन्ट्रल इन्स्टिटट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट पुणे यांच्याकडून आपल्याला जी माहिती मिळाली आहे त्यांच्याकडून आपल्याला माहिती मिळणार आहे. तर आपण संपूर्ण अहवाल महासभेपुढे आणू आणि अहवाल आणल्यानंतर आपण निर्णय घेऊ या. मी सन्मा. सर्व सदस्यांना विनंती करतो की, आपली ही एजन्सी फिक्स करावयाची आहे. ती एजन्सी पहिली फिक्स करुन घेऊ या आणि नंतर मग ज्या पद्धतीने परिस्थिती असेल किंवा कायद्याने काही करता येत नसेल तर आपण नंतर चर्चा करावी एवढी सुचना मी या सभागृहाकडे मांडू इच्छितो.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आहे. परिवहन समितीचा जो अहवाल सभागृहात आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासाच्या दृष्टीने जे जे काही उपरोक्त घेतले जातील त्याचे आम्ही रितसर स्वागत करु पण याच्यापुढे सुद्धा एक गोष्ट आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सहकार्याने जो आता भाईंदर पूर्व - पश्चिम असा उड्डाणपुल आहे तो आता लवकरच १-२ महिन्याच्या कालावधीमध्ये चालू होत आहे आणि तो जेव्हा चालू होईल त्यावेळी त्यावरुन जे आता मिरा भाईंदर शहरामध्ये टि.एम.टी. ठाण्यावरुन येणाऱ्या बसेस व मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट या ज्या

बसेस आहेत यासुद्धा वेस्टला येतील. ज्या उत्तन गोराई, भाईंदर पुर्व-पश्चिम अशा पद्धतीने सगळीकडे चालू होतील. त्यांना आपण मान्यता देणार आहात का? हे पहिले गृहित करा की, ज्या बसेस मुंबई आणि ठाण्यावरुन या पलिकडे येतील त्या थेट अप टू गोराई, उत्तन पर्यंत जातील ही सुद्धा परिवहन सेवाच आहे. म्हणून ह्याच्यावर जरा ठाम निश्चय करा की, या संदर्भात आपण त्यांना परवानगी देणार आहात का? हे सभागृहाला निश्चितच कळविले पाहिजे की, आपण याच्यावर कुठला निर्णय घेणार आहात.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी ठराव मांडलेला आहे. काही सदस्यांचा त्याबाबत वेगळा गैरसमज झालेला आहे. आमचा ट्रान्सपोर्ट कमिटी स्थापन करायला कोणताही विरोध नाही. परिवहन सेवा सुरु करायची या संदर्भामध्ये अहवाल तयार करण्याकरिता एजन्सी नेमायची असा हा विषय आहे. महत्वाची बाब अशी आहे की, मा. आयुक्तांनी दिलेल्या गोषवाऱ्यामध्येच म्हटलेले आहे की, १९८५ चे कलम २५ अन्वये पहिल्यांदा अशी परिवहन समिती स्थापन करायला पाहिजे. जोपर्यंत बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ च्या कलम २५ अन्वये जोपर्यंत कमिटी स्थापन होत नाही तोपर्यंत याच बी.पी.एम.सी. ॲक्टच्या परिशिष्ट २० मध्ये ३४१, ३४६ च्या तरतुदी केल्या आहेत त्या लागू होत नाहीत. आपण ३४१ ची तरतुद वाचून पहावी. मा. आयुक्तांच्या जागी बसलेले माजी प्रभारी आयुक्त कृपया आपण तरतुद तपासून पहा. ३४१ मध्ये जी तरतुद केलेली आहे ती कलम २५ अन्वये परिवहन सेवा अस्तित्वात आल्यानंतर लागू होते. यानंतर आपण ३४२ पहा. या सर्व परिवहन समितीचे कामकाज पाहण्यासाठी ट्रान्सपोर्ट मॅनेजर नेमण्याची तरतुद आहे तो आजही नेमलेला नाही. त्याच्यानंतर ३४३ मध्ये तुम्ही जे काही परिवहन सेवेचे भाडे किंवा चार्जेस जे काही ठरविणार आहात ते नक्की करण्याची तरतुद आहे. ३४४ मध्ये याच्यासाठी स्थायी स्वरुपाच्या मालमत्ता ताब्यात देण्याची तरतुद आहे. ३४५ मध्ये या संपूर्ण परिवहन सेवेच्या कामकाजासाठी कारण नगरसेवक तिकडे जाऊन काही तिकीटे फाडणार नाहीत. कदाचित सांगू शकतील दोघांचा विचार करा. ह्यासाठी जो कायम स्वरुपी स्टाफ जो नेमायचा आहे तो स्टाफ ट्रान्सपोर्ट मॅनेजरने संबंधित समितीच्या परवानगीने नेमायचा आहे. त्याच्याशिवाय ती समिती कार्यरत होऊ शकत नाही. जेव्हा एखादी समिती कार्यरत होत नाही कारण तिचे अस्तित्वच निर्माण झाले नाही. त्या समितीची सेवा सुरु करण्यासाठी दहा लाख रुपये ढोबळ गोषवाऱ्यामध्ये फक्त एवढीच नोंद आहे की, केंद्र सरकारच्या अखत्यारीतील सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे या संस्थेबाबत काहीतरी पत्रव्यवहार झाला आहे किंवा चर्चा झाली आहे. त्या पत्रव्यवहारातून कुठेही या ठिकाणी उल्लेख आलेला नाही की, कसल्याही प्रकारचा पत्रव्यवहार नाही. आमच्या सभापतींनी सांगितले शहरामध्ये अशा प्रकारच्या सेवा सुरु व्हाव्यात याच्याबद्दल माझेदेखील दुमत नाही. तर सर्व नागरिकांचे आहे. सन्मा. सदस्य अग्रवालजी यांनी म्हटले की, प्रीमॅच्युअर्ड म्हणजे अगोदरच आपण करतो आहे. म्हणजे लवकर करतो आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, लवकर काय शिघ्र करा? परंतु जे करावयाचे असेल ते नीट करा. कारण दहा लाख रुपयांना आपण मंजुरी दिल्यानंतर सन्मा. सदस्य रतन पाटील यांच्या म्हणण्यानुसार टी.एम.टी आणि बी.एस.टी.ने आपले दिवाळे निघू नये म्हणून आमच्या विरुद्ध कारवाया सुरु केल्या तर आमची परिवहन सेवा ज्याच्या अहवालासाठी आम्ही दहा लाख रुपये खर्च करणार आहोत त्यांनी जर निगेटिव्ह अहवाल दिला तर या दहा लाख रुपयाच्या आर्थिक नुकसानीला कुठला अधिकारी जबाबदार राहणार आहे हे आजच ठरवा. मग आजच आम्ही मंजुरी देतो आणि म्हणून या तांत्रिक बाबी या केवळ सन्मा. मा. महापौर मॅडम हे आपले काम नाही. हे काय प्रशासनाचे आहे आणि प्रशासनाने ह्या बाबींबाबत स्पष्टपणे उल्लेख केला पाहिजे की, ट्रान्सपोर्ट मॅनेजर नाही, कुठलाही अधिकारी नाही. कारण अधिकारी आणि ट्रान्सपोर्ट मॅनेजर खर्चाबाबत ठरवतात. खर्च कसा करावा आणि त्याला मंजुरी कशी द्यावी. ट्रान्सपोर्ट कमिटी त्या खर्चाला मंजुरी देते. असे असतांना हा खर्च परिवहन सेवेच्या बजेट प्रोव्हीजनमध्ये परिवहन सेवेसाठी केलेला आहे. तो अहवाल मागविण्यासाठी केलेला नाही. तुर्त प्रश्न जास्त रक्कमेचा आहे म्हणून तुर्त या विषयावरती पुन्हा एकदा परत अहवाल तयार करावा. पुणे येथील केंद्र सरकारच्या अखत्यारीतील इन्स्टिट्युटच्या लोकांना प्रत्यक्ष चर्चेसाठी बोलवावे. कारण त्यांचे म्हणणे मा. आयुक्त यांनी सांगितले ते सुद्धा बरोबर आहे की, पाहिल्याशिवाय कारण त्याची पाहण्याची दृष्टी ही वेगळी आहे आणि नागरिकांची व नगरसेवकांची पाहण्याची दृष्टी वेगळी आहे. ते आर्थिकदृष्ट्या सगळ्या गोष्टी पाहतील. परंतु महत्वाचा उल्लेख मला या ठिकाणी असा करावासा वाटतो की, ३४२ चा कलम तुम्ही स्पष्टपणे वाचावा साहेब की, त्याच्यात ट्रान्सपोर्ट मॅनेजरचे काम काय आहे की, आर्थिक बाबी की, नुसते ॲडमिनिस्ट्रेशन नाही. म्हणजे आर्थिक बाबी आल्या म्हणजेच ट्रान्सपोर्ट मॅनजरच नाही. मग तो आर्थिक बाबींची जबाबदारी घेणार कसा? आणि म्हणून या ठरावाला मी अनुमोदन दिले आहे. सन्मा. महापौर

मॅडमना माझी विनंती आहे की, या विषयावरती आमचा विरोध आहे. आजसुद्धा करायचे असेल तर आजसुद्धा आम्ही तयार आहोत. ट्रान्सपोर्ट कमिटी आपण तयार करावी आणि त्यानंतर याच्या तरतुदी लागू कराव्यात. त्याच्याशिवाय आपण कायदेशीर रित्या त्या शिर्षाखाली खर्च करु शकू. आपल्याकडे ऑडिटर नविन आलेले आहेत तेसुद्धा आपल्याला त्याबाबत सांगू शकतील की, हे व्हॅलिड आहे की अनव्हॅलिड आहे. म्हणून मा. महापौरांना पुन्हा विनंती करतो की, आपण योग्य तो निर्णय घ्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, कलम ३४२ प्रमाणे ट्रान्सपोर्ट मॅनेजर आपण नेमल्यानंतर त्यांनीच फक्त फायनान्शीअल आर्थिक धोरणाबाबत किंवा आपण त्यावर किती खर्च करायची गरज आहे किंवा उदाहरणार्थ शंकर नारायण कॉलेज भाईंदर पुर्वेला आहे तर मिरा रोडला रॉयल कॉलेज आहे. अशा कॉलेजजवळ अजूनसुद्धा लांब लांब आहेत तर विद्यार्थ्यांची बऱ्याच अशा अडचणी आहेत. या सगळ्या गोष्टी पाहता सी.आय.टी. सांगू शकते पण फायनान्शीअल बाबत फक्त ट्रान्सपोर्ट मॅनेजर इज ओनली कॉम्पीटेन्ट ऑथोरिटी असा शब्द क्लीअर आहे. त्यामुळे आपण आधी ट्रान्सपोर्ट मॅनेजरची नेमणूक करावी. दॅन ही विल प्रोड्युस हीज रिपोर्ट. त्याचे जे काही म्हणणे असेल ते या सभागृहापुढे ठेवतील. अशा सर्व तांत्रिक बाबी लिगल स्टेट्स त्यांच्यात फार महत्वाचे आहे असे असतांना आपण ह्या विषयावर गांभिर्याने अभ्यास करावा आणि पुन्हा विषय आमच्या सभागृहासमोर ठेवावा अशी माझी विनंती आहे.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, मुळात आपला विषय काय आहे आणि आपण चाललो कुठे असे मला एकंदरित वाटायला लागले आहे. आज आपल्याला दहा लाखाचा खर्च परिवहन समिती, परिवहन सेवा आपण सुरु करावयाची किंवा नाही. या शहराला तो परवडेल किंवा नाही किंवा या शहरातील रस्ते त्या परिवहन सेवेस लायक आहेत किंवा नाहीत यासाठी आहे. दहा लाख खर्च करुन सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी सांगितले की, त्यांचा रिपोर्ट जर आपल्याकडे निगेटिव्ह आला, नकारात्मक आला या ठिकाणी परिवहन सेवा तोट्यात जावु शकेल. तर दहा लाख आपले फुकट जाणार आहेत किंवा त्याच्या नंतर आपले करोडो रुपये फुकट जातील. तर त्यापेक्षा दहा लाख जे खर्च होणार आहेत. कारण आपल्याला कुठेतरी त्याचा रिपोर्ट हा घ्यावाच लागणार आहे. तो कुठल्या तऱ्हेने केली जाईल, कुठल्या तऱ्हेने असावी, कुठल्या रस्त्याला असावी, कुठला रस्ता व किती नफा व तोटा होईल ही माहिती ते देणार आहेत. त्याच्यामुळे हा विषय फक्त आपल्याला त्या संस्थेला बोलवायचे आहे किंवा नाही. त्यांना आपल्याला हे काम द्यायचे आहे किंवा नाही एवढ्या पुरतेच मर्यादित आहे. त्याच्या नंतर आपल्याला सकरात्मक उत्तर आले की, परिवहन सेवा सुरु करायची आहे. त्यावर बाकीची चर्चाही पुढे करता येईल की, ती कशा तऱ्हेने असावी की, खाजगीकरणातून असावी की, मघाशी मा. आयुक्त साहेबांनी सांगितले तर ते त्यांचे योग्य ते उत्तर होते. ते खाजगीकरणातून करावी किंवा आपण करावी आणि यात किती फायदा होईल तेव्हा फक्त मंजुरी आपल्याला द्यायची आहे. तरी त्या संस्थेला आपण काम द्यायचे आहे आणि त्या पैशाला आपल्याला मंजुरी द्यायची आहे एवढ्याच विषयापर्यंत आहे आणि आपल्याला पंचवीस प्रमाणे जी परिवहन सेवा नेमायची आहे तो विषय नंतर येणार आहे. कारण हा विषय नकारात्मक जर आला तर परिवहन सेवाच निर्माण करणार नाही. त्याच्यामुळेच परिवहन सेवा सुरु करावी असा आहे आणि पंचवीस प्रमाणे परिवहन सेवेची नेमणूक करावयाची आहे. ती त्याच्यानंतर होऊच शकणार नाही. तेव्हा हा विषय फक्त त्याला मंजुरी देण्यापुरतेच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयावरती जे मार्गदर्शन केले मनात एक मुद्दा असा उपस्थित होत आहे की, ट्रान्सपोर्ट मॅनेजर जे आपल्याला पद भरावयाचे आहे तर हे जे पद आहे हा अधिकारी जर कायम स्वरुपी आला तर त्याला पुढे काम नसणार आहे. त्याकरिता आपली शेजारची नवी मुंबई महापालिका आहे त्याचेपण क्षेत्र फार मोठे आहे. पण तिकडची सुद्धा ट्रान्सपोर्टची जी व्यवस्था होते ती काही काळ कोलमडून पडली होती. काही काळ ट्रान्सपोर्ट बंद होते. निरनिराळी त्याच्या पाठीमागची कारणे असू शकतात. तसेच दिल्लीचे सुद्धा मी दोन दिवसांपुर्वी टिव्हीवर बघितले केवळ टायर नाहीत, तीन हजार टायर नाहीत म्हणून पाचशे बस डेपोत पडून आहेत असे काही निरनिराळे प्राब्लेम येत असतात. याकरिता या पदाची आपण एक अधिकारी तात्पुरत्या सेवेकरिता आपण नियुक्त करुन घेतला. अन्य कुठल्या सिनिअर ऑथोरिटीकडून जे बी.एस.टी. वगैरे येथील अधिकारी रिटायर्ड असतील तर एक टेम्परी कालावधीसाठी एका अधिकाऱ्याची नेमणूक करावी आणि आपले काम हे लवकरात लवकर कसे पुर्ण होईल त्याच्यावरती लक्ष ठेवावे. कारण ह्या शहरामध्ये रिक्षासुद्धा कोणाला परवडत नाही. असा घटक फार मोठा आहे. कारण रिक्षाचे दर सुद्धा आज स्टेशनवरुन नवरंग हॉटेलकडे जायचे असेल तर साडेचार-पाच रुपये होतात. दिवसातुन दहा रुपये होतात. सगळ्यांनाच परवडतात अशातील भाग

नाही.  आता फाटकावरुन काशिमिरा नाक्याला हायवेला जायचे आहे.  तर २५-३०-४० रुपये वाटेल तेवढे सांगतात आणि बी.एस.टी. मध्ये उभे रहायला जागासुद्धा नसते.  बी.एस.टी.च्या बसेससुद्धा फुल जातात.  पण ट्रान्सपोर्ट कमिटी आपल्याला हवी आणि लवकरात लवकर तयार केली गेली पाहिजे कारण या शहरामध्ये गरिब माणूस ज्याचे इन्कम फार कमी आहे.  कॉलेजमधील जी मुले आहेत हे इंटरनल रोड आहे.  त्याकरिता हा जो अधिकारी नेमायचा आहे.  त्याच्या नियुक्तीबद्दल आपण ठराव आपण पुढे आणावा.  रितसर नियुक्तीसाठी ठराव आणुन त्याची नियुक्ती केल्यानंतर हा विषय आपण सभागृहापुढे आणावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम आता जो परिवहन समिती स्थापन करण्यासंदर्भात विषय चालू आहे, या मिरा भाईंदर शहरामध्ये ठाणे महानगरपालिका बेस्ट बसेस मुंबई यांची परिवहन सेवा भाईंदर हद्दीमध्ये येत आहे आणि ती मोठ्या प्रमाणात मिरा भाईंदरमध्ये धंदा करीत आहेत.  अशी परिस्थिती असतांना मिरा भाईंदर महानगरपालिका स्वतंत्र परिवहन सेवा स्थापन करण्याचा विषय आणि ती स्थापन करण्यासाठी येणाऱ्या अडचणी त्याची सर्व माहिती आपल्याला व्हावी हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून सेंन्ट्रल इन्स्टिट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट पुणे यांचा सल्ला घेण्या संदर्भात आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मागितली आहे. आता सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी मॅनेजरचा जो उल्लेख केला तर मॅनेजर नेमणे ही बाब खरी असेल तर मॅनेजर हे आयुक्तांनी स्वतःच्या अधिकारामध्ये हा विषय आणलेला आहे.  मॅनेजरचे अधिकार आयुक्तांनी घेतलेले आहेत असे वाटते आणि त्या अनुषंगाने त्यांनी हा विषय या ठिकाणी आणलेला आहे. परिवहन चालू करण्यांत फायदे होणार, तोटे होणार, कोणत्या रस्त्यावर चालू करायची, त्याचा तिकीट आकार किती असावा, गाडीची लांबी, रुंदी जी काय असेल ते सर्व डिटेल सेंन्ट्रल इन्स्टिट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्टने अहवाल दिल्यानंतर ठरवण्यांत येतील.  पण आपल्याला परिवहन सेवेची थोडीफार माहिती आहे.  जास्त प्रमाणात डिटेल जाण्यासाठी ही इन्स्टिट्युट नेमणे आवश्यक आहे. आणि त्या दृष्टीने हा विषय आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात आणलेला आहे. आपण सर्व सन्मा. सदस्यांनी त्यांना मान्यता द्यावी अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता असा प्रश्न निर्माण होतो की, सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी सांगितले की, माझी भुमिका नकारात्मक दिसते.  मी असे काही म्हटले नाही.  कदाचित त्यांना चुकीचे ऐकायला गेले असेल. मी तसे म्हटले नाही पण तोट्यात जाईल असे म्हटलेले नाही.

**जयंत पाटील :-**

मी आपल्याबद्दल बोललेलो नाही.  त्यांचा रिपोर्ट जर निगेटिव्ह आला, परिवहन समिती आपली स्थापन होणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठिक आहे.  आपण तसे बोलला नाही.  पण आपण जे बोललात त्यानुसार या परिवहन सेवा सुरु करावयाच्या अगोदर अहवाल आल्याशिवाय परिवहन सेवा सुरु कशी करणार.  ह्या पण बाबी बरोबर आहेत की, परिवहन सेवा सुरु करायच्या अगोदर सेवेचा अहवाल मागायला पाहिजे.  म्हणून प्रकाश दुबोले आग्रह धरतात आणि ते कमिशनर साहेबांनी हा इथे विषय आणला असेही ते सांगतात आणि ट्रान्सपोर्ट मॅनेजर हे कमिशनर साहेब अपॉइन्ट करतात असेही ते म्हणतात.  मग त्यांना ट्रान्सपोर्ट मॅनेजर अपॉइन्ट करायला स्टँडिंगने काही विरोध केला आहे का?  जसे इतर लोकांना आपण विरोध केला होता का त्यांना कुठला मॅनेजर अपॉइन्ट करण्यासाठी कुठल्या कायद्याच्या तरतुदी आड येतात का?  नाही किंवा दहा लाखाचा खर्च करण्याची स्वतःच्या त्यांच्या अधिकारामध्ये पावर्स आहेत ना.  मग त्या पावर्स त्यांनी एक्झिक्युट का केल्या नाहीत.  मग तुम्ही आमच्या डोक्यावर हा विषय कशाला बसवला.  तो जर आम्ही सर्वांच्या मंजुरीने जर दिला तर दहा लाखाचा खर्च जर वायफळ गेला, सुदैवाने तो जाऊ नये कारण त्याच्यानंतर आपल्याला करोडो रुपयांची टी.एम.सी.वाले कमतात, बी.एम.सी.वाले कमवतात असे जर गृहित धरले तर आपले करोडो रुपये जातील.  पण त्या दहा लाखाची तरतुद एक रुपयांची तरतुदसुद्धा हाऊसला बुडवते.  प्रभारी आयुक्त साहेब आपल्याला माहिती आहे. आपण ठाणे महानगरपालिकेमध्ये होते त्याच्यामुळे नंदलाल समितीने काय ठप्पे ठेवले ते आपल्याला माहिती आहे. मला जवळून माहिती आहे.  त्याची खोलवर जाण्याची काहीएक गरज नाही.  दुर्दैवाने किंवा सुदैवाने मला हे सभागृहात सांगायचे देखील नव्हते.  पण मी आज सांगत आहे की, जेव्हा कमिशनर साहेबांना ट्रान्सपोर्ट मॅनेजर अपॉइन्ट करण्याचे विशेष अधिकार आहेत अशा प्रकारचे इतर स्टॅच्युटरी पोस्ट पण त्यांनी प्रतिनियुक्तीवर इतर लोक अपॉइन्ट केलेले आहेत किंवा ट्रान्सपोर्ट मॅनेजर अपॉइन्ट न करता स्वतःच्या अधिकारामध्ये दहा लाख रुपये खर्च करण्याची त्यांचे अधिकार आहेत आणि खर्च केल्यानंतर

सहा महिन्याच्या आत त्याचा हिशोब स्थायी समितीला देण्यांस ते बंधनकारक आहेत. असे असतांना देखील हा विषय आमच्या माथी फक्त एकच ओळीने मारला आहे की, केंद्र सरकारच्या अखत्यारीतील सेंन्ट्रल इन्स्टिट्युट ऑफ ट्रान्सपोर्ट पुणे कोण आहे. चेहरा बघितला नाही व्यक्ती आहे की, संस्था आहे. त्यांना पॉवर्स काय आहेत, ते असे ठरवतात की, नाही. ते कोणालाही माहिती नाही. केंद्र सरकारची आहे. तुम्ही लिहिले म्हणून आम्ही मानतो. कुठले पत्र आहे त्यांचे. तुमची त्यांच्याशी चर्चा झाली अशी माहिती आपण सभागृहाला द्या. सभागृह हे कुठल्या बेसवर ठराव करणार ते असेही म्हणाले की, दहा लाखापेक्षा जास्त खर्च मागितलेला आहे. मग त्याचा कुठे गोषवारा दिलेला नाही. मग जर दहा लाखापेक्षा जास्त खर्च झाला आणि उद्या जर द्यावा लागला तर ही समिती किंवा सभागृह त्याला मंजुरी देणार आहे का? विषय हा कायद्याचा आहे, विषय हा धोरणाचा आहे. या धोरणाला मा. महापौर साहेबांनी हा जो विषय आणलेला आहे हे मा. आयुक्तांच्या सांगण्यावरुन किंवा मा. आयुक्तांच्या शिफारशीवरुन आणला आहे आणि त्यांनी विषय आणला त्याबद्दल आमचा काहीही विरोध नाही. परंतु विषय ज्यांच्या सांगण्यावरुन आणला गेला ते स्वतः या कायदेशीर बाबींना सशक्त असतांना बॉडीपुढे हा विषय का? आणि म्हणून माझे म्हणणे आहे की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीमध्ये निर्णय घ्यावा असा पाहिजे असेल तर ठराव करुन देतो आम्ही किंवा ट्रान्सपोर्ट मॅनेजर स्वतःसुद्धा त्यांनी अपॉइन्ट करावा असासुद्धा ठराव देतो. नकारात्मक भुमिका घेण्याचे काही आमचे कारण नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये शहरातील सर्व नागरिकांना म्हणजे झोपडपट्टीत राहणारा असो किंवा महालात राहणार असो. सर्व स्तरातील नागरिकांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे हे आपल्यावर कायदेशीर बंधनकारक आहे आणि ते आपले आद्य कर्तव्य आहे. जसे आपण रस्ते, पाणी, वीज, चौपाटी आणि अन्य सुविधा उपलब्ध करुन देतो. आरोग्य किंवा सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देतो त्याचप्रमाणे परिवहन सेवा उपलब्ध करुन देणे हेसुद्धा आपले आद्य कर्तव्य आहे आणि ते कायदेशिररित्या बंधनकारक आहे. या ठिकाणी जो विषय आलेला आहे त्यावर सर्वच सन्मा. सदस्यांनी विशेषतः जेष्ठ सदस्य आणि तत्कालीन नगराध्यक्ष आमचे परममित्र श्री. प्रफुल्ल पाटील यांनी व्यवस्थित विवेचनपुर्ण या ठिकाणी वक्तव्य केले आहे. दहा लाखापर्यंतचे जे पॉवर्स आहेत ते मा. आयुक्तांचे आहेत. परंतु या ठिकाणी सभागृहाची त्यांनी मा. आयुक्तांनी परवानगी मागितलेली आहे. परिवहन सेवा सुरु करणे संदर्भात तरी मा. आयुक्तांनी आपले अधिकारात करायला पाहिजे ही पण गोष्ट खरी आहे. परंतु आपण बघतो की, काही कालावधीपासून छोटीसी जरी अमाऊंट असेल तरी कोणीही स्वतःच्या अखत्यारीत करायला काही तयार होत नाही. सगळे विषय जे आहेत आपणही जेव्हा प्रभारी अधिकारी होते. तसेच दरम्यानच्या काळात आपल्याकडे जो आयुक्तांचा चार्ज होता. मा. शिवमुर्ती नाईक साहेब तेव्हापण आपण सांगितले की, यापुढी मी काही माझ्या डोक्यावर घेणार नाही. तरी ते मा. महासभेने ठरवावे आणि एकमताने ठरवून तो निर्णय घ्यावा. तरी ह्या ठिकाणी हा जो प्रस्ताव आलेला आहे तो स्वागतार्ह असावा असे सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी सांगितले की, जी एजन्सी आपण नेमणार आहोत ते संपूर्ण शहराची भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करुन रस्ते, लोकसंख्या किती आहे आणि कोणकोणत्या विभागातून किती उत्पन्न महापालिकेस अपेक्षित होणार आहे, फायदा होणार आहे की तोटा होणार आहे याचा संपूर्ण अभ्यास करण्यासाठी ही समिती आपण या ठिकाणी नेमणार आहोत. तरी मला असे वाटते की, ह्या प्रस्तावावर सर्वांनी एकमताने हा निर्णय घेतला पाहिजे. परिवहन समितीची खरोखर आवश्यक आहे आणि ट्रान्सपोर्ट कमिटी नंतर जेव्हा रिपोर्ट आला त्यानंतर आपण ट्रान्सपोर्ट मॅनेजर नेमू किंवा आपली परिवहन समिती नेमू. चौहाण साहेबांनी मागे सांगितले की, सगळ्या समिती अजून आपल्या बाकी आहेत. तरी प्रत्येकाला काम करण्याची संधी त्यामध्ये आपल्याला मिळेल. प्रभाग समित्या आपण स्थापन कराव्यात. महिला बालकल्याण समिती मा. महापौर साहेबांनी सांगितले की, आपण नंतर चर्चा करुन मला वाटते आणखी फारच विलंब होईल आणि पाच वर्षाचा कालावधी हा निघून जाईल आणि प्रत्येक समित्या व्यवस्थित एक शहराच्या विकासाच्या दृष्टीने सर्व पक्षाचे व नागरिकांचे सहकार्य हे आपल्याला मिळेल. तरी मला ह्या ठिकाणी असे म्हणायचे आहे की, आदरणीय प्रफुल्ल साहेबांनी सांगितले की, चेहरा आम्ही बघितला नाही. तर मला असे वाटते, देखो देखो चेहरा न देखो, दिल सच्चा और चेहरा झुठा, चेहरे ने लाखो को देखा. तरी चेहरा देखण्यापेक्षा मला असे वाटते की, आपल्या ह्या प्रस्तावाच्या मागची भुमिका जर बघितली तर चांगली भुमिका आहे. तरी ह्या दहा लाखाला मंजुरी देण्यांस काही हरकत नाही. तरी सर्वांनी पुन्हा एकदा यावर सकारात्मक मा. आयुक्त साहेबांचा मान ठेवून, मा. महापौरांचा मान ठेवून आणि आपण जे विषय ह्या सभागृहात मांडतो तर त्या पद्धतीने आपण मंजुरी सुद्धा दिली पाहिजे आणि चांगला विषय आहे तरी मला वाटते की, गोरगरीब नागरिकांच्या हिताच्या

दृष्टीकोनातून सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी सांगितले की, झोपडपट्टीत राहणारे नागरिक आहेत. कारण आमच्या झोपडपट्टीत सुद्धा प्रभाग आहेत. तरी त्या लोकांना सुद्धा ह्या सेवेचा लाभ होणार आहे. तरी आता आपण एजन्सी नेमून दहा लाखाच्या खर्चास मंजुरी देण्यांस काही हरकत नाही. तरी कृपया पुन्हा एकदा यावर सर्वांनी सकारात्मक विचार करुन हा विषय मंजुर करावा. धन्यवाद.

**मा. उपआयुक्त साो. (शिवमुर्ती नाईक) :-**

मा. महापौर मॅडम हा विषय परिवहन समिती सुरु करावा किंवा नाही हे ठरविण्यासाठी आहे. मग ते महापालिकेने सुरु करावे किंवा खाजगी संस्थेकडे देऊन सुरु करावे म्हणजेच आपण एखादी इमारत बांधण्यापुर्वी आर्किटेक्ट नेमतो. त्यांनी प्लॅन एस्टीमेंट बनवावे, जागेचे क्षेत्रफळ काढावे, त्यात काय काय असावे. मग खाजगी व्यक्तीने बांधून नगरपालिकेच्या ताब्यात द्यावे किंवा नगरपालिकेने बांधावे हे ठरविण्यासाठी बांधायचे किंवा नाही बांधायचे हे ठरविण्याचे काम तुमचेच आहे. अहवाल यासाठी आहे की, हे सुटेबल आहे किंवा नाही. म्हणजेच परिवहन सेवा महापालिकेने सुरु करावी किंवा नको हे ठरविण्यासाठी तज्ञ व्यक्तींची गव्हर्नमेंटची समिती, गव्हर्नमेंटचा विभाग आहे. त्या विभागामार्फत सर्व्हे करुन घ्यायचा आहे. म्हणजेच गाड्या किती असाव्यात ते खाजगी तत्वावर दिले तर नगरपालिकेला फायदेशीर आहे का? नगरपालिकेने महानगरपालिकेने स्वतः चालवावी. महापालिका स्वतः चालवली तर किती भांडवल खर्च करावा लागेल किंवा खाजगी व्यक्तीला चालवायला द्यायचे आणि नगरपालिकेला त्यातील हिस्सा मागावा आणि तो किती टक्के मागावा की, ही परिवहन सेवा व्यवस्थित गावामध्ये चालेल किंवा नाही. चालेल असा जर अहवाल आला तर मग खाजगी टेंडर देतांना किती अमाऊन्ट टाकावे लागतील. किती गाड्या त्या ठेकेदाराला चालवायला लागतील किंवा कोण सुटेबल कमी स्वस्तात गाड्या चालवून फिरवून नगरपालिकेला इतकी टक्केवारी देईल म्हणजे ही फ्री आहे. ही परिवहन सेवा चालवायची किंवा नाही. चालवणे तर योग्य आहे की, अयोग्य आहे की महापालिकेने चालवावे की खाजगी संस्थेला चालवायला द्यावे. खाजगी संस्थेला चालवायला दिले तर किती रक्कम किंवा किती गाड्या आणि किती टक्के महापालिकेला रॉयल्टी म्हणून द्या. हे सर्व अहवाल तयार करण्यासाठी त्या गव्हर्नमेंटची संस्था नेमूनच करावयाचा आहे आणि ती संस्था नेमून केल्यानंतर जो अहवाल येईल तो अहवाल आपल्यासमोर येईल व आपल्यासमोर आलेला अहवाल आपण मग निर्णय घ्यायचा आहे आणि हा अहवाल पॉझिटीव्ह आला आणि आपलेही मत झाले की, ही परिवहन सेवा सुरु करायला पाहिजे. मग त्यावेळी समिती आणि अधिकाऱ्यांचा प्रश्न येतो. हे फक्त करायची की नाही करायची आणि योग्य तऱ्हेने चालेल की नाही चालेल . ते फायदेशीर आहे की तोट्यात चालेल किंवा खाजगी व्यक्तीने करावे की महापालिकेने करावे. महापालिकेने केले आणि खाजगी व्यक्तीला जरी दिले तरी परिवहन सेवा त्या वेळेलाच येईल अस्तित्वात त्यानंतर येईल. त्यासाठी हा अहवाल गव्हर्नमेंटच्या संस्थेकडून मागवायचा आहे आणि गव्हर्नमेंटची संस्था इथे महिना दोन महिने मुक्कामाला राहिल आणि किती व्यक्ती रिक्षाने जाता, किती व्यक्ती बसने जातात किती व्यक्ती टी.एम.टी.ने जातात, खाजगी गाड्यातून किती जातात, स्वतःच्या गाड्या असणारे किती लोक आहे आणि हे प्रॉफीटेबल आहे की तोट्यात आहे हा संपूर्ण इतिहास काढून अहवाल तयार करुन देणार आहे आणि त्यानंतर हा अहवाल तुमच्यासमोर येणार आहे. तुमच्यासमोर अहवाल आल्यानंतर तुम्ही स्वतः चालवायचे आहे का खाजगी देऊन चालवयाचे आहे आणि त्यानंतर परिवहन सेवा आणि अधिकारी नेमणुकीचा प्रश्न येणार आहे. कृपा करुन याचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन आपण निर्णय घ्यावा अशी नम्रतेची विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे. मघापासून जो विषय चाललेला आहे. पुन्हा नाईक साहेब हातचे ठेवून का बोलले हेच मला समजत नाही. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी टेक्निकल बाजू आणलेली आहे. तुम्ही जो सभागृहासमोर आणलेला विषय आहे, भावनात्मक सर्व काही ठिक आहे. तो आणतेवेळी त्यांनी सांगितले की, तुम्ही कायद्याची तरतुद केली की, नाही. एक त्यांना लिगली पहिल्यांदा सांगा की हा आलेला विषय नीट तांत्रिक दृष्ट्या संपूर्ण प्रशासनाच्या जबाबदारीवर आणलेला आहे असे एक वाक्यात उत्तर दिले असते तर हा एक भाग झाला. दुसरा विषय असा आहे की, त्यांनी परिवहन एजन्सी नेमायला विरोध केला असे नाही. विरोधाचा भाग नाही. जसे आम्ही आमच्या पक्षाच्या दृष्टीने आमच्या अध्यक्षांनी मत मांडले की, यावेळी ही योग्य वेळ वाटत नाही की आज ज्यावेळी प्रशासनाच्या आस्थापनेवर लाखो रुपये खर्च करीत चाललेले अधिकाऱ्यावर अधिकारी येतात. केबीनचे केबीन वाढतात आणि महापालिकेचे दिसणारे अंदाजपत्रक जे सभापती आता स्थायी समितीचे आले त्यांनी बरेच कष्ट करुन तयार केलेले अंदाजपत्रक चुकीच्या मार्गावर चढत चालले आहे असे दिसायला लागले आहे. व्यापार बाहेर चाललेले आहे. माणसे बाहेर चाललेली आहेत. उद्यागधंदा बाहेर चाललेला आहे आणि असे असतांना ही परिवहन सेवा सुरु करावी. तांत्रिक दृष्ट्या ते योग्य आहे की,

नाही आणि त्याची आता आवश्यकत आहे की नाही असे भारतीय जनता पार्टीचे मत आहे. एकतर हा विषय तांत्रिक दृष्ट्या महत्वाचा आहे. मग सभागृहापुढे हा विषय का आणला? आयुक्त अनेक ठिकाणी अवलोकनार्थ म्हणून स्टँडिंगमध्ये हा विषय आणतात. मग तसे अवलोकनार्थ त्यांनी विषय का आणला नाही? असे जर तुम्ही उत्तर दिले तर मला वाटते की, वादविवाद स्पर्धा, प्रतिष्ठा किंवा आताच किंवा उद्या जरी तो अहवाल मागवला नाही तर भाईंदर पुढे अशातील भाग नाही. तांत्रिक दृष्ट्या या सभागृहातील कोणत्याही सदस्यांला कोणताही त्रास न देता एखाद्या राजकीय पक्षावर गालबोट ठेवायला कोणालाही संधी न देता प्रशासनाने शांतपणे विषय आणावा. आम्ही जसे म्हटले आहे की जाहिर न करता दोन तीन अँगलने घेऊन पुढच्या बैठकीला म्हणजे महिन्यात आपली बैठक होत आहे. महिन्यात जर बैठक होत असेल तर हा विषय कोणी प्रतिष्ठेचा करु नका. म्हणजे त्यांनी ठराव मांडला म्हणून आपण प्रतिष्ठा करतो असे नाही. त्यांनी सुचना मांडली म्हणून आपण फेटाळून लावतो असेही नाही. एक सद्सदविवेकबुद्धीने आपण त्यांची शहानिशा करुन पुढच्या सभेमध्ये हा विषय घ्यावा. महिना जाईल, पण त्यातील जे तज्ञ आहेत. आता माजी नगराध्यक्ष यांच्या दृष्टीने जे काही तांत्रिक दृष्ट्या तज्ञ आहेत त्यांनी त्यांची मते मांडली. तुम्ही लिगली ॲडव्हाईज केले.

**मा. उपआयुक्त साो. (शिवमुर्ती नाईक) :-**

एखादे काम मग पाणी पुरवठ्याचे असेल, रस्त्याचे असेल किंव कुठल्याही खर्चाचे असेल ती बाब आपण आयुक्तांनी स्वतःचे अधिकार वापरून काम केले आणि अवलोकनार्थ स्टँडींगपुढे पाठविले ही गोष्ट वेगळी आहे. ही परिवहन सेवा सुरु करण्याची जी बाब आहे ही धोरणात्मक बाब आहे. व्यक्तीगत आहेत त्यांनी निर्णय घेतला आणि आम्ही या थराला आलो हे जर चांगले झाले तर चांगले झाले, वाईट झाले तर वाईट झाले ही महत्वाची निर्णय घेण्याची बाब असल्यामुळे जरी आयुक्तांचे अधिकार अमाऊन्टच्या दृष्टीने असेल. पण धोरणात्मक दृष्टीने ते सभागृहासमोर येणे गरजेचे आहे. ही धोरणात्मक बाब आहे की, परिवहन सेवा सुरु करायची की नाही करायची याचा फक्त अहवाल मागवायचा आहे. म्हणजे दवाखान्यात दाखविण्यापुर्वी मला काय आजार झाला आहे ते तपासून म्हणजे आता बरे होण्यासारखे आहे की नाही, हे सगळे मेडिकलचे आहे. म्हणजे ही परिवहन सेवा सुरु करायची की नाही करायची. आयुक्तांच्या कॅपेसिटीमधून होते आहे किंवा आयुक्तांच्या कॅपेसिटीमधून म्हणजे हे काय पाणी पुरवठा नाही. गटाराचे काम नाही किंवा रस्ता नाही अवलोकनार्थ पाठविण्यासाठी. परंतु ही बाब धोरणात्मक बाब आहे आणि फार रक्कमेची आहे. मग ती खाजगी स्वरुपात असो किंवा लहान स्वरुपात असो. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या समोर हा निर्णय आवश्यक असल्यामुळे हा विषय सभागृहापुंढे पाठविण्यांत आलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

सभागृहापुढे विषय आणल्याबद्दल धन्यवाद. आता जे काम तांत्रिक दृष्ट्या आले आहे. जसे मघाशी तुम्ही उदाहरण दिले की, आता मला इमारत बांधायची आहे आणि इमारत बांधतेवेळी एक क्षमता आपण बघतो की, ग्राऊन्ड फ्लोअरची बांधायची की वन प्लस वन बांधायची की टॉवर बांधायचा. आपली जर आर्थिक क्षमता हा एक विषय आहे की, आर्थिक क्षमतेचे आपल्या सभागृहाने नक्की शिक्कामोर्तब केले का? की आपण त्या स्टँडपर्यंत चाललो म्हणून.

**मा. उपआयुक्त साो. (शिवमुर्ती नाईक) :-**

ते प्लॅन एस्टिमेट समोर आणल्यानंतर प्लॅन एस्टिमेट आपण अजून बनविणार आहोत. प्लॅन आणि एस्टिमेट कॉस्ट किती आहे आणि फ्लोअर किती आहेत हे प्लॅन एस्टिमेट अजून सभागृहापुढे प्लॅन एस्टिमेट करण्यासाठीच ही नियुक्ती आहे.

**रोहिदास पाटील :-**

बघा, अजून घाई होते आहे असे आमचे ठाम मत आहे.

**मिलन पाटील :-**

प्राजेक्ट रिपोर्ट आपण मागवित आहोत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतोय की, जे अत्यंत चांगली आणि वैचारिक चर्चा होत आहे या चर्चेला खरी सुरुवात खऱ्या अर्थाने सन्मा. माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांनी केली. त्यांनी बेसिक मुद्दे उपस्थित केलेले आहेत की कलम ३४२ व ३४७ हे अस्तित्वात असतांना त्यांना छेद देऊन आपण अशा प्रकारे पुढे जाऊ शकतो का? आणि त्याचमुळे हा थोडासा विचाराचा मुद्दा या ठिकाणी निर्माण झालेला आहे. परंतु सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी थोडीशी घाई केली. सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी ठराव पण मांडला व घाईघाईने त्याला सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी अनुमोदन दिले आणि एका प्रकारे येथे डेव्हलप करण्यासारखी परिस्थिती निर्माण

झाली. पण त्या निमित्ताने या ज्या काही चर्चा निर्माण झाल्या त्या आवश्यक होत्या. परंतु मी आता सभागृहाचे लक्ष सन्मा. पिठासिन अधिकारी आणि त्यांना कायदेशीर मार्गदर्शन करणारे मा. उपआयुक्त शिवमुर्ती नाईक साहेबांनी सांगितले की, परिवहन समिती कायद्याने प्रोव्हिजन आहे. करावी लागेल आणि तो धोरणात्मक प्रश्न राहील. परिवहन समिती स्थापन झाली तरीसुद्धा रिपोर्ट घ्यावा लागेल आणि स्थापन नाही झाली तरीसुद्धा रिपोर्टची आवश्यकता आहे. यापुर्वी आपण या शहरामध्ये भुयारी गटार योजनेसाठी सर्व्हे करण्यासाठी तीस लाखाची प्रोव्हिजन केली. सभागृहाने मोठ्या उदारतेने आणि उदांत भावनेने त्याला मंजुरी दिली. आज शहरातील ट्रॅफिकची जी समस्या आहे ती या शहरामध्ये उपलब्ध माहितीनुसार किमान सात हजार ऑटोरिक्षा या रस्त्यावर आहेत. तरी या सात हजार ऑटो रिक्षा असल्यामुळे पादचाऱ्यांना किंवा नागरिकांना सुसह्यपणे जाणे ह्या संदर्भातसुद्धा प्रश्न निर्माण झालेला आहे. सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे बी.एस.टी. कदाचित टेकओव्हर करेल. एस.टी.चा विस्तार होईल. या सगळ्या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरीसुद्धा जेव्हा या शहराचा पुढच्य दहा वर्षासाठी किंवा पुढच्या पाच वर्षासाठी एखादा विकास कार्यक्रम जर हाती घ्यायचा असेल तर त्याचा सर्व्हे हा आपल्याकडे असलाच पाहिजे. सर्व्हे यासाठी दहा लाख रुपये जात आहे हे चांगल्या कार्यासाठी जात आहेत. सर्व्हे आज जरी आपण गृहित धरुन शकलो तरी तो पॉझिटीव्हच येईल. जर तो पॉझिटीव्ह नाही आला तर सर्व्हे करु नये असे कुठेही नाही. निगेटिव्ह झाला तर त्याच्यामध्ये काहीतरी बदल करता येईल व त्यांच्यामध्ये काही सुधारणा मांडता येईल. काही सजेशन किंवा तज्ञांच्या शिफारशी आणखी मागवता येतील. म्हणून मी हा जो प्रस्ताव प्रशासनाच्य वतीने व महापौरांच्या वतीने सभागृहापुढे मांडलेला आहे. या प्रस्तावाचे मी समर्थन करतो आणि हे दहा लाख रुपये खर्च करण्यासाठी मी ठराव मांडीत आहे.

**आसिफ शेख :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम या ठिकाणी सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी घाईघाईने ठराव मांडला. खरे म्हणजे त्यांना या ठिकाणी विषयाचे गांभिर्य कळलेले नाही. कुणालाच कळलेले नाही असे म्हणायला हरकत नाही. फक्त पिठासिन अधिकारी सोडून कारण ते मला अजूनपर्यंत बोलायला देतात. म्हणून त्यांना ते गांभिर्य कळलेले आहे असे म्हणायला हरकत नाही. सध्या जे प्रभारी आयुक्त होते माजी ते आयुक्तांच्या खुर्चीवर बसल्याने त्या गोषवाऱ्याला त्यांना समर्थन करायला भाग पडत आहे. महत्वाची बाब अशी आहे की, आपण एखादी गोष्ट घटनेत नसेल तर आपण ती नाकारतो. एखादी गोष्ट कायद्यामध्ये लिहिली नसेल तरी आपण ती करायला जात नाही. जेव्हा कायद्यामध्ये एखादी गोष्ट नसेल तर उपविधी केले जातात. तुम्ही एवढे परिश्रम केले. तुम्हांला पावर्स होत्या. ४५२(अ) खाली सभागृहाच्या पावर्स त्याला होत्या. आपल्याला स्थायी समितीच्या सभागृहाच्या पावर्स होत्या म्हणून आपण उपविधी केले? त्या उपविधीची कशी पायमल्ली झाली आपण बघितली ना. आता जेव्हा एखाद्या संस्थेला विधिवत काम देण्याचे कुठलाही शासन निर्णय नाही. कुठलीही अधिसुचना नाही. तेव्हा हीच एक पर्टिक्युलर संस्था आहे. याच्यासाठी सक्षम आहे असे आपण या गोषवाऱ्यामध्ये कुठे म्हटले आहे का? हीच एक संस्था माझ्या माहितीप्रमाणे दुसरी रेल्वेची संस्था आहे. आपल्याला ते माहिती आहे आणि त्याची गरजपण लागणार आहे. नाहीतर पाणी पुरवठ्याची आपली योजना पुर्ण होणार नाही आणि तोही मोठा वादाचा विषय होणार आहे आणि मग अशा सगळ्या संस्था असतांना ही संस्था कोणाच्या डोळ्यामध्ये सक्षम दिसली त्याच्या दिसली म्हणजे आमच्या सर्व सभागृहाच्या दिसली पाहिजे का? या मताशी माझे नक्कीच सहमत नसेल. ठराव मागे घेण्यासंबंधी जरी सन्मा. सदस. लिओ कोलासो यांनी सांगितले तरी मी घेईल. कारणा माझ्या ठरावाने या कार्यावर काही फरक पडू नये. कारण याच्यामध्येच दोन भाग करु या की अहवाल तयार करण्यासाठी एजन्सी नेमावी. कुठली नेमावी हे सांगू शकत नाही. तुम्हांला सक्षम वाटते ती नेमावी आणि या कामी येणारा जो खर्च आहे. तो करण्यासाठी आम्ही आयुक्तांना ७३(ब) खाली परवानगी दिलेली आहे. त्याच्यामुळे या विषयावर पडदा पडला असे म्हणायला हरकत नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतोय की आपण भोजन अवकाशापुर्वी सभेच्या कामकाजामध्ये मी जो ठराव मांडला होता आणि सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल यांनी तो विड्राल केलेला आहे असेच आपण गृहीत धरुन चालतो आहे. केलेला आहे तरी त्याची नोंद तशी प्रोसिडिंगमध्ये घेण्यात यावी.

**प्रकरण :- ३६**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत परिवहन सेवा सुरु करणेकामी अहवाल तयार करणेकरिता एजन्सी नेमणे.

**ठराव क्र. २५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००३-२००४ अंदाज पत्रक मंजुरीच्या वेळी बहुसंख्य सन्मा. सदस्यांनी चर्चा करताना मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मनपाची परिवहन सेवा सुरू करावी असे सुचविले होते. तसेच मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २५ अन्वये परिवहन सेवा सुरू करण्याची तरतुद आहे.

वरील विषयांस अनुसरून मनपा प्रशासनाने केद्र सरकारच्या अखत्यारीतील सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे या संस्थेशी याबाबत पत्रव्यवहार करून व प्रत्यक्ष भेटुन चर्चा केलेली आहे. तरी त्यांनी महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरू करणेकामी अहवाल देण्याचे मान्य केलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मनपाची परिवहन सेवा ही खाजगी रित्या किंवा स्वतःची सुरु करणे फायदेशीर आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल त्यांच्याकडून तयार करुन घेणे आवश्यक आहे. सदरचा अहवाल प्रत्यक्ष शहरात येऊन सर्व बाबींची पाहणी करुन घेणेकामी चार महिन्यांचा अवधी लागणार आहे. तरी या कामी अंदाजे रु. १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी हि मा. महासभा महानगरपालिका हद्दीत परिवहन सेवा सुरु करणेकामी अहवाल तयार करणेकरिता एजन्सी नेमणे व त्यास होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे

**सुचक :- श्री. लिओ कोलासो. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण ३७ चे वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की आताचे जे युग आहे ते आधुनिक युग आहे. संगणकाला आपल्या कल्पनेच्या पलीकडे सुद्धा महत्त्व प्राप्त झालेले आहे. संगणक जे कार्य करते तर त्याचे अनेक फायदे आपण प्रत्यक्ष अनुभवत आहोत.आपल्याला ते दिसत आहे. त्यामधुन कामाचा निचरा मोठ्या प्रमाणामध्ये विहित वेळेमध्ये व कमी खर्चामध्ये सुद्धा होत आहे. आणि संगणकीय करणाचा विषय हा विश्वमान्य झालेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या कामकाजात सुधारणा होण्यासाठी, महानगरपालिकेच्या कामकाजात गती येण्यासाठी अशा स्वरुपाच्या प्रस्तावाची आपल्याला आवश्यकता वाटत आहे म्हणुन प्रशासनाने हा जो प्रस्ताव सभागृहापुढे ठेवलेला आहे तरी त्या प्रस्तावाला मी ठरावाच्या रुपाने समर्थन करतो.

**आसिफ शेख :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**धनराज अग्रवाल :-**

याच्यात एक गव्हर्नमेंटचे परिपत्रक जोडलेले आहे. नवी मुंबई आणि इतर महानगरपालिकेला दहा दहा लाख रुपये दिले आहे गव्हर्नमेंटने. तरी आपल्याला याच्यात काही आर्थिक तरतुद आलेली आहे काय? या परिपत्रकात लिहिलेले की नवीन जे संगणकीकरण करणार आहात तर त्याच्यात गव्हर्नमेंट मदत म्हणुन दहा दहा लाख रुपये देतात.

**मा. आयुक्त :-**

ही मदत कल्याण आणि नवी मुंबई या महापालिकांना त्यांनी जे सॉफ्टवेअर डेव्हलप केलेले आहे. त्यासाठी त्यांना देऊ केलेली मदत आहे. आपल्याला देणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आपल्याला नाही देता येणार का? जर आपण अप्लाय केली तर

**मा. आयुक्त :-**

त्यांनी स्वखर्चाने ते केलेले होते. ती त्यांची प्रॉपर्टी होती. म्हणजे अनेक विभागाचे संगणीकरण अतिशय यशस्वीरित्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने केलेले आहे. आणि नवी मुंबई महापालिकेने देखील त्यापैकी काही विषयाच्याबाबतीत जे सॉफ्टवेअर डेव्हलप केलेले आहे. तर याच्यातील जे उत्कृष्ट

सॉफ्टवेअर असेल प्रॉपर्टी टॅक्स आहे, वॉटर टॅक्स आहे किंवा ज्या लोकांच्या तक्रारीच्या बाबतीतील नियोजन आहे. आणि नागरिकांशी निगडीत ज्या सेवा आहेत. काही वेगवेगळ्या प्रकारच्या लायसन्सेस आहेत. तर याचे संगणकीकरण या दोन्ही महापालिकेने उत्कृष्ट रितीने केलेले आहे. दोन्हीमध्ये जी आपल्याला सर्वात चांगली वाटेल ती सॉफ्टवेअर आपण घ्यायची आणि त्याच्या बदल्यामध्ये त्यांची जी काही कॉस्ट असेल ती दयायची. असा एक शासनाचा हेतु होता. त्याच्या अगोदरचा हा कालावधी होता. या बैठकीला मीही उपस्थित होतो. हा जी आर निघण्याच्या अगोदर. त्या महापालिकेने असे म्हटले की, आम्ही एवढा मोठा खर्च त्यासाठी केलेला आहे. तर शासनाने आम्हाला त्यासाठी मदत करावी. तर त्यावेळी त्यांनी मदत करायचे म्हणुन ठरलेले होते. आणि त्याच्याही पुढची माहिती आपल्या सभागृहात देऊ इच्छितो की, त्यांनी एक शासन स्तरावर व्हॅल्युएशन कमिटी नेमलेली होती. या दोन महापालिकेमध्ये कुठली सॉफ्टवेअर, कुठल्या विषयाची सॉफ्टवेअर, कोणाची सर्वात चांगली आहे तर त्याचे मुल्यामापन हे शासन स्तरावर होईल. आणि त्याची किंमत शक्य झाल्यास या शासनाकडुन आपल्याला फिक्स होईल तर ती रेडीमेड आपल्याला या ठिकाणी विकत घेणे शक्य आहे तर हा याच्यापुढचा भाग आहे. कदाचित या कमिटीचा रिपोर्ट एक-दोन महिन्यामध्ये येऊ शकेल किंवा जर खुप उशिर म्हणेजे पंधरा वीस दिवसात येईल किंवा एक महिना या सगळ्या हार्डवेअर पर्चेस करणे वगैरे त्याचे इन्स्टॉलेशन करणे याच्यासाठी कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात शासन याबाबत निर्णय घेईल. तर त्यावेळी आपल्याला हे सॉफ्टवेअर आपल्या महापालिकेमध्यें राबविता येणे शक्य आहे.

**धनराज अग्रवाल :-**

माझी अशी मागणीच होती की, संगणकीकरण आपल्याला करायचेच आहे. त्याच्यामध्ये सभागृहात काही दुमत कोणाचेच नाही. पण गव्हर्नमेंट जर आपल्याला मदत देत असेल तर आपण पण मागणी करावी.

**मा. आयुक्त :-**

नाही. शासन मदत आता कोणालाच देत नाही. पूर्वी प्रोत्साहन म्हणुन शासन आपल्याला मदत करित होते. परंतु आता ते धोरण राहिलेले नाही.

**शुभांगी नाईक :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने संगणकीकरण करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे. त्याचे स्वागत करते. परंतु जेणेकरुन जे कर्मचारी आहेत त्यांना कमी करु नये. एवढीच विनंती करते. दुसरी गोष्ट म्हणजे भाईंदर परिसरात सुशिक्षित बेकार जी मुले आहेत जेणेकरुन जी कॉलेज व संगणकीकरण करुन पूर्ण आहेत. त्यांच्या परीक्षा घेऊन आपल्या मिरा भाईंदरमधील नागरिकांच्याच वर्णी व्हाव्यात असे वाटते.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, २१ व्या शतकाकडे वाटचाल करत असताना मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयाचा जो संगणकीकरणाचा ठराव आज उपस्थित झालेला आहे. मी त्याबद्दल मा. महापौरांचे, मा. आयुक्तांचे निश्चितच स्वागत करिन. कारण या कामी मागे असुनही पण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यामार्फत आपले कर्मचारी जी आज एम.एस.सी.आय.टी. परीक्षा पास झालेले आहेत. अशांना सुद्धा त्याच्यामध्ये सामील करुन घ्या. कारण आपण हे जर खाजगीकरण करित असाल तर आपण आपल्या कर्मचाऱ्यावर ह्या एम.एस.सी.आय.टी. परीक्षेसाठी हा जो खर्च केला. तर खाजगीकरण केल्यानंतर गोपनीयता ही राहणार नाही. तरी या संदर्भात आपण जास्तीत जास्त चौकशी करता येईल किंवा आपल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत ही संगणक प्रणाली चालू करावी. वाटल्यास त्यासाठी मार्गदर्शक घेण्यास आमची काहीच हरकत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

महानगरपालिकेच्या संगणकीकरण करण्याबाबतचा विषय आहे. त्यासाठी सन्मा. आयुक्त साहेब यांनी प्रस्तावना सादर केलेली आहे. राज्यातील महानगरपालिका आणि नगरपरिषदेचे संगणकीकरण करण्याबाबत शासनाचे निर्णय जोडलेले आहेत. आपण जी प्रस्तावना सादर केलेली आहे. ती एकंदरीत पाहता आणि शासनाचा निर्णय पाहता दोन गोष्टी दिसुन येतात की आपण केलेल्या प्रस्तावनेमध्ये आपण या महानगरपालिकेसाठी फक्त आज्ञावलीचा वापर करु इच्छिता. याच्यामध्ये कुठेही हार्डवेअर घेण्यासंबंधीची कुठलीही माहिती आपण दिलेली नाही. किंबहुना संपूर्ण महानगरपालिकेचे संगणकीकरण करावे अशी जरी आपली प्रस्तावना असली तरी त्यामध्ये हार्डवेअर मधील आर.डी.बी.एम.एस. म्हणजे रिलेशन डाटा बेस मॅनेजमेन्टसाठी डी.बी. दोन व ओरॅकल ह्या दोन हार्डवेअरच्या सिस्टम डेव्हलप केलेल्या आहेत. याच्यापैकी कोणती सिस्टम आम्ही ॲडॉप करावी यासंबंधी कुठेही उल्लेख केलेला नाही. त्यानंतर आपल्याला माहिती असेल की या नगरपालिकेने या कार्यालयाच्या उद्घाटनाच्या प्रसंगी स्वतःची वेबसाईट डेव्हलप केलेली होती आणि ती वेबसाईट चालू होती नेटवर्कींग, ईमेलींग सुद्धा चालू होते

किंबहुना तत्कालीन मा. जिल्हाधिकारी श्री. मुकेश खुल्लर साहेब यांच्या आदेशाने ती प्रत्यक्षात अंमलात सुद्धा आणलेली होती. बऱ्याचशा नागरिकांनी त्या वेबसाईटवरती नगरपालिकेच्या टॅक्स दराबाबत व इतर बाबतीमध्ये चौकशी केलेल्या होत्या. प्रश्न विचारलेले होते व त्यांना त्याबाबतीत समाधानकारक उत्तरे दिलेली होती. आज मुळात ही जी नगरपालिकेने आत्मसात केलेली वेबसाईट ज्याचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय विलासरावजी देशमुख व उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ यांच्या हस्ते झाले आज तरी या सिस्टीमचा कुठे मागोवा किंवा अस्तित्व दिसत नाही. तर एकदंरीत या सिस्टीम कुठे गहाळ झाल्या किंवा चोरीला गेल्या. मघाशी त्यांनी सांगितले की, सिस्टीम चोरीला जाऊ नये म्हणुन आपलीच यंत्रणा वापरावी परंतु सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर यांच्यात खुप फरक आहे. शक्यतो सॉफ्टवेअर हे जे आज्ञावली ज्या डेव्हलप केलेल्या आहेत त्या त्या नगरपालिकेने त्या आज्ञवली एकतर शासनाने केलेल्या नाहीत असे दिसते आहे. एकंदरीत की आतापर्यंत शासन जे निर्णय काढत होते त्याच्यावरती महानगरपालिकेचे आयुक्त आणि पदाधिकारी एखादे धोरण राबवत असते. आता उलटी गंगा वाहू लागली आहे की एखाद्या नगरपालिकेने एखादा कार्यक्रम केल्याबरोबर त्यांनी केलेल्या कार्यक्रमाचा पाढा शासनाने वाचला आहे आणि त्याचे अनूकरण करा असे ते दुसऱ्याला सांगितले जाते. कधीतरी गंगा उलटी वाहायलाच पाहिजे. नाही तर उत्तरेकडील लोंढा वाढत राहिल. आयुक्त साहेब आज्ञावली तयार करण्यामागे मलातरी वाटत नाही की कुठल्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी या आज्ञवली तयार केलेल्या आहेत. कुठल्यातरी खाजगी संस्था त्यांच्या बुद्धीने त्यांचे टेक्निशिन्स लावुन या आज्ञावल्या तयार केलेल्या आहेत. हार्डवेअरमध्ये हार्डवेअर आणले की त्याच्यामध्ये त्या सॉफटवेअरच्या हार्डडिक्स फिड केल्या की आज्ञावली जशीच्या तशी आमच्यापुढे येणार. कल्याणला जसे शहर दिसते मोठी गटारे, छोटी गटारे, अधिकृत पाईपलाईन, अनधिकृत पाईपलाईन, मोठी पाईपलाईन, छोटी पाईपलाईन तशा सगळ्या तुम्हाला दिसायला लागतील. झोपडपट्टी किती? फोटोपास दिलेले किती? फोटोपास न दिलेले किती? या सगळ्या आज्ञावल्या ज्यांनी ज्यांनी आपापल्या क्षमतेनुसार तयार केलेल्या आहेत. शासन निर्णयावरुन एकंदरीत असे दिसते की, त्यांनी काम केल्यानंतर सुमारे दहा लाखाचा निधी नवी मुंबईला आणि कल्याण डोंबिवलीला दिलेला आहे. आणि पुन्हा वीस लाख रुपयेसुद्धा त्यांनी दिलेले आहेत. एकंदरीत शासन निर्णय हा आपल्याला लागु आहे. आणि लागु असेल म्हणुनच आपण असे धरतो अन्यथा माझ्या महानगरपालिकेचे नाव इथे कुठेही नाही. मा. महापौर मॅडम यांचे देखील नाव नाही. चौदा लोकांना हा निर्णय त्यांनी पाठविलेला आहे. पण शासन निर्णय हा सर्वांना सर्वकष सारखाच लागु असतो. असे जर आम्ही इक्वेशन धरले तर दहा लाख रुपये आणि वीस लाख रुपये मिळण्यास आम्ही पात्र ठरतो. अर्थात त्यांना देण्याच्या पद्धती त्यांनी केलेल्या कामावर आहे. म्हणजे एखाद्या खेळामध्ये बक्षीस मिळविल्यानंतर म्हणजे पहिला क्रमांक मिळविल्यानंतर प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळते. परंतु एखाद्या खेळामध्ये तुम्ही हरा किंवा जिंका आमचे अनुदान घेऊन जा आणि भले तिकडे सेटींग करा आणि हरुन या. अशा प्रकारच्या या दोन बाबी आहेत. आणि मला याठिकाणी आपल्याला एक विनंती करावयाची आहे की, आपला हा विषय अतिशय चांगला विषय आपण आणला. आपण प्रस्तावनेमध्ये आज्ञावलीसह हार्डवेअरसुद्धा इन्क्लुड करा. अशी माझी आपल्याला विनंती आहे. कारण हार्डवेअरशिवाय आपण फार लांब जाऊ शकणार नाही. कदाचित आमचे कर्मचारी एम.एस.सी.आय.टी. पास झालेले आहेत. ते याच्यापेक्षा चांगली आज्ञावली तयार करु शकतील ॲट प्रेझेन्ट शासनाने कुठल्याही निर्णयामार्फत कल्याण-डोंबिवली किंवा नवी मुंबईने डेव्हलप केलेले आहे. कुठल्याही आज्ञावल्या या मॉडेल आज्ञावल्या ठरवल्या असल्यामुळे त्या कायदेशीररित्या आपण वापरु शकतो की नाही हाही मोठा प्रश्न आहे. आणि म्हणुन अशा बाबतीत आम्ही जर एखादी आज्ञावली वापरायची म्हटली तर आम्हाला शासनानेसुद्धा मंजुरी दिली पाहिजे. त्यांना खर्चाची मंजुरी दिली त्यांना अनुदान देखील दिले. म्हणुन आम्ही देखील पात्र आहोत आणि हे आपण मिळवावे असे मी सांगतो. ही आज्ञावली सुरु आहे. हार्डवेअर संदर्भात कुठलाही विषय या ठिकाणी मांडलेला नाही. तर आपण तो इन्क्लुड करावा आणि जे अनुदान शासनाकडुन म्हटलेले आहे ते प्राप्त करुन घ्यावे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडला त्यापैकी महत्त्वाच्या मुददयाचे मी उत्तर देऊ इच्छितो. हा जो गोषवारा आहे या गोषवाऱ्याच्या दुसऱ्या मुददयामध्ये संगणकीकरणासाठी आवश्यक सामुग्री खरेदी करणे इत्यादी बाबीची पुर्तता करणे आवश्यक आहे असे म्हटलेले आहे. हा हार्डवेअरचा उल्लेख आहे. आपण ॲग्री होत असाल तर याचा दुसरा अर्थ काहीच होऊ शकत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण हार्डवेअरचा उल्लेख केलेला आहे. हेही मान्य आहे. आपण आज्ञावलीचा, सॉफ्टवेअरचा उल्लेख केला हेही मान्य आहे. साहेब, तुम्ही आमच्याकडे वित्तीय मान्यता मागता. दुसऱ्या प्रस्तावात

तुम्ही आर्थिक मंजुरी मागता म्हणजे आर्थिकपेक्षा वित्तीय वेगळे नाही. आणि जेव्हा एखाद्या वस्तुवर एखादी एक्स अमाउन्ट जर खर्च कराची आहे. तर ती सॉफ्टवेअर किती करावी आणि हार्डवेअरवर किती करावी.

**मा. आयुक्त :-**

म्हणुनच हा जो मुद्दा आहे. आम्ही अनिर्णित स्वरुपात सोडलेला आहे. त्याचे कारण असे आहे आम्ही हेही केले की, बजेटमध्ये ७५ लाखाची तरतुद आहे. साधारण हा सगळा प्रोजेक्ट पूर्ण करायला हा खाजगीकरणामार्फत राबविला जाणार नाही. हा देखील मी खुलासा करु इच्छितो. काही सन्मा सदस्यांनी शंका व्यक्त केली की हे आपण खाजगीकरणाच्या माध्यमातुन राबविणार आहोत का? आपण विशेष कार्य अधिकारी ओ.एस.डी.आय.टी. म्हणुन नेमणुक केलेली आहे. यांच्या मार्गदर्शनाखाली आपण हा प्रोजेक्ट पूर्ण करणार आहोत. आणि याची पूर्व तयारी म्हणुन आपण आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शनही केलेले आहे. आणि एम.एस.सी.आय.टी. गव्हर्नमेंटची जी परीक्षा आहे ती देखील आपल्या बहुतांश कर्मचाऱ्यांनी म्हणजे ९० टक्केपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी पास केलेली आहे. या कर्मचाऱ्यांच्या मदतीनेच ते स्वतः ही प्रणाली स्कीम राबविणार आहेत. सध्या कुठलेही खाजगीकरण या संदर्भामध्ये अपेक्षित नाही. ज्या सॉफ्टवेअर घ्यायच्या आहेत नवी मुंबई आणि कल्याण कार्पोरेशन. तर सुरुवातीच्या काळात ज्यावेळी गव्हर्नमेंट लेवलला चर्चेला आला होता मीही त्या बैठकीमध्ये हा शासन निर्णय होण्यापूर्वी उपस्थित होतो. हा दहा लाख आणि वीस लाखाचा जो निधी कल्याण डोंबिवली महापालिका आणि नवी मुंबई महापालिकेला दयायचे ठरले होते तर वास्तविक त्याच्यामध्ये त्यांच्या सॉफ्टवेअरचे कॉस्ट रिकव्हर होईल अशी एक अपेक्षा होती. परंतु त्यानंतर त्यांचे ठेकेदार आणि महापालिका यांच्यामध्ये आय.पी.आर वरुन वाद चालू आहे. इन्टलेक्चुअल प्रोटेक्शन राईट जे आहेत ते नक्की कुणाचे आहेत. ठेकेदाराचे आहेत की महापालिकेचे आहेत. यावरुन पुन्हा हा विषय थोडासा बदललेला आहे. आणि मग शासनाने असे ठरविले की, शासन पातळीवर सचिवांचे आय.टी. सेक्रेटरी जे आहे तर त्यांच्याकडे त्यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी आहे आणि या कमिटीमध्ये या तीन चार महापालिकेच्या त्यातील जे तज्ञ आहेत. ज्यांनी ही योजना राबविलेली आहे त्यांचा समावेश करुन यातील जी उत्कृष्ट प्रणाली आहे या उत्कृष्ट प्रणालीचा ते अभ्यास करणार आहेत याच्यासाठी तिऱ्हाईत एजन्सीदेखील त्यांनी नेमलेली आहे. आणि ती एजन्सी याचे मुल्यामापन करेल आणि त्याची कॉस्ट ठरविण्याच्या बाबतीमध्ये शासन दरबारी याचा निर्णय होण्याची शक्यता लवकरच आहे. पंधरा दिवस एक महिन्यामध्ये होईल. आणि आपल्या सर्वांच्या सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की ही आज्ञावली कल्याण महापालिकेला ज्यांनी विकसीत केली. तेच तज्ञ आपल्याकडे माशाळकर म्हणुन आपण घेतलेले आहेत. तेथील प्रोजेक्ट पूर्ण झाल्यानंतर आपल्या भाईंदरचेच माशाळकर रहिवासी आहेत. त्यांचा मी परिचयदेखील करुन देऊ इच्छितो. तर आपण त्यांना ओ.एच.डी. म्हणून या ठिकाणी घेतले.  उद्देश हाच होता की आपल्याला कमीत कमी खर्चामध्ये चांगल्या प्रकारचे संगणकीकरण व्हावे आणि त्याचे प्रत्यक्ष मॉनिटरींग जे आहे ते आपले ओ.एच.डी. करणार आहेत. या संबंधी प्रकल्पाला साधारण सव्वा ते दीड कोटी रुपये खर्च येईल. परंतु, आता जो आवश्यक खर्च आहे तो बजेटच्या तरतुदीपर्यंतच आपण भागविणार आहोत. म्हणजे बाकीचा जो खर्च आहे तो शासन निर्णय होईपर्यंत मार्चनंतर कदाचित पुढच्या वर्षी करावा लागेल अशा प्रकारची ही साधारण योजना आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे. संगणकीकरण व्हावे म्हणुन अनेक वर्षाची मागणी, जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला स्पष्ट आदेश तो सुद्धा नगरपालिकेच्या कारकीर्दीमध्ये  अंमलात आला नाही. आणि आता ज्या महापालिकेत संगणकीकरण होत आहे. त्याचे सगळे स्वागत करीत आहेत. या चर्चेचा वादाचा विषयच नाही. स्वागताचा विषय आहे. पण एका बाबीकडे मी लक्ष वेधतो की, महापालिकेने ९० टक्के आपला स्टाफ सगळा प्रशिक्षित केला. संगणकीकरणाचे जे प्रशिक्षण आहे. ते प्रशिक्षण घेतल्याला बरेच महिने झाले. जशी आपण खानापुर्ती करतो की तुम्ही शिकलाच पाहिजे तसे शिकविण्यासाठी महापालिका अनेक महिने बंद सारखी राहुन आपण सर्व कर्मचाऱ्यांना संगणकीकरण शिकविण्यासाठी पाठवत होतो. त्यात ते शिकले, परीक्षा पास झाले. आज परीक्षा पास होऊन देखील फार कालावधी झाला. त्या कर्मचाऱ्यांना आपण कोठेही ॲन्गेज केलेले नाही. फक्त जमेची बाजू एवढीच आहे की, ते संगणक परीक्षा देऊन पास झालेले आहेत. म्हणजे त्या लायकीचे झाले आहेत एवढेच आहे. आज त्यांच्या मध्ये फार मोठा गॅप झालेला आहे. आणि कॉम्प्युटरचे असे आहे की, त्याची प्रॅक्टीस संपली की गुणाकार, भागाकार सारखा विषय नाही. त्याची प्रॅक्टीस सतत रहायला पाहिजे. टचमध्ये रहायला पाहिजे. पण आपण ज्यांना परीक्षा देऊन पुन्हा त्यांना परीक्षा दयायची जे पास झाले. त्या सर्व कर्मचाऱ्यांना ॲन्गेज केले नाही. त्यांना काम देणे आवश्यक होते हा प्रोजेक्ट राबविताना आणखी वेळ जाईल. तो पर्यंत या

सभागृहास आपणास आयुक्तांना विनंती करतो की, माशाळकर आहेत त्यांना सांगुन आपल्या सिस्टीममध्ये अजून आपण अनेक कामे बाहेर दिलेली आहेत. नाहीतर ह्याची प्रॅक्टीस जर ते विसरले तर जो घोळ होतो त्यापेक्षा अजुन मोठा घोळ होईल. ही सगळी प्रॉपर्टी, सगळी रिस्पॉन्सिबिलीटी आपली आहे आणि आपण या सभागृहात किंवा महापालिकेत बघतो की येतो तो अधिकारी निवेदन करतो की पहिल्यांदा सगळा घोळ करून ठेवला आहे. आणि आम्ही आता तो सुधारण्याचा प्रयत्न करतो. आपल्याला हे सांगायला मिळणार नाही की पहिल्याने घोळ करुन ठेवला आहे. त्यामुळे मी आयुक्तांना विनंती करतो, माशेळकर यांना विनंती करतो, किंवा संबंधित कोणी अधिकारी असतील त्यांना की त्या कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी ही परीक्षा दिलेली आहे. त्यांना कोणकोणत्या ठिकाणी ॲन्गेज करता येईल ते बघा. नाहीतर हा कागदावरचा खेळ आहे. याच्यामध्ये सर्व कामकाज सुरु व्हायला वेळ लागेल. तोपर्यंत ते सगळे विसरलेले असतील.

**प्रकरण ३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयामध्ये संगणकीकरण करणेबाबत.

**ठराव क्र. २६ :-**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासन गतीमान व लोकाभिमुख करण्यांच्या दृष्टीने व प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शता आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचे धोरण आग्रही आहे. शासनाने कल्याण - डोंबिवली व नवि मुंबई महानगरपालिका यांनी विकसित केलेल्या आज्ञावलीची अंमलबजावणी अन्य महापालिकेमध्ये कार्यान्वित करण्याचे योजले आहे. उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार कल्याण-डोंबिवली व नवि मुंबई महानगरपालिकेने विकसित केलेले स्वतंत्र आज्ञावली तंत्रज्ञान व नागपुर व उल्हासनगर महानगरपालिका मध्ये प्रायोगिक तत्त्वावर लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे संदर्भिय शासन निर्णयाची मिरा भाईंदर महानगरपालिकेत अंमलबजावणी करणेसाठी महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेणेंत येत आहे.

त्याचप्रमाणे सदर आज्ञावली कार्यान्वीत करण्यासाठी संगणक कक्ष उभारणे, मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, संगणक कक्षासाठी आवश्यक संरचना उपलब्ध करुन घेणे,संगणकी करणासाठी सॉप्टवेअर/हार्डवेअर/युपीएस/नेटवर्कीग (केबलींग व स्वीचेस,रॅक्स) इ. आवश्यक सामुग्री खरेदी करणे जरुरीचे आहे.

सदर प्रकल्पास अंदाजे १.५ कोटी रुपये खर्च येण्याची शक्यता आहे. तथापि महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी सन २००३-०४ चे अंदाजपत्रकास संगणक खरेदी या लेखा शिर्षा खाली रुपये ७५ लाख तरतूद करण्यांत आलेली आहे. या आर्थिक वर्षात सदर रक्कम उपलब्ध होणार आहे. उर्वरित रक्कम पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात उपलब्ध करुन देण्यांत येईल.सदर प्रस्तावास ही महासभा वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे.

महानगरपालिकेचे कामकाजाचे संपूर्णतः संगणकीकरण झालेवर --

१) शहरातील नागरिकांना संगणीकरणाच्या माध्यमातून प्रभावी व चांगली सेवा कमीत कमी वेळात उपलब्ध करुन देता येईल.
२) महानगरपालिकेच्या कामकाजात/ प्रशासकीय कामात पारदर्शक पणा येईल.
३) नागरीकांचे तक्रारीचे समाधानकारक रित्या निवारन करता येईल.

सदर संगणकीय काम राबविण्यासाठी प्रस्तावास येणा-या खर्चास ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.३८चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, शाळेतील विद्यार्थ्यांना पोषक आहार दयायचा सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेला आहे. १९६-२००१ सुप्रीम कोर्टाचा आदेश कुठल्या राज्याबद्दल आहे आपल्याला माहिती नाही. ती याचिका कोणी केली होती. याची आपल्याला कल्पना नाही. सुप्रीम कोर्टाचा आदेश पाळणे हे आपले कर्तव्य आहे. त्याच्यानंतर शासनाचा आदेश आपल्याला आला. शाळेतील विद्यार्थ्यांना शंभर ग्रॅम फक्त तांदुळ दयायचे आणि ते तांदुळ शिजवण्यासाठी, त्याची खिचडी बनविण्यासाठी ५० पैसे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी खर्च

द्यायचा असा आदेश शासनाने आपल्याला दिला आहे. आपण शाळेतील प्राथमिक शिक्षकांवर तेथील हेडमास्तरवर, मुख्याध्यापकावर तशा तऱ्हेची सक्ती केली. तसे पत्र आपण त्यांना पाठविले आहे. परंतु प्रॅक्टिकली जेव्हा आपण गेल्यानंतर पाहिले की हे शिजवणे कठिण आहे. मी आपल्याला तसा अर्ज दिला. की आयुक्तसाहेब हे शिजविणे खूप कठीण आहे. आणि त्यादृष्टीने आपल्या दोघांची चर्चा झाली आपण शाळा पाहिली. मी आपल्या सोबत होतो, शिक्षणाधिकारी होते कदाचित सभागृहात बऱ्याचशा नगरसेवकांना माहित नसेल की हे शिजवलेले अन्न शाळेतील विद्यार्थी खात नाहीत बऱ्याचशा उदाहरणार्थ मुर्धा सारख्या ठिकाणी आम्ही गेलो त्या शाळेतील शिक्षकांना त्या गावातील महिला शिव्या देत होत्या की हे अन्न खाल्ले तर आमची मुले आजारी पडतात ते सत्य पण होते. आपण ज्या शहरामध्ये आहात. त्या शहरातील विद्यार्थी अशातऱ्हेने अन्न खाऊ शकतील का? ह्या विषयावर आम्ही चर्चा केली. आणि मग आयुक्तांनी अतिशय धाडसी निर्णय घेतला की, आपल्या शाळेतील विद्यार्थी, आपल्या शहरातील विद्यार्थी यांना काहीतरी अन्न तर दयावेच लागणार आहे, परंतु, ते देताना कशातऱ्हेने चांगलं अन्न देता येईल. थोडेसे ते पौष्टिक कसे होईल, चवदार कसे होईल, याच्यासाठी आपण काही मदत जर केली महापालिकेने जर याच्यामध्ये काही रक्कम वाढवुन दिली तर ते अन्न चांगले चवदार बनविता येईल. म्हणून ५० पैसे वाढवून दिले. खरे म्हणजे ५० पैसे सुद्धा त्या दृष्टीने पुरक नाही. ते ही कमी आहेत. परंतु ५० पैसे दिल्यानंतर थोडासा त्यामध्ये फरक पडेल आणि अशातऱ्हेने हा ठराव इकडे आणलेला आहे. मी या ठरावाला शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य बघून आपण यांना मान्यता द्यावी असा ठराव मांडतो आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम या ठरावाला अनुमोदन होण्यापुर्वी मला काहीतरी बोलायचे आहे. की ५० पैसे देणार हा आपला उदारपणा येथे दिसतो आहे. चांगली गोष्ट आहे की, आपण शासनाचा आदेश पाळणार आहोत पण आपण येथे लिहिलेले आहे की, ही तरतूद महिला बालकल्याण अंतर्गत जी करण्यांत आली. हे ५० पैसे देताना तुम्ही प्रत्येक वर्षाला विद्यार्थी संख्या ७,५०० यांना तुम्ही जो ५० पैसे खर्च करणार आहात तर जवळ जवळ एका वर्षाला तो रू. ९३,०००/- हजार इतका होणार आहे. तर ती निव्वळ लाखापर्यंत संख्या जाणार आहे. एका वर्षाचे त्यांनी सप्टेंबर ते मार्च पर्यंत असे दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

दोन महिने हे सुट्टीचे जातात.

**प्रभात पाटील :-**

ठीक आहे तरी सुद्धा सहा लाखापर्यंत जाते महिला बालकल्याण ची तरतूद तुम्ही येथे म्हटलेली आहे. रू. ४२ लाख ७२ हजार इतकी आहे. तो संपूर्ण महिला बालकल्याण साठी दिलेला निधी आहे. एका वर्षासाठी दिलेली आहे. मग विचार करावा की जी महिला बालकल्याण समिती गठीत करणार आहात मा. महापौरांच्या आदेशानुसार, तर तिच्यामध्ये फंड तरी किती रहाणार आहे. ती महिला समिती एवढया उर्वरीत फंडामध्ये काय काम करणार आहे.

**मा. आयुक्त :-**

वाढवून घेता येईल.

**प्रभात पाटील :-**

मग तुमचा एज्युकेशनचा फंड कुठे गेला. तुम्ही महिला बालकल्याण समिती येथे गठीत करता आहात तर तिला आधीच रिकामी करत आहात आणि मग तो पोकळ हंडा किंवा अर्धवट हंडा हा कुणाच्या डोक्यावर देणार आहात.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य पाटील मॅडम नी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. तो प्रथमदर्शनी बरोबर आहे वाटत असले तरी त्याच्यामध्ये मी खुलासा करू इच्छितो की, आता समिती गठीत होऊन मला वाटते आणखीन एक महिना तरी त्याच्यामध्ये जाईल. त्यानंतर हार्डली चार महिने शिल्लक राहतील महिला बालकल्याण समितीच्या कार्याला आपण मुलासाठी गणवेश पुरविलेले आहेत. त्याच्यासाठी आपण खर्च केलेला आहे. तो शिक्षण मंडळाच्या तरतुदीतून अर्थात केलेला आहे आणि फक्त एवढीच तरतूद सहा लाखाची याच्यातून आपण घेतलेली आहे आपले महिला बालकल्याण समितीच्या इन्व्हेस्टमेन्टच्या स्वरूपात असणार नाही. बाकीच्या बजेटमधून बाकीचे खर्च होणार आहेत. फक्त महिलांच्या संबधातील आणि बालकांच्या सबंधातील, विकासाच्या सबंधातील जेवढे प्रश्न आहेत तेवढयासाठी ही तरतूद आपण ठेवलेली आहे. आपल्याला जर पुन्हा असे वाटले की ही तरतूद कमी पडते. तर हे सहा लाख रूपये खर्च झाल्यामुळें तुमच्या महिला बालकल्याण समितीच्या कामकाजामध्ये तुम्हाला आणखी काही अपुरेपणा जाणवतो आहे. तर त्यावेळी आठमाही बजेटच्या वेळी पुन्हा रिॲप्रोग्रेशन करून वाढवता येईल. त्यामुळे

तो प्रश्न असणार नाही. आपण कार्यक्रम जनतेच्या हिताचे जर आणले तर त्याला सभागृह नाही म्हणणारच नाही. तरतूदी उपलब्ध करून देणे हा बजेटचा खेळ आहे. तर तशा तरतूदी उपलब्ध करून घेता येणे शक्य आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही शिक्षणामधून हा खर्च का करीत नाही?

**मा. आयुक्त :-**

शिक्षण मंडळाच्या बाबतीमध्ये फक्त शिक्षकांची जी सॅलेरी आहे. त्या सॅलरीसाठी तरतूद केलेली आहे. त्या शाळेच्या संदर्भातील दुरूस्ती आहे. इतर व्यवस्था आहे त्या आपल्या पी. डब्ल्यू. डी. च्या फंडातून त्याचा खर्च जातो. त्यामुळे त्याची वेगळी व्यवस्था नाही. पुर्वी २० टक्के आपण शिक्षकांच्या वेतनावर खर्च करीत होतो. आता शासनाने आदेश दिला की आता महापालिका झाल्यामुळे तुम्हाला ५० टक्के करावा लागेल तर आता ही उरलेली जी रक्कम आहे. त्याची तरतूद आपल्याला आणखी करावी लागणार आहे. ही जर सोडली तर आपण शिक्षणावर वेगळा काही खर्च करीत नाही गणवेश वाटप आपण केलेलेच आहे. आणि हा खर्च सोडून शाळेच्या बाबतीतील सगळे जे इतर खर्च आहेत. ते आपल्या पी.डब्ल्यू.डी.च्या फंडातूनही करतो आणि केंद्र शासनाची  सर्व शिक्षण अभियान नावाची जी स्कीम आहे त्यात देखील प्रत्येक शाळेला सहा हजार रूपयाची रक्कम आपण त्या मुख्याध्यापकला देतो आणि त्याच्यामध्ये त्याला मायनर एक्स्पेंडिचर करण्याची मुभा आहे. तर ते पैसे केंद्र सरकार देते. हा जो मुद्दा आहे. हा आणखी थोडासा वेगळा मुद्दा आहे. महिला बालकल्याण समितीचे जे कार्यक्रम असतील त्या कार्यक्रमाला जर आपल्याला वाटत असेल की निधी कमी पडतो तर त्यावेळी आपण त्याची मागणी करा तसे रिॲप्रोग्रेशन करून देखील निधी उपलब्ध करून देणे शक्य आहे.

**रतन  पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्राथमिक शाळेत खिचडी तयार करून द्यायची असा शासनाचा निर्णय आहे. शासन फक्त तांदुळ देते आणि ५० पैसे देते. महापालिकेने आणखी ५० पैसे देऊन ती खिचडी शिजवण्यामध्ये चांगले योगदान केल्याबद्दल मी प्रशासनाचे, मा. महापौरांचे, मा. आयुक्ताचे हार्दिक स्वागत करतो. पण एवढयावरच हे थांबत नाही ते शिजविण्यासाठी लागणारे जे साहित्य आहे. आपण माझ्या प्रभागात शाळा क्र. ६ या शाळेमध्ये शंभर विद्यार्थी आहे. शंभर विद्यार्थ्यांना एका दिवसाला खिचडी शिजविण्यासाठी १० किलोची खिचडी जर शिजवायची असेल तर एक लीटर रॉकेल, अर्धा किलो गोडतेल, मसाला, मीठ व हळद व अर्धा किलो डाळ, अशा पद्धतीने पुर्ण खर्च त्याला येऊन ७५ रू. पुर्ण खर्च हे शिजवण्यास येतो. उर्वरीत त्याला लागणारे सामान, स्टोव्ह, पातेलं, लागणारे पिंप याची सोय कोणी करायची. आणि हे शिजवण्यासाठी कृपया शिक्षकावर सक्ती न करता वेगळया पद्धतीने शिजवता येईल आणि ते विद्यार्थ्यांना देता येईल. हे सुद्धा स्पष्ट होणे गरजेचे आहे.

**रिटा शहा :-**

महानगरपालिकेत शासनाची ही स्कीम आहे. आणि महानगरपालिका ५० पैसे देणार आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. कारण महिला बालकल्याण समिती गठन होणार आहे. आणि जेव्हा गठन होईल त्यानंतर महिला बालकल्याण समिती हा कार्यक्रम राबविणार आहेत. आपल्यासमोर हा विषय आलेला आहे. आणि आपल्याला तो मान्य करायचा आहे. आपल्या शहरातील गोरगोरीबांचा विषय आहे. आणि तो मान्य करायला माझा विरोध नाही. पण ह्यामध्ये आपण जे ५० पैसे दिलेले आहेत. आता त्यांनी सांगितले स्टोव्ह पाहिजे, हे पाहिजे, ते पाहिजे तर खिचडी द्यायची म्हणजे ५० पैसे दिले म्हणजे खिचडी शिजवून झाली असे नसते तर माझे असे मत आहे की ५० पैशापेक्षा आपण त्यांना एक रूपया करू. आणि एक रूपया देऊन त्यांना आपण ही खिचडी नेमकी कोणी बनवायची त्याचा देखील आपण विचार करायचा आहे. कारण आपल्याकडे अशी संस्था आहे. महिला संस्था त्यांना हा तुम्ही प्रकार द्या अशी माझी मागणी आहे.

**मा. आयुक्त :-**

दोन्ही सन्मा. सदस्यांनी फार महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सभागृहाला ओघामध्ये सांगायचे विसरलो ५० पैसे केंद्रशासन देणार आहे. आणि ५० पैसे आपण त्याच्यामध्ये ॲडीशनल करणार आहोत म्हणजे एक रूपया एका विद्यार्थ्याला. साधारण ही जी सहा लाख रूपयाची तरतूद बारा लाखाची होईल आमच्या असे लक्षात आले ठेकेदार आम्हाला भेटला, मला वाटते शारदा केटरर्स, तर हे गृहस्थ स्वतः झळ सोसून या विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारची खिचडी शिजवून देत होते. आम्ही स्वतः पाहिले तर तेही म्हणाले की काय खुप दिवस मला हे करता येईल असे वाटत नाही. कारण मला दर महिन्याला घाटा होत आहे. आणि तेही फक्त भाईंदर शिक्षण मंडळ जे आहे त्या ठिकाणी एका शाळे पुरतेच त्यांनी

ही जबाबदारी घेतली होती एक सामाजिक काम म्हणून ते त्या ठिकाणी करत होत परंतु आपल्या बाकीच्या ज्या सर्व शाळा आहेत आणि बाकीची जे सर्व विद्यार्थी आहेत. तर ते याच्यापासून वंचित राहू नये म्हणून आपल्याला हा निर्णय घ्यावा लागला. सन्मा. सदस्य रतन पाटील आणि रिटा मॅडम यांनी जे प्रश्न विचारले की हे नक्की कोण करणार याच्यामध्ये आपली जी ऑडीटची प्रोसीजर असेल, टेंडर प्रोसेस असेल ती पुर्ण फॉलो केली जईल. याच्यासाठी ज्या संस्था पुढे येतील कदाचित एक रूपयाच्या ऐवजी ७५ पैशात देखील हे काम करून देणाऱ्या संस्था आपल्याला उपलब्ध होऊ शकतील. आम्ही फक्त आपल्याकडून मंजूरी घेतो. ही मंजूरी मिळाल्यानंतर आम्ही रितसर वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देऊन ह्यासाठी काम करायला जे इच्छुक ठेकेदार असतील किंवा सामाजिक संस्था असतील आपण अशा संस्थाना तयार करायला हरकत नाही. आणि वेगवेगळया विभागामध्ये वेगवेगळया संस्था असल्या तर ते देखील आपल्याला चालण्यासारखे आहे. त्यांची स्वतःची भांडीकुंडी असतील कारण टेंडरमध्येच तशी अट आपण टाकणार आहोत. आणि सगळी मॅनेजमेंन्ट जी आहे. ती त्यांची असणार आहे. त्यामुळे आपण इतर काहीही पाहण्याची आवश्यकता नाही.  फक्त एक रूपया विद्यार्थी या हिशोबाने त्यांना पेमेन्ट केले तर बाकीची मॅनेजमेंन्ट ते कॅटरर्स स्वतः करतील.

**लीला पाटील :-**

महापौरांच्या परवनगीने बोलते मॅडम आपण गणवेश वाटप करताना नवघर शाळेत जेव्हा गेलात तेव्हा तिथे काही महिलांनी आपल्याला तक्रार केली की, दोन दिवस खिचडी चांगली तर तिसऱ्या दिवशी खिचडी कच्ची होती. तर त्यामध्ये काही सुतळीचे धागे होते. आणि त्याच्यामुळे मुलांच्या पोटात दुखायला लागले. तरी ती खिचडी मुलेच खातात असे नाही तर राहिलेली त्यांची आईदेखील चाखून बघते. त्यामुळे यापुढे जर तुम्ही कोण एक चांगली महिला संस्था वा एखादी कॅटरर्स असे द्याल तेव्हा चांगली खिचडी शिजेल आणि पोषक अन्न मिळेल आणि पाचवीच्या विद्यार्थ्यांना चांगला पोषक व सकस आहार मिळेल. याकडे जरा लक्ष द्या. तसेच परवा बोलल्याप्रमाणे आपण फोटो पेन दिला. तुमचे त्याबद्दल धन्यवाद.

**धनराज अग्रवाल :-**

महापौर मॅडम टेंडर काढताना सामाजिक संस्थांना यामध्ये प्राधान्य द्यावे असे मी मान्य करतो.

**प्रभात पाटील :-**

या ठरावाला मान्यता देत असताना कोणी अनुमोदन दिले असेल तर मला माहित नाही. परंतू मागच्या वेळी देखील आपण शिक्षणा विषयी आपल्या ह्या नगरपरिषदेचे चांगले एक उदात्त धोरण आहे. मग विद्यार्थ्यांचा गणवेश असो की खिचडी वाटप असो की, वह्या वाटप असो आम्ही नेहमी उदार हस्ते सर्व काही करीत असतो. ज्या विद्यार्थ्यांसाठी आम्ही हे सर्व करतो त्यांना  फक्त गणवेश देऊन त्यांच्या अंगावर चांगला साज चढवून देतो. त्यांच्या ज्ञानाची भर कोणी भागवायची हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. आणि ह्या प्रश्नावर आपण कधीही अंर्तमुख होत नाही. त्या विद्यार्थ्यांची अवस्था बघा नागरीक घडवण्यासाठी आपण ज्यांना लाखो आणि करोडोंनी खर्च करतो. मोठया मोठया शाळा बांधतो त्या विद्यार्थ्यांना ग किंवा म येते का?  ही जबाबदारी आपली नाही का ?  ही जबाबदारी कोणाची ? आपण नुसता फक्त पैसाच खर्च करायचा की नगरपालिकेकडे जास्त पैसा आहे म्हणून तिकडे ओतायचा का ? मी मागच्या वेळी देखील हा प्रश्न मांडला होता. आपण परवाच गणवेश वाटले. हे नागरीक आपणच घडवायचे आहेत. पण ते नागरीक घडतात का ? त्यांना जर बाहेर पडल्यानंतर सातवीतून बाहेर पडल्यानंतर नाव लिहिता येत नसेल आणि पाटीवर किती संख्या लिहिली ती वाचता येत नसेल. तर तुम्ही करोडो रूपये खर्च करून त्यांचे इथे काही नाही. महापौर मॅडम आणि कमिशनर साहेब मी तुम्हाला सांगते हा विषय मी नेहमी नेहमी मांडत असते. यासाठी मी तुम्हाला एक सुचना करते की या सर्व ठरावाला मान्यता देत असताना ह्या सभागृहामध्ये आणि या शहरामध्ये जे तज्ञ लोक आहे सभागृहातील चांगले जाणकार नेते आहे. आपण महापौर आहात कमिशनर साहेब आहेत. ज्यांनी अनेक नगरपालिका मध्ये काम केलेले आहेत. अनेक संस्था चालक या शहरामध्ये आहेत. अनेक चांगले शिक्षक आहेत तज्ञ आहेत जे यशस्विरित्या संस्था चालवितात असेही लोक आहेत. काही समाजातील मार्गदर्शक यांची समिती गठन करा की या शाळा आणि या शाळेतील विद्यार्थी यांना आम्हाला कसे प्रगतीपथावर नेता येईल. यासाठी या समितीचे गठन करा. आणि जसे आपण परिवहन सेवेचे अवहाल मागत आहोत. तसे आपण शहराचे नागरीक घडविण्याचे अवहाल तयार करा. अशी एक समिती गठन करा. नगरपालिकेचे दोन कालावधी निघून गेले. महानगरपालिका स्थापन होऊन एक वर्ष झाले. आपण सर्व हो म्हणता नाही कुठेच सांगितले नाही. शिक्षण मंडळ होईल तेव्हा होईल सध्यातुम्ही तुमच्या अखत्यारीत महापौरांच्या अधिकारामध्ये एक असे मंडळ स्थापन करा, एक अशी समिती स्थापन करा जी सर्व करील. शिक्षक कुठे कमी पडतात. विद्यार्थी कुठे कमी पडतात. आणि काही पालक जिथे बघतात आपल्या विद्यार्थ्याची प्रगती नाही. शाळेतील नाव काढून घ्यायला गेले तर शिक्षक नाव सुद्धा काढून देत नाही.

म्हणजे ह्या शिक्षकांना ह्या महानगरपालिकेला त्या विद्यार्थ्यांना असेच ठेवायचे आहे का ? आपण त्यांची नावे सुद्धा कमी करून घेत नाही. याचा अर्थ उघड आहे की, आपण त्यांचे भवितव्य बिघडवत आहोत. आणि याच्यात कुठेतरी विचार करण्याची वेळ आलेली आहे. तेव्हा मी सांगितलेल्या गोष्टीचा निश्चितपणे विचार करावा एवढीच माझी विनंती आहे.

**मिलन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा सदस्या प्रभात पाटील यांनी जे वक्तव्य केले त्याला माझे समर्थन आहे. मागच्या दोन मिटींगच्या अगोदर याच बाबतीत मी पोटतिडीकने बोललो होतो आताचे जे शिक्षण अधिकारी आहेत. त्यांनी प्रत्येक शाळेमध्ये जाऊन कोणत्या विद्यार्थ्यांला किती शिकलेले आहेत काय त्यांना पाढे येतात किंवा त्यांना लिहिता वाचता येते की नाही. हा अहवाल त्यांनी आयुक्तांना द्यायचा आहे. असे त्यावेळी नक्की झाले होते. तर आयुक्तांनी देखील मान्य केले होते की या वेळी मी दर महिन्याला किंवा दर दोन महिन्यांनी या शिक्षण अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून घेऊन तिथे काय चालले आहे? कुठल्या शाळेत किती विद्यार्थी येतात याचा अहवाल देणार होते तर त्या बाबतीत त्यांनी शिक्षण अधिकाऱ्यांनी अहवाल आपल्या आयुक्तांना दिला का? आणि दिला असेल तर तो अहवाल काय आहे? आपण एवढा खर्च करतो तर.

**असिफ शेख :-**

सन्मा महापौर मॅडम सन्मा सदस्य जयंत दादाजी पाटिल यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावास अनुमोदन सर्वात प्रथम मी देत आहे. आपण आपल्या महापालिका शाळेतील शिक्षण विभागातील जर अवस्था बघतली तर अत्यंत वाईट अशी अवस्था आहे. सन्मा सदस्या प्रभात पाटील यांनी जी व्यथा या ठिकाणी गायलेली आहे. ती समर्थनार्थ आहे. म्हणजे त्या काही चुकीचे बोलल्या नाहीत. शिक्षण अधिकाऱ्यांना मला वाटते जो जास्त इन्टरेस्ट आहे. तो आपल्या महापालिकेतील गोरगरिब विद्यार्थ्यांकडे लक्ष पुरवण्यासाठी त्यांना बिलकुल वेळ दिसत नाही. त्यांना इन्टरेस्ट कशामध्ये आहे की खाजगी शाळेचे प्राथमिक पुर्वप्राथमिक शाळांना मंजुरी देण्याची आणि त्यांना एन्.ओ.सी. द्यायची त्यामध्ये जास्त इन्टरेस्ट दिसतो. कारण आपल्या शाळेतील विद्यार्थी हा गोरगरीब विद्यार्थी आहे. आणि आपले घरातील विद्यार्थी आहे. आपण नगरसेंवक मंडळी समाजातील उच्च वर्गाची लोक चांगल्या शाळेत आपण आपल्या पाल्यांना पाठवित असतो. परंतु झोपडपट्टीतील जी मुलं आहेत. अशी मुले आपल्या महापालिकेच्या शाळेत जाऊन शिक्षण घेत असतात. त्यांना धड लिहिता वाचता येत नाही. त्यांच्या आरोग्याची तपसाणी होत नाही. त्यांची साप्ताहिक शिक्षणाची बैठक घ्यायला पाहिजे. कुठ पर्यंत विद्यार्थांना लिहिता आले, बोलता आले किंवा शिक्षण कुठपर्यंत येत आहे हे तपासायला पाहिजे. त्यांची चाचणी परिक्षा घ्यायला पाहिजे. असा अमुलाग्र बदल शिक्षण विभागात मला दिसत नाही. मागच्या वेळी एका शिक्षण अधिकाऱ्याला लाच घेताना अटक करण्यांत आले. त्यांच्यानंतर दुसरे शिक्षण अधिकारी आले. अशा काळीमा फासणाऱ्या घटना शिक्षण विभागात झाल्या आहेत. म्हणजे आपल्या शाळेचा त्यांनी दर्जा सुधारला पाहिजे. आपल्या विद्यार्थ्याचे शिक्षणाचा किती चांगल्या प्रकारे दर्जा उंचावेल याकडे त्यांचे लक्ष नाही तर आयुक्त साहेब, मी आपणांस नम्र विनंती करतो महापौर मॅडम आपणांस देखील नम्र विनंती करतो की, आपले जे वचक आहे ते वचक शिक्षण विभागाकडे पाहिजे. आपल्या स्थायी समितीमध्ये चेअरमन साहेबांना विचारले की शिक्षण विभागाकडे नियंत्रण वगैरे आहे का नाही? ते म्हणाले त्यांच्याप्रमाणे तेच देतात ते आपल्याकडे येतच नाही. तर आपली गर्व्हर्निंग कमिटी आहे. स्थायी समिती ही महापालिकेची गर्व्हर्निंग कमिटी आहे. तर आम्ही येथे सोळा डायरेक्टर या ठिकाणी कार्य करीत होतो. मॅनेजिंग डायरेक्टरना विचारले तर मॅनेजिंग डायरेक्टर म्हणतात की त्यांचा आमच्याकडे काही कंट्रोलच नाही. तर त्यांना स्वतंत्र कारभार दिला आहे का? त्यांनी स्पष्टीकरण करावे आणि त्यांना सांगावे. स्थायी समितीपुढे आणा ना प्रस्ताव. आता हा प्रस्ताव आला. तुमचा काही काडीमात्र संबंध नाही. एवढा प्रस्ताव आला झाले. नंतर दिवसभर काय करता. शिक्षक शाळेत येतात की नाही? विद्यार्थ्यांना शिकवतात की नाही. वेळेवर येतात की नाही हे सर्व बघायला पाहिजे ना? आता शिक्षण मंडळाच्या स्थापनेला विलंब लागत आहे. तर मी मागच्यावेळी आयुक्त साहेब आपल्याला सांगितले होते. शिक्षण मंडळ स्थापन करण्यास विलंब असेल तर विशेष आणि तदर्थ समिती आपण स्थापन करु अधिनियम ३० अन्वये तर ती तरी स्थापन करा. शिक्षण समितीचे त्या माध्यमातुन आपल्याला काम करता येईल. ती पण आपण स्थापन करित नाहीत. आणि शिक्षण सुधारण्याच्या बाबतीत शिक्षण अधिकाऱ्यांचे जे प्रस्ताव आहेत ते प्रस्ताव सभागृहापुढे आले पाहिजे. शिक्षण कोणत्या तऱ्हेने सुधारेल हा एक प्रस्ताव आमच्यापुढे आलेला नाही आणि दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ५ सप्टेंबर हा शिक्षकदिन आपण साजरा केला की नाही माहित नाही. आज आपली महाराष्ट्रातील एवढी महत्त्वाची महानगरपालिका आहे. संपूर्ण भारतात नावाजलेली आहे. सगळ्यांचा बघण्याचा दृष्टीकोन बदललेला आहे. अधिकारी वाढले, टेबल

वाढले, खुर्च्या वाढल्या पण शिक्षण विभागात सुधारणा काही झालेली दिसत नाही. आयुक्त साहेब आपण गंभीरतेने याच्यावर विचार केला पाहिजे. जे अधिकारी काम करीत नाहीत त्यांना खरोखरच घरी बसवा. ग्रॅज्युएट लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत. शिक्षण विभागात वचक निर्माण व्हावी आणि काहीतरी अपेक्षित बदल आपण कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सन्मा सदस्य आसिफ शेख म्हणाले की शिक्षण अधिकाऱ्यांना वेळच नाही. त्यांना मी कितीतरी वेळेला फोन केला आणि सहा महिने अगोदर मी पत्र दिलेले आहे. उर्दू शाळेमध्ये एकूण ६११ विद्यार्थी आहेत आणि तिथे फक्त १० शिक्षक आहेत. तिथे अजून चार शिक्षक हवे आहेत आणि एका वर्गामध्ये ९० ते ९२ विद्यार्थी बसतात. त्या शिक्षकाला त्या मुलांची व्यवस्थित नावे पण माहिती नाही. एवढी मुले वर्गात असल्यावर शिक्षकांना मुलांची नावे तरी कशी लक्षात राहतील याबाबत मी सहा महिने अगोदर पत्र दिलेले होते. तिथे शिपाईदेखील नाही. कर्मचारी देखील नाही. पाणी देखील येत नाही. वॉचमनदेखील नाही. जेव्हा शाळा रविवारी बंद असते तेव्हा बाहेरची मुले तेथे जाऊन खेळतात. क्रिकेट खेळताना काचादेखील फुटतात. कारण वॉचमेन नसल्यामुळे कोणी जबाबदार मनुष्यच नाही. मी सहा महिने अगोदर पत्र दिलेले आहे आणि शिक्षण अधिकाऱ्यांशीदेखील संपर्क साधलेला आहे. पण तिथे काही कारवाई होत नाही. मला आपल्याकडुन उत्तर आलेले आहे की, आम्ही एक महिन्याच्या आत तुम्हाला चार शिक्षक नेमून देऊ. मराठी शाळा आणि उर्दु शाळा या दोन्ही शाळेला जर नऊ शिक्षक मिळाले तर मुलांना व्यवस्थित शिक्षण मिळेल. खिचडी अगोदर कशाला देता मुलांना लिहिता तर आले पाहिजे. याचा अर्थ काय? शिक्षणाधिकाऱ्यांचे लक्ष अजिबात नाही व आपला त्यांच्यावर वचक नाही. आम्ही पत्र दिले त्याचे उत्तर आले पाहिजे. याच्यावर आपण खरोखर गांभीर्याने लक्ष दिले पाहीजे. आपण गांभीर्याने लक्ष दया. आणि याचा खुलासा आयुक्तांनी किंवा शिक्षणाधिकाऱ्यांनी करावा. की हे काम आपण कधी करु शकाल. महापौर मॅडम आपण शाळात आला होता ना तेथील अवस्था आपण पाहिली आहे. ह्यांना वारंवार बोलावतो पण त्यांना वेळ नाही. काय लक्षच नाही. अतिशय दुर्दशा आहे. तिथे पाणीसुद्धा नाही मुलांना प्यायला असे का चालले ते कळत नाही. तत्कालीन कलेक्टर साहेबांनी आमच्या एरियाला संवेदनशील एरिया असे घोषित केलेले आहे. त्यामुळे आमच्याकडे दुर्लक्ष आहे का? संवेदनशील एरिया आहे म्हणून तुम्ही घाबरता का? तिसरीच्या मुलांना नाव लिहिता येत नाही. पण आता संवेदनशील एरिया राहिलेला नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

महापौर मॅडम हा अतिशय गांभीर्याचा विषय आहे. ह्याबद्दल आम्ही नेहमी तक्रार देतो. पण अजूनपर्यंत त्या शाळेची दुरुस्ती झालेली नाही. अतिशय अडचणी आहेत. आम्ही सगळे काशीमिरा भागातील नगरसेवक त्यांना तोंड देतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयाला धरुन बोलतो. ठराव झालेला आहे. ५० पैसे. ह्या विषयाबद्दल मला एवढेच बोलायचे आहे की जेव्हा सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी ठराव मांडला. पैसे वाढविण्याच्या ठरावाला मी सुद्धा त्यांना परवा आपल्यासमोर सांगितले की निश्चितपणे आम्ही हा ठराव पास करु. यात शंका नाही. आणि तो पास झालेला आहे. तरीसुद्धा या कामात आपण ५० पैसे वाढवून देणार आहोत. म्हणजे यावर्षी मिळतील की पुढच्या वर्षी मिळतील ते माहिती नाही. आपण टेबल, खुर्च्या पास केल्या त्या त्यांना आतापर्यंत मिळाल्या नाहीत. त्यांना सामुग्री द्या. आपण शिक्षणाधिकाऱ्याला वेठीस धरु. १०० टक्के धरु. जेव्हा त्यांना सामुग्री पास करतो ती त्यांना मिळत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हा काय कार्यक्रम असेल तर दुसऱ्याकडुन खुर्च्या मागवाव्या लागतात. आणि आपण आता ५० पैसे वाढविले ते पण मिळतील की नाही ही शंका आहे आणि मुलांना आपल्यासमोर त्यांच्या आई वडिलांनी काय सांगितले की, ही खिचडी दिल्याने आमच्या मुलांना त्रास होतो. म्हणजे एखादी गोष्ट आपण जर ५० पैसे अशी जरी केली आणि तो मुलगा आजारी पडला तर त्याला जबाबदार कोण? शासन आदेश देते. शासनाचे आदेश पाळणे आपले कर्तव्य आहे. पण तरीसुद्धा त्या कर्तव्याची आपण स्वतःहून पाहणी केली आणि एखाद्या डॉक्टर मार्फत त्याची शहानिशा केली तर कळेल त्या मुलांना किती त्रास होतो. त्रास होणार नाही तर काय? आपण रोज एकच अन्न खाल्ल. रोज डाळच खाल्ली तर नक्कीच त्रास होईल. असे चालेल का? म्हणून त्याच्यासाठी आपण काहीतरी पर्याय शोधला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे मी अभिनव शिक्षण मंडळ चालवितो. त्याठिकाणी ही सातवीमधील मुले आठवीत येतात. प्रवेश घेण्यासाठी जेव्हा येतात. तेव्हा आम्ही त्यांना डोनेशन इतर लोकांकडुन जास्त घेतो आणि त्यांच्याकडुन कमी घेतो. का कमी घेतो? आम्ही अभिनव विद्यामंदिर येथे चालवितो. १४,००० विद्यार्थ्यांना आम्ही शिक्षण देतो. ७२ मुलांपासुन सुरु केलेली आमची संस्था आहे. आम्ही त्या संस्थेचे मेंबर आहोत. सांगायचे तात्पर्य

एवढेच की, ही सातवी मधील मुले जेव्हा आठवीमध्ये जातात. तेव्हा त्यांना ८५ टक्के मार्क दिले जातात. प्रत्येक विद्यार्थ्यात ८५ टक्के मार्क? या वर्षी मी चार मुलांना घरी बसवले आणि शिक्षकांना बोलावले आणि शिक्षकांना विचारले की तुमचे शिक्षण किती आहे? तर त्यांनी १२वी शिकलेली असल्याचे सांगितले. तुम्हाला कधीतरी ८५ टक्के मार्क मिळाले होते का? मी बाईंना विचारले. तर त्या गप्प बसल्या. प्रत्येकाला ८५ टक्के मार्क, एकालाही ८२ टक्के किंवा ८४ टक्के मार्क नाहीत. ही आश्चर्याची गोष्ट आहे. म्हणुन मला त्यावेळी असे वाटले की, मी काहीतरी मोठे पाप या शहरावर केलेले आहे. पहिल्या या २९ शाळा जिल्हापरिषदेकडे होत्या. माझ्या नावाचे पत्रकारांनी मोठा लेख दिला होता. पण मी का घेतल्या शाळा त्या पत्रकाराला माहिती नसेल कारण जिल्हापरिषदेच्या शाळा वाडा, मोरवाड्याला आहेत. तिथला जिल्हापरिषदेचा अधिकारी, शिक्षक त्या वर्गात पोहोचताना शिक्षक कामावर येतात की नाही? दुर्लक्ष होईल म्हणुन आम्ही या नगरपालिकेच्या शाळा हस्तांतर करुन घेतल्या. की जेणेकरुन आपले नगरसेवक कधीतरी जातील आणि लक्ष देतील. त्याच्यामुळे मुलांना शिक्षण जास्त मिळेल. जिल्हापरिषदेमध्ये शिकलेल्या मुलाचे नांव नेहमी खराब होते. कारण त्यांना खोटे मार्क दिलेले असतात आणि म्हणुन आम्ही त्या शाळा वर्ग करुन घेतल्या. म्हणुन त्याच्यावर लक्ष केंद्रित करणे हे आपले कर्तव्य आहे. म्हणुन मला असे वाटते की, हा ठराव घ्या आणि स्थानिक समितीच्या या ज्या २९ शाळा घेतलेल्या आहेत त्याची पाहणी करण्यासाठी एक समिती नेमा आणि याच्यावर काहीतरी पर्याय काढा. म्हणजे आपण हा खर्च करायला तयार आहोत. पण तो वाया जातो. कुठेतरी या खर्चाचा पाठपुरावा झाला पाहिजे. हाच एक माझ्या म्हणण्याचा उद्देश आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने मी बोलते. शासनाच्या आदेशाप्रमाणे ५० पैसे प्रती खिचडीमागे दिले जातात. आणि आपण मिरा भाईंदर महानगरपालिका ५० पैसे खिचडीचे आणखीन विद्यार्थ्यांना देणार आहोत. ही अतिशय चांगली बाब आहे कारण त्यामुळे पौष्टिक आहार मुलांना मिळणारच आहे. परंतु ते बनविताना योग्य त्या पद्धतीने बनविले पाहिजे. आणि मुलांना ते चांगल्या प्रमाणामध्ये मिळाले पाहिजे. त्यांचे वाटप व्यवस्थित झाले पाहिजे. हा एक त्याच्या मागील अतिशय महत्त्वाचा उद्देश आहे. मुलांना रोजच खिचडी. आपल्याला जर कोणी सांगितले की रोज भात खा तर आपण खाऊ शकतो का? हा पण आपण विचार केला पाहिजे. कारण जसे प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळ्या चवी असतात. त्या पद्धतीने माणसाला अन्न खावेसे वाटते. विद्यार्थ्यांना रोज खिचडी जर तुम्ही वाढली तर मुले रोज दुपारी खिचडी खाणार का? ही देखील तेवढीच महत्त्वाची बाब आहे. तेव्हा आपण अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना जे ५० पैसे देणार आहोत. त्याचा विनियोग योग्य पद्धतीने झाला पाहिजे. त्यासाठी मुलांना सकस आहार कुठल्या पद्धतीने देता येईल याकडे आपण शिक्षणाच्या माध्यमातुन लक्ष दिले पाहिजे. आणि विद्यार्थ्यांना यासाठी चांगल्यात चांगले अन्न कसे मिळेल आणि त्याची चाचणी देखील केली पाहिजे. प्रत्येक शाळेच्या बाबतीत आपण पाहिले तर असे दिसुन येते की, टोपामध्ये एवढा मोठा भात शिजवलेला आहे आणि त्याच्यावर कोथींबीर पेरलेली आहे. त्याच्यामध्ये काही टाकलेले नसते. मग ती मुले कशी खाणार. बहुतेक मुले ते जेवण टाकुन देतात. अशा पद्धतीमुळे मुलांचे कुपोषण होत आहे. यापुढे आपण पालिकेच्या माध्यमातुन काय करणार आहोत ही एक अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. किंवा अतिशय महत्त्वाचा निर्णय आज सभागृहामध्ये होणार आहे. तर हा निर्णय घेत असताना आपल्याला असे नाही केले तर मुख्याध्यापकांवर कारवाई होणार आहे. म्हणुन कुठल्याही परिस्थितीमध्ये आपल्याला हा निर्णय घेणे भाग आहे. आणि हा निर्णय घेत असताना मिरा भाईंदर पालिकेच्या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीचे अन्न आपण दिले पाहिजे. जसा आपण गणवेश वाटप केला. विद्यार्थ्यांना गणवेशाच्या नावाखाली तीन वर्ष आपण रखडुन ठेवले आणि शेवटी एखादा गणवेश देऊन त्यांचे समाधान आपण केलेले आहे आणि मुलांना गणवेश मिळाला तीही एक महत्त्वाची गोष्ट आहे. कारण जर मुले आजपर्यंत गणवेशापासुन वंचित होती त्यांना कमीत कमी गणवेश मिळाला. तर तशाप्रकारे शिक्षणाची पद्धतदेखील आपण सुधारली पाहिजे आणि त्यासाठी आपल्या सर्व नगरसेवकांचे कर्तव्य आहेच की आपल्या प्रभागातील शाळांमध्ये काय चालले आहे? आपल्या नगरसवकांचेही कर्तव्य आहे. आपणदेखील पाहायला पाहिजे. शिक्षणाधिकाऱ्यावर दोष ठेवुन चालणार नाही. आपण नगरसेवक आहोत आपण आपल्या शाळांमध्ये काय चालले आहे? काय त्रुट्या आहेत या बाबी आयुक्तांच्यासमोर, महापौरांच्या समोर आपण आणुन दिल्या पाहिजेत. प्रत्येक सभागृहामध्ये आपण ही चर्चा करतो. त्याच्यावर काहीतरी निर्णय घेतला पाहिजे. ठोस निर्णय घ्या. शाळेवर कारवाई करा. शिक्षणाधिकाऱ्यावर कारवाई करा.

**आसिफ पटेल :-**

शिक्षक वाढवुन दया म्हणुन वेळोवेळी पत्र दिलेले आहे. फक्त उत्तरच आलेले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

या उत्तरावर काहीतरी कारवाई आयुक्तांमार्फत, किंवा महापौरांमार्फत करुन असे मला तरी वाटते. कारण शिक्षणाच्या ही बाबी असतील तर शिक्षण अधिकाऱ्याला काय अडचणी आहेत. त्यांच्या अडचणी काय आहे त्या जाणुन घ्याव्यात. स्टाफ कमी असेल, शिक्षक कमी असतील तर त्या ठिकाणी शिक्षक देणे फार गरजेचे आहे. तर अशाप्रकारे शिक्षण अधिकाऱ्यांनी त्याचा खुलासा आणि योग्य तो निर्णय दयावा. स्थायी समितीच्या सभेमध्येदेखील शिक्षण अधिकारी अनुपस्थित होते. मग ते का अनुपस्थित राहतात. शिक्षणाचा लेखाजोगा काहीच येत नाही. किंवा महासभेपुढे विषय का येत नाही? हे त्यांचे कर्तव्य आहे. शिक्षण अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. तर त्यांच्या काय अडचणी असतील तर त्या सभागृहापुढे मांडाव्यात आणि अशाप्रकारे नगरसेवकांच्या तक्रारी येता कामा नयेत. कारण पालक आणि नागरीक तुमच्याकडे अपेक्षेने बघतात. कारण आजचे भवितव्य हे शिक्षक घडवित असतो. आणि शिक्षण डिपार्टमेंटवर जर व्यवस्थित लक्ष नसेल तर त्याला दोषी कोण होते. अशा प्रकारचे वातावरण या मिरा-भाईंदर शहरामध्ये असता कामा नये. असे माझे प्रामाणिकपणे मत आहे. आणि त्याची कुठे तरी सुधारणा झाली पाहिजे. यासाठी आपण सर्वांनी लक्ष दिले पाहिजे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, खिचडी के बारे ये जो कंटाला आ गया है। तो बारा महिने जो खिचडी खायेगा उसकी हालत क्या होगी। अभी खिचडी बंद रखते है। स्कुल में चार चार क्लास में एक टीचर पढाती है। और स्कुल के अंदर पुरा सब्जी मार्केट का जो गोडाऊन रहता है। वो आपका साफ नही होता है। और पुरा भंगार रहता है। अंदर टेबल नही, खुर्ची नही। मैं परसो भी जाके आया। तो वहा जायेंगे तो पुरा आजुबाजु राऊंड में सब्जीवाले बैठते है। शाम को बंद करके भाजी स्कुल के अंदर रखते है। स्कुल के बाजु में वाईन शॉफ, होटल्स ये सब कुछ है। और व्हिडीयो गेम, जुगार का अड्डा ये सब है। तो वो सब हटाना जरुरी है। बच्चा जो खिचडी खायेगा उसके पहले जो अच्छा संस्कार दिया जायेगा, तो वो सौ आदमी को खुद खिचडी खिलायेगा। लेकीन ऐसा नही होना चाहिए की, खिचडी खिलाने की कोई बुरी बात नही, अच्छी बात है। लेकीन बच्चों को पहले संस्कार देना जरुरी है। और अच्छी टिचर देना जरुरी है। तो आयुक्त साहब मै मॅडम बिनती करता हुँ, की पहले टिचर का बंदोबस्त किजीए। चार क्लास में खाली एक टिचर है। तो ऐसा नही होना चाहिए। यह मै आपको विनंती करता हुँ।

**प्रभात पाटील :-**

एकंदर ही चर्चाचे स्वरुप पाहता संपूर्ण शिक्षण प्रक्रियेवरच सदस्यांनी भडीमार केलेला आहे. आणि ह्या शिक्षण प्रक्रियेतील मुख्य केंद्रबिंदु आहे तो म्हणजे विद्यार्थी. सगळे भाग जरी बाजुला ठेवले तरी विद्यार्थी हा स्वतः डेव्हलप कसा होईल? त्याचा विकास कसा होईल? यासाठी तरी साहेब निदान तुम्हाला समिती आणि बाकीचे तज्ञ लोक यांचे मार्गदर्शन घेतल्याशिवाय आणि या नवीन प्रक्रियेला सुरुवात केल्याशिवाय याच्यातुन निश्चितपणे मार्ग निघणार नाही. राहिली गोष्ट येथे म्हात्रे साहेब खुलासा करतील तत्पुर्वी मला थोडेसे बोलायचे आहे की म्हात्रे साहेब नेहमी त्याचे ठरलेले डॉयलॉग आहेत ते बोलतात की आंधळ दळतंय आणि कुत्रं पिठ खातंय नाही खरंच सांगतेय मी की कुत्रं पीठ कसं खातंय ते या येत्या मे महिन्यामध्ये सांगितले तर मी इतक्या दिवसामध्ये तोंड उघडले नव्हते. कारण स्वतःची त्या प्रकरणामध्ये इनव्हल होते तरी मला स्वतःला सांगायला ही गोष्ट शरमेची वाटते. परंतु हा विषय निघाला म्हणुन सांगतो की मे महिन्यामध्ये स्मार्ट पी.टी. अंतर्गत इंग्रजी विषयाचे प्रशिक्षण झाले. मिरा भाईंदरचे सर्व शिक्षक.जे.जे वर्तक विद्यालय वसई येथे त्यांना ट्रेनिंग होते. जेव्हा ट्रेंनिगची ऑर्डर आली. आज कर्मधर्म सहयोगाने पर्स बदलली म्हणुन माझी नाहीतर आज तुम्हाला दाखविली असती त्या ट्रेंनिंगच्या ऑर्डरवर माझ्या नावाच्या जागी स्वीडन लोपीसचे नांव होते. जी शिक्षिका आमच्याकडुन सोडुन दोन वर्षापूर्वीच लोकमान्यमध्ये जॉईन झाली होती. माझे नांव नव्हते मग तिचे नांव खोडुन माझे नांव तिथे लिहिले गेले. हा एक भाग. दुसरा भाग म्हणजे आम्हांला ट्रेनिंगच्या ठिकाणी सकाळी ६.०० वाजता जॉईन व्हायला सांगितले होते आम्ही सर्व मिरा भाईंदरचे शिक्षक व खाजगी शाळेचे शिक्षक सुद्धा सकाळी ६.०० वाजता तेथे हजर झाले तर कुत्रसुद्धा नव्हते. म्हणुन आम्हाला प्रश्न पडला की सेंटर वगैरे बदलले कि काय? म्हणुन आम्ही अजुन वर्तक कॉलेज शोधत गेलो तेथेही काही नव्हते. पुन्हा येऊन त्याच शाळेत बसलो. ८.३० नंतर एक-एक शिक्षक यायला लागले. तेव्हा कळले की ट्रेंनिंग ९.०० वाजता सुरु होणार आहे. आम्हाला ऑर्डर ही ६.०० ची होती. आणि जे आम्हाला पत्र पाठविले होते ते पत्र तुम्हाला सांगतो की कुठचे होते आपण कुठले पत्र पाठवितो. जेव्हा क्षमताधिष्ठीत अभ्यासक्रम सहा वर्षापुर्वी राबविला गेला. शासनाद्वारे क्षमताधिष्ठीत आठवत असेल कोणी शिक्षक असतील त्यांचा माहित पडेल पहिल्यांदा राबविला गेला. तेव्हा शिक्षकांना प्रशिक्षण दिले गेले. मिरा भाईंदरच्या शिक्षकांना अभिनव मध्ये केंद्र होते. त्यावेळेची ऑर्डर होती त्या ऑर्डरवर फक्त नांव टाकायची ती ऑर्डर जरुर ६.०० वाजता होती व

बाहेरुन येणाऱ्या शिक्षकांना त्यांनी वस्तीला बोलाविले होते की तुम्ही ६.०० वाजता हजर होणार नाहीत. तर तुम्ही रात्री मुक्कामाला या. जेवणापासुन ते नाश्तापर्यंत सर्व सोय केलेली होती तीच ऑर्डर सहा वर्षापुर्वीचा तो फॉर्म आम्ही आजही वापरतो त्या फार्मवर लिहिल्याप्रमाणे शिक्षकांची नाश्ताची, जेवणाची सोय असल्यामुळे आम्ही बिनडब्याचे मे महिन्यात तेथे जे.जे.वर्तकला गेलो साहेब पोटात भुक लागली संपुर्ण वसई वेस्टमध्ये कोणत्याही हॉटेलात अन्नाचा कणही उरलेला नव्हता इतके शिक्षक त्याच्यावर तुटुन पडलेले होते. तरी या ऑर्डर देण्याचे काम कोणी केले. हे आंधळ दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय नाहीतर काय प्रकार आहे. याची स्वतः चौकशी करा. स्वतः मी त्या ट्रेनिंगला होतो. आणि मी याबाबत कोणालाही सांगितले नाही.

**मा. आयुक्त :-**

आपल्या शिक्षणाधिकाऱ्यांनी केले असेल तर त्याचे नांव दया.

**प्रभात पाटील :-**

ते होते. ते करतील.

**संगीता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते शाळा क्र.२२ मुर्धाशाळा आणि तिकडे बाईनी हे सगळे साहित्य दिलेले आहे. सगळ्या शाळांना हे पोहोचलेलेदेखील आहे. मुख्याध्यापिका आहेत त्यांनी साहेबांकडे गेले साहेब म्हणाले की सगळ्या शाळांना सामान टेबल, खुर्च्या दिलेले आहे. आणि त्यांचे उरले तर तुम्हाला देऊ असे त्यांना सांगितलेले आहे. ऑर्डर देताना शाळेचा विचार केला नव्हता का? हे तुम्ही जरा लक्षात घ्या आणि एक म्हणजे मुर्धा शाळेत नेहमी चोऱ्या होतात. म्हणजे सगळे साहित्य चोरीस गेलेले आहे आणि सगळ्या काचा वगैरे फोडतात, कुलुप फोडतात आणि तिकडे जरा संरक्षणाचा बंदोबस्त व्हावा.

**सुरेखा गायकवाड :-**

महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. जुलैच्या २८-२९ तारखेला आपली जी गोडदेव नाक्याची मराठी शाळा आहे. तिथे मी ॲडमिशनसाठी गेले होते. सकाळी आठची वेळ होती. आठ वाजता मी बरोबर त्या पालकांना आणि विद्यार्थ्यांना घेऊन पोहोचले तर तिथे बरेचसे शिक्षक गैरहजर होते. आणि एका वर्गात एकच शिक्षिका होती आणि पहिली, दुसरी आणि तिसरी असे एका वर्गात तीन वर्ग बसविलेले होते. तर त्या मॅडमना वाटले मॅडम आता तिसरीच्या वर्गाला ॲडमिशन पाहिजे. तेव्हा मुख्याध्यापिका कधी येतील. पण मुख्याध्यापिका काही अजुन आलेल्या नाहीत. नऊ-दहा वाजेपर्यंत येतील. म्हणे त्या लांबुन येतात त्यामुळे त्यांना उशीर होतो. आणि ज्या तिसरीच्या वर्गाच्या शिक्षिका आल्या त्यांना मी म्हटले की तिसरीच्या वर्गाला ॲडमिशन पाहिजे. तर म्हणाल्या मिळेल. मिळेल म्हणाल्या पण नंतर मग मी त्यांना म्हटले मॅडम आपल्या पटावर किती मुले आहेत. तर म्हणाल्या वीस एक आहेत. मग त्यातील दररोज किती हजर असतात. तर म्हणे नऊ असतात. नऊ असतात म्हटल्यावर विचारले की मॅडम तुम्ही त्यांना काय शिकवता. जे काही अंदाजपत्रक आपण जूनमध्ये तयार करतो जी टाचणवही तयार करतो ती टाचणवही तुमच्याकडे आहे का? ती टाचणवही मला दाखवा. तेव्हा त्या मॅडम म्हणाल्या की, टाचणवही ती अजुनपर्यंत केलेली नाही आणि ती करायला थोडा वेळ लागेल. तर ही अशी उडवाउडवीची उत्तरे देता कामा नये. शिक्षण अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे व्यवस्थित लक्ष दयायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

या सभागृहात जवळ जवळ १५ सदस्य बोलले असतील खिचडी एवढी शिजवलेली आहे, की पहिले ते सातवीपर्यंत जाऊ दे पण दात नसलेले म्हातारेदेखील खातील एवढी खिचडी शिजवलेली आहे. मग ती शिजवताना ज्या बालवाड्या मिरा भाईंदरमध्ये आहेत त्याचा शिक्षणाधिकाऱ्यांनी विचार केला होता का? की आपल्या बालवाडीमध्ये किती मुले आहेत? त्यांच्या आहाराचा कोणी विचार केला आहे का? याचे स्पष्टीकरण करावे.

**आसिफ पटेल :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, परवा आपण गणवेश वाटप करण्यासाठी काशी शाळेमध्ये आला होतात. तिथे आपण दोन-चार मुलांना गणवेश देऊन दुसरीकडे गेले. मी काल स्वतः तिथे जाऊन गणवेश वाटप केले. परंतु, तिथे अशी अडचण आहे की आपण जे ड्रेस बनविले. ते एकाच साईजचे आहेत. ते त्यांना येतदेखील नाहीत. आपण फक्त गणवेश वाटप केलेत. पण आता त्याचे काय करायच? आपण त्याचे मोजमाप करुन शिवायला पाहिजे होते. ते सगळे गणवेश एकाच साईजचे शिवलेले आहेत. मग मोजमाप केले तो जबाबदार राहिल ना. एका मुलीला तो गणवेश झाला नाही म्हणुन मी विचारले की

तिला दुसरा ड्रेस देऊन बघा. त्या मुलीला व्यवस्थित येतात का? एकही ड्रेस तिला आला नाही. याचा अर्थ मोजमाप झालेले नाही. ते गणवेश वयोगटाप्रमाणे दिलेलेच नाहीत.

**मा. आयुक्त :-**

जे गणवेश बनविले जातात त्याच्या पद्धतीबद्दल सभागृहामध्ये खुलासा करण्याची वेळ येईल असे मला वाटले नव्हते. परंतु, आपण असे हजारो विद्यार्थ्यांमधुन एखादे उदाहरण आपण सांगितले आणि असे का होते? हा प्रश्न विचारला साधारण असा अंदाज होता की, हे जे जवळपास ७५०० विद्यार्थी आहेत. त्याच्यामध्ये एक हजार विद्यार्थी असे असतील की जे ऑड साईजचे असतील. साधारण आपल्याच माहिती असते की पहिलीत जाणारा विद्यार्थीची साईज काय असेल? दुसरीमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची वयाप्रमाणे काय साईज असेल? त्याला अपवाद हजार-एक विद्यार्थी असू शकतात. १० टक्के विद्यार्थी असू शकतात. इव्हन गणवेश पुरवठा ज्यावेळी केला गेला त्यावेळी मी पुरवठादाराला हा प्रश्न विचारलेला होता की प्रत्येक विद्यार्थ्याचे तुम्ही मेजरमेंट घेणार का? तेव्हा त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात सगळीकडे गणवेश पुरविले जातात. सगळ्या महापालिकेत, जिल्हापरिषदेत पुरविले जातात. आदिवासी विभागामध्ये पुरविले जातात. अशी पद्धत कुठेही नाही की प्रत्येक विद्यार्थ्याचे मोजमाप घेऊन त्याला गणवेश दयायचे. मात्र असे जे ऑड साईजचे विद्यार्थी असतील त्यांच्यासाठी आपण साधरणपणे पाच ते दहा टक्के कोटा राखुन ठेवलेला आहे. याप्रमाणे हजार विद्यार्थ्यांची गणवेशाची जी व्यवस्था आहे. ती शिक्षकांनी हा गणवेश विद्यार्थ्यांना दिल्यानंतर जर असा एखादा विद्यार्थी असेल त्याला तो बसतच नाही. घट्ट होतो किंवा सैल होतो. सैल झाला तर दुसऱ्या विद्यार्थ्याला देता येतो. घट्ट झाला तर त्याला बदलुन दुसरा देता येतो. साधारण वयानुसार आणि त्याच्या इयत्तेनुसार हे वर्गीकरण केलेले असते. तर त्यातील जे अपवाद म्हणुन विद्यार्थी आहेत. त्यांच्यासाठी वेगळी व्यवस्था केलेली असते. आता वाटत झाल्यानंतर आपल्या हे लक्षात येईल की, असे किती विद्यार्थी आहेत? की जे या रेडीमेड बनविलेल्या गणवेशामध्ये ॲडजेस्ट होऊ शकत नाहीत. त्यांच्यासाठी आपण मेजरमेंटची व्यवस्था आपण केलेली आहे. आणि ती नक्की केलेली आहे. त्या विद्यार्थ्यांचे जे गणवेश दिले जातील ते मेजरमेंट घेतल्यानंतरच तयार केले जातील. मात्र साधारण ९० टक्के विद्यार्थी हे ॲव्हरेज साईजचे असतात. आणि त्यांना ते गणवेश बसतात. हा अनुभव आहे. त्यामुळे एखादा अपवाद असण्याची शक्यता आहे.

**आसिफ पटेल :-**

गणवेश चेन्ज करण्याची व्यवस्था आहे का?

**मा. आयुक्त :-**

चेन्ज करण्याची व्यवस्था आहे.

**अनंत पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आता जे आपण टेबल आणि खुर्च्यांचे वितरण केले. ते वितरण करायला कोणत्या ठेकेदाराला दिले होते? त्या ठेकेदाराने असे केलेले आहे की, राईला दोन खुर्च्यांची मागणी होती. तिथे सहा खुर्च्या टाकलेल्या आहेत, दोन टेबलांऐवजी पाच टेबल टाकलेली आहेत. म्हणजे वितरणामध्ये जी तफावत झालेली आहे त्याच्यामुळे गोंधळ झालेला आहे.

**शुभांगी नाईक :-**

गोडदेव शाळेला एकही टेबल, खुर्च्या काहीही अद्याप मिळालेले नाही. पाण्याची सोयदेखील नाही. त्या ठिकाणी तांबे, ग्लासही नाही. खिचडी दिली म्हणजे सर्व झाले असे नाही.

**निर्मला सावळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते, शैक्षणिक दर्जा सुधारावा म्हणुन महाराष्ट्र सरकारने पाठ्यपुस्तक तसेच आपण आता गणवेशाचे वाटप केले. त्यामध्ये भरपूर त्रुटी आहेत. काही शाळेमध्ये टेबल, खुर्च्या याची सोय नाही. आम्ही त्याबाबतीत शिक्षण अधिकाऱ्यांना विचारपुस केली. त्यांनी सांगितले तुमच्या शाळेमध्ये पाठवू. या सगळ्या सोयी पुराव्यात म्हणुन नगरसेवक व अधिकारी झटतात. परंतु, प्रत्यक्षात आपले जे उद्दिष्ट आहे ते साध्य होत नाही. शिक्षणाचा दर्जा बाजुला रहातो शाळेमध्ये फळे लावली जातात. आताचा आम्हाला माहिती मिळाली की, शिक्षकांना शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी काही रक्कम मिळाली होती. साहित्य मागवले परंतु शाळेतील मुले बोलकी कधी होणार? मुलांना लिहिता-वाचताच येत नाही. तर शिक्षणाचा दर्जा सुधारणे ह्यामध्ये फार महत्त्वाचे आहे. त्यामुळे मी असे सुचित करते की आम्ही बऱ्याच वेळा शिक्षण अधिकाऱ्यांना सांगितले की आमच्या शाळेला भेट दया आणि तेथे प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन शिक्षणाची पद्धत कशी आहे? मुले सातवीला गेले तरी त्यांना लिहिता-वाचता येत नाही. स्वतःचे नांव देखील लिहिता वाचता येत नाही. त्यांना कखग पण शिकवावे लागते. तर प्रत्यक्षात संन्याशीव साहेबांनी शाळेला भेट देऊन त्याचा शैक्षणिक दर्जा पहावा आणि त्याच्यावर योग्य ती कारवाई करावी. एवढीच माझी सुचना आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही भारतीय जनता पक्षातर्फे 'चलो गाव की ओर' असा एक कार्यक्रम झाला होता. आणि कार्यक्रमात जेव्हा आम्हाला सफाळा गाव दिले होते. आम्ही सफाळा गावामध्ये गेलो. त्या शाळेमध्ये गेलो. त्या शाळेमध्ये गेल्यानंतर तिकडच्या पोरांची शिस्त, शिक्षिकांची शिस्त बघितल्यानंतर या शहराच्या शाळेला बघुन लाज वाटते. कारण तिकडे पैसा आहे. त्या पैशाचा दुरुपयोग अधिकारी व शिक्षक करतात. साहेब भाईंदरचा आत खिचडी हा विषय चालू आहे. एकही शाळेमध्ये पाणी पिण्याची महापालिकेतर्फे चांगली सोय नाही. मी एक प्रस्ताव आपल्याकडे आणला आणि एका संस्थेने त्या भाईंदर हिन्दी शाळेमध्ये पाणपोई देण्याचे माझ्याकडे निवेदन केले मी आपल्याकडे आलो आपण सांगितले ठिक आहे. परवानगी देतो. परवानगी घेता घेता एक महिना झाला. परवानगी तयार झाली. परवानगी तुमच्याकडे आणण्यापूर्वी तुम्ही म्हणालात मला दाखवु मला माहिती आहे की बाकीच्या कामाला अटी-शर्ती कोणाला चालत के नाही ते सर्व बरोबर आहे. पण जेव्हा कोणतीही सामाजिक संस्था कुठल्याही कामाला गेली तर त्याला अटी-शर्ती जास्त असतात. त्या शाळेमध्ये पाणपोई बनविण्यासाठी परवानगी घेतली असताना त्यामध्ये एक अटी-शर्ती अशी टाकली की अकरा महिन्याच्या मुदतीसाठी ही पाणपोई त्या संस्थेला काय वेड लागले आहे चार लाख रुपये अकरा महिन्यासाठी खर्च करायला म्हणुन हा शहरी भाग मागे राहिलेला आहे ते यामुळेच. इकडे पैशाची किंमत नाही. त्या संस्थेने ताबडतोब माघार घेतली. मला साहेबांनी सांगितले साहेबांकडे घेऊन जा सही घ्यायला. मी म्हटले नाही. कारण ही अटी-शर्तीच त्या संस्थेला मान्य नाही. आम्ही पिण्याचे पाणी त्या शाळेला देतो. तुमची तिकडे पाण्याची सोय नाही. आणि तुम्ही अटी दाखवता अकरा महिन्याची आणि आर.सी.सी. बांधकाम तो करणार आहे. स्वतःचे चार लाख रुपये खर्च करणार आहे. म्हणुन या सभागृहामध्ये किती चर्चा केली यापूर्वी आपले उपमहापौर मुजफ्फर हुसैन यांनी फार भाषणे केली. आता मागच्या सभेमध्ये पूर्वीचे नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांनी एक म्हण आहे. जेव्हा माणूस प्रेतात जातो ना आणि प्रेत जळते तेव्हा त्याच्या लक्षात येते की अपने को इधरही आने का है। काहे को ऐसा करते है। तिथुन परत आले की तेच धंदे सुरु होतात. या सभागृहामध्ये धन्यवाद देणार. शाळेचा विषय आल्यानंतर शाळेची आपुलकी लोकांना वाटते.

**रतन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. मिरा भाईंदर शाळा क्र.६ ही आमची एक नवीन इमारत आमची शाळा शिफ्टिंग ज्या शाळेमध्ये ट्रान्सफर होणार आहे. ती शाळा तलावरोडवर तयार झालेली आहे. तर मा. महापौरांना आणि या आयुक्तांना विनंती करतो की ही शाळा नवीन जागेत लवकरात लवकर शिफ्टिंग करावी असे मी निवेदन करतो.

**संन्याशीवः-**

मा. महापौर मॅडम व मा. आयुक्त साहेब आणि सन्मा. सर्व सदस्य या ठिकाणी बराचसा काही शिक्षणाच्या बाबतीत म्हणजे माझ्यावर विरोध आहे की शिक्षण विभागावर विरोध आहे. ते मला समजत नाही. दुसरे म्हणजे, मी येथे नवीन आलेलो आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**महेंद्रसिंग चौहान :-**

आयुक्त महोदय, माननीय शिक्षण अधिकारी महोदय मैं शॉर्ट मे ये कहूँगा पहलेवाले जो अधिकारी है बिलकुल उनके पदचिन्हो पे चल रहे है। मै आपके पास फ्रुफ बता दुंगा। इसलिए आज सभागृह की जो मन की बात है। उसको सुधारिए। शिक्षा ऐसी की जाए तो प्रारंभिक ऐसे जीवन बनाता है। राष्ट्र बनता है, देश बनता है। अन्यथा मत लो। लेकीन आप चल रहे है तो उन्ही के पदचिन्हो पर चल रहे है। आपको प्रुफ चाहिए तो मैं ला के बताऊँगा। और इन्होने कहा कहा किस तरहसे भेजते है। अभी दो महिने आये हो, जो इनके पास प्रायव्हेट स्कूल आते है वो कहा कहा बैठके सलटाते है। इस तरहसे कृपया शिक्षण की गलती को सुधारने का आपको अधिकार है।

**संन्याशीव :-**

ही माझी एकट्याचीच जबाबदारी नसून आपल्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये आल्यानंतर मी पाहिले की या ठिकाणी सर्वात मोठी समस्या आहे ती शिक्षण मंडळ नाही. जर शिक्षण मंडळ राहिले असते. तर शिक्षकांवर एक वचक असतो. आता या परिसरामध्ये एकूण वीस अनुदानित शाळा एकोणतीस महानगरपालिकेच्या शाळा आणि जवळ जवळ सत्त्याण्णव विनाअनुदानित कायम स्वरूपी शाळा आहेत. नगरपालिकेचे म्हणजेच शिक्षण मंडळाचे प्रशासन करताना मला खाजगी शाळासुद्धा व्हिजिट करायला लागतात. त्यानुसार, आता पाटील मॅडमनी सांगितले की, प्रशिक्षणामध्ये जे काही झाले त्यावेळी मी जिल्हापरिषदेला होतो.

**प्रभात पाटील :-**

मग तुम्ही तिकडे का व्हिजिट करायला आला होता?

**संन्याशीव :-**

माझ्याकडे तो संपर्क तालुका होता.

**प्रभात पाटील :-**

साहेब तुम्ही आम्हाला चुकीची ऑर्डर दिली की सहा वाजता बोलावले. तुम्ही असे सांगता माझ्याकडे चार्ज नव्हता. ते बिलकुल खोटे आहे.

**संन्याशीव :-**

चार्ज होता पण मी जिल्हापरिषदेला होतो असे मी म्हणतो आहे. माझ्याकडे चार्ज होता. आणि मी चार्ज घेण्याच्या अगोदर सर्व सुर्यवंशी साहेबांच्या काळातील आदेश निघालेले होते. म्हणजे माझ्या सहीचे ते आदेश नव्हते. आणि मी कोणालाही असे आदेश दिलेले नव्हते. आणि माझ्याकडुन तरी चुकी होणे शक्य नव्हते. दुसरे म्हणजे आत सन्मा. सदस्य आता बालवाडीच्या बाबतीमध्ये बोलले तर बालवाडी विभाग हा शिक्षण मंडळात नाही. त्यामुळे बालवाडीची माहिती आमच्याकडे नाही. त्यानंतर आमच्या सन्मा. सदस्यांनी सांगितले की, आपल्या स्टँडिंग कमिटीमध्ये कुठलाही नवीन शाळेचा प्रस्ताव येत नाही किंवा मान्यतेसाठी येत नाही. तर नवीन शाळेला मान्यता देण्याचा अधिकार हा शिक्षण मंडळाला आहे. आणि या ठिकाणी आपणा सर्वांना माहित आहे की, शिक्षण मंडळ नाही. परंतु २ जुलै २००३ च्या शासन आदेशानुसार ज्या ठिकाणी शिक्षण मंडळ नसेल. महापालिका असेल नगरपालिका असेल सर्व कारभार चीफ ऑफिसर पाहतील. आणि ज्या ठिकाणी महापालिका आहेत. त्या ठिकाणी मा. आयुक्त सर्व अधिकार त्यांना राहिल अशा पद्धतीने तो जी.आर. आला आणि त्यानुसार मी माझ्याकडे तेवढे काही नवीन शाळेचे प्रस्ताव आहेत. मी ते मा. आयुक्त साहेबांसमोर सादर करीत आहे. पुर्ण मान्यता देण्याचा अधिकार मला नाही. तो संपूर्ण अधिकार शिक्षण मंडळाचा आहे. त्याचप्रमाणे मी सुद्धा पाहतो आहे की, मी एक प्रशासनीक व्यक्ती आहे. माझ्यावर एक शिक्षण मंडळाची जबाबदारी आहे. शासनाने मला या ठिकाणी पाठवलेले आहे. एक माझ्यावर जबाबदारी आहे आणि त्या दृष्टीकोनातुन मी दरमहा मुख्याध्यापकांची मिटिंग घेत असतो. शिवाय आपल्या २९ शाळेपैकी जवळ जवळ २२ शाळांना मी भेटी दिलेल्या आहेत. दरवेळी मुख्याध्यापकांची सभा घेऊन विद्यार्थी पटसंख्या वाढवण्यासाठी विविध उपक्रम आहेत. आपण काय उपक्रम आयोजित केले पाहिजेत. तसेच ज्या वेळेला मी शाळेला व्हिजिटला जातो तेव्हा मी त्या शाळेचे टाचण वही पहात असतो. आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती कशा तऱ्हेने वाढवली जाईल याबाबतीत माझे प्रयत्न केले जातील आणि आपल्याला जे माझ्याकडुन अपेक्षित आहे ते मी नक्कीच पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन. कारण आज याठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांनी काही सुचना केलेल्या आहेत त्या सुचनेचे मी नक्कीच पालन करेन. आणि त्याप्रमाणे कार्यवाही केले जाईल. आणि शक्यतो शिक्षणाच्या बाबतीत आता जे सन्मा. सदस्य बोलले की या ठिकाणचा सातवीचा विद्यार्थी इंग्रजी शाळेत गेल्यानंतर त्याला काही येत नाही. तर ते मी सर्व काही शिक्षकांकडुन करुन घेणार आहे. कारण येथे मी एक मनुष्य आहे. मी एकटा आहे व शाळा आहेत एकुण १४६ नगरपालिकेच्या शाळेच्या बाबतीत मी अगोदर सांगितले की नगरपालिकेच्या शाळा पाहताना मला खाजगी शाळा पण पाहाव्या लागतात. आणि अनुदानित व विनाअनुदानित शाळा देखील पहाव्या लागतात. आणि प्रशासनाकरिता कधी कधी वाईटपणा पण घ्यावा लागतो. कधी कधी इतका वाईटपणा घ्यावा लागतो की आमच्याविरुद्ध तक्रारी देखील होतात. आता सन्मा. सदस्य बोलले की मागच्या शिक्षणाधिकाऱ्याचे काय झाले? परंतु, सगळ्यांचीच कार्यपद्धती सारखी नसते. त्यांची कार्यपद्धती त्यांच्याप्रमाणे होती. माझी कार्यपद्धती माझ्याप्रमाणे आहे. मा. आयुक्त साहेबांनी सांगावे की माझ्या कार्यपद्धती चुकीची असेल तर मी स्वतः बदली करुन घेतो. कारण मी इथे बदली मागितली नव्हती. आणि तशी माझी तयारी आहे. पण या ठिकाणी मी आलेलो आहे. माझ्याकडुन जर होत नसेल आणि मी तुम्हाला आश्वासन देतो की, या मिरा भाईंदर मध्ये मी हा फरक केल्याशिवाय राहणार नाही. कारण प्रत्येक शाळा फार जास्त शाळा नाहीत. २९ शाळा फक्त या २९ शाळांना भेटी देणे मला काही मोठे काम नाही. आणि दुसरे म्हणजे की मी उल्हासनगरलादेखील काम केलेले आहे. मला उल्हासनगरला त्या ठिकाणी एक गाडी होती. त्या गाडीवर फिरुन मी शाळा व्हिजीटला गेलो होतो. त्या ठिकाणी देखील गाडी नसती तर मी माझी काहीतरी पर्यायी व्यवस्था करुन मी शाळा बघितल्याच पाहिजे. खाजगी शाळेतदेखील मला बघितलेच पाहिजे. कारण जरी तिथे मॅनेजमेंट असेल मॅनेजमेंट फक्त अपॉन्टिंग ॲथोरिटी आहे. खाजगी शाळेमध्ये फक्त तुम्ही अपॉइन्टमेंट करायची. अप्रुव्हल देणे हे आमचे काम आहे. त्या शिक्षकांकडुन काम करुन घेणे हे आमचे काम आहे. खाजगी शाळा जरी काम करित नसतील तरी आमच्याकडे तक्रारी होत असतात.नगरपालिकेत नाही तर खाजगी शाळेतसुद्धा शिक्षक काम करित नसताना आमच्याकडे तक्रारी

येतात. आणि त्याचे निराकरण आम्हालाच करावे लागते. तर या ठिकाणी मी नवीनच आलेलो आहे. मला येऊन फक्त तीन ते चार महिने झालेले आहेत. आणि आपलीच इच्छा आहे. आपल्याला असे वाटते की शिक्षण अधिकाऱ्यानी काहीतरी केले पाहिजे. तर मी जरुर आपल्याला करुन दाखवेन आणि पुढच्या वेळी आपल्याला अशी कोणतीही त्रुटी दिसून येणार नाही. याची आपल्याला ग्वाही देतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम तासभर चर्चा झाली. आपण मला बोलायला दिल्याबद्दल धन्यवाद. मघाशीदेखील एका विषयावर बोलत होतो. ठरावदेखील मांडला. पण आमच्या लिओ सरांची सर कुठल्या मास्तरला येणार नाही. माझ्या अनुपस्थितीमध्ये त्यांनी मागे घेतला. आता मास्तरबद्दल भरपूर चालले आहे आणि आपण सर आहात तर आपली सर मास्तरलादेखील येणार नाही. आपला मी आदर करतो. हा विंषय गंमतीचा आहे. मघापासुन जे चालले आहे ते कुठल्या नाटकातील चालले आहे ते मला कळत नाही आणि शिक्षण अधिकाऱ्याचे जे वस्त्रहरण चालू आहे खरं म्हणजे वस्त्रहरण करायला पाहिजे त्याचे आपण करित नाही. ह्या विषयाचा गोषवारा आयुक्त साहेबांनी दिला. अगदी काळजीपूर्वक आपण पहा. या विषयामध्ये पहिल्याच वाक्यात त्यांनी असे म्हटले आहे की सर्वोच्च न्यायालयाची विशेष याचिका क्रमांक १९६ (२००१) नुसार शालेय शिक्षण विभागातील शासन निर्णय २००३-३४/३/३मार्च २००३ यांच्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न सक्तीचे केलेले आहे. मला वाटते विषय काय आहे आणि आम्ही चर्चा काय करतो आहे. विषय काय आहे आणि आम्ही मंजुरी कशाला देतो आहे. याच्यामध्ये बराच विपर्यास आहे. जर मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना जे प्रवेशापासुन वंचित आहेत. त्यांचे आंदोलन वगैरे करुन झाली त्यांना जर बाहेर प्रेक्षक गॅलरीत बसवले असते. तर त्यांनी आपल्याला साष्टांग नमस्कार घालून दुसऱ्या कुठल्या लाईनमध्ये प्रवेश करायला गेले असते. अशी परिस्थिती आहे. याला कारणीभुत तुम्ही व मी नाही, शिक्षणाधिकारी तर बिलकुलच नाही. मग नक्की कारणीभुत कोण? जो विषय आणतो तो, आमचे महापौर मॅडम की ज्यांनी गोषवारा दिला ते आयुक्त साहेब आणि आयुक्त साहेबांनी ज्या बाबींचा उल्लेख केला. ते निर्णय, ते निर्णय काढणारे शासन किंवा या शासनाला ज्या आदेशाद्वारे निर्णय काढायला मजबुर केले. ह्यामध्ये नेमके अडाणी कोण आहे? मला वाटते आपल्याशी मी संपर्क केला होता या आदेशाकडे आपण जरुर पहा. हे मी एवढ्यासाठीच बोलतोय की आम्ही केलेले ठराव जर चुकीचे असले तर त्याला आम्ही शिक्षेस पात्र झालो तर आम्ही त्या गोषवाऱ्याला धरुन ठराव केलेला आहे म्हणजे तुम्ही आमच्यासह आले. जसे अलिबाबा ३९ असतील तर तुम्ही ४० वे आलात असे म्हणायला हरकत नाही. कृपया वाईट वाटून घेऊ नका. माझे तसे बोलण्याचा उद्देश नाही. पण साहेब आपण बघा ह्या संपूर्ण सभागृहामध्ये जितके नगरसेवक आहेत लोकप्रतिनिधी आहेत ते वेगवेगळ्या पक्षाचे आहेत. कुणाचे सरकार केंद्रात आहे तर कुणाचे सरकार राज्यात आहे. एकंदरीत येथे दिसले की रोज नविन सुर्य उगवतो. कधी आम्ही त्यांच्याबरोबर असतो, कधी आम्ही त्यांच्याबरोबर नसतो. पण हे लोकल सरकार आहे. निव्वळ त्यांच्या स्वभावाकडे बघून बरेचसे लोक त्यांना लाईक करतात. हे म्हणायला हरकत नाही. वैयक्तिक मी सुद्धा. कारण त्यांचा स्वभाव फार चांगला आहे ते ऐकुन घेतात शांतपणे. तर त्यांनी शिस्त लावायचे म्हटले तर तुम्हाला एवढी शिस्त शिक्षकांना लावा असे शिक्षणअधिकाऱ्यांना सांगायची वेळ आली नसती. कारण शिस्त ही आपल्यापासुन सुरु होते. असे मानणारा मी आहे. आणि म्हणुन तुम्ही हा विषय आणला त्याबद्दल मी तुम्हाला दोष देणार नाही. मा. आयुक्त साहेबांनी गोषवारा दिला त्यांच्याबद्दल मी तुम्हाला दोष लावणार नाही आणि शिक्षण अधिकारी ह्याच्यावर स्पष्टीकरण करू शकले नाही. त्यांच्याबद्दलही मी दोष देणार नाही. नगरसेवकांनी जे प्रश्न मांडलेले आहे ते इतर बाबतीत, शाळेच्या बाबतीत, प्रशासनाच्या बाबतीत, शालेय साहित्य उपलब्ध नसल्याबाबत किंवा शाळेत शिक्षकांच्या वागणुकीबद्दल किंवा शाळेत जो विद्यार्थी शिकतो तो जो त्यांचा बौद्धीक विकासच नाही तर शारिरिक विकासही झाला पाहिजे. मला ह्या येथे महत्त्व एकच वाटतो तो म्हणजे शारिरिक विकास कारण नेमका ह्याच याचिकेला धरुन तो आहे. म्हणुन तुम्हाला मी या याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने जे निर्णय दिले. ते निर्णय काय दिले ते मी वाचुन दाखवितो. तत्पुर्वी शासनाने आम्हाला कसे अंधारात ठेवले आणि शासनाच्या निर्णयावरती शिक्षणविभागाने कसे आम्हाला अंधारात ठेवले आणि आम्ही ओरबाडतोय शिक्षण अधिकाऱ्याला आणि तुम्हाला. मुळात विषय शासनाला सुद्धा कळलेला नाही असे मला म्हणायचे आहे. कारण शासनामध्ये एवढे हुशार अधिकारी असताना असा निर्णय काढू कसा शकतात. साहेब, राज्य शासनाचे चार निर्णय झालेले आहे एक शासन निर्णय, शालेय पोषण आहार सन २००३/३४/०३ प्रा.शि.४ मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२, मंत्रालय, दि. ३ मार्च २००३ व दुसरा शासन निर्णय दि. १६ मे २००२, तिसरा शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग दि. २८ जानेवारी २००३ आणि चौथा शासन निर्णय शालेय पोषण आहार मंत्रालय दि. २७ मे २००३ हे शासन निर्णय जे झालेत त्याच्या प्रती आम्हा कुठल्याही लोकप्रतिनिधीकडे नसतात आणि ते असण्याची आवश्यकता नाही आणि ते

असल्यास देण्याची जबाबदारी महानगरपालिका अधिकाऱ्यांची आहे असे मी समजतो. हे निर्णय शिक्षण विभागाकडे जरुर आहेत आणि शिक्षण विभागाने या निर्णयाला अनुसरुन आपल्याला तीन पत्रे दिलेली आहे. त्याचा नंबर आहे जा.क्र./शिक्षण/माध्यमिक/शालेय पोषण आहार/२००३-शिक्षण विभाग दि. १/७/२००३ दुसरे पत्र आहे जा.क्र.शि/माध्यमिक शा.पो.आ./२००२-०३ शि.वि.दि. २१ जुन२००३. एका सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाला चार शासनाचे निर्णय निघाले आणि त्या चार शासनाच्या निर्णयाला अनुसरुन दोन शिक्षण विभागाचे निर्णय झाले आणि त्या दोन शिक्षण विभागाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आजचा विषयय आपल्यासमोर ह्या सभेत आणला आहे. मुळात शासननिर्णयामध्ये याचिकेचा उल्लेख केलेला आहे. पण याचिकेत अंतरिम आदेश काय दिलेला हे शासनाला माहिती असून त्यांनी लिहिलेले नसावे. कदाचित तो केंद्र सरकारची योजना आहे. राज्य शासनाला राबवायची नसेल. साहेब आपण हा निर्णय वाचा. हा निर्णय वाचल्यानंतर तुम्हाला असे वाटेल ह्यांनी सगळ्यांनी चिरफाड करून पोस्ट मार्टमला देखील काही ठेवले नाही. मग त्यांचे वस्त्रहरण राहिले बाजुला म्हणून हा निर्णय वाचून दाखवितो कृपया सभेने ह्याचे अवलोकन करावे. सर्वोच्च न्यायालयाचे अंतरिम आदेश १९६ चे २००१ अन्वये. एम.डी.एम.एस. (मिड डे मिल्क स्क्रीम) या योजनेची अंमलबजावणी करायची आहे. वास्तविकता ही योजना केंद्र शासनाची आहे. ती राज्य शासनाने राबवावीत अशी आदेशात अंतर्भुत केलेली आहे. शिक्षण विभागाने या संदर्भात वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यासंबंधी दोन पत्र शिक्षण विभागाने काढलेली आहेत. सदर आदेश हे शासन निर्णयाने वेळोवेळी काढलेल्या एकुण चार निर्णयाला धरुन काढलेले आहे. शासन निर्णयाने जे आदेश काढलेले आहे त्या आदेशामध्ये स्पष्टपणे विशेष याचिका सर्वोच्च न्यायालय १९६/२००१ या याचिकेचा उल्लेख केलेला आहे. या याचिकेमध्ये जो काही अंतरिम आदेश झालेला आहे तो इंग्रजीमध्ये माझ्याकडे उपलब्ध आहे तो मी वाचून दाखवितो त्यांचे मराठीत भाषांतर करतो आणि आम्ही कुठल्या आदेशाची अंमलबजावणी करत आहोत आम्ही मुर्खांच्या देशात आहोत की शहाण्यांच्या देशात आहोत हे आम्हाला त्याच्यावरुन ठरवले पाहिजे. (मिड डे मिल्क स्कीम (एम.डी.एम.एस.) इट इज अ केस ऑफ युनियन ऑफ इंडिया दॅट देअर हॅज बीन फुल कम्प्लायन्स विथ रिगार्डस टु द मिड डे मिल्क (एम.डी.एम.एस) स्कीम हाऊएव्हर इफ ऐनी ऑफ द स्टेट गीव्ह द स्पेसिफिक इन्स्टन्स ऑफ नॉन कॅम्प्लाइन्स द युनियन ऑफ इंडिया वी डु द नीडफुल वीदीन द फ्रेमवर्क ऑफ द स्कीम पॅरा नं.११ पॅरा सेकन्ड वी डायरेक्ट द स्टेट गर्व्हमेंट युनियन टेरिटरीज टु इम्प्लीमेंट द मिड डे मिल्क स्कीम बाय प्रोव्हायडींग एव्हरी चाईल्ड इन एव्हरी गर्व्हमेंट म्हणजे राज्यांमध्ये ॲन्ड गर्व्हमेंट असीस्टेट इन प्रायमरी स्कुल विथइन विथ द प्रिपेड मिड डे मिल्क तयार केलेले अन्न त्यांचा अर्थ शिजवलेले अन्न घ्यायचे का? ते तूम्ही ठरवा. शिजवलेले, उकळलेले, कच्चे म्हणा. तयार केलेले अन्न जसे आपण गाजर हे आपण कच्चे खातो. प्रायमरी स्कुल विथ अ प्रिपेड मिड डे मिल्क विथ अ मिनीमम कन्टेन्ड विथ द ३०० कॅलरीज ॲन्ड ८ टु १२ ग्रॅमस ऑफ प्रोटिन्स ईच डे ऑफ स्कुल फॉर मिनिमम पिरियड मिनिमम डेज ऑफ २००. दोज गर्व्हमेंट प्रोवायडिंग ड्राय रेशन इन्स्टीड ऑफ कुक मिल्स मस्ट विथईन थ्री मन्थस स्टार्ट प्रोवायडिंग कुकींगज मिल्स इन ऑल गर्व्हमेंट ॲन्ड ऑल गर्व्हमेंट ॲडेड प्रायमरी स्कुल्स शासनाच्या महानगरपालिकेच्या जिल्हापरिषद शाळा आणि शासनाचा अनुदान प्राप्त होणाऱ्या प्राथमिक शाळा इन ऑल हाफ द डिस्ट्रीक्ट ऑफ द स्टेट इन ऑर्डर ऑफ पॉवर्टी ॲन्ड मस्ट विथइन ॱअ पिरिअड ऑफ थ्री मन्थस एक्स्टेन्ड द प्रोव्हीजन ऑफ कुक मिल्स टु द रिमेनिंग पार्टस ऑफ द स्टेट वी डायरेक्ट द युनियन ऑफ इंडिया ॲन्ड द एफ.सी.आय. टू इनशुअर प्रोव्हिजन ऑफ फेअर-ॲव्हरेज मल्टीग्रॅम फॉर द स्क्रीन ऑफ ऑन टाईम द स्टेट ऑर युनिअन टेरिटरिज ॲन्ड एफ.सी.आय डायरेक्टेड टु जॉइन टु डु जॉइन इन्स्पेक्शन ऑफ फुडग्रेनस इफ द फुडग्रेनस इज फाऊन्ड ऑफ जॉइन इन्स्पेक्शन नॉट टु बी फेअर ॲव्हरेज क्वालिटी इट विल बी रिप्लेस बाय एफ.सी.आय. टु ब्रायर टु लिफ्टींग. अतिशय महत्त्वाचा निर्णय याचे गांर्भीय सर्वोच्च न्यायालयाचा असला म्हणजे त्याचे गांभीर्य घेतले पाहिजे हे मला माहिती नाही. कदाचित दिल्ली, युपीचे लोक घेत नसतील परंतु आम्हाला गांभीर्य घ्यावे लागेल. तर ह्या याचिकेच्या पीपल्स युनियन्स फॉर सिव्हील टॅरीस वर्सेस युनियन ऑफ इंडिया ह्याच्यामध्ये बरेचसे अंतरिम आदेश झालेले आहेत. यासंबंधिचा अंतरिम आदेश दिला त्यासर्व आदेशांच्या प्रती मी तुम्हाला पहाण्यासाठी देतो जे माझ्याकडे कालच आलेले आहे. ही संपूर्ण याचिका आणि ह्याच्यावरती शंभरपेक्षा जास्त अंतरिम आदेश दिलेले आहेत. आणि राज्य सरकारची ही जबाबदारी आहे. फक्त शिजवलेल्या अन्नामधुन तीनशे कॅलरीज आणि आठ ते दहा ग्रॅम प्रोटीन्स मिळावे अशाप्रकारची आपण व्यवस्था करावी अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेबा या नगरपालिकेच्या शाळांमधला खिचडीचा विषय सभागृहापुढे आलेला आहे. परंतु ह्याच्यामध्ये महिला व बालविकास हा शब्दसुद्धा ॲड केलेला आहे. बरेचसे वक्ते माझ्याबरोबर निरनिराळ्या विषयावर बोलुन झालेले आहे. परंतु महानगरपालिकेच्या वतीने बालवाड्या सुद्धा चालवल्या जाताहेत. या बालवाड्यांमध्ये लहान मुले ज्यांच्याकरीता एज्युकेशनल चार्ट, एज्युकेशनल खेळणी ही भरपुर निघाली आहेत. ज्याने लहान मुलांचे जनरल नॉलेज वाढते अशी काही खेळणी आहेत. पण आपल्यायेथुन माझ्या माहितीनुसार महापालिकेकडे जवळ जवळ २९ बालवाड्या आहेत. आणि या बालवाड्यांमध्ये लहान मुलांना खेळण्याकरीता किंवा एज्युकेशनल चार्ट इत्यादी साहित्या मागण्याकरिता बरेच वेळेला मी स्वतः पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु मला नविन एक माहिती प्रशासनाकडुन की बालवाड्यांना खेळणी दयायची की नाही हे दुसऱ्या महानगरपालिकांना विचारायचे आणि मग दयायचे. हा प्रकार मला काही कळत नाही. पूर्वी नगरपालिका देत होती. त्यांनतर महानगरपालिका झाली आणि अचानक त्या मुलांच्या खेळण्यावर संक्रात आली आहे. असे वाटते तर नेमके धोरण काय आहे? आपण त्या लहान मुलांना सकस आहार देतो. त्यांच्यासाठी आपण शिक्षिका नेमल्या, समाजमंदिर बालवाड्या आपण बनविल्या आहेत. त्यांच्याकरीता आपण होईल तेवढे एज्युकेशनल थोड बहुत का होईना पण आपण देतो. पण मग खेळण्याची तरतुद का नाही? बालवाडी आहे सगळ काय ते आहे. मुलांनी खेळायचे नाही असे धोरण शासनाचे आहे का? कारण लिस्ट तयार केली गेली. भांडारपालकडे लिस्ट गेली. पण सरळ उत्तर दिले गेले की, मंजुरी मिळालेली नाही आणि ही तरतुद महानगरपालिकेच्या नियमात नाही. ह्याचा आपण मला खुलासा करुन दयावा. तसंच आपल्या सर्व शाळा आहेत. त्या शाळांमध्ये प्रत्येक वर्ग पहा. आम्ही लहान असताना प्रत्येक वर्गामध्ये जे राष्ट्रीय पुरुष आहेत त्यांच्या तसबीरी असायच्या. पण येथे एकाही वर्गामध्ये तसबिरी नाही. तसेच आता येथे जवळ जवळ २९ शाळांमध्ये १९७ शिक्षक आहेत. ५ तारखेला पगार व्हायचा होता. अजुनपर्यंत पगार झालेला नाही आहे. तरतुद वगैरे आटली की काय बजेटमधुन. गेल्या वेळेला सुद्धा दोन महिन्यांपुर्वी पगार देण्यात आलेला नव्हता असे का चालले आहे? ह्याच्यावर खुलासा कराल का? रूलिंग मिळाली तर चांगले होईल. जो आपला शिक्षण विभाग आहे. त्याच्याकडुन जर खुलासा झाला तर बरे होईल आणि जे गणवेश वाटप झाले आहे. त्याच्यावरती मोजमाप संदर्भात बरीचशी चर्चा झाली. परंतु अत्यंत निकृष्ट दर्जाचे कापड त्याच्यामध्ये आहे. म्हणजे आता तुम्ही नवीन वाटले. मी सभागृहात आयुक्त साहेबांकडे धुतलेले कपडे सादर करीन. कारण कपडा हे धुतल्यानंतर समजते की त्याची खरी क्वॉलिटी काय आहे. धुतलेला एक ड्रेस आम्ही आपणाकडे सादर करु.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय. शालेच्या संदर्भात विषय असल्याकारणाने आता मी येथे मा. महापौर साहेबा ह्यांचे अभिनंदन करु इच्छितो की, त्यांनी त्यांच्या हस्ते सर्व शाळांना गणवेश वाटप केले. आणि आता आपण इतिवृत्तांला मंजुरी दिली. त्या इतिवृत्तांत असे नमुद करु इच्छितो की, प्रत्येक विद्यार्थ्याला दोन गणवेश. पण आमच्या ज्या महिला नगरसेविका जेव्हा वाटपाच्या वेळेस गेलेल्या त्यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला एकच गणवेश दिला गेला आणि जो आणखीन एक गणवेष आहे तो केव्हा मिळणार? आणि त्याच्यात आमच्या खारीगाव मराठी शाळेचा उल्लेख नव्हता त्या कार्यक्रमामध्ये.

**मा आयुक्त :-**

कार्यक्रमात एक दिला असेल पण आणखीन एक गणवेश देण्यात येणार आहे. दोन गणवेश देण्याचे ठरले आहे.

**शशिकांत भोईर :-**

धन्यवाद.

**गजानन भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय. आम्ही जे शिक्षण अधिकाऱ्यांना प्रश्न विचारला होता की बालवाडीच्या मुलांबद्दल विचार काय? तर त्यांनी सांगितले की ते अधिकार आमच्याकडे नाही. तर त्या बालवाडीचे अधिकार हे नक्की कुणाकडे आहे. आणि हे प्रश्न विचारताना एक सदस्य म्हणाले की त्याचे वस्त्रहरण केले. तर आम्ही त्यांचे वस्त्रहरण केलेले नाही. त्यांनी स्वतःचे कपडे स्वतः उतरविले आहेत. कारण पाच महिने झाले तरी ते म्हणतात की मी अजुन नविन आहे. पण त्यांचे अनुभव तर जुने असतील. बालवाडीचे अधिकार कुणाकडे आहेत त्याचा आपण आम्हाला खुलासा दयावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब यांनी याठिकाणी याचिका क्रमांक १९६/२००१ यामध्ये सन्मा. न्यायमुर्तीने जो आदेश दिलेला आहे. त्या आदेशाचे या सभागृहाला अवलोकन घडविले. आपला

मी आभारी आहे. ह्या सभागृहापुढे हा विषय कसा आला आणि त्याची पार्श्वभुमी काय आहे? ही आपली कायदेशीर जबाबदारी आहे का? हा मुद्दा ह्या ठिकाणी विचारला गेला तो अतिशय चांगला मुद्दा आहे. आम्ही या गोषवाऱ्यामध्ये कुठेही असे म्हटलेले नाही की ह्या पैशामध्ये पन्नास पैसे आणखीन देऊन त्या विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारची खाण्यायोग्य खिचडी देणे हे आमच्यावर सक्तीचे आहे. आपण म्हणता तर त्याप्रमाणे उकळुन त्यात थोडेसे मीठ, चटणी टाकुन किंवा तेही न टाकता त्यांच्यापुढे आपल्याला ठेवता आले असते. तर कायद्याचा परपझ सुरु झाला असता. सुप्रिम कोर्टाला आम्ही सांगितले असते की ज्या राज्यसरकारने हे सगळे आदेश काढलेले आहे आणि राज्यसरकारलाही सांगितले असते की तुम्ही दिलेल्या आदेशानुसार आम्ही ही खिचडी तयार केलेली आहे. तुम्ही दिलेल्या पन्नास पैशामध्ये आम्हाला ही ह्याच्यापेक्षा जास्त काही करता येत नाही. परंतु ज्या सामाजिक बांधिलकीमुळे आपण व्यासपीठावरुन मोठमोठी भाषणे करतो. त्या बांधिलकीचा ह्याठिकाणी प्रश्न येतो. हे आपल्या शहरातल्या गरीब नागरिकांची मुले जी आपल्याकडे आज शिक्षण घेताहेत की ज्यांनी खाजगी शिक्षण खातेकडे जाऊन शिक्षण घेता येत नाही. म्हणुन कदाचित ते आपल्याकडे आले असतील. तर त्यांना कुठली तरी एक आर्कषित स्क्रीम आपण दयावी जसे गणवेश आहे. गणवेश देणे असे कुठल्या कायदयामध्ये लिहिलेले आहे. महापालिकेची जबाबदारी गणवेश देण्याची नाही. आपण बालवाड्या चालवितो. शिक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले की बालवाडी चालविणे हे शिक्षण मंडळाची जबाबदारी नाही. बरोबर आहे. आपली कायदयाने कुठे जबाबदारी आहे. तरी आपण बालवाडी चालवितो ते कशासाठी चालवितो जे दारिद्रय रेषेखाली असणारे गरीब जे नागरिक आहेत. त्यांची मुले इतर संस्थामध्ये जाऊन फी देऊन शिकु शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. टॅक्स देऊ शकणाऱ्या नागरिकांकडुन आपण टॅक्स गोळा करतो आणि त्यातला छोटासा भाग हा असा गोरगरीबांना देत असतो. हा एक समाजवाद आहे. आणि हा समाजवाद महापालिकेच्या माध्यमातुन हा प्रोकोलेट होत असतो. त्यामुळे असा क्लेम आम्ही गोषवाऱ्यात कुठेही केलेला नाही की महानगरपालिकेने हे जर नाही केले तर उद्या राज्य सरकार ही महापालिका बरखास्त करेल का काय? किंवा सुप्रीम कोर्ट आपल्याला काय विचारेल की काय? ज्यापद्धतीने चालवायला पाहिजे त्या औपचारिक पद्धतीने आताही चाललेले आहे. आम्ही मुख्याध्यापकांना नोटीसा काढल्या की शासनाने हे सक्तीचे केलेले आहे. त्यामुळे जे मुख्याध्यापक ही योजना राबविणार नाहीत. त्या मुख्याध्यापकांचा खुलासा मागवा. सगळ्या मुख्याध्यापकांनी सांगितले की साहेब अशी अशी अवस्था आहे. गॅसला, डाळ घ्यायला, तेलाला, मसालेला एवढे एवढे पैसे लागतात. रोज रोज काय तेल टाकुन, तिखट टाकुन मुलांना आपण खिचडी देऊ शकत नाही. म्हणुन जर का एखादी भाजी त्यात ॲड करता आली तर त्या मुलांना एक वेगळ्याप्रकारची टेस्ट लागेल. कारण शेवटी हा प्रश्न नुसता खाण्याचा नाही आहे. लहान मुले आहेत त्यांनी आवडीने ते खाल्ले पाहिजे. आपण आपल्या मुलांना रोज वेगवेगळ्या प्रकारचे भाज्या देतो. अन्य अन्नपदार्थ देतो. ते कशासाठी देतो. ते कशासाठी देतो. रोज आपण आपल्या मुलांना अशाप्रकारची खिचडी खाऊ घातली तर आपली मुले खातील का? या सगळ्या बाबींचा विचार करुन आणि प्रत्यक्षात अनेक शाळा आम्ही फिरलो मी एकेका विद्यार्थ्याला विचारले की तुला खिचडी आवडते का? किती मुले खिचडी खातात त्यांनी हात वर करावा. ज्याठिकाणी बऱ्यापैकी खिचडी पदरची झळ सोसुन जसे मी शंतकरी शिक्षण मंडळाची भाईंदरची जी शाळा आहे. त्याठिकाणचे उदाहरण मी आपल्याला सांगितले की तो कॉन्ट्रॅक्टर स्वतः झळ सोसुन ते करतोय. तो म्हणाला की हे मला जास्त दिवस करता येणार नाही. आणि हे मी एकाच शाळेपुरते करतोय. हे मला अधिक काळ करता येणार नाही. त्यावेळेला आमच्या डोक्यात हा विषय आला की इतर ठिकाणी आपण महापालिकेच्या विकास कामावरती व इतर कामाकरिता पैसा खर्च करतोय. आणि हे एक असे क्षेत्र आहे की ह्या क्षेत्रामध्ये जर का आपण दोन पैसे या माध्यामातुन वाढवुन दिले तर ही स्क्रीम अधिक परिणामकारकरित्या आपल्याला राबविता येईल. नुसती फॉरमॅलिटी म्हणुन किंवा शासनाचा आदेश, सुप्रीम कोर्टाचा आदेश किंवा सक्तीचे आहे म्हणुन पण महापालिकेवर सक्ती तर नाहीच आहे. परंतु काय तरी चांगले देण्याच्या हेतुने अगेन आय ॲम करेक्टींग माय सेल्फ हे जर केले तर मुलेही आवडीने खातील. योजनाही चांगल्या रितीने राबविता येईल आणि मुले आपल्याला आर्शीवाद देतील. इतर महापालिकेमध्ये जी खिचडी दिली जाते त्यापेक्षा मिरा भाईंदरमध्ये वेगळी काळजी इथल्या नागरिकांनी, नगरसेवकांनी आमच्यासाठी वेगळी व्यवस्था केलेली आहे. कदाचित आपले हे उदाहरण आजुबाजुच्या महापालिकासुद्धा घेऊ शकतील आणि त्यांच्याकडे देखील अशाप्रकारची एक पुरक अशी तरतुद ह्या बजेटमध्ये केली जाईल. हा सगळा जो प्रकार आहे तो सक्तीचा नाही. फक्त एक समाजसेवेचा भाग आहे. आपल्या महापालिकेच्या क्षेत्रामध्ये जे गरीब नागरिक आहेत. ज्यांची मुले आपल्याकडे शिकताहेत त्या मुलांची पटसंख्या व्यवस्थित रहावी व त्यांना ह्या स्क्रिमचे आकर्षण रहावे व चांगले अन्न त्यांच्या पोटामध्ये जावे हा पुरक अशा प्रकारची ही योजना आहे. खिचडी खाऊन ही मुले पूर्ण दिवस राहतात असे देखील नाही आहे. संध्याकाळी त्यांचे जे

नेहमीचे जेवण आहे ते जेवण ही मुले घेतातच, किंवा सकाळी घेतात. परंतु दुपारच्या वेळेला त्यांना भुक लागल्यानंतर एक नाश्ताच्या स्वरुपामध्ये व्यवस्था करता यावी. एवढाच फक्त ह्याचा उद्देश आहे. ही योजना अधिक चांगल्यारितीने राबविता यावी. या दृष्टीने हा प्रस्ताव मांडलेला आहे. हा मंजुर करण्याचे बंधन सभागृहावरती आहे असे आम्ही म्हटलेले नाही म्हणणार नाही. परंतु एक सामाजिक भावनेने हा प्रस्ताव याठिकाणी आणलेला आहे. आणि ते मंजुर करायला काही हरकत नसावी माझी अशी आपल्याला विनंती आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, खरं म्हणजे आपले कौतुकही केले पाहिजे. कारण बऱ्याच वेळा आयुक्त हे कायदयाच्या तरतुदीखालीच चालतात. आपल्याबाबत तसे काही दिसले नाही. परंतु आता आपण तसे स्पष्टही केले की आपल्याला सामाजिक बांधिलकीची भावना आहे. आणि म्हणुन आपण हे करत आहात. जर आपण असे म्हटले की, याचिकेमध्ये अंतरिम आदेश दिलेला आहे. तो आम्हाला बंधनकारक नाही आहे. किंवा तो शासनाने आम्हाला कळवलेला नाही म्हणुन बंधनकारक नाही आहे. शासन आम्हाला बरखास्त करील काय ही भिती आम्हाला मुळीच नाही. परंतु कदाचित शासनाने नाही केली पण शासनाच्या अधिकाऱ्यांवर मात्र कारवाई होईल याची मी आपल्याला जाणीव करुन देतो. कारण सभागृहाची जबाबदारी ही मंजुरी देण्याची असते. मंजुरी दिलेल्या ठरावाची अंमलबजावणी काटेकारपणे म्हणण्यापेक्षा कायद्याच्या चौकटीत बसवुन करण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची असते आणि हे त्यांनी विसरता कामा नये. मला वाटते मी चुक केली आपल्याला ही याचिका दाखवली. परंतु आपण आम्हाला ज्या बेसवरती ठराव करायला सांगतात. त्या गोषवाऱ्यातच आपण सांगितले आहे की मा. सर्वोच्च न्यायालय यांची विशेष याचिका क्र.१९६/२००१ नुसार म्हणजे शासनाच्या निर्णयानुसार तुम्ही आता असे म्हणता का, तुम्ही ठराव नाही केला तरी बंधनकारक नाही.

**मा. आयुक्त :-**

माझ्या म्हणण्याचा उद्देश तो नाही आहे. पहिल्या उताऱ्यामध्ये उल्लेख केलेला आहे तो प्रस्तावनेच्या स्वरुपामध्ये केलेला आहे की ह्याची बॅकग्राऊंड काय आहे? ते समजण्यासाठी.

**प्रफल्ल पाटील :-**

आपण गोषवारा दिला त्या गोषवाऱ्यामध्ये प्रस्तावना वेगळी असेल तर आम्ही ते जरुर मान्य करु. अन्यथा गोषवारा कशासाठी दिला जातो ही बाब आपल्याला प्रशासनीय अतिशय चांगल्या पद्धतीने माहिती आहे. ते कदाचित लोकप्रतिनिधींना माहिती नसेल. आणि आपण दिलेल्या गोषवाऱ्याचा किंवा आपण जी माहिती दिली त्या त्या माहितीच्या आकलनावरती आम्ही ठराव करतोय. आपण जर एखाद्या विषयावरती गोषवारा नाही दिला तर असे किती विषय आम्ही परत नाही पाठविले की गोषवारा दिलेला नाही. आयुक्त साहेबांनी ह्याच्यावर आपले म्हणणे मांडलेले नाही, काही सांगितले नाही. प्लीज बी स्टकप वि दॅट. तुम्ही फर्म रहा. हा जो गोषवारा तुम्ही दिला आहे तो बरोबर आहे म्हणुन आणि आम्ही फर्म राहतो जर आम्हाला सर्वोच्च न्यायालयाचे आदेश माहिती नसतील आणि म्हणुन मी बोललेलो आता पर्यंतचे मा. महापौर साहेबा आपण हे सर्व काढून टाका. आणि आज आम्ही असा ठराव करतोय अंतरित आदेश सर्वोच्च न्यायालयाचे काय झाले ते माहित नाही. कारण शासन निर्णयामध्ये फक्त नंबर टाकलेला आहे याचिका क्रमांक पण त्यांनी काय आदेश केलेत ते शासनाने जाणुनबुजुन लपविलेले आहे असे मला स्पष्टपणाने म्हणावेसे वाटते. एवढ्यासाठीच त्यांच्यावरती जी जबाबदारी आहे ती आमच्यावरती नाही आहे. ही शासनावरती जबाबदारी आहे की प्रत्येक भागामध्ये शासकीय शाळा आणि शासन ज्याला अनुदान देते त्या शाळांमध्ये पहिली ते पाचवी ह्या वर्गांना ह्या सगळ्या विद्यार्थ्यांना सकस अन्न देणे आणि ते नुसते सकस अन्न शिजवुन देणे नाही साहेब मी तुम्हाला मघाशी पण सांगितले की ते शिजवुन दया प्रीपेड फुड कारण शिजवलेले अन्न हे खाण्यायोग्य असते. पण आपण कच्ची गाजरे खातो ना ते सुद्धा खाण्यालायक आहे असे अन्न दया कि ते शिजवलेले असेल आणि पचण्यायोग्य असेल. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे असे आहे त्याला तिनशे कॅलरीज व आठ ते दहा ग्रॅम प्रोटिन्स असले पाहिजे हे तुम्ही स्पष्ट उल्लेख केलेला आहे. त्याच्या कडे तुम्ही कशाला दुर्लक्ष करताहेत. ह्याचा अर्थ काय आम्हाला सर्वोच्च न्यायालयाचे आदेश माहित नाहीत आणि शासन निर्णय ते कळवले नाही म्हणुन त्याचा आम्ही अवलंब करणार नाही. असा अर्थ दयायचा का? साहेब आपली सामाजिक बांधिलकी कायदयाला फाटा देणारी आहे. मी स्पष्टपणे ह्या ठिकाणी बोलतो कदाचित आपल्याला राग आला तर मला क्षमा करा. कारण मी आपल्यापेक्षा अनुभवाने, वयाने लहान आहे आणि शिक्षणानेही लहान आहे. परंतु मी एवढेच समजतो की एक नागरिक म्हणुन आपण म्हणालात की सामाजिक बांधिलकीची आम्ही मोठी मोठी भाषणे करतो आणि खरंच त्या भाषणाची मला आठवण आली. कुठलेही काम कृपया जर करायचेचे असेल आणि त्याच्यासाठी ह्या सभागृहाची मंजुरी पाहिजे असेल आणि माझ्या व्यतिरिक्त जर सभासद तुम्हाला मंजुरी

देतच असतील मी देत नसेल आणि लिओ साहेब सांगत असतील की ठराव मागे घ्या तरी मी तो करीन. पण कृपया चुकीच्या मार्गाने नेऊ नये अशी मी कळकळीची विनंती या ठिकाणी करत आहे. प्रश्न एवढाच आहे की तीनशे कॅलरीज आणि आठ ते दहा ग्रॅम प्रोटिन्स देणे ही अन्न देण्याची जबाबदारी. तुम्ही एवढा दानशुरपणा दाखविला की शासन पन्नास पैसे मदत करायला तयार झाले. पण मुळात शासनाकडे काय आहे ते आपल्याला सर्वांना माहित आहे. जशी आपली परिस्थिती लोकांना कळते, तुम्ही सांगता नगरसेवकांना फंड नाही अडीच लाखाला तुम्ही खर्च करा. तशी शासनाची परिस्थिती आपल्याला कळते, की त्यांचीही परिस्थिती नाही आहे. याचा अर्थ असा होत नाही की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशाला कुठेतरी फाट्यातुन वेगळ्या गोष्टी करा. साहेब मी तुम्हाला सांगतो तीनशे कॅलरीज आणि आठ ते दहा ग्रॅम प्रोटिन्स किती स्वस्तात पडेल. पण हे सगळे कोणी करायचे साहेब, शिजवलेल्या अन्नाबाबत किती शिक्षकांनी तक्रारी केल्या. तुम्हीच फक्त वाखाणणी केली शेतकरी शिक्षण मंडळाची. कदाचित तुम्हाला खास खिचडी बनवुन दिली असेल. पण सगळ्यांनीच तक्रार केली आहे की कुणालाही खिचडी आवडली नाही. साहेब आपण मघाशी बोललात की, बाजुच्या नगरपालिका आपला धडा घ्यावा असे आपण आदर्श काम करावे. साहेब मला वाटते कदाचित अधिकाऱ्यांनी माहिती घेतली नसेल की बाजुच्या नगरपालिकेत कशाप्रकारे अन्न दिले जाते. तीनशे कॅलरीज व आठ ते दहा ग्रॅम प्रोटिन्स हे कोण डिफाइन करणार. जसे तुम्ही आज्ञावली, हार्डवेअर आयटम आपले संगणकीकरण करण्याच्या अगोदर एका अधिकाऱ्याला आपण नियुक्त केले व त्याची आगाऊ तयारी केली. तसे आपल्याकडे वैदयकीय अधिकारी आहेच आणि आपण एखादा फुड इन्स्पेक्टर आपल्याला अधिकार आहे त्या अधिकाराचा उपयोग करुन अधिकारी नेमा आणि त्यांच्याकडुन सर्टीफाय करा. अतिशय छोट्या वस्तुमध्ये म्हणजे तांदळाबरोबर दुध ॲड केले तर प्रोटिन्स ८ ते १० ग्रॅम मिळेल. साहेब १०० ग्रॅम तांदूळ ५० एम.एल. दुध ह्याच्यामध्ये ३८० कॅलरीज आणि नऊ ग्रॅम प्रोटिन मिळतो. आणि असल्या वस्तु त्याला काही सबऑर्डीनेट तयार करा आणि अशा वस्तु शाळांना दया. त्याच्यासाठी एजन्सी नेमा. एकच एजन्सी सेंट्रल लाईज नेमा. त्याच्यावर नियंत्रण ठेवा आपल्या फुड इन्स्पेक्टरच्या मार्फत ते बरोबर बनविले जाते का नाही आणि मुंबई महानगरपालिकेची जी सिस्टम ॲडॉप केलेली आहे. साहेब मी तुम्हाला हे करा ते करा हे सांगण्याच्या अधिकारातला नक्कीच नाही. परंतु एक सभागृहाचा अधिकार नक्कीच आहे. जेव्हा आम्ही एखादया योजनेवरती विचार करतो तेव्हा याचा विचार आपण करा व कराल अशी मला आशा आहे. कृपया हा विषय आपण पुन्हा एकदा आणावा अशी माझी इच्छा आहे. घाईगर्दीने काम केले तर अडचणीत आणेल असे कुठलेही काम करु नये. अशी माझी पुन्हा सभागृहाला विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की हे सभागृह आहे. सभागृहात प्रशासनाने आणलेले ठराव आणि त्या ठरावावर सभागृहातील सदस्याची भुमिका किंवा त्याच्यावरील आस्था, त्यांनी दिलेल्या सुचना ह्या सगळ्या म्हणजेच इजी जसे आपण टेक इजी म्हणतो सभा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी स्पष्ट सांगितले आणि प्रशासन बघते किंवा अधिकारी बघतो आहे हे मला आश्चर्य वाटले. तर त्यांनीच सांगितले हे लिओ सरांचे ते सर आहेत मी न बोलता तो ठराव मागे घेतला म्हणुन सांगितले आणि त्यांची नोंद काय झाली तर त्यांच्या गैरहजेरीमध्ये त्यांनी वटवुन घेतले की सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटलांचा मांडलेला ठराव त्यांनी मागे घेतला अशी नोंद करा. इतके इजी सभागृह चालेल अशी आम्ही अपेक्षीत धरत नाही. त्याचा ठराव त्यांनी मागे घ्यावा किंवा नाही घ्यावा त्याच्या तोंडुन जरी बोलले की मी ठराव मागे नाही घेतला आणि निवेदन केले तर त्याच्यातले नक्की तरी काय आहे. सभा. सदस्य प्रफुल्ल यांनी निवेदन करावे आणि सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनीही निवेदन करावे. हे सभागृह आहे सगळेच चर्चा करतात व सगळेच बोलतात आणि मग ते प्रशासन आणि आम्ही अपेक्षा करतो की ज्यावेळी इतक्या सन्मा. सदस्यांनी पोटतिडकीने ही भूमिका मांडली. अनेक यातले सदस्य शिक्षणक्षेत्राशी संबंधित आहेत किंवा जवळून ते बघत आहेत ते काही मा. आयुक्तांनी स्टेटमेंट केलेले नाही. किंवा मा. उपायुक्तांनीसुद्धा स्टेटमेंट केलेले नाही, मंडळानेसुद्धा स्टेटमेंट केलेले नाही. शिक्षणाधिकारी आहेत त्यांनीसुद्धा स्टेटमेंट केलेले नाही. किंवा एखादया ठिकाणी टेबल दिला जात नाही हे चोवीस तासात टेबल पोहचेल असे बोलायला काय होते. कशासाठी आम्ही येथे चर्चा करतो, मला आमच्या भावना व्यक्त करायच्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

भावना आपण व्यक्त कराव्यात परंतु योग्य पद्धतीने करा. त्याचे प्रत्येक ॲटमचे उत्तर दिलेले आहे. एवढ्यापर्यंत सांगितलेले आहे की मी भांडारपाल यांना जेव्हा विचारले तेव्हा सांगितले की आता तो

सामान आलेला आहे आणि त्याचें वाटप चालू आहे. त्यावेळी मी ते घोषित केलेले होते. वाटपाचे काम चालू आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्याच ठिकाणचा डिफरन्स मी तुम्हाला सांगतो त्याचे व्हॅल्युएशन करा. सभागृहाने त्या गोष्टीला मान्यता दिली, ठेकेदार ठरला. ठेकेदाराने सामान आणले. आणले ते पोहचले किंवा नाही याची जोपर्यंत शहानिशा होत नाही. मास्तर-मास्तरीण येते, पोरांना शिकविते, पोरं शिकतात. तरीही सभागृह सांगते की पोरं शिकतच नाही. मग त्याचा रिझल्ट कोणी घ्यायचा?

**मा. आयुक्त :-**

त्याबाबत शिक्षणअधिकाऱ्यांनी सांगितलेले आहे. खुलासा केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

शिक्षण अधिकारी आता चार महिन्यापूर्वी आले आहेत. मराठी शाळेचा दर्जा अनेक वर्षापासुन चाललेला आहे. मघास पासुन त्यांनी जे बोलले की त्याच्यावर कपडे ठेवलेच नाही तीही गोष्ट खरी आहे. प्रत्येकजण आपआपल्यापरीने शब्द वापरतो पण हा एक दिवसाचा विषय आहे का? ज्या दिवसापूर्वी सभागृह अस्तित्वात आले. त्या दिवसापासुन प्राथमिक शाळेच्या दर्जाबाबत ह्याच भाषेत वेगवेगळे सभासद बोलत असतात. पण त्याचा परिणाम दिसत नाही हे त्याच्यातील गांभीर्य आहे आणि हे तात्पर्य पाहिजे की आपण प्रशासन किंवा हे सभागृह. ह्या सभागृहात काम करणारे अनेक सदस्य आहेत कि जे शिक्षण खात्यात आहेत तेही सांगत नाहीत कि आमच्या प्रभागातील आमची शाळा, आमच्या कमिटीने आम्ही देखरेख ठेऊ आणि ती सुधारु. मघाशी जसे सांगितले भाजपाने अभियानामध्ये ज्या गावच्या शाळेचा उल्लेख केला त्याठिकाणी गावचे लोक सामील आहेत ते शाळा रंगवितात, शाळेत येतात, बसतात, मुल शाळेत येत नाही त्याबाबत चौकशी केली जाते. या सभागृहाला माझी विनंती आहे की असे रोजच्या रोज बोलण्यापेक्षा काहीतरी पर्यायी उपाय काढावा. मला वाटते शिक्षण अधिकाऱ्यावर आपला दबाव पाहिजे. त्याचबरोबर शिक्षकांवर सुद्धा दबाव पाहिजे. ह्या विषयावर मिडीयानेपण लिहीले होते. ई मराठी वाहिनीने वर्सोवाच्या शाळेचे पूर्ण चित्रण करुन दाखविले होते. प्रशासनाने काय कारवाई केली. काहीच नाही. म्हणजे नगरसेवकांनी आपल्या दृष्टीपथास आणुन तुम्ही कारवाई केली नाही. याची जबाबदारी जोपर्यंत तुम्ही स्वीकारत नाही. जोपर्यंत काम चालु आहे, रस्ता बंद आहे अशा पद्धतीने कामकाज चालेल तर वर्षानुवर्षे आता दोन तास या विषयावर चालले आहेत पण दोन तासाच्या ऐवजी दोन दिवस जरी बोललो . कदाचित महापौर मॅडमची आज इच्छा असेल आज सात वाजेपर्यंत चालवावे आणि पुढचे विषय उद्या सकाळी चालवावे. महापौर मॅडमना आम्ही धन्यवाद देतो की त्या बोलायला मोका देतात. पण त्याच्यातुन निघते काय? एवढी चर्चा झाली. ज्या शिक्षिका आहेत त्यांनी विषय मांडला सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी भावनात्मक नाही तर वास्तविकतेतुन हा विषय आणलेला आहे. कायदयामध्ये कसे बसवावे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी कायदयाच्या त्रुटी किंवा त्यांचे जे सज्ञान आहे ते त्यांनी दाखविले. आपले असे स्पष्ट मत आहे की, या महापालिका हद्दीतील जी मराठी प्राथमिक शाळेत मुले जातात. त्यांचा शैक्षणिक दर्जा तसेच त्यांचे आरोग्य टिकविण्यासाठी कदाचित आठ आणे कमी पडत असेल तर आम्ही म्हणतो त्याला आठण्याचा रुपया करा. पण नियमात बसुन करा. जसे मघाशी सांगितले की, आता ड्रेसचे कॉन्ट्रॅक्ट कोणाकडे दिले त्याचा संबंध येत नाही. पण ते ड्रेस आज घातले उद्या वर चढले असे झाले नाही तर कापड कोणीतरी घेऊन येतील. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलले की आम्ही कापड घेऊन येतो. तर त्याचा दर्जा, त्यांनी दिलेले कापड खरोखर चांगले हा आपला प्रशासनाचा वचक पाहिजे. आणि ह्याची जेव्हा आपण शाश्वती शहरांतील लोकांना देऊ. तरच लोक आपल्याला बरं म्हणतील अनेक बजेट आपण बनविली आणि संपविली. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जो ठराव मांडला होता आणि सरांनी जे सांगितल की त्यांच्या गैरहजेरीत तो मागे घेतलेला आहे. काय खरे ते निवेदन करा. लिओ साहेब आता शैक्षणिक विषय चालले आहे म्हणून बोलतो.

**लिओ कोलासो :-**

मी सभागृहात ठराव मांडला त्यांचे भाषण संपल्यानंतर सभागृह स्थगित झाले. त्यावर रुलिंग दिले नव्हते म्हणुन मी खुलासा विचारला. मी असे सांगितले नाही की त्यांनी ठराव मागे घेतला असे लिहुन घ्या. आणि त्यावेळी उपायुक्तांनी सांगितले की सर्वानुमते ठराव मंजुर झाला आहे. आमची तर अशीच अपेक्षा असेल की हा ठराव पुन्हा टेबल झाला पाहिजे, मतदानाला गेला पाहिजे तरीसुद्धा आमची तयारी आहे. त्यात काही अडथळ्याचे कारण नाही.

**रोहिदास पाटील :-**

माझा मतदानाला टाकायचा आग्रह नाही. अगदी थोडक्यात सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल यांनी त्याच्यावर मत मांडले होते. सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने त्यांनी खुलासा करावा. विषय संपला.

नाहीतर काय ते रुलिंग तो ठराव खरोखर तसाच झालेला आहे का? एवढ झाले की प्रोसिडिंग लिहायला सोपे होईल. लिओ कोलासो साहेब, मला याचे काय झाले ते सांगा. तो गेला की राहिला. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी मागे घेतला का नाही? प्रोसिडिंगला तुम्ही काय लिहिणार?

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनीच सांगावे की मी वीड्रॉवल केलेला आहे की नाही केलेला आहे? तरीसुद्धा चालेल कारण आपली काहीही अडचण नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर आपण जो निर्णय घ्याल तो मला मान्य आहे.

**मा. महापौर :-**

आमची या ठरावाला मंजुरी आहे.

**प्रकरण क्र. ३८:-**

महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खिचडी देणेकरीता शासन प्रति विद्यार्थी ५० पैसे देते त्यास महानगरपालिकेची मदत म्हणून प्रति विद्यार्थी ५० पैसे देणेबाबत.

**ठराव क्र. २६(अ) :-**

मा. सर्वोच्च न्यायालय यांची विशेष याचीका क्र. १९६/२००१ नुसार तसेच शालेय शिक्षण विभागातील शासन निर्णय क्र. शापोआ/२००३/(३४/०३)प्राशि-४, दि. ३ मार्च २००३ अन्वये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न देणे सक्तीचे केले आहे.

मा. शिक्षण संचालक (प्राय.) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि. २८/५/२००३च्या आदेशानुसार प्रती दिनी प्रती विद्यार्थी रु. ०.५० प्रमाणे या कामी तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर बाबत मा. शिक्षणअधिकारी (प्राय.) यांच्याकडे जा. क्र. नपाशिम/२४७/२००३-०४, दि. ०४/०८/२००३ च्या पत्रानुसार आर्थिक तरतुदीची मागणी केली आहे. या कामी शासनाकडून अद्यापपर्यंत आर्थिक सहाय्य उपलब्ध झालेले नाही. श्री. जयंत पाटील नगरसेवक यांनी या कार्यालयास दि. २६/०८/२००३ रोजी पत्र देऊन प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार या शिर्षकाखाली आर्थिक सहाय्य करणेबाबत विनंती केलेली आहे.

महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळैतील इयत्ता १ली ते ५वीच्या विद्यार्थ्यांची संख्या ७५०० असून एकूण २९ शाळा विविध प्रभागामध्ये आहेत. शासनाकडून सध्या प्रति विद्यार्थ्यांमागे सकस अहारासाठी ५० पैसे प्रमाणे तरतुद उपलब्ध होणार आहे. ती अत्यंत अपुरी असून सदर तरतुदीमध्ये विद्यार्थ्यांना पोषक आहार शिजवून देणे शक्य होत नाही. त्यासाठी लागणारे इंधन, भांडी, तेल, डाळ, मिरची मसाला या आवश्यक वस्तुंची तरतुद शासनाच्या दि. २८/०५/२००३ च्या पत्रात नसल्यामुळे प्राथमिक शिक्षकांची सदर पोषण आहार योजना राबविण्यासाठी कुचंबना होत आहे. म्हणून प्रति विद्यार्थ्यामागे महिला व बाल विकास शिर्षकाखाली असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून प्रति विद्यार्थ्यांमागे ५० पैसे महानगरपालिका निधीतून खर्च केल्यास ७५०० विद्यार्थी X ५० पैसे = रु. ३७५०/- X २५ शालेय दिवस = रु. ९३,७५०/- (एका महिन्यासाठी) सप्टेंबर ०३ ते मार्च ०४ या उर्वरीत शैक्षणिक वर्षासाठी एकूण रु. ६,५६,२५०/- एवढा खर्च येणार आहे.

सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात महिला व बालविकास शिर्षाखाली एकूण रक्कम रु. ४२,७२,०००/- एवढी तरतुद आहे. महिला व बाल विकास या शिर्षातून शालेय विद्यार्थ्यांना सकस आहारासाठी प्रति विद्यार्थ्यामागे ५० पैसे निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासकीय वित्तीय मंजुरी तसेच याकामी निविदा मागविण्यांस हि महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. लिओ कोलासो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण ३९ चे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर झोपडपट्टीयांना स्वतंत्र नळ कनेक्शन देणेबाबतचा येथे ठराव आलेला आहे. या ठरावाचा गोषवारा जेव्हा बघितला, एकतर मा. आयुक्त साहेब आम्हाला अज्ञानी समजतात असे किंवा त्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांना जी टिपणी दिली असेल ती त्यांनी वाचली नसेल अशा पद्धतीचा गोषवारा

याठिकाणी आलेला आहे याच्यामध्ये महापालिकेच्या प्रत्येक नागरिकाला पाणी देणे, आरोग्य राखणे हे सर्व कर्तव्य महापालिकेचे आहे. त्याच्यातील किती वस्तु नागरिकांनी घेतली पाहिजे. किती महापालिकेने दिलेल्या वस्तुचा फायदा घेतला पाहिजे. हा त्याचा भाग आहे या गोषवाऱ्यामध्ये दोन तीन गोष्टी अशा दिलेल्या आहेत की जेव्हा ग्रुप कनेक्शन देण्याचे ठरले त्याला अल्प प्रतिसाद आला आणि नगरपालिकेच्या महसुलामध्ये घट झाली. अल्प प्रतिसाद आला आणि आताही प्रश्नोत्तराच्या तासामध्ये जो प्रश्न होता सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे याचा झोपडपट्टीयांना किती ग्रुप कनेक्शन दिली गेली. तर त्याच्यात शंभर कनेक्शन नमुद केलेले आहेत. शंभर गुणिले दहा बारा म्हणजे कमीत कमी बाराशे ते पंधराशे झोपडपट्ट्यांना ग्रुप कनेक्शनच्या माध्यमाने कनेक्शन दिलेली आहेत. अल्प प्रतिसाद आला याचे कारण काय ग्रुपमध्ये नको आहेत. म्हणुन त्यांनी घेतले, त्यांना पाणी मिळत असेल म्हणुन ते घेत नसतील आणि जर शासनाला खरोखर महसुलाची काळजी असेल तर या शहरातील प्रत्येक नागरीक खाजगी कनेक्शन घेण्याच्या तयारीत आहे. मग एका विशिष्ट लोकांना वैयक्तीक कनेक्शन देण्याचा ठराव कशापद्धतीने मा. महापौरांनी किंवा मा. आयुक्त साहेबांनी आणलेला आहे. हा प्रश्न ह्या ठिकाणी उपस्थित होता. आता चर्चेमध्ये सन्मा. नगरसेवक आसिफ शेख सुद्धा म्हणाले कि या शहरातील नागरिकांना समान वस्तु मिळाली पाहिजे. सर्वांसाठी समान कायदा असला पाहिजे. मग ह्या ठरावामध्ये सन्मा. आसिफ शेख समान कायदा कुठे आहे. मा. महापौर मॅडम झोपडपट्टीची एकुण संख्या किती आहे. ते या गोषवाऱ्यामध्ये दिलेले नाही. आपण फोटोपास वाटप केलेले आहेत. किती केलेले आहेत त्याचा अजुन आकडा मिळालेला नाही. वाटप चालु आहे की बंद आहे हे सुद्धा नाही. किती कनेक्शन दिल्यावर किती महसुल वाढणार आहे. तो आकडा ह्या ठिकाणी नाही. मा. महापौर मॅडम हा जो प्रस्ताव आणलेला आहे. सभागृहाचा, शासनाचा नियम आहे की पंधरा फ्लॅट धारकांना एक इंचाचे कनेक्शन आणि सात ते आठ रहिवाशांना अर्धा इंचाचे कनेक्शन. पंधरापेक्षा जास्त फ्लॅट झाले. आणि त्यांनी एक इंचाचे आणखी एक कनेक्शन सांगितले तर त्याला कायदयाकडे बोट दाखवतात. तुम्हाला दुसरे कनेक्शन देता येत नाही. शासनाला ट्रान्सफर फी देतात, स्टॅम्प ड्युटी देतात, रजिस्ट्रेशन फी देतात अशा व्यक्तीवर अशा पद्धतीने अन्याय करणे बरोबर नाही. एकतर महापालिकेने असा निर्णय घ्या. महसुलाचा प्रश्न असेल किंवा महसुल वाढवायचा असेल तर खुले करा प्रत्येकाला कनेक्शन. ज्याला पाहिजे त्यांनी घ्यावे आणि मी तुम्हाला खात्रीने सांगतो तुम्ही झोपडपट्टीवासीयांना पाच हजार, सात हजारने कनेक्शन देणार असाल. तर वैयक्तिक लोक वीस-वीस हजार रुपये महापालिकेला दयायला तयार आहेत. तुम्ही महसुल वाढवा आणि कनेक्शन दया. धोरणात्मक निर्णय घ्या. झोपडपट्टीवासीयांना कनेक्शन दिले पाहिजे. पाणी दिले पाहिजे. पहिले देत होतो. आता स्टँड पोस्ट बंद करायचे म्हणुन त्यांना वैयक्तिक कनेक्शन. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, एका झोपडपट्टीमध्ये अनधिकृतरित्या दहा-वीस झोपडपट्टया बांधल्या जातात. त्या ठिकाणी जे महापालिकेने एक टाकी बांधली आणि टाकी पण तुम्हाला चाळीस फुट पन्नास फुट उंच बांधण्याची गरज नाही. झोपडीची उंची फक्त दहा ते पंधरा फुट आहे. एक टाकी बांधली आणि महापालिकेचा एक सेप्रेट झोन त्या झोपडपट्टीपुरता दिला आणि त्या टाकीमध्ये पाणी आपण घेऊन गेलो. जसे अन्य बिल्डिंगवाले करतात. त्या टाकीतुन पाणी घेऊन वाटल्यास दीड-दोन इंचाची लाईन उतरवा आणि तुम्ही वैयक्तिक कनेक्शन दया. नगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. वैयक्तिक कनेक्शन म्हणता येईल की वैयक्तिक कनेक्शन दिलेले आहे. नगरपालिकेची पाईप लाईन खराब होणार नाही. मी देवलनगर झोपडपट्टीमध्ये गेलो होतो. सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स पण गेले होते. त्यांनी तिकडे देऊळ बांधले आहे त्या देवळात मी दर्शन घेण्यासाठी गेलो होतो. त्या झोपडपट्टीतुन निघाल्यानंतर मी कुठुन निघालो मला स्वतःला माहित नाही की मी कुठुन निघतो आहे मी गेलो आणि झोपडपट्टीच्या एका रस्त्याला भाईदरच्या पोलिस स्टेशनला निघालो म्हणजे कुठे झोपडपट्टी आहे आणि तुम्ही कसे कसे कनेक्शन देणार आहात त्याची कुठलीही रुपरेषा तुमच्याकडे नाही. फक्त एका नगरसेवकाने सांगितले किंवा एका विशिष्ट व्यक्तीने सांगितले किंवा एका पक्षाने ठरविलेला विषय की वैयक्तिक कनेक्शन देऊन टाकावे. म्हणुन हा विषय तुम्ही या सभागृहात आणलेला आहे. ही गंभीर बाब आहे. आणि मी भारतीय जनता पार्टीतर्फे येथे ठराव मांडित आहे की, आपण हा जर ठराव मान्य केला तर आमचा विरोध आहे. आणि तो मतदानाला टाकायला पाहिजे आणि मी सभागृहाला खुलेआम सांगतो आहे की अशापद्धतीचा ठराव जर महासभेत केला तर आम्हाला न्यायालयात सुद्धा जावे लागेल. यापुर्वी अनधिकृत कनेक्शन अधिकृत करण्याचा ठराव महापालिकेत जबरदस्तीने पास केला गेला. शासनाच्या धोरणत्मक वस्तुस्थिती लक्षात न घेता बेकायदेशीर पास केला आणि आम्ही तो मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने तो ठराव रद्द करुन घेतला नेतर मा. प्रभारी आयुक्त त्यावेळी शिवमुर्ती नाईक साहेबांनी शासनाकडुन आणुन त्याला रेग्युलाईज केले व ठराव केला. त्यावेळी परत ठराव आला व त्यामध्ये सुद्धा गोंधळ आहे. ज्या लोकांनी फॉर्म भरले व कनेक्शन घेतले नाही मागच्या फॉर्मचे कनेक्शन देणे आता चालू आहे हा नंतरचा विषय

आहे तरी अशा पद्धतीचा ठराव आणणे हे महानगरपालिकेला हिताचे नाही म्हणुन आमचा हा ठराव आहे, भारतीय जनता पार्टीचा, हा जो व्यक्तिगत नळ जोडणीचा प्रस्ताव आणलेला आहे त्याला आमचा विरोध आहे आणि या ठरावाच्या विरोधात आम्ही मतदान करणार आहोत. जर अन्य कुणाला काही याबाबतीत ठराव मांडायचा असेल त्यांनी मांडावा नाहीतर आमचा हा ठराव आहे की हे वैयक्तिक कनेक्शन देऊ नये.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते आहे की या ठरावावर अनुमोदन होण्यापूर्वी आमचे काही म्हणणे आहे ते ऐकुन घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयावरती कुठलाही ठराव मंजुर करण्याच्या अगोदर त्या त्या प्रभागातील आम्ही नगरसेवक आहोत. आम्हाला आमची रितसर भुमिका मांडायची आहे. कोणाला कोर्टात जायचे आहे त्यांना कोर्टात, हायकोर्टात, सुप्रीम कोर्टात जावे. तुम्ही जसे जाऊ शकता तसे आम्ही पण जाऊ शकतो. हे तुम्ही लक्षात ठेवा. ज्यावेळी या शहरामध्ये बेसुमार चोरीचे कनेक्शन चालले होते. तेव्हा आपल्या भुमिका कधीही सभागृहापुढे मांडलेल्या नाहीत. याचे देखील तुम्ही भान ठेवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ज्या नगरसेवकांच्या प्रभागामध्ये झोपडपट्ट्या आहेत त्यांना बोलण्याची संधी दया.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सर्वात जास्त अनधिकृत कनेक्शन बद्दल या सभागृहात भांडणारा मी आहे माझा तारांकित आहे. माझ्या प्रश्नाचे उत्तर या सभागृहात व्यवस्थित दिलेले नाही. मी आताही बोलतो आहे. आताही जुन्या फॉर्मवर कनेक्शन चालु आहे. बिल्डिंग झालेली नाही. त्या ठिकाणी जन्म दाखले दाखवुन कनेक्शन दिले जातात. तुमची बाजु तुम्ही मांडा. तुम्हाला हक्क आहे. आम्ही काय करतो आणि काय नाही करत हे सांगण्याची तुम्हाला गरज नाही.  आम्ही आमची भुमिका मांडली आहे.

**आसिफ पटेल :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो ह्या आलेल्या ठरावाला विरोध करुन यांचे काय म्हणणे आहे की लोकांनी अनधिकृत कनेक्शन घ्यावे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही, हे शासनाने ठरवायचे.

**आसिफ पटेल :-**

लोकांना कनेक्शन घ्यायचे असेल तर घेऊ दया.

**(सभागृहात गोंधळ)**

**शरद पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, गोषवाऱ्यामध्ये असे नमुद केलेले आहे की, ग्रुप कनेक्शनला अल्प प्रतिसाद आहे. ज्यावेळी स्थायी समितीची सभा झाली त्यावेळी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी मा. सभापती यांना सांगितले की, माझ्या २५० फाईल ग्रुप कनेक्शनसाठी पडलेल्या आहेत. मला पाच वाजेपर्यंत टाईम दया. मी तुम्हाला अडीचशे फाईल आणुन देतो. अडीचशे गुणिले दहा बरोबर दोन हजार पाचशे झोपड्या होतात. मग ग्रुप कनेक्शनला अल्प प्रतिसाद कसा आला.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ज्या अडीचशे फाईल कधीही सभागृहात आलेल्या नाहीत. ग्रुप कनेक्शनचे अजुन फॉर्मच भरलेले नाहीत. मा. महापौर मॅडम मा. स्थायी समिती सभेने ठराव क्र.१३ दिनांक १८/१/०३ रोजी नळ कनेक्शन देण्याचे मंजुर केले. त्यावेळी ग्रुप कनेक्शन देण्यात यावे असा ठराव झाला होता. परंतु ग्रुप कनेक्शन देत असताना  ग्रुप कनेक्शनसाठी प्रतिसाद फारच कमी आला. माझ्यासुद्धा प्रभागात झोपडपट्टी आहे. आणि मी माझ्या वॉर्डपुरते तात्पुरते बोलते. इतर नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये देखील झोपडपट्ट्या आहेत. त्यांना त्याचा अनुभव आला असेल.माझ्या वॉर्डमध्ये पाईप लाईन टाकलेली आहे. पाईप लाईन टाकण्याचे काम झालेले पूर्ण आहे. लोकांना कनेक्शन पाहिजे होते. लोकांनी एक वर्षापूर्वीच अर्ज भरले होते. १०० रु.चा फॉर्म भरुन भरले होते. त्यामध्ये पालिकेने कोठेही असे नमुद केले नव्हते की तुम्हाला हे ग्रुपमध्ये देण्यात येईल की स्वतंत्र देण्यांत येईल. नागरिकांनी स्वतंत्र कनेक्शनसाठीच अर्ज केले होते. अशा आमच्या विभागात दीड दीड हजार फाईली पालिकेमध्ये जमा होत्या. त्यावेळी पालिकेने असे कुठल्याही प्रकारचे मार्गदर्शन केले नव्हते. नागरिकांना शंभर रुपयाचा फॉर्म देण्यात आला होता. लोकांनी जे फॉर्म भरले. अशा प्रकारे स्थायी समितीचा ठराव ज्या दिवशी झाला. त्या दिवशी दहा दहा मेंबरमध्ये एक-एक कनेक्शन दिले जाईल असा ठराव पारित झाला. त्यानंतर लोकांचा प्रतिसाद कमी झाला. लोक कनेक्शन

घ्यायला तयार होईना कारण आतापर्यंत झोपडपट्टी विभागात स्टँडपोस्टवर पाणी भरत होते त्यांना ९३ सालापासून कनेकशन देण्याचे बंद केले होते त्यामुळे एका स्टँडपोस्टवर पंचवीस ते शंभरपर्यंत नागरिक एकत्रितपणे पाणी भरत होते आणि त्या स्टँडपोस्टवर पाणी भरत असताना अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागते होते. पाण्याच्या प्रेशरवरुन नागरिकांत भांडणे व्हायची. काही दादागिरी करणाऱ्या महिला त्या कॅन भरुन विकायच्या आणि पैसे कमवायच्या. असा प्रकार सर्व झोपडपट्टीत दिसुन येतो आणि असा प्रकार होत असताना राजकारण होते. म्हणजेच ज्यांनी मारामारी केली असेल त्यातील एखादा व्यक्ती माझ्याकडे येणार आणि त्यापेक्षा विरोधात असलेला दुसऱ्या पक्षात जाणार आणि त्यामुळे राजकारणी लोकांमध्ये तो वादविवाद पोलिस चौकीपर्यंत जाणार. तर अशी संपुर्ण परिस्थिती मिरा-भाईंदर शहरातील झोपडपट्टी भागात होत आहे. त्यावेळी विनयभंगाचे बरेचसे प्रकार झाले. महिलांवर देखील विनयभंग झाले आणि अशा प्रकारच्या बऱ्याच तक्रारी पोलिस स्टेशनपर्यंत गेल्या. पोलिसदेखील कंटाळले. पोलिसदेखील म्हणायला लागले की अशा प्रकारच्या तक्रारी आम्ही घेणार नाही. तुम्ही पालिकेत जाऊन प्रश्न सोडवा. नाहीतर नगरसेवकांकडे जाऊन प्रश्न सोडवा. तर अशावेळी नगरसेवकांनी काय करायचे. तर त्यावेळी नगरसेवक हतबल होतात. आपण पाणी येऊ शकत नव्हतो कारण त्यावेळी मिरा भाईंदरमध्ये संपुर्ण ठिकाणी पाणी कनेक्शन बंद होते. परंतु आज पाणी कनेक्शन, नळ कनेक्शन चालू आहे आणि माझ्या वार्डमध्ये प्रथम ग्रुप कनेक्शन देण्यात आले आणि जेव्हा ते ग्रुप कनेक्शन लागले. त्याच्यानंतर दहा की पंधरा दिवसांनी एक घटना घडली, त्याच कनेक्शनवर की, एका बाईला जिवंत जाळण्यात आले. म्हणजे पालिकेच्या माध्यमातुन ग्रुप कनेक्शन घेतल्यानंतर सुद्धा हा प्रकार आमच्या वॉर्डमध्ये घडला आणि हा प्रकार घडल्यानंतर सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी स्थायी समितीमध्ये ठराव मांडला दुःखद निधनाचा आणि त्याला मी अनुमोदन दिले. चंदा राऊत ह्या महिलेला जिवंत जाळण्यात आले. ती बाई मेली आणि चार व्यक्तींना त्याच्यावर सजा झाली. आणि ३०७ चा गुन्हा पण झाला. अशाप्रकारचा वाद पुन्हा होऊ नये किंवा अशा घटना घडु नये याकरीता मी निवेदन मा. आयुक्त साहेबांनी दिले. मा. स्थायी समितीचे सभापती मोहन पाटील होते. त्यांनाही दिले आणि मला वाटते मा. महापौर मॅडम आपल्याला देखील पत्र दिलेले होते आणि त्यानुसार स्थायी समितीमध्ये फेरविचार करुन दि. २८/५/०३ रोजी कलम ९२ अन्वये आपण एक ठराव पारित केला की राखीव प्रभागातील म्हणजे जे वॉर्ड एस.सी. किंवा एस.टी. असतील अशा प्रभागातील नागरिकांना म्हणजे त्यातील झोपडपट्टीवासियांना नळ कनेक्शन स्वतंत्रपणे देण्यात यावे. मी स्वतः त्यांना मागणी केली की ज्या लोकांना स्वतंत्र कनेक्शन घ्यायचे असेल तर त्यांना स्वतंत्र घेऊ द्या व ज्यांना ग्रुपमध्ये घ्यायचे असेल तर त्यांना ग्रुपमध्ये घेऊ द्या. कारण लोकांना आज पैसे गेले त्याचे वाईटपणा त्यांच्या मनामध्ये काहीच नाही. लोकांना आज पाणी पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पाणी पाहिजे भांडणतंटा न करता. ते पालिकेची रक्कम भरायला तयार आहेत आणि पालिकेची रक्कम भरतांना आपला सुद्धा बेस असा आहे की, ''ना नफा ना तोटा'' या तत्वावर आपल्याला ही स्कीम राबवायची आहे आणि ही स्कीम राबवत असताना पालिकेला पैसे भरुन झोपडपट्टीवासी स्वतंत्र कनेक्शन घेत असतील तर त्यामध्ये आपला विरोध असण्याचे काही कारणच नाही आहे आणि मी म्हणते माझ्या प्रभागात जर प्रथम प्राधान्य देऊन दिले असेल तर सभागृहाला मी धन्यवाद देते. त्यावेळी मी स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना मी धन्यवाद दिले आणि विनंतीही केली होती की माझ्या प्रभागामध्ये म्हणजे राखीव प्रभाग आहे त्या प्रभागामध्ये आपण प्रथम प्राधान्य म्हणुन दिले असेल तर यापुढच्या अनेक झोपडपट्ट्या आहेत त्या प्रभागामधील झोपडपट्ट्यांना सुद्धा पाणी हे मिळालेच पाहिजे. मग त्याची इच्छा असेल ग्रुप कनेक्शन घ्यायची किंवा स्वतंत्र कनेक्शन घ्यायची तर तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे, त्या व्यक्तींचा वैयक्तिक प्रश्न आहे. तरी हा ठराव महासभेला शिफारशीसाठी दयावा अशी आम्ही विनंती केली होती. त्यावेळी बी.जे.पी.च्या सर्व सदस्यांनी विरोध केला होता. तरी सुद्धा आमच्या वॉर्डमध्ये ठराव पास झाला होता. त्यामुळे मला वाटते सुचक मा. श्री. हरेश गावंड साहेब होते आणि अनुमोदन मी केलेले आहे आणि अशा प्रकारे तो ठराव पारित होऊन माझ्या वॉर्डमध्ये १२५ स्वतंत्र नळ कनेक्शन पास झाले आणि त्यानुसार त्याला इम्प्लीमेंट सुद्धा झालेले आहे. लोकांनी ते कनेक्शन घेतले व लोकांनी प्रामाणिकपणे त्याचे पैसे भरले नळजोडणी घेतली आणि आज नागरिक अतिशय आनंदामध्ये आहेत. स्वतंत्र कनेक्शन घेऊन त्यांनी पैसे नगरपालिकेत भरलेले आहेत आणि मला वाटते की अजुन पंचवीस-एक फाईली अशा आहेत की ज्यांना अजुन डिमांड ड्राफ्ट मिळालेले आहेत. पण पैशाची रक्कम त्यांच्याकडे जमा नसल्यामुळे त्यांनी अजुनपर्यंत भरलेले नाहीत. असे सव्वाशे स्वतंत्र नळ कनेक्शन माझ्या वॉर्डमध्ये मंजुर झाले. आणि त्यांनतर अचानक कुणीतरी काहीतरी त्या झोपडपट्टीवर दिले. आम्हाला का नाही? अशाप्रकारचा विषय मांडुन आयुक्तांना पत्र दिले. आणि ते कनेक्शन बंद करण्यात आले. माझा त्यामध्ये काहीही उद्देश नाही. जर एका वॉर्डमध्ये तुम्ही दिले असेल इतर झोपडपट्टीमध्येदेखील त्याची मागणी असेल तर दयायलाच

पाहिजे. असे नाही की राखीव प्रभाग आहे. म्हणून त्या प्रभागातील लोकांना दयायला पाहिजे अशातील काही भाग नाही. पाणी प्यायचा अधिकार सर्वांचा आहे. मग तो कुठलाही माणुस असु दे. मग तो गरीब असु दे. श्रीमंत असु दे. पाणी हे सर्वांना मिळायला पाहिजे. मिरा भाईंदर पालिकेमध्ये पाणी नसताना जे आंदोलन झाले किंवा ज्या मारामाऱ्या झाल्या ह्या सर्व तुमच्या सगळ्यांच्या डोळ्यासमोर आहे. आज ८१ एम.एल.ने पाण्याची जी स्कीम आपण राबवतो ती कोणासाठी? आपण म्हणतो फ्लॅटधारकांना पंधरा जणांना एक कनेक्शन आपण देतो. एक इंचाचे कनेक्शन देतो. पण फ्लॅटधारकांकडे टाक्या असतात. तशी त्यांच्याकडे योजना असते. ते त्याच्यामध्ये साठवू शकतात आणि त्यांच्या फ्लॅटमध्ये प्रत्येकांच्या नळाला पाणी येतेच ना. ते डिस्ट्रिब्युशन ते करतातच ना. मग वैयक्तिक कनेक्शन देऊन झोपडपट्टीला जर स्वतंत्र कनेक्शन घ्यायचे असेल तर त्याच्यामध्ये वाईट काय आहे? ती लोक त्यांना भरायची तेवढी भांडी भरतील आणि नंतर नळ बंद करुन ठेवतील कारण त्यांना काळजी आहेच ना की जेवढे आपले मीटर चालणार तेवढे त्यांना बिलदेखील भरायचे आहे. म्हणुन पाण्याचा अपव्यय कुठे होणार नाही. शिवाय स्टँडपोस्ट जे आपण दिलेले आहे. ते आपल्याला नंतर बंद करायचे आहेत. मग ते बंद करीत असताना पहिला आपल्याला तो विचार करावाच लागणार आहे की, प्रत्येक नागरिकाला पाणी मिळेलच की नाही? हाही एक प्रश्न आहे. मग जर ते ग्रुपमध्ये घेत असतील तर ग्रुपमध्ये घेऊ दे. व्यक्तीगत घेत असतील तर व्यक्तीगत घेऊ दे. शिवाय ग्रुपमध्ये देण्यापेक्षा व्यक्तीगत जर कनेक्शन दिले तर जास्त फायदा नगरपालिकेचा त्याच्यामध्ये आहे. कारण ग्रुपमध्ये फक्त चार ते आठ मेंबर्स मिळुन जर एका इंच कनेक्शन घ्यायचे असेल तर आपल्याला आठ मेंबर्स घ्यावे लागतात आणि अर्धा इंची कनेक्शन घ्यायचे असेल तर चार मेंबरला ग्रुप कनेक्शन आपण देतो. आणि त्याच्यामध्ये ९४ चे पुरावे असलेल्या नागरिकांनाच आपण कनेक्शन देतो. कारण पालिकाही सर्व काही पुरावे बघते. ९४ च्या फोटोपासबद्दल जे १६ पुरावे आपण दाखविलेले आहेत तर ते सोळा पुराव्यापैकी एक जरी त्याच्याकडे असेल तर त्याच व्यक्तीला ते ग्रुप कनेक्शनमध्ये सामील होता येते किंवा स्वतंत्र कनेक्शन घेता येते मग पालिकेचासुद्धा त्याच्यामध्ये फायदाच होतो तर तो असा की स्वतंत्र कनेक्शनमध्ये अर्धा इंचाच्या कनेक्शनला सात ते साडेसात हजार रुपये एक व्यक्ती भरते आणि ग्रुप कनेक्शनमध्ये चार जण मिळुन सात ते साडेसात हजार रुपये भरतात. त्याच्यामध्ये पालिकेचे नुकसान आहे. ग्रुप कनेक्शनमध्ये पालिकेचा जर फायदा बघायचा असेल तर स्वतंत्र व्यक्तीगत कनेक्शन देणे अतिशय योग्य आहे असे मला तरी वाटते. तर अशा प्रकारे स्वतंत्र कनेक्शन देण्यात यावे. निदान माझ्या वॉर्डमध्ये जे स्टॅंडिंग कमिटीने मंजुर केलेले आहे आणि स्थायी समितीचे सर्व सदस्य, मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त आणि सर्वांचे मी धन्यवाद मांडलेले आहेत तसेच मी त्याची आभारी आहे. तसेच माझ्या वार्डातील नागरिक आभारी आहेत तरी मला वाटते झोपडपट्टी मधला हा प्रश्न सोडविलाच पाहिजे. आणि त्यासाठी कोणी विरोध करायचा, कोणी नाही करायचा ही आपआपल्या पक्षातील भूमिका असेल ती भुमिका त्यांनी बजावावी त्याबद्दल वाद नाही. आणि जर कोणाला कोर्टात जायचे असेल त्यांनी आपआपल्या पद्धतीने ते करावे. परंतु नागरिकांचा हक्क त्यांनी हिरावू नये असे मला वाटते. प्रत्येक नागरिकाला पाण्याचा हक्क हा मिळालाच आहे असे माझी स्वतःचे व्यक्तीगत म्हणणे आहे. हा ठराव सर्वानुमते मंजुर झालेला होता. आता येथे वेगळी भुमिका मांडण्याचे काही कोणत्याही प्रकारचा अर्थ नाही आहे. तरी अशाप्रकारे हा स्थायी समितीमध्ये माझा जो ठराव मंजुर झालेला आहे त्याला कोणीही आक्षेप घेण्याचे कारण नाही. आणि विरोध करण्याचे कारण नाही आहे. आणि बाकी इतर झोपडपट्टीचा हा जो विषय महासभेपूढे आलेला आहे तर त्यासाठी मंजुरी सभागृहाने द्यावी. अशी मी आजच्या या माझ्या निवेदनातुन सर्व सभासदांना विनंती करित आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, झोपडपट्टी विभागात स्वतंत्र नळ जोडणी बाबत घेतलेला आपण निर्णय हा खरोखरच चांगला आहे परंतु माझ्या प्रभागामध्ये काही इंडस्ट्रीयल एरिया आहे त्या विभागामध्ये अद्यापपर्यंत पाण्याच्या सोयी कुठेही उपलब्ध झालेल्या नाहीत ते नागरिक त्या जागेचा कर भरतात अशा नागरिकांना पाण्याची सोय जर तुम्ही करत असाल तर आपल्या महसुलामध्ये नक्कीच वाढ होईल ही आपण नोंद घ्यावी.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम मै आपकी परमिशनसे बोल रहा हुँ। मैं यहाँ मा. महापौर, मा. आयुक्त, और सभागृह से एक बात पुछना चाहता हुँ की, यह जो महानगरपालिका चल रही है लोगो को सेवा देनेकी संस्था है कि दुकान है। मैं यह कहना चाहता हुँ लोंगोको आप पाणी दिजिए, कनेक्शन नही और जैसे आप लोग रोज नई नई समितीयाँ बना रहे है मैं यह भी कहता हुँ की और एक समिती बनाईये और उसमे जांच करवाईये की आप ने आजतक कितना कनेक्शन दिया है। और उस कनेक्शनसे लोगोको पाणी मिल रहा है की नही। मेरा दावा है की किसी भी कनेक्शनसे पुरा पाणी नही मिल रहा है। हर

बिल्डिंग जो चार चार कनेक्शन लिया है। एक खड्डा खोदने का चार-चार बार पैसा दिया है। उसके बावजुद लोग टँकर मंगा रहे है। आप पहले जो कनेक्शन दे चुके है उनको पुरी तरह से पाणी दिजिए। उसके बाद नया कनेक्शन देने की सुचना किजिए। यही मै आपसे विनंती चाहता हुँ।

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय झोपडपट्टी विभागात स्वतंत्रपणे नळ कनेक्शन देणेबाबतचा विषय आहे. सुदैवाने किंवा दुर्देवाने माझ्या प्रभागामध्ये दोन झोपडपट्ट्या आहेत. झोपडपट्टी कुणाच्या प्रभागात असावी असे कुणाला वाटणार नाही आणि वाटुही नये लिओ साहेबाची कविता खुप पूर्वी त्यांनी सांगितलेली आहे सभागृहात हे शहर कसे सुंदर हवे यासंबंधी. शहरामध्ये झोपडपट्ट्या वाढल्यानंतर शहर निश्चितच सुंदर होणार नाही. झोपडपट्टीत राहणारे लोक गरीब असतात ही एकवेळची भावना मान्य केली तरी झोपडपट्टी या शहराला लागलेली किड आहे हे सर्वांनाच मान्य करावे लागेल. शहरातला जास्तीत जास्त पैसा, आपले अंदाजपत्रक झोपडपट्टीमुळे कधीकधी डळमळीत होते. किती टक्के टॅक्स आपल्याला झोपडपट्टीतुन मिळतो याचा जरा आपण विचार केला तर खुप मोठी तफावत तुम्हाला दिसेल. आज सुद्धा शहरामध्ये १९९५ नंतरची अनधिकृत बिल्डिंग बनलेल्या आहेत त्याच्यामध्ये राहणारी लोक मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय आहेत त्यांच्या चुकीमुळे असेल किंवा काही कारणामुळे असेल कि ते त्या फ्लॅटमध्ये राहायला आले. प्रत्येक वर्षी आपल्याला हजारोंच्या संख्येने ते कर देतात. परंतु त्या ठिकाणी आज पाणी नाही. मी अशा एका दुर्देवी इमारतीचा चेअरमन आहे मला वाईट वाटते की मी नगरसेवक असुन सुद्धा त्यांना पाणी देऊ शकत नाही. परंतु कायद्याची अडचण आपल्याला आहे. झोपडपट्टीबद्दल आमच्या बऱ्याच नगरसेवक/नगरसेविकांना प्रेम दिसते कारण ऐनवेळी ते झोपडपट्टीला उपयोगी येतात असे मला वाटते. आलेले असतील. परंतु याच्यापुढे सुद्धा त्यांनी विचार केला पाहिजे की आपल्या प्रभागामध्ये झोपडपट्ट्या बनू नयेत आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी. याच्यामध्ये असा काही उल्लेख आपण केलेला नाही फक्त महसुल वाढावा म्हणुन जर झोपडपट्टीला कनेक्शन दयायचे असेल तर सरसकट भाईंदरमधल्या सर्व बिल्डिंगला पाणी देऊन टाका. आपला प्रचंड प्रमाणात महसुल वाढेल. शासनाचे आदेश आहेत हे मला माहित आहे. परंतु शासनाचे आदेश असुन सुद्धा कशा तऱ्हेने पाणी देता येईल हे आपण ठरवु शकतो. आमचे छोटे बंधु सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील याबद्दल माहिती देतील कारण त्यांना त्यांच्य बाबतीत कशा तऱ्हेने मार्ग काढायचा निश्चितच ते हुशार आहेत. १९९५ नंतरच्या झोपडपट्टींना आपण पाणी देणार आहात का? हा येथे प्रश्न महत्त्वाचा आहे. १९९५ नंतरची झोपडपट्टी बनली त्यांना जर आपण पाणी देणार नसाल आणि त्या प्रभागातील आपण स्टँडपोस्ट काढुन घेणार असाल तर मग ते लोक पाणी कुठुन पितील? आपण सांगितले की, जनरल स्टँडपोस्ट कायमचे बंद करु. मग ह्यांच्या पाण्याचा प्रश्न कसा सुटेल? आज ह्या झोपडपट्ट्या हजारोंच्या संख्येने आहेत. त्या लोकांचे नेतृत्व हेच आमचे नगरसेवक करणार आहेत. पाणी मिळत नाही म्हणुन तेच आपल्याकडे मोर्चे घेऊन येतील आणि त्यासाठी आपण वेगळा निर्णय घेऊ. अशा तऱ्हेचा निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. जर आपण त्यांना स्वतंत्र नळ कनेक्शन देणार असु. मग बिल्डिंगच्या लोकांना आपण पाणी का देऊ नये? आणि ही भावना संपूर्ण शहराची आहे. कारण मध्ये एका संस्थेने चार दिवसापूर्वी भाव वाढल्या संदर्भामध्ये एक मिटिंग ठेवली होती. साडेतीन रुपयाचे आम्ही सात रुपये केले. मी त्यांना समजावुन सांगितले की तुम्हाला एक टँकर पाणी ७० रु. मध्ये मिळते की जे आपण साडे तीनशे ते चारशे रुपयात देतो ते त्यांना पटले. पण पाणी मिळत नाही ही त्यांची भावना आहे. आज देखील अपुऱ्या अवस्थेत त्यांना पाणी येते. नळाला प्रेशर नाही. असे असताना जर हजारोंच्या संख्येने कनेक्शन आपण झोपडपट्टीला दिले तर किती टक्के पाण्याचा परिणाम त्या नळावर होणार आहे. पाण्याच्या पाईप लाईन वर होणार आहे. आणि इमारतीतील लोक जे हजारोने आपल्याला टॅक्स देतात. त्यांना ते भोगावे लागणार आहे. याचा आपण विचार केला पाहिजे. असा सगळ्या दृष्टीने आपण विचार केलात तर माझी या ठरावाला मान्यता नाही. स्वतंत्र नळ कनेक्शन देण्याच्या विरोधात मी आहे. १९९५ पूर्वीच्या झोपडपट्ट्या जर असतील तर त्यांना आपण ग्रुप कनेक्शन दयायच पूर्वीच मान्य केलेले आहे. स्वतंत्र कनेक्शन जर प्रत्येक झोपडीला दिले तर पाण्याचा ताण आपल्या पाण्याच्या व्यवस्थेवर पडेल आणि पुन्हा दुसरी नवीन योजना आपल्याला राबवावी लागेल. एवढेच मला सांगायचे आहे.

**अनंत पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, आता जी काही पाणी पुरवठ्याबद्दल चर्चा झालेली आहे. त्यात सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे यांनी जो काही प्रश्न उपस्थित केला. मोठ्या पोटतिडकीने त्यांनी भुमिका मांडली. झोपडपट्टीची अवस्था फार दयनीय आहे. राई, मोर्वा, मुर्धा, उत्तन विभागातील ही नागरिक झोपडपट्टीमध्ये रहावयास गेले आहेत. परंतु नळ कनेक्शनसाठी ते वंचित झालेले आहेत. अनेक लोकांचे अर्ज पेंडिंग पडले आहेत. आणि अशा स्थानिक भुमिपुत्रांचे वास्तव्य झोपडपट्टीत जरी असले तरी

त्यांना झोपडपट्टींना नळ कनेक्शन देणे हे आपले कर्तव्य समजुन त्यांना पाणीपुरवठ्यासाठी कनेक्शन दयावे. कारण हा प्रश्न गेल्या बऱ्याच वर्षापासुन आहे आणि म्हणुनच त्यासाठी झोपडपट्टींना कनेक्शन देण्यासाठी माझी सभागृहाला विनंती आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम हा झोपडपट्टी विभागासाठी जो आज आपल्या सभागृहासमोर आलेला आहे. या अगोदर राखीव प्रभाग म्हणुन ठराव क्र.५२ मध्ये आम्ही स्टँडिंग कमिटीला मान्यता दिली. आम्हाला त्यावेळी स्टँडिंग कमिटीमध्ये तत्कालीन आयुक्तसाहेबांनी सांगितले की हा कायदयाने नियम आहे. राखीव प्रभागामध्ये वैयक्तीक नळ कनेक्शन देखील त्याला कायदयाने अधिकार दिलेले आहेत. त्यावेळी पेपरदेखील मिळाले. परंतु आज हा विषय ह्या सभागृहापुढे संपुर्ण मिरा भाईंदर शहरासाठी येतो आहे अतिशय चुकीचा विषय आहे असे मला या ठिकाणी वाटते. कारण आज देखील जे पाणी आम्हाला शहरामध्ये मिळते ते पुरेसे पाणी सोसायटींनादेखील मिळत नाही. आज काही सोसायटींना पंधरा फ्लॅट आहेत त्या ठिकाणी दोन नळ कनेक्शन आहेत. पण ती सोसायटीदेखील आज टँकरचे पाणी पिते. आणि आपण झोपडपट्टीमध्ये तर वैयक्तीक नळ कनेक्शन दिले. तर या पुढील विषय किती गंभीर होईल. आज भाईंदर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी आहे. आपण प्रत्येक वेळेस झोपडपट्टीचा विचार करित गेलो. तर इतर सोसायटीच्या बाबतीत आपण काय विचार करणार? जे टॅक्स भरतात, कायदयाने ते फ्लॅटमध्ये राहतात. पंधरा फ्लॅटच्यामागे आपणएक नळ कनेक्शन एक इंचाचे देतो. त्यांना आपण पुरेसे पाणी मिळत नाही. आणि आपण हा जो सभागृहामध्ये विषय आणलेला आहे. तो चुकीचा वाटतो. कारण सोसायटीमध्ये राहणाऱ्या लोकांवर निश्चितपणे याचा परिणाम होणार आहे. आणि त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. आज खऱ्या अर्थाने तुम्ही बघा, सगळ्या ठिकाणीसुद्धा नळ कनेक्शन असुनदेखील टँकर चालू आहेत आणि माझ्या प्रभागामध्ये एक झोपडपट्टी आहे. हरिश्चंद्र नगर झोपडपट्टी त्या ठिकाणी मी स्वतः जाऊन चौकशी केली आणि झोपडपट्टीच्या लोकांना जाऊन विचारले की तुम्हाला इकडे वैयक्तिक नळ कनेक्शन हवे आहे का? आज मी तुमच्या समोर त्या झोपडपट्टीमधील लोक उभे करतो. त्यांनी आम्हाला नकार दिलेला आहे. बोलले आमच्याकडे दोन नळ कनेक्शन आहेत. आम्हाला पुरेसे पाणी मिळते. मी स्वतः जाऊन चौकशी केलेली आहे. परंतु अशाप्रकारे आपण जर ठराव मंजुर केला तर यापुढे शहरामध्ये फार मोठा असंतोष घडेल. आणि जे लोक सोसायटीमध्ये राहतात. त्यांच्यावर अन्याय केला जाईल. ग्रुप कनेक्शनवर कोणाचाही विरोध नाही. आणि ह्या अगोदर देखील ग्रुप कनेक्शनला आम्ही मान्यता दिलेली आहे आणि ग्रुप कनेक्शनचीच मान्यता दयावी, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. आता माझ्या वडिलांचे मित्र सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी म्हटले की झोपडपट्ट्या वाढता कामा नये. मला असे वाटते की , आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या म्हणण्याप्रमाणे लोंढा बाहेरुन यायला नको या मताशी आपण सहमत आहात का? आपण काँग्रेसमध्ये आहात. आपल्या मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, बाहेरुन येणाऱ्या लोकांना जर थांबवते तर आम्ही त्याच्यावर गुन्हा दाखल करु. आणि ते तुम्ही रिपीट करता की झोपडपट्टी आली नाही पाहिजे. तुमचे मुख्यमंत्री म्हणतात की, बाहेरचे लोक येणारच. मग झोपडपट्टी वसणारच. सर्व लोक इथे बाहेरुन कमवायला येतात. दुसरी गोष्ट म्हणजे १९९५ पूर्वीची जी झोपडपट्टीमध्ये लोक आहेत. ज्यांना फोटोपास दिलेले आहेत त्यांना तुम्ही कनेक्शन दया. जेणेकरुन महानगरपालिकेला महसुल वाढेल. आमचे म्हणणे असे नाही की काल एखाद्याने झोपडी बांधली तर त्याला कनेक्शन दया. बिल्डिंगलादेखील देत नाही. पाण्याची समस्या तुमच्या मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार वाढणार आहे. कारण लोंढा आपल्याला थांबवायचा नाही. तो लोंढा येतच राहिल त्यामुळे पाण्याची समस्या तशीच राहिल. आता ७० एम.एल.डी. ने पाणी येते. नंतर १४० एम.एल.डी. लागणारच हे शहर भरभराटीने वाढत आहे. तर पाणी तर लागणारच. आमचे असे म्हणणे नाही की १९९५ नंतरच्या लोकांना पाणी दया. १९९५ च्या अगोदरच्या लोकांना पण पाणी दया. आम्ही काही झोपडपट्टी वसवत नाही. हा जो वैयक्तिक कनेक्शन देण्याचा जो ठराव आहे. हा स्टँडिंग कमिटीमध्ये मंजुर केलेला आहे. त्यावेळी सर्व पार्टीचे सदस्य हजर होते. त्यावेळी विरोध केलेला नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आम्ही विरोध केला आहे.

**शरद पाटील :-**

आम्ही विरोध केला आहे. नावासहित विरोध केलेला आहे.

**आसिफ पाटील :-**

विरोध नाही आहे स्टँडिंगची मंजुरी बघा.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक आसिफ पटेल एक वर्षभर बोलले नाहीत आणि एका वर्षाचा कोटा एका दिवसात संपवायाला बघता काय. मला आज कळल कि त्यांना बोलता येते. इतके दिवस मी समजत होतो कि त्यांना वत्कृत्व नसेल, त्यांना चांगले वत्कृत्व आहे. त्यांनी शिवसेनेचा उल्लेख काढला कदाचित त्यांना माहित नसाव मी शिवसेनेचा शाखाप्रमुख होतो आणि मला त्याचा अभिमान आहे.

**आसिफ पटेल :-**

माझे वडिलदेखील शिवसेनेचे शाखाप्रमुख होते.

**जयंत पाटील :-**

तरीसुद्धा तुम्ही वडिलांच्या विरोधात बोलता.

**आसिफ पटेल :-**

साहेब, मी विरोधात बोलत नाही.

**जयंत पाटील :-**

मला सांगायला अभिमान वाटतो की, मी शिवसेनेतुन घडलेला नागरिक आहे. माझे जे राजकीय जीवन घडले. ते शिवसेनेतच घडले. आजसुद्धा शिवसेना नेते बाळासाहेब ठाकरे यांचा मी आदर करतो.मी जरी काँग्रेसचे तत्वज्ञान मांडणार असलो तरी आणि झोपडपट्टीबद्दल जे काही मी बोललो ते काही चुकीचे बोललो नाही. कोणी ही यावे आणि इकडे झोपड्या बांधाव्या असे आपले मत आहे का?

**आसिफ पटेल :-**

असे आमचे मुख्यमंत्र्याचे मत आहे.

**जयंत पाटील :-**

त्यांनी झोपड्या बांधाव्या असे सांगितले आहे का?

**आसिफ पटेल :-**

माझ्याकडे पेपर कटींग आहेत. जेव्हा राज ठाकरे साहेबांनी हे सांगितले की आम्ही बाहेरुन येणाऱ्या लोंढ्यांना थांबवु यावर मुख्यमंत्री साहेबांचे स्टेटमेंट आहे.

**जयंत पाटील :-**

सभागृहात अध्यक्षांना संबोधुन बोलायचे असते. आपण वैयक्तीक बोलायचे नसते. कुठेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले नाही कि कोणीही या आणि कुठेही झोपड्या बांधा आणि जर ह्या झोपड्या बांधायच्या झाल्या तर प्रशासन आपले डळमळीत होईल. आपले संपुर्ण बजेट संपुन जाईल. आपण चुकीचा त्या गोष्टीचा अर्थ लावलेला आहे आणि याच्यामुळे मिरा रोडमध्ये ज्या घटना घडत आहेत दुःखाने सांगावे लागते तो विषय इथला नाही आणि अशा गोष्टींमुळे मिरारोडमध्ये घटना घडलेल्या आहेत आणि देशावर संकट आलेले आहे.  आज जे मिरारोडमध्ये अतिरेकी सापडलेले त्यामुळे मिरा-भाईंदरचे नाव खराब झालेले आहे आणि आम्हाला शरम वाटते की या शहराचे आम्ही नागरिक आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

हे अतिरेकी आलिशान टॉवरमध्ये सापडले.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मिरा रोड में ही क्युं आया। भाईंदर में क्यु नाही आया।

**जयंत पाटील :-**

में आपसे सहमत हुँ। मगर पेपर में आते टाईम उसका मिरा-भाईंदर किया जाता है। थोड्या दिवसामध्ये भाईंदरमध्ये इमारतीला कस्टमर्स देखील येणार नाहीत. या शहरामध्ये आपण झोपडपट्ट्या बनवायच्या का? या झोपडपट्ट्या आपल्याला हव्या आहेत का? आणि अशी लोक जर झोपडपट्टीमध्ये आली आणि उद्या आमचे सभागृह इथे वसलेले आहे. आणि याच्यावर जर बॉम्ब टाकला तर आपले काय होईल? संसदेवर हल्ला होऊ शकतो. इकडे हल्ला होणे काही कठिण नाही. कोणत्याही तऱ्हेचे प्रोटेक्शन या ठिकाणी नाही. माझा सांगण्याचा उद्देश एवढाच की, झोपडपट्टीला वैयक्तीक कनेक्शन दिल्यानंतर संपुर्ण यंत्रणा या ठिकाणची बिघडुन जाईल. या यंत्रणेवर एवढा ताण येईल. आणि सगळ्या गोष्टी आपण झोपडपट्टीच्या करत आहोत. कोणासाठी, कशासाठी करतो? पाच वर्षानंतर येणाऱ्या निवडणुकीसाठी का?  येणारी पिढी या गोष्टीसाठी आपल्याला दोष देईल याचा निश्चितच आपण विचार करावा. एवढीच माझी विनंती आहे.  १९९५ पूर्वीच्या झोपडपट्ट्यांना पाणी दयावेच लागेल. हे मला मान्य आहे. परंतु १९९५ पूर्वीच्या झोपडपट्टयांना जर आम्ही पाणी दिले. १९९५ पूर्वीच्या झोपड्यांना जर आपण पाणी दिले तर आपण स्टँडपोस्ट काढणार आहात का? मग कोण तुमचे पाणी विकत घेईल? स्टँडपोस्ट जर तुम्ही

काढु शकत नाही तर तुमचे पाणी विकत कोण घेणार आहे? आणि १९९५ च्या नंतरची जी लोक तिथे राहतात त्यांचे तुम्ही काय करणार? १९९६ पासुन २००३ पर्यंत जी लोक झोपडपट्टीमध्ये राहायला आली त्या लोकांना पाणी कुठुन देणार? त्या लोकांचा मोर्चा घेऊन तुम्हीच येणार आहात. त्यांचा मोर्चा घेऊन आपण नेतृत्व करणार आहात. महापौर मॅडम बराच वेळ झालेला आहे सव्वा सहा वाजलेले आहेत. आणखी दोनचार विषय आहेत सभा जर आपण तहकुब केली तर बरे होईल या ठरावानंतर सभा तहकुब करा आणि नंतर घ्या म्हणजे सविस्तर चर्चा करता येईल.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांनी मा. बाळासाहेबांविषयी जो विषय काढला की मुंबईमध्ये येणारे परकीय लोंढे या संदर्भात जो त्यांनी विचार केला या त्यांच्या पूर्ण मताशी आम्ही सहमत आहोत आणि हे मत सन्मा. सदस्य जयंत पाटील यांना देखील पटलेंले आहे. म्हणुन त्या संदर्भात त्यांनी तसे मत मांडलेले आहे. या महाराष्ट्रामधील विधानभवनावर बसणाऱ्या प्रत्येक नेत्याला आणि मंत्र्याला देखील हे पटलेले आहे की मुंबईमध्ये येणारे लोंढे थांबवा. पण प्रत्यक्षात कोणीही बोलत नाहीत. ते फक्त बोलण्याचे धारिष्ट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांनीच फक्त केलेले आहे. आणि हे लोंढे थांबलेच पाहिजेत. महापालिकेत शासनाच्या जागेवर असणाऱ्या झोपडपट्ट्या महापालिका त्याला रस्ते, गटारे, पाणी, लाईट इत्यादी सुविधा पुरविते आणि त्यांच्याकडुन आपल्याला अल्पशा प्रमाणात घरपट्टीच्या स्वरुपात पैसा मिळतो आणि जे आमचे नागरिक सोसायटीमध्ये राहत असुन त्यांच्यावर आम्ही भरमसाठ घरपट्टी व पाणीपट्टी वाढविलेली आहे. ते या सुविधापासून वंचित होतात. आज झोपडपट्टीमध्ये अर्ध्या झोपडपट्टीला एक-अर्धा इंचाचे कनेक्शन आपण देतो. त्या झोपडपट्टीमध्ये एका घरात राहणारी चार माणसे आणि आमच्या सोसायटीमध्ये राहणारी या लोकांना जर देत असाल तर सरसकट सर्वांना कनेक्शन दया. हीच आमची शिवसेनेची भुमिका असणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम सभागृहाला विनंती करतो की ज्यांनी ज्यांनी झोपडपट्टीला नळ कनेक्शन देणेबाबत या ठिकाणी शिफारस केलेली आहे. आणि ज्यांनी ज्यांनी विरोध केलेला आहे त्या दोघांना देखील विनंती करतो की ज्यांनी ज्यांच्या प्रभागात झोपडपट्ट्या आहेत. त्यांनी त्याला समर्थन दिलेले आहे. ज्यांच्या प्रभागात झोपडपट्टया नाहीत त्यांनी त्याला समर्थन दिलेले नाही. उदाहरणार्थ सन्म. सदस्य जयंत पाटील आणि मी मघाशी सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी काही गोष्टी आपल्यासमोर सांगितल्या खरतर साहेब, या प्रशासनीक बाबीमध्ये इतका गोंधळ आहे की तुमच्या प्रशासनाने आमच्यामध्ये झगडे लावलेले आहेत. असा मी स्पष्ट आरोप करतो आणि या ठिकाणी मी हे सिद्धदेखील करतो. मला फक्त संधी दया. प्लीज गीव्ह मी ॲन ॲपॉरचुनीटी आणि तुमच्या अधिकाऱ्यांना जरा इथे उभे सांगायला की त्यंनी कोणाला काय सांगितले ते ही सगळी सभागृहात जी भांडणे चाललेली आहेत ती त्याच्यामुळेच ना.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब आम्ही आपला आदर करतो. आपण वैयक्तिक अशा प्रकारचे वक्तव्य करु नका.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांनीसुद्धा आदर करायला शिकले पाहिजे. साहेब, मी आजपर्यंत कधीसुद्धा शिस्तीच्या बाहेर जाऊन बोललो नाही. आजपर्यंत बोललो नाही. तुम्हाला माहिती आहे मी तुमच्याबरोबर अतिशय प्रामाणिकपणे आणि शांत भाषेत बोलतो आहे. हे जे आज काय चालले आहे तर ते केवळ अधिकाऱ्यांमुळे. आपण जर त्यांना पाठीशी घालत असाल. तुम्ही त्यांच्या कार्यपद्धतीची नोंद करा.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल जोपर्यंत बोलता तोपर्यंत तुम्हाला काय बोलायचे ते बोला.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब ते त्यांची कार्यपद्धती सांगतिल का?

**मा. आयुक्त :-**

त्यांची धोरण चुकीची असतील, कार्यपद्धती जर चुकीची असेल तर आपण जरुर बोला.

**प्रफुल्ल पाटील :-**

पाहिले त्यांच्या कार्यपद्धतीच्या अगोदर त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीला विचारा. या ठिकाणी सन्मा. नगरसेविका ज्योत्स्ना हसनाळे उपस्थित आहेत. त्यांनीच हा विषय झोपडपट्टीला कनेक्शन देण्याचा विषय पुढे आणलेला आहे. आपण दशोरेंची चांगली बाजु मांडली. साहेब आपण मला हे विचारले नाही की, सन्मा. सदस्य एखाद्यावर आरोप करण्यापर्यंत जातो. या सभागृहात मागच्या सभेत मी बोललो तेव्हा

कोरम पूर्ण नव्हता. सभागृहात मी बोललो की, हे काय चालले आहे? या सभागृहाची शिस्त, सभाशास्त्र त्याच्यानंतर आपण जी पाण्याची योजना करित आहोत हे सगळे महत्त्वाचे विषय असताना देखील या सभागृहामध्ये मिटींग होत नाही. आणि त्या वेळी असा कोणताही विषय निघाला नाही की झोपडपट्टीत नळ कनेक्शन दयायला माझा विरोध आहे. पण या व्यक्तीने त्यांना सांगितले की झोपडपट्ट्याना कनेक्शन दयायला सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांचा विरोध आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मॅडम त्यावेळी आपली तब्येत ठिक नव्हती. आम्ही देखील त्यावेळी अनुपस्थित होतो. आम्ही सभागृहामध्ये आलो नव्हतो. येऊन देखील आम्हाला काही काम होते म्हणुन आम्ही बाहेर निघुन गेलो होतो. त्यानंतर मी सभागृहामध्ये मिटिंग झाली की नाही म्हणुन दशोरे साहेबांच्या केबीनला गेले. आणि त्याचवेळी दशोरे साहेबांनी मला म्हटले की या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे. आणि काही खरं दिसत नाही की कनेक्शन मिळेल की नाही ते. मी म्हटल की माझ्या वॉर्डचा प्रश्न वेगळा आहे. राखीव प्रभाग आहे म्हणुन त्याला मी मागणी केलेली आहे आणि राखीव प्रभागातील नागरिकांना त्यांचा अधिकार मिळाला पाहिजे. म्हणुन स्थायी समितीने त्याला मंजुरी देऊन हा ठराव पास केलेला आहे. इतर झोपडपट्ट्यांचे म्हटले काय झाले? तर ते म्हणाले त्यावर खुप चर्चा झालेली आहे. आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनीदेखील त्याला विरोध केला तर त्याचवेळी जस्ट हा शब्द त्यांनी बोलले असतील नसतील त्याचवेळी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील समोर आले. आणि मी लगेचच त्यांना म्हटले की काय साहेब तुम्ही माझ्या ठरावाला का विरोध करता. मी त्यांना लगेच विचारले. तर ते म्हणाले की असे काहीच नाही. तर मी म्हटले की साहेब कधीच विरोध करणार नाहीत. ही माझी शाश्वती आहे. माझ्या कुठल्याही कामाला साहेब विरोध करणार नाहीत. तुम्ही मला काहीही सांगा असे मी त्यांनादेखील म्हटले आणि त्याच्यानंतर मी साहेबांना भेटली पण मी साहेबांना विचारले की साहेब तुम्ही असे असे त्यावेळी मिटिंगमध्ये बोललो का? तर ते म्हणाले की मी असे काहीच बोललो नाही. तर अशा प्रकारचे गैरसमज अधिकाऱ्यांनी कोणत्याही नगरसेवकांच्यामध्ये करु नयेत. कुठलाही अधिकारी असु दे. कारण होते काय? आम्ही सभागृहामध्ये बसतो. अधिकाऱ्यावर प्रेशर टाकायला पण इथे वादविवाद होतात. नगरसेवकांमध्येच त्या पक्षाची लोक या पक्षाच्या लोकांना बोलतील आणि मग पक्षापक्षाच्या लोकांमध्ये भांडण होऊन त्याचा फायदा अधिकारी लोक उचलतात. इथे क्लेम करायचा असतो अधिकारी लोकांना. परंतु इथे सभागृहामध्ये वेगळेच चित्र निर्माण होते. इथे नागरिक पत्रकार आहेत. सगळेच बघतात. सगळे नगरसेवक सुज्ञ आहेत. कुणी याच्यामध्ये अडाणी नाही आणि इतक्या प्रचंड मताने निवडुन सभागृह चालविण्यासाठी इथे आलेले आहेत. म्हणजे सगळेच चांगल्या अक्कल हुशारीने आणि बुद्धीमत्तेने इथे बसलेले आहेत. परंतु इथे बसल्यानंतर या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनाने जेव्हा आम्ही बोलत असतो, आम्ही आमचे विचार मांडत असतो. आमच्या भावना मांडत असतो.त्यावेळी आमचे जेव्हा उत्तर प्रत्युत्तर चाललेले असतात. त्याचा फायदा अधिकारी वर्ग घेतो. आणि आमच्याकडुन अशी चुकी होते की आम्ही त्यांच्यावर क्लेम करण्याऐवजी एकमेकांवर क्लेम करित बसतो. आणि आमच्यावर प्रतिआरोप होत असतात. आणि त्यामुळे असे अधिकारी सुटले जातात. मी म्हणत नाही की सगळेच अधिकारी दोषी आहेत. पण बहुतेक अधिकारी याचा फायदा घेतात. आणि प्रशासनाच्या या बाबी मा. आयुक्त म्हणुन आपण देखील लक्षात घेतल्या पाहिजेत. आणि मा. महापौर मॅडम आपणदेखील लक्षात घेतल्या पाहिजेत. कारण मिरा-भाईंदर शहराचा विकास व्हायचा असेल तर या अधिकाऱ्यांच्या दबावाखाली आम्हाला राहायची गरज नाही. आम्ही जनतेचे प्रतिनिधी आहोत. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. आम्ही इथे जे भांडतो ते लोकांसाठी भांडतो. सन्मा. सदस्य ज्योत्स्ना हसनाळे कुठली गोष्ट मांडत असेल तर तिला दीड हजार लोकांनी निवडुन दिलेले आहे. ती त्यांचे प्रतिनिधित्व करते. आणि त्यांच्या समस्या या ठिकाणी मांडते. मी माझे व्यक्तिगत काही मांडत नाही. तर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील काय म्हणत असतील तर ते त्यांच्या प्रभागातील लोकांसाठी बोलतात कोणीही व्यक्तिगत कुठल्याही कायदयासाठी नगरसेवक याठिकाणी बोलायला येत नाही. याचा सर्व अधिकाऱ्यांनी म्हणा या गोष्टी जाणुन घेतल्या पाहिजेत. कुठलाही सभासद उठतो आणि त्याचे खेळीमेळीचे वातावरण होते. त्याचा फायदा आपण उचलु नका. आम्हालाही कळत की अधिकारी वर्ग कशा प्रकारची वागणुक आम्हाला देतात. कशा प्रकारची उडवाउडवीची उत्तरे देतात. कशाप्रकारे एका केबीनमधुन दुसऱ्या केबीनमध्ये नगरसेवकांना चकरा मारायला लावतात. आम्ही सगळे आमच्या डोळ्यांनी पाहतो. पण कधी कधी आम्ही बघुन आंधळे बनता. तर अशाप्रकारे घडलेले आहे त्यांनी जे म्हटले ते बरोबर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांना मी विनंती करतो की, पाटील साहेबांनी रागाच्या भरामध्ये जे शब्द काढलेले आहेत की दशोरे साहेबांना म्हणजेच अधिकाऱ्यांना फटके दिले

पाहिजेत. तर माझी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांना विनंती आहे की, हे शब्द आहेत ते कामकाजातुन काढुन टाकावेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही कृपया बसा माझी वकिली करु नका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी वकिली करीत नाही. मी तुम्हाला अपिल केलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठीक आहे. तुम्ही कारवाई करा. दोघांचे ऐकल्यानंतर तुम्हाला काय खरे कळले? तुम्ही सभागृहाचे नेते आहात ना. म्हणजे आमचेदेखील नेते आहात. मग असं सांगा आपण माझ्याकडे या. मी तुमच्याकडे येतो. आणि तिघांना बसवुन मग मिटवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मला वाटते तुम्ही सक्षम आहात.

**प्रफुल्ल पाटील :-**

सभागृहामध्ये एखाद्या अधिकाऱ्याचा अपमान होतो असे वाटत असेल पण सभागृहाचे नेते तुम्हीच आहात. मी आयुक्त साहेबांकडे कधीही तक्रार, विरोध केलेला नाही किंवा लेखी आणि तोंडीपण तक्रार कधीही केलेली नाही आणि अशा परिस्थितीमध्ये दशोरे ह्यांना वाईट बोललो असेल तर मी माफी मागतो.

**दशोरे :-**

मा. महापौर मॅडम नगरसेवक कॅबीनमध्ये येतात आणि किती वेळा जनरल डिसकशन होत असते. सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे स्थायी समितीमध्ये असताना स्वतंत्र नळ कनेक्शनचा विषय होता. त्यावेळी ते बऱ्याचवेळा कॅबिनमध्ये येऊन बोलायचे की लोकांचे काय म्हणणे आहे. आणि तेव्हा हे डिसकशन आमच्या कॅबिनमध्ये होत असताना तुम्ही ह्याविषयावर आमच्याबरोबर बोलु नका किंवा बाहेर जा असे मी त्यांना सांगु शकत नाही. ते मला येऊन विचारायचे कोणा कोणाचा विरोध आहे. कोण विरोध करतो का विषयाला. पण मी शेवटी माणुस आहे आणि माझ्या डिसकशनमध्ये तसे आले. आणि ते आमच्या कॅबिनमध्ये येऊन चर्चा करतात व मला विचारतात तेव्हा ते नगरसेवक असल्यामुळे मला पण सहभाग घ्यावा लागतो. शेवटी मी पण माणुस आहे आणि मी जे असे काही बोललो त्याची सभागृहासमोर माफी मागतो.

**मा. आयुक्त :-**

जरी असे झालेले आहे. ते त्यांनी कबुल केलेले आहे व त्याबद्दल त्यांनी माफी मागितली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

जी चर्चा झालेली आहे. ती आपण इतिवृत्तांतुन काढुन टाकावी असे मी सांगत आहे. कारण शेवटी प्रश्न धोरणाचा आहे.

**मा. महापौर :-**

आजची सभा तहकुब करण्यांत येत आहे. पुढची सभा कधी घ्यायची हे मी नंतर घोषित करणार आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०६.४५ वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**